TIGHT BINDING BOOK

UNIVERSAL
LIBRARY
OU_196177
UNIVERSAL
LIBRARY

**OSMANIA UNIVERSITY LIBRARY**

Call No M181.4/N72V Accession No. M4041

Author निरंजन ... गं. भा.

Title विचार धारा

This book should be returned on or before the date last marked below

# विचार-धारा

संपादक

प्रा. गंगाधर भाऊराव निरंतर, एम्. ए.
बृ. म. कॉलेज ऑफ कॉमर्स व फर्ग्युसन् कॉलेज, पुणे

व्हीनस बुक स्टॉल : पुणें २

आवृत्ति पहिली : १९४९

( सर्व हक्क प्रकाशकाचे स्वाधीन )

मूल्य तीन रुपये फक्त

प्रकाशक
**सदाशिव कृष्ण पाध्ये**
व्हीनस बुक स्टॉल
अप्पा बळवंत चौक . पुणें २

मुद्रक
**न. वि. सरदेशपांडे**
आदर्श मुद्रणालय
३९५/५ सदाशिव . पुणे २

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १ | ज्ञान धर्माला व नीतीला पोषक नाहीं काय ?<br>— वा म. जोशी | १ |
| २ | ग्रहणें — श बा दीक्षित .. .. | १९ |
| ३ | बुद्धजयंति .. ...<br>— न चि केळकर | २९ |
| ४ | अर्जुनाचा वेडेपणा . ...<br>— शि म परांजपे | ४२ |
| ५ | समाजधर्म . ...<br>— ना गो चापेकर | ५२ |
| ६ | अज्ञान-वृक्षाच्या सांवलींत<br>— श्री म माटे | ६० |
| ७ | समाजशास्त्रांतील विवेकवाद ...<br>— द के केळकर | ७२ |
| ८ | सत्य आणि अहिंसा ... ...<br>— न र फाटक | ८९ |
| ९ | आपल्या पूर्वजांचा परिचय करून देणारा<br>चार्लस डार्विन — पा म साने | १०० |
| १० | विज्ञान आणि जीवननिष्ठा . ..<br>— श द जावडेकर | ११४ |
| ११ | प्रचंड शक्तीचा आवेश . ...<br>— श्री दा. सातवळेकर | १२७ |
| १२ | महाराष्ट्रांतील औद्योगिक क्रांति ...<br>— श वा किर्लोस्कर | १३६ |
| १३ | पंढरी ...<br>— द बा कालेलकर | १४८ |
| १४ | व्यासांचा आक्रोश ! .. .<br>— म ज भागवत | १५६ |

# प्रस्तावना

वाङ्मयप्रकार या दृष्टीने लालित्यात प्रतिष्ठा पावलेला मराठी निबध हा प्रामुख्याने विचार प्रकटीकरणाचे एक साधन, एक प्रभावी माध्यम म्हणूनच अवतीर्ण झाला आज जुन्या निबधापासून म्हणजे अस्सल मराठी निबधापासून आग्ल सस्कारानी व्यक्त झालेला आधुनिक निबध निराळा दाखविण्यासाठी आधुनिक निबधास 'ललित निबध' असे सबोधण्यात येते आणि निबध आणि ललित निबध असा भेद करण्यात येतो आज ललित निबधास काही लालित्य-प्रधान कलावताच्यामुळे वाङ्मयीन प्रतिष्ठा प्राप्त झाली आहे, तरी मराठी निबधाचा मूळचा पिड वैचारिक आहे

इग्रजी अमलाचे आरभी सामाजिक जीवनावर आणि विचारवताच्या वैयक्तिक जीवनावर जे परिणाम झाले ते वाङ्मयात प्रकट होऊ लागले अर्वाचीन गद्य त्यातून जन्मास आले अनेक नवे नवे विचार मनात येत ते व्यक्त करण्यासाठी वाङ्मयाचा आश्रय करण्यात येऊ लागला सामाजिक जीवनात आलेल्या नवविचाराचे वाङ्मयात प्रतिबिब आणि पडसाद दिसू लागले, हाक येऊ लागले कोणी नाटके लिहिली, कोणी कथा लिहिल्या, कोणी 'शास्त्रीय' ग्रथ लिहिले कोणी इग्रजी ग्रथाची सरळ भाषातरे केली, कोणी इग्रजी ग्रथातील विचाराच्या आधारे आपल्या समाजस्थितीचा उहा-पोह सुरू केला वाङ्मयाचे निरनिराळे प्रकार दिसू लागले खरे, परतु ते विचार व्यक्त करण्याच्या इच्छेनेच स्वीकारलेले दिसतात

आग्लाईच्या आरभी जे नवे समाजजीवन सुरू झाले, जी वैचारिक आदो-लने झाली ती अतिशय व्यापक स्वरूपाची होती आपला धर्म, समाजरचना, इत्यादि सर्वच घटकाचा फेरविचार सुरू झाला आणि नवविचाराचे अनेक प्रवाह पुढे राजकारणात मिळून गेले राजकीय प्रश्नानीच सर्व जीवन व्यापले तरी इतर प्रश्नाची चिकित्सा होतच राहिली

पहिला प्रभावी नवविचार हा धर्मकारणासबधीचा होता आग्लविद्या-विभूषितानी आपल्या समाजजीवनाची चिकित्सा सुरू केली त्या वेळी त्याना असे आढळून आले की, आपल्या समाजजीवनावर परपरागत धर्मविचाराचे अतिशय मोठे नियत्रण आहे त्यामुळे त्यानी धार्मिक आचारविचाराची चर्चा अतिशय हिरीरीने केली राजकीय जीवनाविषयी एक प्रकारची निर्धास्त वृत्ति आरभी होती आणि सामाजिक जीवनाचीच चर्चा होत राहिली 'सुधारक'

हे जवळ जवळ विशेषनाम व्हावे इतक्या आवेशाने एकतानतेने समाज सुधारणेचे विचार माडणारे आद्य समाजसुधारक मुख्यत धर्मकारणाचीच चिकित्सा करीत होते त्यासबधी टीकाप्रतिटीकेची रणे माजली सुधारक, दुर्धारक, सनातनी, हे शब्द पक्षवाचक झाले मतप्रसाराच्या, खडनमडनाच्या कार्यात निबध लिहिले गेले ते केवळ वाङमयासाठी, कलाविष्कारासाठी लिहिले नाहीत ते स्पष्टपणे मतप्रचारासाठी लिहिले आहेत आणि निबधातील वाङमयगुणानुसार तो मतप्रचार कमीजास्त प्रभावी ठरला

धर्मकारणाचा विचार हळूहळू व्यापक होत जाऊन पुढे समाजकारण हा चर्चेचा विषय झाला आणि राजकीय प्रश्नाना जीवनात अतिशय महत्त्व येत गेल्यावर राजकारणाचेहि दालन निबधात सुरू झाले ते दालन पारतत्र्यात जास्त विस्तार पावत जाणे साहजिकच होते समाजकारण आणि राजकारण या दोन विभागानी मराठी निबधाचा बराच मोठा भाग व्यापला आहे या दोन विभागात अनेक पोटविषय येत असत त्यामुळे निबधात वैचित्र्य आपोआपच येत गेले आणि वैचारिक प्रवाहाची विविधताहि निर्माण झाली

मराठी निबध हा असा प्रामुख्याने विचारधारा आहे तो भावनाचा स्वयस्फूर्त स्वयसिद्ध, स्वयपूर्ण उद्रेक नाही या विचारधारेचे आरभीचे स्वरूप, धर्म, समाज आणि राजकारण असे प्रामुख्याने विविध स्वरूपाचे दिसते परतु नवविचारप्रवाहातच पुढे अनेक उपप्रवाह निर्माण झाले आणि निबधातहि विविधता आली

पाश्चात्य विद्येने ज्ञानाची नवी नवी दालने दिसू लागली प्राचीन भारतीय शास्त्राचाहि नव्या दृष्टीने अभ्यास होऊ लागला काही विषय अगदी नवे होते ज्ञानाची ही विविध दालने निबधद्वारा वाङमयात प्रकट होणे स्वाभाविकच होते शिक्षणाची एक अगदी नवी पद्धति देशात आणि महाराष्ट्रातहि सुरू झाली ‘शाळा’ ही हिंदी जीवनात नवी घटना होती शाळा सुरू झाल्या शाळा निघाल्या की, क्रमिक पुस्तके पाहिजेतच अनेक गद्य लेखकानी पाश्चात्य शास्त्राचा परिचय करून देणारे निबध लिहिण्यास आरभ केला त्यात यत्रशास्त्र, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र इत्यादि अगदी नवे विषय आले समाजशास्त्र, अर्थशास्त्र, याच्याबरोबर विज्ञानाचाहि निबधाच्या द्वारा प्रसार होऊ लागला

आधिभौतिक शास्त्राचा सोप्या भाषेत सोप्या पद्धतीने परिचय करून देण्यासाठी लेखन ( अर्थात् गद्य ) होऊ लागले ते लहान मोठे निबधच होते.

ज्याना निबध म्हणता येईल असे हे बहुविध लेखन विचारप्रवर्तनासाठी लिहिले गेले आहे निबधाचे तेच स्वरूप आणि हेतु पुष्कळ प्रमाणात आजतागायत चालू आहे असे या ग्रथातील निबधावरून दिसून येईल या क्षेत्रात लालित्यसपन्न लेखक उतरल्याने निबधाचे 'गद्य' स्वरूप बरेचसे रसाळ होत गेले आहे तरी त्याचा पिड वैचारिकच आहे

मराठी निबधातील 'विचारधारा' विचारप्रकटीकरणाच्या अनेक माध्यमातून वाहात आली आहे तिचा आरभीचा बराच प्रवास नियतकालिकातून झाला मासिकाना स्वतत्र प्रतिष्ठा लाभल्यावर निबधात्मक विचारधारा मुख्यत मासिकातून वाहू लागली आणि ती पुढे ग्रथद्वारा प्रकट होऊ लागली

पाश्चात्य वाङमयाच्या अभ्यासाने निबधासहि शुद्ध वाङमयीन असे लालित्याचे वैभव प्राप्त झाले आज निबधातील विचारधारा विचाराबरोबर सौदर्य आणि आनद याचाहि आस्वाद देत आहे

आपली वैचारिक प्रकृति टिकवून निबधाने मराठी गद्यास लालित्याचे वैभव दिले आहे

मराठी निबधाचे स्वरूप अद्याप जरी प्रामुख्याने वैचारिक असले तरी लेखकाच्या अगच्या गुणविशेषामुळे त्यात विविधता आली आहे या ग्रथातील निबध वैचारिक स्वरूपातहि विविध प्रकारचा आनद देतात प्रत्येक लेखकाच्या शैलीत विशिष्ट आकर्षणे आहेत त्यातील लालित्याने निबधातील विचार न कळत मनात रुजत जातात आणि अविस्मरणीय होतात परतु शैली हे साधन आहे, सर्वस्व नव्हे हे या निबधात दिसून येईल

मराठी निबधाच्या या वैशिष्ट्यामुळे इतर कोणत्याहि वाङमयप्रकारापेक्षा समाजजीवनात त्यास अतिशय महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले आहे समाजजीवनाशी मराठी निबधाचा अतिशय जिव्हाळ्याचा सबध आहे तितका इतर वाङमयप्रकाराचा (निदान अद्याप तरी) जडला नाही असे म्हणण्यांत फारशी अतिशयोक्ति होणार नाही.

आरभी विचारप्रचाराचें बहुतेक कार्य वृत्तपत्रद्वाराच होत राहिले. परतु मासिकाना प्रतिष्ठा प्राप्त होऊ लागल्यावर वृत्तपत्रानी 'तूर्त पण ताबडतोब' महत्त्वाचे अशा विचारावर, अशा विषयावर भर दिला आणि मासिकातून जास्त व्यापक, चिकित्सक, स्थिर स्वरूपाचा मजकूर येऊ लागला निबध वृत्तपत्रातून मासिकाकडे वळले आणि तेथे ही विचारधारा जास्त प्रभावी स्वरूप धारण करू शकली या पुस्तकातील बहुतेक निबध मासिकातून प्रकट झाले आहेत. आणि नतर ग्रथरूपात चिरस्थायी झाले त्याचे विषय राजकीय प्रश्नाप्रमाणे तात्कालिक महत्त्वाचे नाहीत. त्यात जीवनाचे तात्विक, सामाजिक, नैतिक विचार मूलगामी स्वरूपात आले आहेत ते मानवी जीवनाच्या देशकालातीत भूमिकेवरून केले आहेत. या व्यापक भूमिकेवर भारतीय, महाराष्ट्रीय समाजाचे विवेचन केलेले आहे त्यामुळे स्वकीय वाचकाना या विषयाविषयी जिव्हाळा वाटेलच परतु स्वत विषयी विचार करता करता त्या विचाराची धारा सहजच मानवतेच्या महासागरास जाऊन मिळते

प्रत्येक निबधकाराचा स्वत चा असा जीवनविषयक दृष्टिकोण आहे. त्याचे व्यक्तित्व त्या त्या निबधातून दिसते आणि ते व्यक्तित्व सामाजिक अनुभूतीतून सिद्ध झालेले असल्याने त्या व्यक्तित्वाच्या आविष्कारात समाजजीवनाविषयी वाचकाचे उद्बोधन होते जीवनाच्या तत्वप्रणालीची ओळख या निबधातून होते आज जी नवी तत्त्वज्ञाने जीवनावर सत्ता बसवू पाहात आहेत त्याची ओळख या विचार-धारेत विहार करीत असता होईल

विज्ञानप्रधान युगात जीवननिष्ठेचे महत्त्व विसरता कामा नये, समाजशास्त्राच्या केवळ वरवरच्या विचारात विवेकवादाकडे दुर्लक्ष होऊ नये, समाजधर्माचे मूलभूत सिद्धान्त समाजरचनेच्या नव्या नव्या प्रयोगात अबाधित राखले पाहिजेत, सत्य आणि अहिसा या सनातन तत्वांचा आधुनिक आविष्कार नीट कळला पाहिजे, चिकित्सक बुद्धिवादी अशा आधुनिकासहि पढरीस किवा अजान—वृक्षाच्या सावलीत मिळणाऱ्या सुखाचा लाभ घेता येतो, ज्ञानाची विविध स्वरूपं धर्म वा नीति याच्या त्रिकालाबाधित सिद्धान्तास विरोधी नाहीत इत्यादि विचार आधुनिक जीवनात किती उद्बोधक आहेत हे या विचार-धारेतील अवगाहनाने अनुभवास येईल अशी आशा आहे

---

# वा. म. जोशी

## ज्ञान धर्माला व नीतीला पोषक नाही काय?

'**ज्ञानान्मोक्ष.**' असे आपण म्हणतो खरे, पण जसजशी समाजाची ज्ञानामध्ये प्रगति होत गेली आहे तसतशी धर्मावरील श्रद्धा कमी होत गेली आहे असे सकृद्दर्शनी तरी वाटते, हे कबूल केले पाहिजे अलीकडे अलीकडे तर आधिभौतिक व इतर शास्त्रामध्ये प्रगति बरीच झाल्यामुळे लोक धर्मशून्य नाहीत तरी अश्रद्ध व अज्ञेयवादी होत चालले आहेत असे आपातत दिसते, हेहि खरे आहे युरोपियन व अमेरिकन लोकाच्या अलीकडील चालीरीतीकडे व विचार--पद्धतीकडे पाहिले असता जुन्या धर्म-कल्पनाचा व नीति-कल्पनाचा तिकडे ऱ्हास होत चाललेला दिसतो आणि आपल्या इकडेहि इग्रजी शिक्षणामुळे अशाच प्रकारचा देखावा दिसतो, हे सगळे मी कबूल करतो, पण माझे म्हणणे एवढेच आहे की, बाह्य देखाव्या-कडेच न पाहता, सूक्ष्म दृष्टीने विचार केला असता, खऱ्या धर्माची व नीतीची हानि अलीकडे झाली आहे किंवा होत चालली आहे, असे मानण्यास मुळीच आधार नाही

चारपाच हजार वर्षापूर्वीचा वैदिक धर्म किंवा १९२५ वर्षापूर्वीचा ख्रिस्ती धर्म हे आजकाल मूळ स्थितीत दृग्गोचर होत नाहीत, हे आध-ळ्याला देखील दिसते आहे पण याचा अर्थ जग धर्महीन बनत चालले आहे असाच का करावा? धर्मासबधी आपल्या कल्पना बदलत आणि सुधारत चालल्या आहेत, असा त्याचा अर्थ का करू नये, असा मी तुम्हाला नम्रपणे प्रश्न विचारतो इतर बाबतीत जसा विकास ( evolution ) झाला आहे, त्याप्रमाणेच धर्माचाहि विकास होऊन रूपातर झाले आहे, असे मला तरी वाटते वैदिक कालाचाच विचार केला, तर त्या कालातदेखील धर्माचे एकच स्वरूप होते, असे दिसत नाही. ऋग्वेदातील ऋचावरून पाहता, त्या कालीदेखील अनेक देवतांची पूजा मागे पडत जाऊन एक देव मानण्याकडे पुढे पुढे प्रवृत्ति होऊ लागली होती, असे दिसते. " **एक सद्विप्रा**

**बहुधा वदन्ति "** या वचनाची तुम्हाला येथे आठवण होईल 'नासदीय' सूक्तावरून तर हल्लीच्या अज्ञेयवाद्याची पूर्वपीठिका वेदकालापर्यन्त जाते असे म्हणावे लागते मनुष्याची विचारशक्ति जसजशी वाढत जाईल, त्याला अनुभव जसजसे निराळे निराळे येऊ लागतील, त्याची परिस्थिति जसजशी बदलेल, त्याप्रमाणे धर्मासबधी व नीतीसबधी त्याच्या कल्पना बदलावयाऱ्याच, त्या बदलल्या तर त्यात आश्चर्य नाही, न बदलल्या तर मात्र आश्चर्य खरे ! 'गीता' हे आपण एक धर्म-पुस्तक मानतो. पण गीतेतच 'वेद-वाद-रता' ची निंदा करून श्रुतीच्या पलीकडे जो श्रेष्ठ मार्ग श्रीकृष्णाला दिसला तिकडे अर्जुनाचे मन वळविण्याचा प्रयत्न केलेला आहे ना ? आद्य शकराचार्य याना तर कोणी अधार्मिक म्हणणार नाही ना ? ते तर धर्माचा उद्धार करणारे म्हणून आपण मानतो त्यानी तरी कोठे यज्ञयागात्मक जुना वैदिक धर्म कायम ठेविला ? आम्ही अलीकडचे लोक कदाचित् अश्रद्ध व धर्मशून्य असू, पण ज्ञानदेव-तुकाराम-एकनाथादि साधुसत तरी अधार्मिक नव्हते ना ? त्यानी जुन्या धार्मिक समजुतीत व चालीरीतीत फरक करण्याचा प्रयत्न केला की नाही? युरोप-मध्येहि ल्यूथर, कॅल्व्हिन, वेस्ले इत्यादिकानी आपापल्या कल्पनाप्रमाणे धार्मिक चालीरीतीत व विचारपद्धतीत परिवर्तन करण्याचा आपापल्या परीने प्रयत्न केलेला आहे मग आधुनिक कालातल्या विचारवत लोकाना हल्लीच्या ज्ञानाला, अनुभवाला व परिस्थितीला अनुसरून धार्मिक चाली-रीतीत वगैरे बदल करावासा वाटला, तर त्यानाच का दोष देण्यात यावा? आणि त्याना धर्मशून्य का म्हणण्यात यावे ? धर्म हा वाढत्या वृक्षाप्रमाणे आहे, त्याचे मूळचे बीजस्थितीतले स्वरूप अकुरावस्थेत राहणार नाही आणि अकुरावस्थतले स्वरूप वृक्षावस्थेत राहणार नाही. मोठा वृक्ष झाल्यावरहि जुनी पिकलेली पाने गळून पडणार, काही फुले व फळेहि त्या ऋतूत आपापली कार्ये करून गळून पडणार. आहे त्या स्थितीतच सदा राहणे यात त्याचे चिरजीवित्व किंवा सनातनत्व नाही, तर परिस्थिती-प्रमाणे पानात वगैरे बदल करण्यातच त्याचे सनातनत्व आहे

तुम्ही कदाचित् म्हणाल की, धर्माच्या मूळ तत्त्वातच बदल करण्यात आला, तर मग धर्म-हीनत्व हा आरोप बरोबर होईल किंवा नाही ? तुमचे

म्हणणे कबूल, पण धर्माचे तत्त्व म्हणजे तरी काय ? ख्रिस्ती धर्म खरा, का हिंदुधर्म, का मुसलमानी, का बौद्ध ? आणि त्यातली 'खरी तत्त्वे' किंवा 'खरे तत्त्व' कोणते ?

**" श्रुतिर्विभिन्ना स्मृतयश्च भिन्ना**
**नैको मुनिर्यस्य वचः प्रमाणम् । "**

हा श्लोक तुम्हाला ठाऊकच आहे "**धर्मस्य तत्त्वं निहितं गुहायाम्**" असे सांगून आपल्या प्रश्नाची टाळाटाळी मला करावयाची नाही, तर आपल्या प्रश्नाचे उत्तर देणे किती कठीण आहे, हे सूचित करावयाचे आहे धर्माच्या व नीतीच्या तत्त्वासंबंधाने मी 'नीतिशास्त्रप्रवेशा'त आणि 'विविधज्ञानविस्तारा'च्या ज्युबिलीप्रीत्यर्थ निघालेल्या 'निबंधसंग्रहा'त विस्ताराने ऊहापोह केलेला आहे त्याचा पुनरुच्चार करण्याचे हे स्थळ नव्हे व वेळहि सध्या आपणाला नाही सर्व लोकांना मान्य होईल अशा प्रकारचे धर्माचे तत्त्व म्हटले म्हणजे

**" न हि सत्यात्परो धर्मः "**

किंवा 'परोपकार हाच धर्म,' किंवा

**"ज्यासी आपंगिता नाहीं। त्यासी धरी जो हृदयीं।**
**तोची साधु ओळखावा। देव तेथेंचि जाणावा ॥"**

अशा प्रकारचे तत्त्व होय. 'भूतमात्राच्या ठिकाणी प्रेमबुद्धि ठेवणे' असे त्याचे रूपान्तर करता येईल, किंवा अधिक विस्तार करून व तपशील देऊन धर्माचे तत्त्व असे सांगता येईल --

**" धृतिः क्षमा शमोऽस्तेयं शौचमिन्द्रियनिग्रहः ।**
**धीर्विद्या सत्यमक्रोधो दशकं धर्मलक्षणम् ॥ "**

यापैकी कोणतेहि सर्वमान्य लक्षण घेतले, तर धर्माचा अलीकडे अधःपात होत आहे आणि तो ज्ञानाच्या प्रगतीमुळे होत आहे, या दोन्ही विधानांना काही एक आधार नाही असे दिसून येईल, अशी माझी खात्री आहे '**न हि सत्यात्परो धर्मः**' हे लक्षण उदाहरणार्थ घ्या. अलीकडच्या ज्ञानवृद्धीमुळें हरतऱ्हेचे 'सत्य' अधिक कळू लागले आहे, आणि

सत्यजिज्ञासा आणि सत्याबद्दलची आसक्तीदेखील वाढत आहे राजकीय दृष्ट्या 'सत्याग्रह' यशस्वी असो किंवा नसो, बौद्धिक दृष्ट्या अलीकडच्या काळात सत्याग्रहाबद्दलचा आग्रह अधिकाधिक होत आहे,—इतका की, या सत्यामुळे परपरागत समाजरचनेची व नीति-कल्पनाची वगैरे वाताहात झाली तरी हरकत नाही, अशी या काळातील बौद्धिक सत्याग्रही लोकाची वृत्ति आहे! कॉलऱ्याचे जतु शोधून काढणाऱ्या मेचनिकॉफ (Methnikoff) या शास्त्रज्ञाला किती प्रयास पडले व शेवटी तर त्याने शोधन काढलेल्या जतूच्या विषाचा अर्क त्याने स्वत व त्याच्या काही शिष्यानी प्राशन करून, जीव धोक्यात घालून, आपले मत सिद्ध केले! रेडियम शोधून काढणाऱ्य क्यूरी पति-पत्नीचो आपल्या इकडील बोस, रॉय वगैरेची व अशा अनेक शास्त्रज्ञाची सत्यशोधनार्थ चाललेली धडपड, त्याची चिकाटी, त्याचा स्वार्थत्याग, इत्यादि गोष्टीचा विचार केला असता, 'सत्य'रूपी नारायणाची पूजा अलीकडे श्रद्धेने, निष्काम बुद्धीने व निश्चयाने होत आहे, हे कोणालाहि प्राजलपणे कबूल करावे लागेल

'भूतदया हाच धर्म' असे लक्षण केले, तरीदेखील हा भूतदयात्मक खरा धर्म दिवसेदिवस प्रवृद्ध व उन्नत होत आहे, असे दिसून येईल परोपकार, दान, धृति, क्षमा, अक्रोध—कोणताहि धर्ममूलक सद्‌गुण घ्या, अलीकडे त्याची अभिवृद्धि दिसेल दान पूर्वीच्या स्वरूपात होत नसेल, पण त्याचे कारण 'सात्त्विक दान कोणते' याबद्दल आपण अधिक विचार करू लागलो आहोत व आपले दान 'सात्त्विक' असावे याबद्दल आपण अधिक दक्ष आहोत. जो मागेल त्याला जे मागेल ते देणे याला आपण आता सात्त्विक दान समजत नाही, तर ज्याला जरूर असेल त्याला जरूर तेवढेच द्यावयाचे व तेदेखील अशा रीतीने द्यावयाचे की, त्याचे सामर्थ्य वाढून याचना करण्याची त्याला जरूरच राहू नये, अशा प्रकारची आपली दान कल्पना आहे. आणि तिला अनुसरूनच आपण वागण्याचा प्रयत्न करतो. पूर्वीचे पेशवाईतले 'रमणे' जरी गेले असले, बडोद्यातली रोजची खिचडी जरी आता बद झाली असली, हव्यकव्य कमी होऊन भिक्षुकांना जरी कमी दक्षिणा व आमत्रणे मिळत असली, किवा पुराणिकाच्या चौरगावर तादुळाची जरी आता पूर्वीएवढी रास होत नसली, तरी एकदरीत खरा

दानधर्म कमी झाला आहे असे मानण्याचे कारण नाही हल्लीच्या विश्व-विद्यालयात वगैरे मिळणाऱ्या हरतऱ्हेच्या शिष्य-वृत्त्या, जिकडे तिकडे चालू असलेल्या आणि लोकाश्रयावर जगलेल्या नानाप्रकारच्या संस्था, त्याचे नानाविध निधि व त्याच्या वर्गण्या, या सर्वाचा विचार करता, समाजात परोपकार किंवा दान कमी होत आहे असे मानण्याचे मुळीच कारण नाही 'क्षमा' पाहिली असता अलीकडे तीत ज्ञानामुळे फारच प्रगति झालेली दिसेल. युरोपमध्ये पूर्वी धार्मिक मताबद्दल कित्येकाचा छळ झाला आहे बायबलमधील 'जेनेसिस' च्या विरुद्ध पृथ्वीची व मानवजातीची उत्पत्ति प्रतिपादण्याबद्दल आधि-भौतिक शास्त्रज्ञाना त्रास सोसावा लागला आहे चोरीसारख्या लहान अपराधाबद्दल अठराव्या शतकात फाशी देण्यात येत असे या प्रवृत्तीचा अवशेष एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धातहि मधूनमधून दृष्टीस पडे उदाहरणार्थ, १८१८ मध्ये बारा लोकाना लहानशा चोरीबद्दल फाशी देण्यात आले होते.* १८३० मध्ये एका लहान मुलाने गवताच्या गंजीला कोलीत लावले म्हणून त्याला फाशी देण्यात आले ! हल्लीच्या काळात असले न्यायाधीशकृत मनुष्यवध शक्य आहेत काय ? स्त्रियासबंधी, मुलासबंधी, गुन्हेगारासबंधी, मजुरासंबंधी आपली वर्तणूक पूर्वीपेक्षा अधिक माणुसकीची, अधिक न्यायाची आणि दयेने व क्षमा-बुद्धीने अधिक प्रेरित झालेली नाही काय ? दया व न्याय या दृष्टीने पाहता पांढरपेशा वर्गातील स्त्रियाची—विशेषत विधवाची—स्थिति मला तरी पूर्वी-पेक्षा सुधारलेली वाटते व दिवसेंदिवस ज्ञानाचा व विचाराचा फैलाव जसजसा जास्त होईल, तसतशी त्याची स्थिति सुधारत जाईल यात शंका

* 'On March 7, 1887 at the Lincolnshire Lent Assizes the Right Honourable Sir Vicary Gibbs, the Honourable Sir William Farrow and John Charles Lucas Calcraft Esquire, Sheriff, all pillars of the Church and State, murdered in cold blood by hanging twelve unfortunate men, guilty of petty theft or small offences."

"TIMES OF INDIA" 7th Oct. 1929.

नाही. 'धृति' आणि इतर सद्गुण घेऊन ज्ञानवृद्धीबरोबर या सद्गुणाची वृद्धि कशी झालेली आहे, हे मला दाखविता येईल, पण दिशा दाखवून दिलेली आहे, अधिक विस्तार करण्यात अर्थ नाही.

पण तुम्ही कदाचित् येथे मला असा प्रश्न विचाराल की, 'ईश्वराविषयी आस्तिक्यबुद्धि कमी झालेली नाही काय ?' कमी झालेली आहे हे कबूल, पण ईश्वराविषयी आस्तिक्यबुद्धि धार्मिकतेला आवश्यक असल्यास, ती कोणत्या अर्थाने ते आपणास पाहिले पाहिजे कपिलमुनीने प्रचलित केलेल्या साख्यवादाच्या अनुयायापैकी काही निरीश्वरवादी होते, पण त्याना आपण अधार्मिक मानीत नाही अद्वैतवेदान्ती हे वास्तविक निरीश्वरवादीच, बौद्धहि तसेच, पण त्याना सर्वांना अधर्मनिष्ठ म्हणणे धाडसाचे होईल बरे, 'ईश्वर' शब्दाने अमुक गुणधर्मसमुच्चय सूचित होतो असा विचार करू लागलो, तर 'व्यक्ति तेवढे ईश्वर' मानण्याची पाळी येईल आणि हिदुस्थान देशातील तेहतीस कोटि लोकाना तेहतीस कोटि देव आहेत, ते या अर्थाने यथोचित होतील ! त्यातील खरी गोष्ट अशी आहे की, देवाची कल्पना मनुष्याने आपल्या समाधानाकरिता उत्पन्न केलेली आहे, अर्थात् ज्याच्या त्याच्या मानसिक विकासाला व प्रवृत्तीना अनुरूप असाच त्याचा देव असणार ज्यू लोकाचा देव कोपिष्ट, सूड घेणारा, बलि घेण्यास उत्सुक, पक्षपाती होता, त्याला तशीच कारणे होती रानटी लोकाचे देव रानटीच असावयाचे ! मनुष्य सुसस्कृत झाला म्हणजे त्याचा देव सुसस्कृत होतो. मग त्या देवाला पक्षपात आवडत नाही, त्याला कोणाचा तरी बळी घ्यावासा वाटत नाही, त्याला अमुक मनुष्याकरिता सृष्टीचे नियम बाजूला सारून जादूगाराप्रमाणेच चमत्कार करून दाखवावेसे वाटत नाहीत, तर तो न्यायी, दयाळू, प्रेमळ असा होतो मन अधिक सस्कृत झाले म्हणजे सगुण ईश्वरापेक्षा निर्गुण ईश्वराची-- ब्रह्माची--कल्पना आवडू लागते ! या ब्रह्माचा अर्थ कसा करावयाचा, हे देखील ज्याच्या त्याच्या ज्ञानावर, स्वभावावर, प्रवृत्तीवर, परिस्थितीवर, अवलबून असते कोणी पूर्वीचा अर्थ घेऊन त्यात समाधान मानून राहतील, कोणी हेगेल ( Hegel ) याच्या 'निरपेक्षपूर्ण' प्रमाणे ( 'Absolute' प्रमाणे ) त्याचे लक्षण करतील, कोणी त्या त्या मनुष्याला अत्यत आदरणीय,

पूज्य, रम्य वाटणारे ध्येय, असा त्याचा अर्थ करतील ! " देवपूजा म्हणजे ध्येयपूजा " असे या शेवटी निर्देश केलेल्या लोकाचे म्हणणे पडेल माझे स्वतःचे असेच म्हणणे आहे, पण " माझा धर्म तोच खरा धर्म " ( 'My doxy is orthodoxy' ) असे मानणाऱ्यापैकी मी नाही ! गीतेत सांगितल्याप्रमाणे, पण किंचित् निराळ्या अर्थाने, प्रत्येकाचा 'स्वधर्म' म्हणजे त्याला पटलेला धर्म–त्याला श्रेष्ठ होय, असे मानणारा मी आहे. प्रत्येकाची ईश्वराची कल्पना निराळी असणे व असण्यास हरकत नाही, आणि प्रत्येकाने आपापल्या ईश्वराची आपापल्या पद्धतीने पूजा करावी असे कबूल केल्यास, ईश्वराविषयी आस्तिक्यबुद्धि हे धर्माचे एक प्रमुख अंग आहे, असे मी आनंदाने मान्य करीन कोंट ( Comte ), मिल, ब्रॅड्लॉ, आगरकर, इत्यादिकांना ' सत्य,' ' आदर्शभूत मानवजाति ', ' समाजसेवा ' किंवा अशाच प्रकारचे ध्येय ईश्वराच्या ठिकाणी होते व या ईश्वराची ते दृढ श्रद्धेने, निष्कामबुद्धीने, स्वार्थत्यागपूर्वक निरंतर पूजा करीत होते, अर्थात् ते नास्तिक नव्हते, --हे जर तुम्ही कबूल करीत असाल, तर ईश्वराविषयी आस्तिक्यबुद्धि ही धार्मिकतेला आवश्यक नाही, असे म्हणण्याचे कोणालाच कारण नाही पण असा जर अर्थ मान्य नसेल, आणि आपल्या आवडत्या लोकांकरिता त्यांच्या शत्रूंचे निर्दालन करणारा, किंवा सोमपान करणारा, किंवा सूड उगवणारा, किंवा सृष्टीचे नियम झुगारणारा, किंवा नवसाला पावणारा, किंवा भक्ताचा दळण दळणारा देव मानला पाहिजे असाच तुमचा आग्रह असेल, तर मात्र " आमची अधार्मिकांत गणना झालेली पुरवली, आम्हाला असला चमत्कारिक, लहरी, पक्षपाती, आकुंचित दृष्टीचा देव नको " असे म्हणण्याची कित्येकांना पाळी येईल ! अलीकडच्या सुसंस्कृत माणसाला सरळपणा, न्याय, समता, दया, क्षमा, शान्ति इत्यादि गुण प्रिय व पूज्य आहेत, हे गुण समाजात जितके प्रिय व पूज्य होतील तितके त्याला बरे वाटेल, या गुणांच्या इष्टतेबद्दल आणि पूज्यतेबद्दल त्याची श्रद्धा असते व त्यांच्या अभिवृद्ध्यर्थ तो शक्य तेवढा निष्ठापूर्वक प्रयत्न करीत असतो सनातनीयाची परंपरागत आस्तिक्य-बुद्धि खरी असेल, त्याची भक्ति चांगली असेल, त्याचा धर्म खरा असेल, पण आता सांगितलेल्या वृत्तीत खरी भक्ति व खरा धर्म अजिबात नाही, ही

वृत्ति धर्मश्रद्धेतची आहे असे म्हणणे धाडसाचे आहे आधिभौतिक शास्त्राच्या किंवा इतर शास्त्राच्या प्रगतीमुळे परपरागत आस्तिक्यबुद्धीला धक्का बसला आहे यात शंका नाही, पण खऱ्या धार्मिकतेचा किंवा नीतिनिष्ठेचा नाश व्हावा, असे या शास्त्रात काहीच नाही पदार्थविज्ञानशास्त्राने व रसायनशास्त्राने पदार्थाचे, अणूचे व परमाणूचे कितीहि पृथक्करण केले आणि त्याना कार्यकारणभावाच्या नियमरज्जूनी बाधले, तथापि मन हेदेखील एक परमाणूचे कार्य आहे, असे अद्यापि तरी ती दाखवू शकत नाहीत, ते ती पुढे मागे दाखवू शकली तर शकतील, पण तशी आशा करण्यास फारसा आधार नाही किंबहुना आधुनिक आधिभौतिक शास्त्रीय शोधाचा विचार करता Purpose ची म्हणजे सहेतुकतेचीच भाषा जीवनशास्त्रात व मानसिक शास्त्रातहि काही बाबतीत अधिक यथार्थ वाटू लागली आहे 'सहेतुकते' वरुन कोणी तरी 'ईश्वरा'ने जग निर्माण केले असे समजावयाचे नाही, तर एवढेच समजावयाचे की, रासायनिक भाषेपेक्षा हेतुसूचक भाषा अधिक उचित आहे--हा हेतु कोणत्या मनाचा किंवा व्यक्तीचा आहे, हा केव्हा व कसा उत्पन्न झाला, वगैरे गोष्टी मुग्धच ठेवावयाच्या बरे, घटकाभर आपण असे धरले की, मन हे एक खडू किंवा पाणी याप्रमाणेच जड परमाणूचे कार्य आहे तरीदेखील मानसिक व्यापार म्हणून काहीतरी अस्तित्वे आहेत, गुणधर्म आहेत, त्यात विशिष्ट भाव-भावना आहेत, त्यामध्ये विशिष्ट आशा-आकाक्षा आवडी-निवडी गर्भित आहेत, याहि गोष्टी तितक्याच खऱ्या व अनुभवसिद्ध आहेत अर्थात् सुसस्कृत मनाला विशिष्ट गोष्टी खऱ्या किंवा सुंदर किंवा उचित किंवा नीतिदृष्ट्या चागल्या वाटल्या, तर त्याचे खरेपण, सौंदर्य, औचित्य किंवा सत्त्व ही त्याच्यापुरती तरी खरी मानली पाहिजेत आणि तो ती तशी खरी धरून चालला, तर त्यात अस्वाभाविक किंवा गैर काही नाही वनस्पतीची फुले व फळे मातीपासून उत्पन्न झालेली असली, ती जरी जड परमाणूची पूर्णपणे कार्ये असली, तरी त्याचा सुवास किंवा गोडी किंवा त्याचे सौंदर्य खोटे किंवा टाकाऊ किंवा अप्रिय किंवा अनादरणीय का व्हावे ? मनाचीहि गोष्ट तशीच आहे ते कसेहि उत्पन्न झालेले असो, आज ते असे असे आहे, त्याच्या अशा अशा प्रवृत्ति व आवडीनिवडी आहेत, अर्थात् आज त्या सर्व खऱ्या धरून त्याना अनु-

सरूनच वागले पाहिजे सुसंस्कृत माणसाचे मन मातीपासून उत्पन्न झाले आहे असे ठरले, तरी त्या मनाला घाणीत लोळावेसे वाटणार नाही, आणि त्या मनाने घाण टाळली किंवा लोकांना टाळण्यास सांगितली, तर त्यात तर्कदृष्ट्या वावगे काय आहे ? माझी सौंदर्याभिरुचि किंवा सद्‌भिरुचि कशीहि उत्पन्न झालेली असो, आज मला अमुक अमुक गोष्टी कुरूप, हिडीस, अनुचित किंवा अनीतीच्या वाटताहेत, अर्थात् त्या तशा मी मानल्या, तर त्यात चूक कोठे आहे ? मला जोपर्यंत माझे मन जास्त विश्वसनीय वाटत आहे (आणि ते प्रत्येकाला वाटतेच) तोपर्यंत त्या मनाला प्रिय-अप्रिय, पूज्य-अपूज्य, सुन्दर-असुन्दर वाटणाऱ्या गोष्टी मी ग्राह्य किंवा त्याज्य समजाव्यात व लोकांनाहि त्या तशा आहेत असे सांगावे आणि शक्य असल्यास तसे वागण्यास सांगावे, किंबहुना भाग हि पाडावे, हे माझ्या दृष्टीने न्यायप्राप्त व यथोचितच आहे सुसंस्कृत समाजामध्ये सौंदर्याच्या, नीतीच्या वगैरे ज्या कल्पना शिष्टसंमत असतात त्या--अर्थात् त्या शिष्टजनांच्या दृष्टीने-मनाच्या उत्पत्तीची कोणतीहि मीमांसा स्वीकारली तरी आदरणीयच राहणार आणि त्या त्यांनी आदरणीय का मानू नयेत याला सबळ कारण काही नाही

इच्छाशक्ति ( Will ) स्वतंत्र नाही, ती मूलभूत द्रव्याच्या गुणधर्मांनी किंवा पूर्वजन्म-कर्मांनी निबद्ध आहे असे जरी सिद्ध झाले ( सिद्ध झालेले नाही, तरी पण घटकाभर सिद्ध झाले आहे असे गृहीत धरले ), तरी नैतिक भाषा, कर्तव्य-अकर्तव्य याबद्दलचा उपदेश, व्यर्थ व अनुचित आहे असे नाही सिजविकसाहेबांनी या बाबतीत आपल्या " Methods of Ethics " मध्ये जे विवेचन केलेले आहे, ते मननीय आहे. मन हे नियमांना वश आहे म्हणून तर विशिष्ट प्रकारचे शिक्षण द्यावयाचे, सवयी लावावयाच्या, शिक्षेची दहशत घालावयाची, नियमांना ते वश नसते तर त्यावर मात्र परिणाम होईल अशा रीतीचे शिक्षण देण्याचा, सवयी लावण्याचा, उपदेश करण्याचा किंवा दहशत घालण्याचा प्रयत्न वेडेपणाचा झाला असता, हा त्यांचा कोटिक्रम विचारणीय आहे

" इतिहासशास्त्र, समाजशास्त्र, मानसशास्त्र, इत्यादिकांच्या अध्ययनाने

जात्यभिमान, देशाभिमान, वगैरे गुण आकुंचित दृष्टीचे वाटू लागतात," असे पूर्वपक्षी जे म्हणतो, ते एका अर्थी खरे आहे इतिहासाला आपलाच देश सर्वांत उत्तम, आपलीच संस्कृति सगळ्यात श्रेष्ठ, आपलाच धर्म सनातन, आपलीच जाति शुद्ध बीजाची व रक्ताची, आपल्याच देशाकडे, जातीकडे किंवा धर्माकडे सर्व जगाला सुसंस्कृत करण्याचे काम ईश्वराने दिलेले आहे, या व अशा कल्पना खुळचट वाटू लागतील, यात शंका नाही, पण यात बिघडले कुठं ? दुरभिमान गेला तर त्यात वाईट काय आहे ? आपल्या देशात, धर्मात, जातीत जर काही खरोखरच अभिमानास्पद गोष्टी असतील, तर त्याबद्दल योग्य प्रमाणात अभिमान बाळगण्याच्या आड इतिहासादि शास्त्रे येतील असे वाटत नाही अभिमानास्पद गोष्टी नसल्या तर इतिहासादि शास्त्रे उत्तेजन देऊन सांगतील की, "गत गोष्टींचा विचार न करता स्वपराक्रमाने अभिमानास्पद गोष्टी करून दाखवा, कोणतेहि राष्ट्र पृथ्वीच्या पोटातून एकदमच पराक्रमी किंवा सुसंस्कृत असे बाहेर पडलेले नाही, तर त्या त्या देशातील लोकांनी प्रयत्न करून त्याला 'राष्ट्र' बनविले व त्याचे नाव अभिमान बाळगण्यासारखे केले"

आपली जाति किंवा आपले लोक तेवढे शुद्ध बीजाचे किंवा वीर्यशाली किंवा सर्वांत पुरातन संस्कृति असलेले, हे जर इतिहासाने सिद्ध झाले तर ठीकच, बरं, नाही सिद्ध झाले, तर विषाद मानून मान खाली घालून हताश होण्याचे कारण काय ? एखाद्याच्या दहावीस हजार वर्षांपूर्वीच्या पूर्वजाने, उत्तरध्रुवाजवळ, किंवा इतर कोठे वस्ती असेल तेथे, एखाद्या रानटी स्त्रीशी विवाह केला असला, किंवा चारपाच हजार वर्षांपूर्वी सिंधुप्रदेशाच्या आतबाहेर असताना एखाद्या शूद्रीशी विवाह केला असला, किंवा तदनंतर विंध्य पर्वत ओलांडून आल्यावर दंडकारण्यात वसाहत करताना एखाद्या अनार्य स्त्रीशी विवाह केला असला, म्हणून त्या गृहस्थाने का उगीच विशेष विषाद मानवा? तसेच पाहू गेले असता, आपले पूर्वज वानरसदृश कोणीतरी अज्ञात नर होते, असे डार्विन वगैरेंचा विकासवाद सांगतो, मग आपण या हीनतम योनीबद्दल शोक करावा किंवा विषाद मानीत बसावे काय ? नाही. कारण आपले पूर्वज वानर-सदृश होते का कसे होते हा मुख्य प्रश्न नाही, तर आपण आपल्या इष्ट-मित्रांशी वानरोचित चेष्टा करतो की काय, ही

मात्र महत्त्वाची गोष्ट आहे, आणि या बाबतीत जर मान खाली घालण्याजोगी आपली स्थिति नसेल, तर आपल्या वानरसदृश योनीची क्षिति बाळगण्याचे कारण नाही वानर-सदृश जातीच्या अगदी पूर्वीच्या आपल्या पूर्वजाकडे पाहिले, तर ते सूक्ष्मदर्शक यंत्रातून दिसतील न दिसतील एवढे सूक्ष्म जंतु किंवा जीवपेशी या स्वरूपात दिसतील असे जीवशास्त्र सांगते, पण या आपल्या मूळ योनीबद्दल आपण कोठे विषाद मानतो ? याच न्यायाने आपले पूर्वज क्षत्रिय होते का ब्राह्मण होते, त्यांनी वैश्याशी किंवा शूद्राशी विवाह केला होता किंवा नाही हे प्रश्न विशेष महत्त्वाचे नाहीत आपण आज वैश्य-शूद्राप्रमाणे वागतो किंवा काय, म्हणजे त्यामध्ये विशिष्ट प्रतिकूल परिस्थितीमुळे सामान्यत. आजकाल जे दोष दिसतात तशा प्रकारचे दोष आपल्यामध्ये आहेत किंवा काय, हा मुख्य प्रश्न आहे मी शुद्ध ब्राह्मण-बीजाचा असेन, पण मी आपल्या विद्येची व सामर्थ्याची क्षुद्र वैश्यवृत्तीने विक्री करीत असेन, किंवा शूद्राप्रमाणे मी गलिच्छ रीतीने वागत असेन, तर माझ्या शुद्ध ब्राह्मण-बीजाचा मी पोकळ अभिमान बाळगण्यात विशेष अर्थ नाही खरे, माझे पूर्वज कोणत्याहि वर्णाचे असले, तरी त्यात मला लज्जास्पद असे काय आहे ? तात्पर्य, इतिहास व समाजशास्त्र ही जातिविषयक आणि वर्णविषयक अभिमानाला काट मारतील, पण खऱ्या पौरुषाच्या, पराक्रमाच्या किंवा सद्गुणाच्या अभिवृद्धीला ती मारक होऊ शकत नाहीत

खऱ्या देशाभिमानाला ही शास्त्रे पोषक नाहीत, असे पूर्वपक्षाने दाखविण्याचा जो प्रयत्न केला आहे, तो देखील चुकीचा आहे आपलाच देश सर्वश्रेष्ठ अशा प्रकारची भावना या शास्त्राच्या अध्ययनाने बाधित होईल हे मला कबूल आहे आपण आपल्याच लोकांचे हित पाहावे, इतरांना पादाक्रांत करावे, त्यांनी आपणास जिंकले असल्यास त्यांचा द्वेष करावा, अशा प्रकारच्या वृत्तीला इतिहासादि शास्त्रे उत्तेजन देणार नाहीत हेहि मला मान्य आहे, पण खऱ्या देशाभिमानाला अशा भावना किंवा वृत्ति आवश्यक नाहीत. तत्त्वदृष्ट्या पाहिले असता कोणत्याहि देशातला सज्जन मनुष्य मला प्रिय असला पाहिजे आणि दुर्जन माझ्या देशातला असला तरी मला तो अप्रिय झाला पाहिजे. गीतेतला स्थितप्रज्ञ 'सर्वभूतहिते रत' असतो, केवळ 'हिंदुजनहिते रत' किंवा 'ब्राह्मण-जनहिते रत' नसतो सर्व

मनुष्यजातीचे हित, हे आपले ध्येय असले पाहिजे. हे ध्येय देशाभिमानाशी किंवा जात्यभिमानाशी अत्यंत विरोधी किंवा विसंगत आहे, असे समजण्याचे कारण नाही उलट शांतपणे खोल विचार केला असता हे ध्येय मर्यादित आणि यथोचित देशाभिमानाने व जात्यभिमानाने अधिक सुसाध्य होईल, असे दिसून येईल. नीग्रो, पोर्च्युगीज, बेल्जम, स्पॅनिश किंवा अमेरिकन लोक यांचे हित हिंदुस्थानातील सामान्य मनुष्य साधणार कसा ? त्याला त्यांची भाषा येत नाही, त्यांची विशेष माहिती नाही, त्यांच्या जरुरी-अडचणी काय आहेत हे ठाऊक नाही बरे, त्यांनाहि याची विशेष माहिती नाही अशा स्थितीत या हिंदी गृहस्थाने अपरिचित परकी लोकांचे हित साधावयाचे कसे ? सामान्य मनुष्याला आपल्या कुटुंबाचे रक्षण व पोषण करणेच कठिण पडते त्याचे ज्ञान व त्याचे सामर्थ्य आपल्या कुटुंबाचे हित साधण्यास जेमतेम समर्थ असते थोडे बहुत अधिक सामर्थ्य असल्यास गावातील एखाद्या संस्थेचे थोडेबहुत हित साधू शकेल, अधिक असल्यास गावाचे त्याहून अधिक असल्यास प्रान्ताचे संबंध देशाचे हित साक्षात् साधण्याचे सामर्थ्य फारच थोड्यांमध्ये असते अप्रत्यक्षपणे आपल्या संस्थेचे किंवा गावाचे हित आपल्या पतीप्रमाणे व संधि मिळेल त्याप्रमाणे साधणे हेदेखील पुष्कळांना कठिण पडते कारण कशामध्ये हिताहित आहे हे आधी समजत नाही, समजून घेण्याला फुरसत नाही, समजले तरी संस्था किंवा गाव यांत आपले तेवढे वजन नसते, वजन असले तरी आपले सामर्थ्य मर्यादितच असल्यामुळे आपले साहाय्यदेखील मर्यादित स्वरूपाचेच असते अशा स्थितीत संबंध प्रांताचे किंवा देशाचे जे सामान्य मनुष्य हित साधणार ते अप्रत्यक्षपणेच -- आपल्या गावाचे, संस्थेचे व कुटुंबाचे हित साधण्याचा प्रयत्न करूनच साधणार. अशा मनुष्याने, ज्या देशाची आपणास विशेष माहिती नाही, त्या देशाचे हित साधण्यास कंबर कशी बांधावी ? बरे, ज्यांचे सामर्थ्य टिळक गोखले, गांधी यांच्याप्रमाणे असेल त्यांना तरी परकी देशाचे हित साधणे शक्य असेल असे नाही टिळक, गोखले, गांधी झाले तरी त्यांचे ज्ञान, त्यांची माहिती, त्यांचे वजन, त्यांचे सामर्थ्य या देशापुरतेच बहुवशी असते ते पोर्च्युगालचे किंवा बेल्जमचे हित कसे साधणार ? त्यांना त्या देशांची खरी स्थिति, त्या देशाच्या खऱ्या अडचणी,

वगैरे गोष्टी ठाऊक नसतात, आणि ठाऊक आहेत असे क्षणभर गृहीत धरले, तरी टिळक-गाधीना पोर्च्युगाल किवा बेल्जममध्ये कोण विचारतो ? अर्थात् या थोर महात्म्यानादेखील आपले सामर्थ्य आपल्या देशाचा आपापल्या दिशेने व आपापल्या कल्पनेप्रमाणे उद्धार करण्यात खर्च करावे लागणार परकीय लोक कमी योग्यतेचे, त्याचा उद्धार करण्यात पाप आहे, असे नव्हे, तर त्याचा उद्धार करणे या थोर व्यक्तीनादेखील सुसाध्य नसते, म्हणून त्यानी आपले शक्तिसर्वस्व व मतिसर्वस्व आपल्या देशाची उन्नति करण्याचे कामी खर्च केले तर त्यात वावगे काही नाही प्रत्येक देशातील थोर थोर माणसानी काय किवा लहानसहान माणसानी काय, आपापल्या देशाची आपल्या हातून प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष जेवढी सुधारणा होईल तेवढी करण्याचा प्रयत्न करणे यातच मानवजातीचे कल्याण आहे आता ही गोष्ट खरी की, वेडरबर्न, ह्यूम, मी एफ अॅन्ड्र्यूज अित्यादिकासारख्याना परदेशाचे हित साधता येते व ते त्याना आपल्या परीने साधावेहि, पण अशी मडळी थोडी हे लोक टिळक, गोखले, गाधी याहून अधिक योग्यतेचे आहेत, असे मला भासवावयाचे नाही कारण खरी गोष्ट अशी आहे की, वेडरबर्न, ह्यूम इत्यादिकाना हिदुस्थानचे प्रत्यक्षपणे कल्याण करण्याची सुसधि मिळाली, तशी टिळक-गोखले इत्यादिकाची स्थिति नव्हती आणि त्याहून अधिक खोल विचार करावयाचा म्हणजे हिदुस्थानचे हित साधण्यातच इग्लडचेहि खरे कल्याण आहे, असे वेडरबर्न, ह्यूम इत्यादिकाना व टिळक, गोखले याना वाटत होते व गाधी याना वाटत आहे. 'इग्लडचे खरे कल्याण' असे शब्द मी वापरले आहेत, 'इग्लडचा फायदा' असे शब्द मी वापरले नाहीत हे येथे ध्यानात धरावे. खऱ्या कल्याणाच्या म्हणजे नि श्रेयसाच्या दृष्टीने पाहता हिदुस्थानचे कल्याण म्हणजे इग्लडचेहि कल्याण होय, व इग्लडचे कल्याण म्हणजे हिदुस्थानचेहि कल्याण. आर्थिक किवा व्यावहारिक फायद्याच्या बाबतीत दोन व्यक्तीचा किवा देशाचा विरोध होऊ शकतो, नि:श्रेयसाचे बाबतीत केव्हाहि अविरोधच असतो. महात्म्याना सर्व लोक व सर्व देश सारखेच असतात.

**" अयं निजः परो वेत्ति गणना लघुचेतसाम् ।**
**उदारचरितानां तु वसुधैव कुटुबकम् ॥ "**

महात्मे हे ' सर्वभूत हिते रत ' असतात, असे मघाशी सांगितलेच या दृष्टीने पाहता आकुंचित ' देशाभिमाना' ला अवकाश नसला, तथापि परकी लोकांचे किंवा देशाचे कल्याण साधण्याची प्रत्यक्ष संधि थोर थोर महात्म्यानादेखील मिळत नाही, परदेशाची त्यांना विशेष माहिती नसते, तेथे त्यांचे वजन नसते, इत्यादि गोष्टींचा विचार करता ज्याने त्याने आपल्या देशाची उन्नति करण्याचा प्रयत्न करून, त्या द्वारेच इतर देशांची अप्रत्यक्ष उन्नति होईल तेवढ्यावरच समाधान मानून राहणे प्राप्त आहे सामान्य माणसाला तर परकी लोकांबद्दल काहीच माहिती नसते आणि त्याचे मन त्याविषयी स्नेहार्द्र तर मुळीच नसते अर्थात् त्यानी भलती उडी मारण्याचा प्रयत्न न करता, आपल्या सामर्थ्यानुरूप आपल्या कुटुंबाची, जातीची, संस्थेची, गावाची वगैरे उन्नति करण्याचा प्रयत्न करावा, यातच त्याचे, त्याच्या जातीचे, देशाचे आणि जगाचेहि कल्याण आहे

इतिहास, समाजशास्त्र इत्यादि शास्त्रे वाचली असता, मनुष्याचे सामर्थ्य मर्यादित आहे, राज्ये उदयास येतात व अस्तास जातात–खाल्डिअन, असिरिअन संस्कृतीप्रमाणे संस्कृतीच्या संस्कृति नामशेष होतात, इत्यादि गोष्टी कळून मनुष्य निरुत्साही होईल असे पूर्वपक्षाचे म्हणणे होते, ते थोडेसे खरे आहे. कारण असा परिणाम कित्येकांच्या मनावर होतो यात शंका नाही. पण असा परिणाम झालाच पाहिजे, विचारी माणसाच्याहि मनावर न्यायत असाच परिणाम होणार, हे मात्र खोटे समाजाची उन्नति एका दिवसात होऊ शकत नाही, एका मनुष्याचीदेखील सुधारणा एका दिवसात एकदम होऊ शकत नाही. बरे, मनुष्याची किंवा समाजाची सुधारणा झाली, तरी मनुष्याप्रमाणे समाजालाहि मरण येण्याचा संभव असतो, इत्यादि गोष्टी समाजशास्त्रावरून कळल्या, तरी शक्य तेवढी सुधारणा करण्याचा प्रयत्न करू नये, असे ठरत नाही, समाजाची सुधारणा हळूहळू होते, अनेक लोकांनी अनेक रीतींनी अनेक वर्षे सतत प्रयत्न करावा लागतो, या तत्त्वाचा निष्कर्ष, न्यायत पाहिले तर असाच निघतो की, प्रत्येकाने आपल्या परीने आपल्या प्रयत्नाची शिकस्त करावी. एक वर्षांत स्वराज्य मिळविण्याची आशा समाजशास्त्र नष्ट करील, पण स्वराज्य मिळविण्याची खटपट करू नये असे कोणते समाजशास्त्र शिकवील? भलत्या आशा व आकांक्षा यांना

इतिहासादि शास्त्राकडून पायबद पडेल, पण यात वाईट काहीच नाही. उलट आशा–आकाक्षा प्रथमपासूनच शक्य कोटीतल्या ठेवण्यास या शास्त्रानी शिकविल्यामुळे निराशेचे दु ख व त्यामुळे येणारा निरुत्साह या आपत्ति टळ-ील देश, समाज, सस्कृति यामध्ये हळूहळू फरक होत जातो व कालान्तराने मूळ स्थिति अगदी बदलून जाते आणि कित्येक वेळा देश, सस्कृति वगैरेना मरण येते, ही जरी गोष्ट इतिहासाने शिकविली तरी देखील आपण आपल्या देशाच्या वगैरे उन्नतीचा प्रयत्न करू नये, असे अनुमान यावरून कसे निघते ? शभर वर्षाच्या आत आपण मरणार ही गोष्ट आपणास ठाऊक आहे तरी आपण हरतऱ्हेचे स्वसुधारणेचे प्रयत्न करतोच ना ? अमक्या अमक्या कारणाने अमुक अवस्थेत मरण येते, ही गोष्ट कळली तर नैराश्य तर येऊ नयेच, उलट ही कारणे शक्य तेवढी टाळण्याविषयी दक्षता बाळ-गावी, असाच त्यावरून बोध घ्यावयाचा असतो दुसरी गोष्ट अशी की, उद्या किवा एका घटकेनतर किवा एक मिनिटानतर मला फाशी देणार हें जरी मला किवा तुम्हाला निश्चित कळले, तरी आपण मुद्दाम घाणीत बसू का ? मुद्दाम अभद्र भाषण करू का ? मुद्दाम सदभिरुचि सोडू का ? नाही एका क्षणानतर मी मरणार असलो किवा तुम्ही मरणार असला, तरी आपण कोणी घाणीत बसावे किवा अद्वातद्वा बोलावे किवा भरमसाट वागावे हे न्यायत प्राप्त नाही व आपण कोणी असें वागणारहि नाही त्याचप्रमाणे देश, समाज, सस्कृति याचा पुढ केव्हातरी अध पात होणार असला तरी आजचे आपले कर्तव्य आपण करू नये असे होत नाही. उलट आपण ती आपत्ति शक्य असल्यास टाळण्याचा आटोकाट यत्न केला पाहिजे, हेच खरे अनुमान त्यावरून निघते वरे पूर्वी अनक देशाचा, समाजाचा व सस्कृतीचा नाश झाला म्हणन पुढेहि असाच होणार, हा सिद्धान्तहि निश्चित नाही. उलट समाजाच्या वगैरे अध पाताची कारणे अधिकाधिक कळू लागल्यामुळे ही आपत्ति टाळणे पुढे मागे शक्य होईल, अशी आशा बाळगण्यास जागा आहे कसेहि पाहिले तरी, इतिहासादि शास्त्रे नैराश्य किवा निरुत्साह उत्पन्न करतील, असे मानण्यास तर्कदृष्टया मुळीच आधार नाही.

वैवाहिक व इतर चालीरीतीसबधी भिन्न समाजातील भिन्न प्रकार

समजल्यामुळे या चालीरीतीचे बंधनकारकत्व शिथिल होईल, त्याबद्दल आदर कमी होईल व एकदरीत समाजशास्त्रादि शास्त्राच्या अध्ययनाने नैतिक सदभिरुचीचे निर्णय अनिश्चित व धरसोडीचे होतील, आणि नीतिनियम पाळलेच पाहिजेत असा दंडक राहणार नाही, सगळीकडे शैथिल्य आणि स्वेच्छाचारित्व याचा पगडा बसेल, ही भीतिदेखील चुकीची आहे. भिन्न देशातल्या भिन्न चालीरीति कळल्या म्हणजे आपल्या चालीरीतीत जर काही दोष असतील तर ते दिसून येतील, व या अर्थाने त्याचे बंधकत्व व मान्यत्व ही कमी होतील हे मला कबूल आहे पण भिन्न चालीरीतीचा वगैरे समाजशास्त्र, नीतिशास्त्र इत्यादिकाच्या आधारे सागोपाग व साधकबाधक ऊहापोह करून, ज्या चालीरीति उत्तम ठरतील त्याचे उत्तमत्व, केव्हाहि अबाधित राहणार खुटा हालवून जसा बळकट होतो त्याप्रमाणे आपल्या चालीरीतीची इतराच्या चालीरीतीशी तुलना करून आणि हरतऱ्हेचा तद्विषयक ऊहापोह करून ज्या चालीरीति आपण उत्तम ठरवू त्याबद्दलची आपली निष्ठा दृढ होईल अज्ञानजन्य श्रद्धा लहानसा धक्का लागल्याबरोबर डळमळते किंवा ढासळते, पण ज्ञानाचा आणि विचाराचा आधार असलेली निष्ठा स्थिर व अचल असते. अर्थात् शास्त्रे ही खऱ्या नीतिमत्तेला स्थैर्य देतात, आकुंचित दृष्टीच्या नैतिक कल्पनाना मात्र त्यापासून कप सुटतो व त्याचे भय वाटते

लहान मुलावर वगैरे अलीकडे मानसशास्त्रज्ञाकडून जे प्रयोग होत आहेत त्यातून निष्पन्न झालेल्या तत्त्वावरून मुलाचे हसणे, रुसणे, बोलणे, चालणे वगैरे सर्व विशिष्ट कारणाची विशिष्ट कार्ये होत असे कळू लागून, मातापित्याना आज आपल्या अपत्याबद्दल जे कौतुक वाटते व जो प्रेमाचा पान्हा फुटतो तो फुटणार नाही, अशा प्रकारचे पूर्वपक्षाने, जे प्रतिपादन केले होते ते कसे सदोष आहे हे थोडक्यात दाखवून मी पुढील मुद्याकडे वळणार आहे. ज्ञान जसजसे वाढत जाईल, तसतशा बाल्याविषयीच्या ज्या काही भ्रामक कल्पना आहेत त्या जाऊ लागतील, हें उघडच आहे 'लहानपण हे मोठे रम्य आहे,' 'रम्य ते बालपण देइ देवा,' इत्यादि कल्पना ज्ञानाच्या प्रकाशापुढें टिकावयाच्या नाहीत लहानपण आपणाला रम्य वाटते,—लहान मुलाना तसें वाटत नाही, आणि आपणाला तरी काय, 'रम्य ते बालपण

देइ देवा ' हे बोलण्यापुरते व गाण्यापुरतेच ठीक आहे, खरोखरीच मोठेपण सोडून लहानपण स्वीकारण्याचा प्रसग आला, तर 'दुसरे बालपण' म्हणजे म्हातारपण जितके आपणास नकोसे वाटते तितकेच पहिलेहि वाटेल यात शका नाही ! वर्ड्स्वर्थला आत्म्याच्या अमरत्वाला काही खुणा लहानपणीच्या आठवणीत दिसल्या व लहान मुले ही ईश्वराच्या घरून नुकतीच आल्यामुळें ईश्वराच्या घरच्या–दिव्य लोकाच्या–त्याच्या आठवणी ताज्या असतात, असे वाटले, पण कविकल्पना म्हणून ही मते चागली आहेत, तत्वदृष्ट्या त्याची किमत बेताचीच ! आईला आपले चार महिन्याचे मूल हसलेले पाहून असे वाटते की, ' गुलामाला माझ बोलण सगळ समजत, ' आणि ती त्याचे मटामट मके घेते पण त्याच्या हसण्याचा बहुधा आईच्या बोलण्याशी काहीएक सबध नसतो, दुसऱ्या काहीतरी कारणाने ते स्मित उत्पन्न झालेले असते ! आणि त्या हसण्यामध्येहि विसगतिदर्शन वगैरे काही नसते, तर ते अर्धवट यात्रिक असते ! लहान मुले आपणाला जितकी चागली वाटतात तितकीं ती नसतात त्याना आपण निस्वार्थी, निष्पाप, गरीब, सालस समजतो, पण हें बरेचसे भ्रममूलक आहे त्याचे मलमूत्रात लोळणे हे जसे वेदान्तज्ञानाचे लक्षण नव्हे, तसेच त्याचे रुपयाकडे वगैरे दुर्लक्ष असणे हे निस्वार्थीपणाचे लक्षण नव्हे लहान मुलामध्येहि आपल्याप्रमाणेच बऱ्यावाईट प्रवृत्ति असतात, ती स्वार्थी असतात, इत्यादि गोष्टी कळू लागल्यावर, लहान मुलाभोवती जो एक आपल्या कल्पनेने अनेक रगी सुरम्य परिवेष निर्माण केला असतो, तो सूर्यकिरणामुळे धुके जसे नष्ट होते त्याप्रमाणे नष्ट होऊ लागतो. इतर अनेक गोष्टीबद्दल मुलाचे आपण कौतुक करतो, पण यापैकी काही गोष्टी प्रेममोहमूलक होत, असे मानसशास्त्रावरून कळून येईल या सगळया गोष्टी मी कबूल करतो, पण मानसशास्त्रामुळे प्रेमाचेच निर्मूलन होईल, मुलाविषयीच्या आपल्या सर्व कोमल भावना ज्ञानाग्नीत होरपळून जातील आणि मुलाविषयीची आपली कर्तव्यबुद्धि शिथिल होईल, असे मानण्यास कारण नाही खरा प्रकार असा आहे की, मानसशास्त्राच्या अध्ययनानें बालमनाच्या विकासाची दिशा, तद्विषयक नियम, विकृतीची कारणे, सवयीचें महत्त्व, चागल्या उदाहरणाची आवश्यकता, शिस्त केव्हा, कशी व कोणी लावावी याविषयीच्या यथार्थ कल्पना, या सर्व गोष्टी कळून मुला-

बद्दल आपण अधिक दक्षतेने वागू! आईचे 'आधळे खुळे मन' जसे बालकाकडे पाहते, तसेच केवळ आपण बाल-मानसशास्त्र शिकल्यावर त्याकडे पाहणार नाही. पण आईच्या प्रेमाचा झरा त्यामुळे आटेल असेहि मानण्याचे कारण नाही, उलट आईला आपली जबाबदारी अधिक वाटू लागेल, आपले कर्तव्य काय हे अधिक यथार्थत्वाने कळू लागेल आणि एकदरीत मुलाच्या शिक्षणाविषयी ती अधिक दक्ष होईल 'या दक्षतेबरोबर रुक्षताहि येण्याचा सभव नाही काय?' असे मला कोणी येथे विचारील, पण मला तर वाटते की, रुक्षतेऐवजी बालसगोपनाच्या व शिक्षणाच्या बाबतीत शास्त्राध्ययनाने अधिक जिज्ञासा-विषय, अधिक आस्था-विषय, अधिक कौतुकविषय interests उत्पन्न होतील, अधिक गोष्टी मनोरजन-विषय बनतील, अधिक गोष्टीकडे लक्ष लागेल, आणि मूल हे एक आपल्याजवळ ठेवलेली मोठी मौल्यवान् ठेव आहे, हा एक Trust आहे याकडे यत्किंचित् दुर्लक्ष करणे पाप आहे, अशी अधिक तीव्र जाणीव उत्पन्न होईल 'मूल हे स्वर्गांतून ईश्वराच्या घरून आले आहे,' ही वर्डस्वर्थची कल्पना नष्ट झाली, तरी तिच्या ऐवजी मुलाचा भविष्यकाळ उज्ज्वल करणे, त्यामध्ये ईश्वरी गुण उत्पन्न करणे, हे आपल्या हातात आहे, ही भावना तेथे अधिक जागृत होईल वर्डस्वर्थने कल्पिलेला मुलाचा दिव्य भूतकाळ गेला, तरी स्वतःच्या कर्तव्याच्या जबाबदारीच्या जाणिवेने कल्पिलेला मुलाचा दिव्य भविष्यकाळ मातेला अधिक कर्तव्यदक्ष करील आणि आपल्या कामात तिला अधिक उत्साह व आनद वाटेल, अशी माझी तरी कल्पना आहे.

---

# शं. बा. दीक्षित

## ग्रहणें

सहस्त्ररश्मि प्रकाशलेला आहे, सर्व लोक आपल्या कामात मग्न आहेत, पशुपक्ष्यादि प्राणी भक्ष्यादिकाच्या उद्योगात आहेत, इतक्यात अकस्मात् अधकार पडला. रात्र होण्याची वेळ नसता रात्र झाली, अथवा सगळ्या कलानी प्रकाशलेल्या चद्राचे आनददायक चादणे पडले असता एकदम ते नाहीसे होऊन चद्र काळा ठिक्कर पडला, तर मनुष्यादि सर्व प्राण्यास अति आश्चर्य वाटेल, फार भीति उत्पन्न होईल आणि ते वेड्यासारखे होतील कधी कधी असे होते हे ज्यास स्वानुभवाने किवा परपरागत गोष्टी ऐकून माहीत नसेल त्याची अवस्था तर विलक्षणच होईल. पशुपक्ष्यादि प्राणी आणि रानटी लोक ह्यास परपरागत इतिहास कोठचा, आणि त्यास स्वानुभवाचे स्मरण कोठचे राहणार. खग्रास सूर्यग्रहण किवा चद्रग्रहण पाहून सर्वकाळ त्याची अवस्था अशीच होणार. रानटी जातीमध्ये अद्यापहि सूर्याला गिळून टाणकाऱ्या राक्षसाला प्रसन्न करण्यासाठी वाद्ये वाजवितात. हिदुस्थानात अजूनहि पचागातून व स्थानिक वृत्तपत्रातून ग्रहणाचा स्पर्श, मध्य, मोक्ष आणि त्याचा काळ वगैरेबद्दलची माहिती अगोदर दिलेली असते तरीसुद्धा राहूकेतूचे तडाख्यातून सूर्यचद्राची सुटका होण्यासाठी प्राचीन काळच्यासारखेच मत्रतत्र, जपजाप्य इत्यादि विधि ग्रहणाचे वेळी आचरिले जातात. साराश, विचार करणाऱ्या मानवाची जर अशी स्थिति होते तर ग्रहणाचे वेळी जनावरे भयचकित होतील व पाखरे आपापल्या घरट्याचा आश्रय करतील यात मुळीच आश्चर्य नाही.

कोलबस अमेरिकेत गेला होता, तेव्हा तो एका बेटात असता तेथले लोक त्यास अन्नादि सामुग्रीचा पुरवठा करीत असत. परतु पुढे काही कारणानें त्याचे आणि कोलबसच्या लोकाचे वैमनस्य आल्यामुळे बेटांतले लोक पुरवठा करीतनासे झाले. अशा सधीस खग्रास चद्रग्रहण आले. तें कोलंबसास समजलें होते. त्यानें त्या लोकांस सांगितले होतें कीं, तुम्हावर देवाचा कोप

झाला आहे त्याचे चिन्ह तुम्हास आज रात्री दिसेल. एकाएकी अंधार पडेल, चद्र प्रथम काळा दिसेल, आणि मग लाल दिसू लागेल. त्याप्रमाणें रात्री झाले तेव्हा त्या लोकास अतिशयित भीति वाटून त्यानी कोलंबसास तात्काळ धान्यादिक आणून दिले. विद्याचारसपन्न देशातदेखील आद्य-स्थितीत खग्रास ग्रहणानी मनुष्याची अशीच स्थिति काही काल झाली असेल. खग्रास सूर्यग्रहणे पुष्कळ होतात, तरी एकाच स्थळी ती फार थोडी दिसतात. लडनमध्ये इ स ११४० या वर्षी खग्रास सूर्यग्रहण पडले त्यावर पुन इ स १७१५ मध्ये झाले. म्हणजे मध्ये पावणेसहाशे वर्षात मुळीच झाले नाही असे आहे यामुळे ग्रहणाविषयी ऐकून माहिती असली तरी ते प्रत्यक्ष पाहून मनुष्य आश्चर्यभरित आणि चकित झाल्यावाचून राहणार नाही

ऋग्वेदातले सौरसूक्त नावाचे सूर्याचे स्तोत्र म्हणत असतात त्यात असे वर्णन आले आहे -- "हे सूर्या आसुर स्वर्भानूने तुला तमाने आच्छादिले तेव्हा कोणास आपले स्थानहि दिसेना सगळे लोक अगदी भाबावल्यासारखे झाले. हे इद्रा, तू स्वर्भानूच्या मायाचा नाश करतोस तमाने झाकलेल्या सूर्यास अत्रीने ब्रह्मज्ञानाने मुक्त केले अत्रीने स्वर्भानूच्या मायाचे निवारण केले' अत्रि सूर्याला मिळविते झाले. इतर कोणी मिळवू शकले नाहीत"

महाभारतादिकात ग्रहणाचे वर्णन पुष्कळ ठिकाणी आहे. त्यात बहुधा काही विपरीत किवा फारशी कधी न घडणारी गोष्ट घडण्याच्यावेळी ग्रहण पडले होते, अथवा ग्रहण झाल्यावर विपरीत गोष्टी झाल्या असे वर्णन असते या देशातील बहुतेक क्षत्रियाचा सहार करणारे कौरवपाडवाचे महाभयकर युद्ध झाले, त्याच्या पूर्वी नुकतीच एकाच महिन्यात चद्राचे व सूर्याचे अशीं दोन ग्रहणे झाली होती, आणि त्यावरून त्या प्रळयाचे चिन्ह दिसून आले होते असे वर्णन आहे.

गेल्या सोळाशे वर्षातले अनेक राजाचे शेकडो ताम्रपट हल्ली सापडले आहेत, आणि त्यावरून या देशाच्या प्राचीन इतिहासाचा पुष्कळ चागला विश्वसनीय शोध लागत चालला आहे. बहुतेक ताम्रपट एखाद्या पुण्यकारक पर्वाच्या वेळी ब्राह्मणास भूमि इत्यादिकाचे दान केल्याच्या संबधाचे आहेत. त्यांत सूर्यग्रहण अथवा चंद्रग्रहण याच्या वेळी भूमिदान केल्याचा उल्लेख पुष्कळ ताम्रपटांत आहे. या ताम्रपटांत ग्रहण कोणते दिवशी झाले, शक व

महिना कोणता होता, असे उल्लेख असतात त्यामुळे कालगणनेला पुष्कळच मदत झाली आहे

ऋग्वेदातले वर्णन वर दिले आहे त्यासबधे दोन तीन गोष्टी विचार करण्यासारख्या आहेत. ते वर्णन अतिप्राचीन असून अतिभीतिदर्शक नाही. दुसरी गोष्ट अशी की, अत्रि मात्र सूर्यास मुक्त करते झाले, इतराचे सामर्थ्य झाले नाही, याचा अर्थ काय? सूर्यग्रहणाचे ज्ञान अत्रि गोत्रातील ऋषीस होते, इतरास नव्हते असा त्याचा अर्थ दिसतो, आणि अत्रीस ज्ञान होते याचा अर्थ काय? ग्रहण लागले हे सर्वांस समजते. तेव्हा प्राचीन खाल्डियन लोकास ग्रहणे पडण्याचा नियम माहीत होता, तसा अत्रीस माहीत असावा असे दिसते. तिसरे असे की, स्वर्भानूने तमाने सूर्यास झाकले असे वर्णन आहे तेव्हा स्वर्भानु निराळा आणि तम निराळे असे झालें स्वर्भानूने सूर्यास गिळिले असे वर्णन नाही. यावरून ग्रहणाच्या खऱ्या कारणाची कल्पना त्यावेळी असावी असे दिसते. महाभारतात जागोजाग वर्णने आहेत, त्यातहि ग्रहण पाहूनच लोक भिऊन गेले असे वर्णन कोठेहि नाही. ग्रहणाचे परिणाम वाईट होतील, अशी मात्र भीति लोकास पडत असे. भारतीय युद्धाच्या वेळी एका महिन्यात दोन ग्रहणे झाल्यामुळे ते लोकानी दुश्चिन्ह मानले साराश, आमच्या लोकास प्राचीन काळापासून ग्रहणाचा पुष्कळ परिचय आहे, व त्यासबधी त्यास वास्तविक ज्ञान असावे असे दिसून येते. ग्रहणावरून चद्रसूर्याच्या गति साधल्या असे आर्यभट्ट आणि ब्रह्मगुप्त यानी स्पष्ट लिहिले आहे.

सूर्यग्रहण सुरू झाल्यावर थोडा वेळ प्रकाश फारसा कमी झालेला दिसत नाही, पण पाहणाऱ्याचे जवळ जर काजळ लावलेली काच असेल तर त्याला सूर्यबिंबाचे पश्चिम बाजूला काळसर झालेले वृत्तखड दिसेल तास दीड तास हे काळसर पडणारे वृत्तखड क्रमाने वाढत जाते उष्णतामान कांही अश उतरते आणि सूर्यप्रकाशाच्या रगामध्ये थोडा बदल झाल्यामुळे पृथ्वीवर जिकडे तिकडे एक प्रकारचे अस्वाभाविक दृश्य दिसू लागते. लवकरच सूर्य एकदम सपूर्णपणें दिसत नाहीसा होतो आणि त्याबरोबरच त्याच्या बिंबावरील देखावा विलक्षण दिसूं लागतो. काळ्या सूर्यबिबापासून लाल ज्वाला निघतात. त्यांना तेजशृंगे म्हणतात. त्या तेजशृंगाचे वर ज्याला

प्रभामडळ म्हणतात असे एक तेजाचें वर्तुळहि सूर्यबिबाचे भोवती पसरलेले दिसते. प्रभामडळातून निघणारे व जणू काय पताकासारखे फडकणारे तेजाचे पट्टे सूर्यबिंबाच्या सर्व बाजूनी कित्येक अश लाबवर पसरतात ताऱ्यापैकी काही बरेच चकाकित तारे व शुक्र, गुरु, मगळ वगैरे ग्रह आकाशात दिसू लागतात. हे दृश्य अगदी थोडी मिनिटेच टिकून राहाते मग हा देखावा ज्याप्रमाणे तो एकदम दिसू लागतो तितकाच एकदम तो नाहीसा होतो सूर्याच्या पश्चिम बाजूस पाढरी स्वच्छ प्रकाशाची कोर दिसू लागते व ही कोर वाढत वाढत जाऊन नतर दीडएक तासात ग्रहण सुटते. खग्रास सूर्यग्रहणे पुष्कळ होतात, पण एकाच स्थळी ती फार थोडी दिसतात. काही ठिकाणी तर खग्रास सूर्यग्रहण झालेले मुळीच आढळून येत नाही. साहजिकच आपल्या सबध आयुष्यात ज्यानी खग्रास सूर्यग्रहण पाहिलेले नाही असे बरेच लोक आढळतात

खडाकृति सूर्यग्रहणे बरीच दिसतात, पण त्याचे दृश्य खग्रास सूर्यग्रहणाइतके चमत्कृतिजनक नसते स्थूलमानाने पाहता सूर्याचा प्रकाश चद्राच्या प्रकाशाच्या सहा लक्ष पट जास्त असतो तुलनेने चद्रप्रकाश हा खग्रास ग्रहणाचे वेळीच दिसणाऱ्या सूर्याच्या प्रभामडळाच्या तेजाइतका असतो एकादे ग्रहणाचे वेळी सूर्याचा प्रकाश अर्ध्याने कमी झाला तरीसुद्धा तो फरक क्वचितच लक्षात येतो, आकाश अभ्राच्छादित होते तेव्हा सुद्धा प्रकाशात यापेक्षा जास्त फरक पडतो. ककणाकृति सूर्यग्रहणाचे वेळी सूर्याची फक्त कडाच दिसते. तरी तेव्हाचा प्रकाश पौर्णिमेच्या चद्राच्या प्रकाशाच्या सुमारे पाच हजार पट असतो, म्हणून या प्रकाशात सूर्याचे प्रभामडळ आणि तेज शृगे दिसत नाहीत.

सूर्यग्रहणाचे मानाने चद्रग्रहणाच्या वेळचे कुतूहल कमी प्रमाणात असते. ग्रहणाच्या पूर्वी सपूर्ण चद्रबिबाचा प्रकाश पडलेला असतो त्यावेळी सुद्धा अत्यत चकचकीत तारे दिसत असतातच. जसजशी ग्रहणाची छाया वाढत जाते, तसतसे तारे अधिकाधिक दिसू लागतात इतकेच, आणि पूर्ण ग्रास झाल्यावर सर्व आकाश फक्त अमावास्येच्या रात्रीप्रमाणे ताऱ्यानी भरलेले दिसते. चद्राचा पूर्ण ग्रास बराच वेळ टिकतो. चद्रग्रहणाचे ऐतिहासिक दृष्ट्या महत्त्व आहे. कारण त्यामुळे पृथ्वी गोलाकार आहे हे नि.सदिग्ध-

पणें सिद्ध झाले आहे. तसेच त्याचे योगाने चद्राचे अतर नक्की ठरविता आले आहे.

पृथ्वीच्या निरनिराळ्या भागावर एकच सूर्यग्रहण निरनिराळ्या प्रकारचें दिसते एका विशिष्ट पट्ट्यात ते खग्रास किवा ककणाकृति दिसते व बाकीच्या भागात खडग्रास दिसते. याचे उलट चद्रग्रहणाचे वेळी पृथ्वीवर जेथे जेथे चद्र दिसत असेल तेथे तेथे चद्रग्रहण सारखेच दिसते चद्राचा ग्रास कमजास्त प्रमाणात झालेला दिसत नाही. यामुळे एखाद्या विशिष्ट स्थळी सूर्यग्रहण कोणत्या प्रकारचे दिसेल याबद्दलचे गणित चद्रग्रहणाचे गणितापेक्षा जास्त गतागतीचे असते

ग्रहणाच्या काळाचे एक चक्र आहे १८ सौरवर्षे आणि ११ दिवस इतक्या काळात जी जी ग्रहणे ज्या क्रमाने होतात तीच बहुधा त्याच क्रमाने पुढें तितक्या काळात होतात चाद्रसौरमानाने कधी ह्या काळात १८ वर्षे होतात कधी १८ वर्षे आणि एक चाद्रमास होतो सूर्यचद्र हे राहूबिदूत एकदा आल्यापासून पुन्हा सुमारे इतक्या काळाने, ते एकाच वेळी फार थोडया कलाचे अतराने त्या स्थळी येतात या फरकाने चक्रातले एकादे ग्रहण पुढल्यात कमी होते आणि एकादे वाढते एका चक्रात बहुधा ७० ग्रहणे होतात त्यात ४२ सूर्याची आणि २८ चद्राची होतात कधी चक्रात ७१ ग्रहणे होतात तेव्हा चद्राची २९ होतात चक्रात सूर्याची ग्रहणे होतात पुष्कळ, परतु एकाच स्थळी त्यातली थोडीच म्हणजे सुमारे ७ दिसतात ती बहुतेक खडित म्हणजे अपूर्ण दिसतात चक्रातील २८ चद्रग्रहणापैकी सरासरीने १८ एका ठिकाणी दिसतात. म्हणजे १८ वर्षात पृथ्वीवर होणाऱ्या एकदर ७० ग्रहणापैकी ७ सूर्यग्रहणे व १८ चद्रग्रहणे एका ठिकाणी दिसतात. ४६ दिसत नाहीत. खाल्डियन लोकानी पुष्कळ ग्रहणे लिहून ठेवली होतीं. यामुळे त्यास हे चक्र माहीत झाले होते एका वर्षात ४ सूर्यग्रहणे व ३ चद्रग्रहणे अथवा ५ सूर्यग्रहणे व २ चद्रग्रहणे होणे शक्य आहे. एका वर्षात होणाऱ्या ग्रहणाची किमान सख्या २ असते. मात्र जेव्हा दोनच ग्रहणे होतात तेव्हा ही दोन्ही सूर्यग्रहणेच असतात ऑपॉझलरचे नियमानुसार १०० वर्षांत सरासरीने २३८ सूर्यग्रहणे व १५४ चद्रग्रहणे होतात.

पृथ्वीभोवती चद्र फिरतो आणि चद्राच्या पलीकडे फार लाब सूर्य आहे.

पृथ्वी आणि चद्र हे दोन्ही गोल अपारदर्शक आहेत यामुळे सूर्याचा प्रकाश यावर पडतो, तेव्हा सूर्य जिकडे असतो, त्याच्या दुसऱ्या बाजूस ह्याची छाया पडते. रात्रीस पृथ्वीच्या ज्या अगी आपण असतो, त्याच्या दुसऱ्या अगास खाली सूर्य असतो, म्हणून आपल्या वरच्या बाजूस आकाशांत पृथ्वीची छाया पसरलेली असते चद्र नसला तर ही छाया आपल्या अनुभवास येतेच. याप्रमाणेच चद्राची छाया पडते अमावास्येच्या दिवशी सूर्याच्या थेट खाली चन्द्र असला म्हणजे चद्राची छाया पृथ्वीवर पडली पाहिजे. ह्या छायामुळे चद्रसूर्यास ग्रहणे लागतात सूर्य स्वयप्रकाशी आहे म्हणून वास्तविक म्हटले म्हणजे त्यास ग्रहण कधीच नाही म्हणजे त्याजवर कोणाची छाया कधीच पडावयाची नाही परतु त्याच्या आड चद्र येऊन चद्राची छाया पृथ्वीवर पडली म्हणजे, जेथे ती पडते तेथील लोकास सूर्य दिसत नाही म्हणून ते म्हणतात की, सूर्यास ग्रहण लागले छाया नसते तेथे सूर्य दिसतच असतो दिवसास एकादे वेळी आपण असतो तेथे ऊन असते, आणि काही अतरावर एकाद्या लहानशा ढगाची सावली पडलेली असते व ती जलद पळत असते, असे पुष्कळ वेळा आपल्या दृष्टीस पडते. अशीच गोष्ट चद्राची आहे ढगापेक्षा चद्र फार मोठा आहे त्याची छाया ढगाच्या छायेहून फार मोठी असते यामुळे पृथ्वीच्या बऱ्याच भागावर ती पसरते

दिव्याच्या लहानशा ज्योतीसमोर एखादी मोठी दगडाची वाटोळी गोटी धरिली, आणि तिची छाया भिंतीवर पाडिली तर ती वाटोळीच परतु गोटीहून मोठी पडेल काही उपायानी ज्योत फार मोठी वाटोळी केली आणि तिच्यासमोर एक लहानशी गोटी धरिली तर तिची छाया भितीवर तिच्याहून लहान पडेल ती गोटी ज्योतीच्या आड परतु भिंतीपासून पहिल्यापेक्षा लाब धरिली तर एखादे वेळी तिची छाया भिंतीवर पोचणारहि नाही ही गोट्याची छाया शकूच्या आकाराची पडते तिला सूचि असेहि म्हणतात. एक फार मोठी वाटोळी ज्योत करा तिच्यासमोरच तिच्याहून फार लहान असे एक लिंबू धरा. ज्योत व लिंबू यामध्ये लिंबाहून फार लहान अशी एक गोटी धरा. गोटी हा चद्र, लिंबू ही पृथ्वी, आणि ज्योत हा सूर्य अशी कल्पना करा. ज्योत आणि लिंबू याच्यामध्ये गोटी आणा. तिहीचेहि

मध्यबिंदू एका सरळरेषेत येतील असे करा गोटीची लहानशी छाया लिंबा-वर पडेल, इतकी लांब ती गोटी धरा छायेतील लोकांस ज्योत मुळीच दिसणार नाही. तिला खग्रास ग्रहण लागले. छायेच्या भोंवती पुसट छाया पडलेली दिसेल. तिला छायाकल्प म्हणतात. तीतील लोकांस सूर्याचा काही भाग दिसत नाही. त्यास खंडग्रहण दिसते छायाकल्पाबाहेर ज्योतीचा पूर्ण प्रकाश पडलेला असेल तेथे ग्रहण मुळीच नाही गोटी प्रथम धरली होती, तेथून अमळ दिव्याकडे नेऊन तिची छाया लिंबावर मुळीच पोंचणार नाही असे करा ज्योत आणि गोटी ह्यांच्या मध्यबिंदूच्या समोरचा जो लिंबा-वरचा बिंदु तेथे एकादी मुंगी असली तर तिला कंकणाच्या आकाराची ज्योतीची वाटोळी कडा दिसून मधल्या भागाच्या आड गोटी आल्यामुळे तो दिसणार नाही, म्हणजे कंकणग्रहण लागले. मग लिंबाच्या छायेंत गोटी आणा ज्योत आणि गोटी ह्यांच्या थेट मध्ये लिंबू असले तर गोटी सगळी छायेंत सांपडेल तिला खग्रास ग्रहण लागले गोटी अमळ जरा वर किंवा खाली केली, अशी की तिच्या थोड्याशा भागावर उजेड पडेल तर तिला खंडग्रहण लागले

अमावास्येच्या वेळी सूर्याच्या खाली चंद्र कोठेतरी असतो आणि सूर्य क्रांतिवृत्तात कोठेतरी असतो पृथ्वी क्रांतिवृत्ताच्या मध्यबिंदूत असते अर्थात् पृथ्वीची छाया क्रांतिवृत्तातच समोर असते पूर्णिमेच्या रात्री चंद्र जेथे असतो त्याच्या आसपास भूछाया क्रांतिवृत्तात असते. सूर्याइतकीच भूछायेची गति असते. तिच्याहून चंद्र जलद चालतो तो पश्चिमेकडून पूर्वेस जातां जातां तो आणि भूछाया यांचे पूर्वपश्चिम अंतर शून्य होते. तेव्हांच दक्षिणोत्तर अंतर शून्य झाले तर त्यास ग्रहण लागते. परंतु दर पूर्णिमेस ते अंतर शून्य होत नाही.

सपाट जमिनीवर एक मोठी बांगडी व तिच्या आंत एक बरीच लहान बांगडी ठेवा दोन्ही बांगड्या एका सपाटीवर आहेत ह्या एका पातळीत आहेत असे म्हणतात. चंद्रकक्षा आणि क्रांतिवृत्त ही आकाशांत अशीच एका पातळीत असती तर दर पूर्णिमेस चंद्र व ×भूभा यांचे आणि दर अमावास्येस चंद्र व सूर्य यांचे दक्षिणोत्तर अंतर शून्य झाले असते. परंतु

×भूभा म्हणजे पृथ्वीची छाया.

दोहोच्या पातळ्यात ५ अंश ८ कलाचा कोन आहे त्या पातळ्या दोन ठिकाणी परस्परास छेदितात. त्या बिंदूस राहु-केतु म्हणतात राहुकेतूत किंवा त्याच्या जवळ चंद्र असतो तेव्हा चंद्राचा शर शून्य किंवा अगदी थोडा असतो. म्हणजे क्रांतिवृत्ताच्या जवळच चंद्र असतो यामुळे तेव्हा सूर्यहि तेथेच असला तर त्याच्या आड चंद्र येतो किंवा भूछाया तेथे असली तर तीत चंद्र सापडतो यामुळे ग्रहणे होतात राहूकेतूपासून चंद्र लांब असला तर तो क्रांतिवृत्तापासून लांब असतो. यामुळे त्याचा शर सूर्यबिंब किंवा भूभाबिंब याहून जास्त होतो यामुळे तो सूर्याच्या आड येत नाही, किंवा भूछायेत सापडत नाही, यामुळे ग्रहण होत नाही चंद्रग्रहण नेहमी पूर्णिमेस आणि सूर्यग्रहण अमावास्येस होते सूर्यग्रहण लागण्यापूर्वी सूर्याच्या पश्चिमेस चंद्र असतो परंतु तो जलद चालणारा असल्यामुळे सूर्याचे बिंब ओलांडून काही वेळाने सूर्याच्या पूर्वेस येतो पश्चिमेकडून चंद्र येता येता सूर्याच्या पश्चिम कडेच्या आड तो येताच सूर्यास त्या दिशेने ग्रहण लागू लागते, तेव्हा ग्रहणाचा स्पर्श झाला असे म्हणतात अर्थात् सूर्यग्रहणाचा स्पर्श सूर्यबिंबाच्या पश्चिमेकडून होतो, आणि पुढे सूर्यबिंबाचा अधिकाधिक भाग आच्छादित होऊ लागतो. नंतर काही वेळाने तो कमी व्हावयास लागून सूर्याच्या पूर्व बाजूने चंद्र सूर्यास मोकळा करतो, म्हणजे ग्रहण सुटते त्यावेळी ग्रहणाचा मोक्ष झाला असे म्हणतात मोक्ष याचा अर्थ सुटका असा आहे ह्याप्रमाणेच भूछायेच्या पश्चिमेकडून चंद्र येऊन पूर्वेस जातो यामुळे त्याचा पूर्वभाग प्रथम आच्छादित होतो, आणि पश्चिमभाग शेवटी छायेतून बाहेर पडतो, म्हणून चंद्रग्रहणाचा स्पर्श बिंबाच्या पूर्वेकडून आणि मोक्ष पश्चिमेकडून होतो बिंबाचा जितका भाग आच्छादित होतो, तितका ग्रास झाला असे म्हणतात स्पर्शापासून मोक्षापर्यंन्त जो काळ जातो त्यास पर्वकाळ म्हणतात. या काळाच्या मध्याच्या सुमारास महत्तम ग्रास होतो. तेव्हा ग्रहणाचा मध्य झाला असे म्हणतात. त्यावेळी जो भाग आच्छादित होतो तो ग्रास पंचांगात लिहितात, आणि ग्रहणाची आकृति पंचांगात काढितात, तीत दाखवितात ग्रास ह्याचा अर्थ खाणे असा आहे. राहु सूर्यास ग्रासितो अशी मूळची कल्पना होती, तिजवरून ग्रास ही संज्ञा प्रचारात आली असावी.

सूर्यास खग्रास ग्रहण लागते तेव्हा चद्राची छाया पृथ्वीवर पडते, तिचा व्यास फार तर १८० मैल असतो यामुळे इतक्या रुदीचा पृथ्वीचा जितका पूर्वपश्चिम पट्टा सूर्यबिबावरून चद्र पलीकडे जाईपर्यन्त दैनदिन गतीमुळे छायेत येतो, तेथे मात्र खग्रास ग्रहण होते. ककणग्रहणात ते ककण दिसण्याचा पट्टा सुमारे शभर मैल रुद असतो हृया पट्ट्याच्या उत्तरेस व दक्षिणेस तीच ग्रहणे खडितमात्र दिसतात यामुळे स्थलविशेषी खग्रास किवा ककण सूर्यग्रहण फार वर्षांनी दिसते खग्रास सूर्यग्रहणात सूर्य पूर्णपणे आच्छादिलेला फार तर आठ मिनिटे दिसतो, आणि ककण ग्रहण फार तर ३१ पळे दिसते.

जेथे चद्र असतो तेथे पृथ्वीछायेचा व्यास चद्रबिबाहून पुष्कळ मोठा असतो कधी कधी तो चद्रबिबाच्या तिप्पट असतो म्हणजे ग्रहणाच्या वेळी भूभा आणि चद्र याचे मध्यबिदू एका ठिकाणी आले तर चद्राभोवती चद्रबिबाच्या दीडपट रुदीचे भूभावेष्टन असते. यामुळे चद्रास कधीहि ककणग्रहण लागावयाचे नाही भूछायेतून जाण्यास चद्रास फार वेळ लागतो म्हणून खग्रास चद्रग्रहण फार वेळ दिसते यावेळी भूभेने चद्राचा ग्रास होऊन ख म्हणजे आकाश याचाहि होतो, म्हणून त्यास खग्रास ग्रहण म्हणतात. भूभेच्या भोवती छायाकल्प असतो. त्यात चद्र येतो तेव्हा अमळ निस्तेज दिसतो यामुळेच खग्रास चद्रग्रहणात स्पर्शापूर्वी व नतर काही वेळ चद्र फिकट दिसत असतो तसेच त्यावेळी चद्राच्या व आपल्यामध्ये कोणी आलेले नसते फक्त त्यावर छाया पडलेली असते व सूर्याचे किरण प्रत्यक्ष पडत नाहीत, तरी ते पृथ्वीच्या वातावरणातून वक्रीभवन पावून त्यावर पडतात, यामुळे तो अगदी काळा दिसत नाही, किंचित् प्रकाशित दिसतो.

आईनस्टाईनच्या सापेक्षत्वाच्या नियमाप्रमाणे प्रकाशाच्या गतीसहि जड वस्तूच्या गतीचे काही नियम लागतात उदाहरणार्थ, प्रकाशकिरण फार मोठ्या द्रव्यसघाजवळून जात असतील तर त्यांचे विलचन होईल. या विचलनामुळे सूर्याच्या तेजोगोलाच्या मागे परतु त्याच्या कडेजवळ असलेले

काही तारे आपणास दिसू शकतील. असे तारे खरोखरच दिसतात की कसे या संबधीचे वेध फक्त खग्रास सूर्यग्रहणाचे वेळीच घेता येतील असे वेध निरनिराळ्या खग्रास सूर्यग्रहणाचे वेळी घेऊन प्रकाशकिरणाचे खरोखरच विचलन होते व ते किती होते याबद्दल आईनस्टाईनने सांगितलेला नियम बरोबर आहे असे सिद्ध झाले आहे

---

# न. चिं. केळकर

## बुद्धजयंति

धराबध्दपद्मासनस्थांघ्रियष्टि –।
नियम्यानिलं न्यस्तनासाग्रदृष्टि: ।।
य आस्ते कलौ योगिनां चक्रवर्ती।
स बुध्द: प्रबुध्दो ऽ स्तु निश्चित्तवर्ती ।।

श्री शकराचार्य.

निदसि यज्ञविधेरहह श्रुतिजातं
सदय हृदयदर्शित पशुघातं
केशव धृतबुध्दशरीर। जय जगदीश हरे ।।

–गीत–गोविंद.

बरोबर पचवीसशे वर्षे झाली, वैशाख शुद्ध १५ स शाक्यकुलातील अत्यत श्रेष्ठ पुरुष जो सिद्धार्थ गौतम तो " बुद्ध " झाला व तेव्हापासून जगातील श्रेष्ठ अशा धर्मापैकी एकाची म्हणजे बौद्धधर्माची स्थापना झाली. वास्तविक सिद्धार्थ गौतम या व्यक्तीच्या जन्मास पचवीसशेहून अधिक वर्षे झाली आहेत. तथापि, ज्या दिवशी त्याला खरा आत्मसाक्षात्कार झाला, अनेक वर्षेपर्यत तीव्र चिकित्सापूर्ण अशा मनाने हुडकीत अनलेली भवचक्राची गुरुकिल्ली चिच्छक्तीच्या प्रेरणेने ज्या दिवशी त्याच्या हस्तगत झाली, तोच दिवस बुद्धावतारजयतीचा मानण्यात यतो तत्पूर्वीचा गौतमबुद्ध हा तुमच्या आमच्याप्रमाणे केवळ एक ससारी पुरुष होता ख्रिस्त, महमद वगैरेप्रमाणेच बुद्ध ही एक खरी ऐतिहासिक व्यक्ति होऊन गेली व तिजविषयीं साधार अशी माहिती ग्रथातून मिळते बुद्धाचा बाप शुद्धोदन शाक्य हा वास्तविक राजा असा नव्हता कारण शाक्य जातीच्या लोकात त्या वेळी एक प्रकारची प्रजासत्ताक राज्यपद्धति असून समाजाचा सर्व कारभार प्रातिनिधिक पद्धतीनें चालत असे. शुद्धोदनास प्रत्यक्ष राजपद असे नसले तरी तो घरचा श्रीमान्

व सुखी होता आणि आपला प्रिय पुत्र जो सिद्धार्थ याला त्याने एखाद्या राजपुत्राप्रमाणे चैनीत व ऐषआरामात लोळता येईल अशा स्थितीस ठेवले होते. सासारिक दु ख म्हणून कसे असते ते आपल्या मुलाच्या दृष्टीसहि पडू नये, अशी त्याने विशेष खबरदारी घेतली होती

यशोधरा नावाच्या सुदर स्त्रीशी सिद्धार्थाचे लग्न लहानपणीच लागलेले असून राहुल नावाचा एक अत्यत कमनीय असा पुत्रहि त्याला होता. सिद्धार्थाचे लक्ष ऐहिक ऐषआरामात गुरफटलेले नसून जगाच्या स्थितीकडे लागलेले ते. प्रेमळ बापाने केलेल्या कडेकोट बदोबस्तातूनहि मानवी दु खाचा थोडाबहुत मासला त्याच्या नजरेस मधून मधून पडल्याशिवाय राहात नसे, व प्रत्येक वेळी हा मासला पाहताच या दु खाचे मूळ कशात आहे ? दु खनिवारणार्थ चाललेला जगाचा प्रयत्न योग्य मार्गाने होत आहे किवा भलत्याच अयोग्य मार्गाचे वळण त्याला लागले आहे ? ही त्याची विचिकित्सा वाढतच जाई ससारातले त्याचे मन निघाल्यामुळे प्रतिक्षणी ससारोपाधीचा जाच त्याला अधिकाधिक दु सह वाटू लागला. ससारपाश तोडल्याशिवाय आपल्या शकास समाधानकारक उत्तर मिळणार नाही, असा त्याचा कायमचा निश्चय झाला; व राहूलाच्या जन्मोत्सवासबधाने कपिलवस्तु नगरीच्या पौरजनानी केलेल्या एका विशेष समारभाच्या ऐन दिवशीच गौत मबुद्धाने आपल्या **अलौकिक अशा वैराग्याचा** मासला जगास दाखविला. जगात सामान्यत वैराग्याला कारण दु ख हेच असते, आर्त भक्तीची उदाहरणेच पुष्कळ. सुखात लोळणाऱ्याला वैराग्य क्वचितच आठवते. पण गौतमबुद्धाच्या वैराग्याला जगांत दुसरे उदाहरण मिळणे कठिणच. समर्थ रामदासस्वामी विवाहाकरितां पाटावर उभे असता ‘सावधान’ या सूचक शब्दाचा इषारा तरी त्याच्या कानी पडला होता; पण गौतमबुद्धाला जी वैराग्य जागृति मिळाली ती केवळ आत्मप्रेरणेनें. बुद्धाच्या ‘महाभिनिष्क्र’ मणासारखा काव्यमय व उदात्त प्रसग दुसरा मिळणार नाही. रामचद्राला ऐन राज्यारोहणप्रसंगीं राज्य सोडून जावे लागलें खरे; पण त्याला मूळ कारण परेच्छा, स्वत: रामचद्राची इच्छा नव्हे रामचद्राचा वनवास हे पितृभक्तीचे उदाहरण होय, वैराग्याचे नव्हे. गौतमाने सर्व ससारसुखाचा त्याग केला तो केवळ स्वत.च्या परमार्थज्ञानाच्या सात्त्विक इच्छेनें.

उत्सवप्रिय मनुष्यानी वाडा गजबजून गेला आहे, नाचरग चालला आहे, मगल वाद्ये वाजत आहेत, सर्वत्र रोषणाई केलेली आहे अशा दिवशी गौतमबुद्धाचे मन मात्र ठिकाणावर नव्हते. व्यग्र चित्ताने त्याने सर्व दिवस घालविला आणि ऐन मध्यरात्री यशोधरा ही पुष्पशय्येवर राहुलाला कुशीत घेऊन गाढ निद्रिस्त असता तिला जागी न करता तो निघाला. आपल्या प्रिय पत्नीला विरहदु ख काही दिवस सोसावे लागणार, पण मनात जी विचिकित्सा उत्पन्न झालेली आहे, तिचे समाधान झाल्यानतर परत येऊन तिला भेटून आपणास झालेल्या सम्यक् ज्ञानाचा गुरूपदेश तिलाहि करू, अशा सदय भावनेने गौत मबुद्ध त्या उभयतास तेथेच सोडून देऊन फक्त एका सारथ्याला घऊन राजोद्यानातून बाहेर पडला रात्रभर प्रवास करून सकाळी एका पवित्र नदीच्या तीरावर येताच आपल्या तरवारीने त्याने आपले लाब सडक, व सुगधी तेल लावून तुळतुळीत केलेले केस कापले, अगावरील सर्व अलकार उतरले, आणि ते सर्व सारथ्याबरोबर कपिलवस्तूस परत पाठविले. नतर मगध देशाची राजधानी जे राजगृह शहर तेथे जाऊन डालार व उद्रक या दोन पडितापासून हिदु तत्त्वज्ञानाची माहिती त्याने करून घेतली अर्थात् शुष्क तत्त्वज्ञानाने त्याचे समाधान झाले नाही तेव्हा योगसाधनाने तरी चित्तात सम्यक् ज्ञानाचा प्रकाश पडेल या भरवशाने, विध्य पर्वतातील उरुवेलच्या निबिड अरण्यात सहा वर्षेपर्यंत त्याने इतके देहदडन केले की, शेवटी उभा राहण्याची देखील शक्ति त्याच्या अगी राहिली नाही. हठयोगाने समाधान होईना तेव्हा त्याने तोहि सोडन दिला असाच विचार करीत करीत भटकत असता व निरजना नदीच्या तीरी महावृक्षाखाली बसला असतां एक दिवस त्याच्या मनात खऱ्या परमार्थज्ञानाचे तेज प्रकाशमान झाले. ती सर्व रात्र त्याने मन समाधीच्या एकातिक सुखात घालविली दुसऱ्या दिवसापासून आपल्यास मिळालेले ज्ञान दुसऱ्यास शिकविण्यास त्याने सुरुवात केली. वैराग्य, आत्मयज्ञ, उपास, तप इत्यादिकानी त्याच्या ठिकाणी जे तेज उत्पन्न झाले होते ते सम्यक् ज्ञानाच्या आनदाने दुणावले आणि सर्व जग शहाणे करून सोडण्याच्या त्याच्या सात्त्विक निश्चयाने जगद्गुरूची पदवी नसली तरी पात्रता त्याचे अंगी आपोआप बिनटली. येथपासून पुढे आपल्या अवतारसमाप्तीपर्यंत सुमारें चाळीस वर्षेपर्यंत त्यानें उपदेशाचे पवित्र काम

केलें; शेकडो लोकाशी युक्तिवाद केला, शेकडो लोकास कळकळीने आळविले, शेकडो सघ स्थापले व जवळजवळ सर्व देशभर शिष्यमडळ बनविलें. कोणत्याहि नवीन मताची शिष्यपरपरा हिदुस्थानात कशी फैलावत जाते याचा ज्याला अनुभव आहे, त्याला गौतमबुद्धाने केवळ आपल्या निम्म्या हयातीत प्रचड धर्मक्राति कशी घडवून आणली असेल याची कल्पना येईल. यास्तव गौतमगुरूचा दिग्विजय प्रथम केवळ पाच शिष्य-सैनिकासह कसा सुरू झाला, त्याला पहिल्याच यशाची प्राप्ति वाराणसीसारख्या सनातनप्रिय अशा वैदिक धर्माच्या क्षेत्री कशी झाली, त्याच्या अपूर्व धर्मोपदेशाच्या लाटेत सशयग्रस्त ससारी जनचसे काय पण पूर्वपरपरेने पढलेले विद्वान् व बुद्धिमान् असे वैदिक, पडित व पराक्रमी राजे कसे गडप झाले, चोर, जार, पतित, चाडाल वगैरे सर्व प्रकारचे मूढ व दुराचारी जनहि त्याच्या प्रसादतीर्थाने अतर्बाह्य पुनीत होऊन सद्गुणी कसे बनले, वगैरे तपशील सागत बसण्याचे कारण नाही तसेच या नव्या धर्मावताराने निस्तेज झालेल्या असूयाग्रस्त अशा अनेक लोकानी गौतमबुद्धाचा पाडाव करण्याकरिता निदा, अत्याचार वगैरे तामसी विद्या व पैशुन्य कला खर्ची घातल्या तरी गौतमबुद्धाच्या यशाची यत्किचितहि हानि न होता अखेरपर्यंत त्याची कीर्ति वाढतच कशी गेली हा कथाभागहि सागत बसण्याचे कारण नाही जगात कोठेंहि जा, सख्या भावडाचा तोडवळा जसा सारखा असतो, तसेच विभूतिमात्राचे चरित्रहि पुष्कळ अशी सारखे असते

असो, अशा रीतीने आपले आयुष्य सत्कार्यी खर्चून व आपले नाव अजरामर करून गौतमबुद्धाने आपल्या वयाच्या ऐशींव्या वर्षी देह ठेवला. बुद्धाने प्रथम पाच शिष्यास उपदेश करून आपल्या कामास सुरुवात केल्याचे वर सागितले आहे. लवकरच या पाचाचे साठ झाले व साठाचे हजारो झाले, व आजमितीस बुद्धाच्या धर्माचे अनुयायी असे पन्नास कोट लोक पृथ्वीच्या पाठींवर आहेत! खुद्द बुद्धाच्या हयातीत कित्येक राजेलोकांनी बौद्धधर्माची दीक्षा घेतली होतीच तथापि ख्रिस्ती शकापूर्वी सुमारें तिसऱ्या शतकाच्या सुमारास अशोक नामक जो हिंदी सम्राट होऊन गेला त्यानें बौद्धधर्माचा स्वीकार करून चहूकडे त्याचा प्रसार होण्याची अतोनात खटपट केली; खुद्द अशोकाचा पुत्र मिलिंद व त्याची मुलगी हीं दोघेंहि संन्यास स्वीकारून

धर्मोपदेश करण्यास बाहेर पडली, त्यामुळे बौद्धधर्माच्या प्रसारास अत्यंत मदत झाली. पीतवस्त्र परिधान करणारे भिक्षु व धर्मोपदेशाच्या सात्त्विक आवेशात ससारसुखाचा विसर पडलेल्या भिक्षुणी यानी थोडयाच काळात चारी दिशा व नवखड पृथ्वी व्यापिली पूर्वेस ब्रह्मदेश, सयाम, चीन, जपान, उत्तरेस अफगाणिस्तान, तिबट व हिमालयापलीकडील प्रदेश, दक्षिणेस सिलोन, जावा व पश्चिमेस खोतान तुर्कस्तान, मध्य आशिया वगैरे ठिकाणी बौद्धसघ व विहार याची स्थापना झाली तथापि कर्मध सयोगाने बौद्धधर्माची जन्मभूमि जे हिदुस्थान त्यातून उत्पत्तीपासूनच एक हजार वर्षाच्या आत त्याचे उच्चाटन झाले बौद्धधर्माची वाढ जलद झाली व विस्तार फार वाढला, यामुळे लवकरच त्यामध्ये अनेक पथ व मतातरे उत्पन्न झाली. या सर्वाचा मेळ घालण्याचा प्रयत्न प्रथम प्रथम वजनदार बौद्धधर्मानुयायी राजे लोकानी केला एकवाक्यता करण्याचा प्रयत्न करणारी पहिली परिषद, बुद्धाच्या मरणानतर लवकरच म्हणजे इ स पूर्वी ५४३ व्या वर्षी मगध देशाचा राजा अजातशत्रु याच्या कारकीर्दीत राजगृह येथे बुद्धाचा ब्राह्मण पट्टशिष्य महाकाश्यप याच्या अध्यक्षतेखाली, भरली होती दुसरी परिषद यानतर सुमारे शभर वर्षांनी वैशाली येथे भरली, व त्या प्रसगी एका परिषदेच्या दोन परिषदा होण्यापर्यंत मतभेदाची मजल गेली तिसरी परिषद प्रसिद्ध सम्राट अशोक मौर्य याच्या कारकीर्दीत इ स पू २५० व्या वर्षी पाटणा शहरी भरली व चौथी परिषद राजा कनिष्क याने इ स ४० या साली भरविली या सर्व परिषदाचा हेतु बौद्धधर्माच्या ग्रथात सुव्यवस्था व विल्हेवारी लावणे व मतातराची एकवाक्यता करणे हा होता तथापि, ती गोष्ट शक्य नसल्यामुळे उत्तरेकडची व दक्षिणेकडची अशा बौद्धधर्माच्या वेगवेगळ्या परपरा निर्माण झाल्या कालातराने हजारो कोसाचे व हजारो वर्षांचें अतर पडल्यामुळें उत्तर बौद्ध व दक्षिण बौद्ध यांची परस्पर ओळखहि नाहीशी होऊन प्रत्येक परपरेचा विस्तार व परिणति स्थानिक स्थिती-प्रमाणें वेगवेगळ्या दिशानीं होत गेली. सुदैवाने बौद्धधर्माच्या पुनर्जीवनाचा काळ हल्लीं आलेला दिसतो या पुनर्जीवनप्रसगी पूर्वीप्रमाणे एखादा धर्म-दिग्विजयी अवतारी पुरुष निर्माण होणार किंवा कसे तें कोण सागणार ? तथापि, एवढी गोष्ट खरी की, एकदर जगावर जी एका नव्या विचार-

क्रांतीची छाया हल्ली पडत आहे, तिच्या अनुवेगाने बौद्धधर्माविषयीं तन्मतानुयायाची दृष्टि नवीन होऊन निरनिराळ्या बौद्धधर्मी देशात पूर्वींहून परस्पर अधिक दळणवळण वाढेल, जुन्या बौद्ध वाङ्मयावर पडलेली राख फुकली जाऊन त्यातील ग्राह्यांश सतेज होऊन लोकनिदर्शनास येईल, आणि बुद्धाच्या जन्मभूमीत पूर्वकालीन विरोध विसरला जाऊन बौद्धधर्म हा काही झाले तरी भारतीय धर्मांपैकीच एक पथ आहे व या दृष्टीने हिंदु लोकांचेहि ममत्व त्याच्या ठिकाणी असले पाहिजे, ही भावना अधिकाधिक जागृत होईल, यात शंका नाही बौद्धधर्म व ब्राह्मणधर्म यांचा पूर्वी एके-काळी तीक्ष्ण विरोध होता, व अद्यापहि त्या काळच्या भांडणाचा प्रतिध्वनि सर्वस्त्री निःशेष झालेला नाही या कारणास्तव बौद्धधर्माविषयी आज कोणास जे काही बोलणे ते जपूनच बोलले पाहिजे यात शंका नाही तथापि आजच्या नवीन युगात गौतमबुद्धाच्या २५०० व्या जयंतीच्या महोत्सव-प्रसंगी या दोन धर्मांतील परस्परसंबंध काय आहे, कोणकोणत्या बाबतीतला विरोध खरा म्हणजे सकारण व कोणत्या बाबतीतला विरोध खोटा म्हणजे निर्मूल व निष्कारण आहे, याचा विचार कोणी शांत मनाने केल्यास असली विचारसरणी ऐकून घेण्याइतकी सहिष्णुता तरी आजच्या ब्राह्मण-धर्मात खास आहे, अशी आमची समजूत आहे धर्मदृष्ट्या पूर्वीचा काळ विशेषीकरणाचा होता, तसा आज नसून आजचा काळ धर्मदृष्ट्या व राष्ट्रीय दृष्ट्या एकीकरणाचा आहे अर्थात् जी जी म्हणून भारतीय वस्तु पुनरुज्जीवनोन्मुख असेल तिचा सत्कारपूर्वक परामर्ष घेणे हे राष्ट्रहितेच्छु भारतीयाचे काम आहे या दृष्टीने पाहता बौद्धधर्म हा अस्सल भारतीय आहे ही गोष्ट प्रथम लक्षात घेतली पाहिजे

वर जो बुद्धाचा अल्प इतिहास दिला आहे, त्यावरून बुद्धाचे कुळ, स्वतः त्याचा जन्म, त्याचे निर्वाण, त्याने स्थापलेल्या धर्मपंथाचा जन्म व परिणाम या सर्व गोष्टी भारतीय आहेत हे उघड आहे व आज हिंदुस्थानात त्या धर्माचा फारसा मागमूस राहिलेला नाही, तरी ज्या देशात तो पूर्वीपासून आजवर प्रचलित आहे त्या म्हणजे चीन, जपान वगैरे देशाचे लोक हिंदुस्थानास अद्यापि पवित्र भूमि मानितात. या देशाच्या भाविक यात्रे-करूची यात्रा हिंदुस्थानात आल्याशिवाय पुरी होत नाहीं, व पूर्वी ज्या ज्या

वेळी बौद्धधर्म व बौद्ध वाङमय याची जागृति करावी अशी चिनी व जपानी समाजास इच्छा झाली त्या त्या वेळी, मूळच्या पवित्र कुडातून तीर्थोदकाच्या रिकाम्या गिडग्या भरून घ्याव्या त्याप्रमाणे हिदुस्थानात प्रसिद्ध असलेल्या धार्मिक पडितास सन्मानपूर्वक पाचारण करून त्यानी स्वदेशी नेले व अशा रीतीने सुमारे हजार–पाचशे वर्षेपर्यन्त हिदुस्थान व बौद्धधर्मीय देश याच्या सगतीचा साधा जुळत आलेला होता गौतमबुद्ध हा भारतीय आहे एवढेच नव्हे तर व्यक्तिश तो अखिल भारतीयास परमपूज्य होता व अद्यापिहि आहे तसे नसते तर शिरोभागी दिलेल्या अवतरणात खुद्द श्रीशकराचार्य व जयदेव कवि यानी बुद्धाला अवतार मानून त्याची जी प्रशस्ति केली आहे तशी खास केली नसती स्वत गौतमबुद्धाच्या चरित्रात अशी कोणती गोष्ट आहे की, तिजमुळे त्याच्या कट्टया निदकासहि त्याला तिळमात्र नाव ठेवण्यास जागा मिळेल ? बुद्ध हे नाव घेताच कित्येकाच्या मनात जी अनादरलहरी उत्पन्न होते तिचे खरे कारण स्वत बुद्ध ही व्यक्ति नसून, त्याच्या धर्माची तत्त्वे व विशेषत तद्धर्ममतानुयायानी कालानराने माजविलेला अनाचार हेच होय, असे सूक्ष्म दृष्टीच्या मनुष्यास दिसून येईल त्यातल्या त्यात पाहता दुसरी गोष्ट सर्वस्वी असमर्थनीय आहे, पण अविचारी अशा बौद्धमतानुयायाच्या मूर्खपणाबद्दल जर बुद्धास जबाबदार धरावयाचे तर जगातला दुसरा कोणताहि धर्मसस्थापक अशा सकटातून सुटेल असे आम्हास वाटत नाही श्रीमच्छकराचार्य हे बुद्धाप्रमाणेच व्यक्तिश पवित्र व सदाचरणी होते, पण शकरपरपरेत 'घटाकाश' 'मठाकाश' वगैरे शब्दाचा स्वत स अगर दुसऱ्यास न समजेल असा शुष्क गोधळ माजवून 'कलौ वेदान्तिनो भान्ति फाल्गुने बालका इव' अशा निदेस पात्र झालेले विचित्राचारी असे लोक निर्माण झालेच नसतील काय ? अहिसा, सत्य याचा उपदेश करणाऱ्या बुद्धाच्या नामधारी चिनी व जपानी अनुयायात हिसाच इतकी माजून राहिली आहे की, हे लोक आज मारून खात नाहीत असा प्राणीच जगात नाही पण याला बुद्धाने काय करावे ? झुरळे मारून खाणाऱ्या चिनी लोकाच्या आचाराकरिता दयासागर बुद्धाला जर नावे ठेवावयाची तर मनुस्मृतीत देहान्त प्रायश्चित्त सागितलेले पातक कर-

णाऱ्या हिंदूच्या अपराधाकरिता खुद्द मनूसच फाशी चढविणे योग्य का होणार नाही ? 'शिष्यापराधे गुरोर्दंड' का ?

दुसरा आक्षेप म्हटला म्हणजे बुद्धाच्या सिद्धान्तासंबंधाचा सनातन वैदिक धर्माभिमान्यास बौद्धमतात विषाद वाटण्यासारख्या मुख्य चार गोष्टी आहेत एक निरीश्वरवाद, दुसरी अनात्मवाद, तिसरी यज्ञहिंसानिषेध व चवथी चातुर्वर्ण्यनिंदा पण यातहि थोडासा विचार आहे. निरीश्वरवाद व अनात्मवाद हे दोन्ही बुद्धाने स्वतःच नवे निर्माण केलेले होते असे नाही. आपल्या खास वैदिक धर्मात या दोन्ही वादाचे मूळ आहे सांख्यमतवादी परमपूज्य कपिलमहामुनि हा निरीश्वरवादी होता व अद्वैतवादी शंकराचार्य हे एका अर्थाने अनात्मवादी होते सांख्य तत्त्वज्ञानात ईश्वराशिवाय सृष्टि-व्यवस्थेचा निर्वाह मानिलेला आहे कपिलाचार्य फक्त प्रकृति व पुरुष ही दोन तत्त्वे मानतात ईश्वर मानीत नाहीत सृष्टि उत्पन्न करणारा, दयेने तिचे पालन करणारा, निग्रहानुग्रह समर्थ, भक्तीस पावणारा वगैरे गुण-विशिष्ट असा ईश्वर मानणे हेच लौकिक आस्तिक्यतेचे लक्षण आहे पण या दृष्टीने पाहावे तर कपिल काय किंवा शंकराचार्य काय या दोघानाहि 'आस्तिक' ही पदवी कितपत लावता येईल याची शंकाच आहे जो आत्मा-अर्थात् व्यक्तिमात्राचा—न मानल्याबद्दल बुद्धावर आम्ही रागावतो तो आत्मा कपिल मानतात तरी! शंकराचार्य तोहि मानीत नाहीत, जीवात्मा परमा-त्म्याहून भिन्न नाही, हेच अद्वैतसिद्धान्ताचे मर्म असल्यामुळे जीवात्मा वेगळा उरतच नाही शंकराचार्यास आक्षेपक लोक 'प्रच्छन्नबौद्ध' ही निंदाव्यंजक पदवी देतात त्याचे झाले तरी कारण हेच होय सांख्यमत निरीश्वरवादी असूनहि जर 'नास्ति सांख्यसमं ज्ञानं' या स्तुतीस ते पात्र आहे, तर निरी-श्वरवादाबद्दल बुद्धाचा अनादर करणे योग्य होणार नाही बुद्धाच्या अनात्म-वादाविषयी एक विशेष गोष्ट लक्षात ठेवावयास पाहिजे, ती ही की, हा अनात्मवाद प्रयोजनपुरस्सर नसून केवळ आनुषंगिक आहे बुद्धाचा कटाक्ष आत्म्याचे अस्तित्व नाशाबीत करण्याकडे नव्हता, तर ज्या यज्ञयागाच्या योगाने हत्या माजली होती त्याविरुद्ध होता, आत्मा असिद्ध ठरवून त्यास कांही मिळावयाचे नव्हते, तर वादग्रस्त आत्म्याच्या मोक्षसाधनार्थ प्रत्यक्ष हत्यादि पापात्मक अनाचार होत होते ते त्यास बंद करावयाचे होते.

यज्ञहिंसानिषेधाबद्दल बुद्धास नावे ठेवण्यापूर्वी दोन गोष्टींचा विचार होणे जरूर आहे. पहिली अशी की, यज्ञयागाचे स्तोम बुद्धाच्या वेळी बेसुमार वाढलेले असून, त्याविरुद्ध निषेधपूर्वक प्रतिक्रिया करणारा कोणी तरी धीट पुरुष निर्माण व्हावयास पाहिजे होता व दुसरी अशी कीं, जो यज्ञहिंसेचा निर्बंध बुद्धाने आपल्या वेळी केला त्याचाच अनुवाद आज हजारो वर्षे आपण करीत आहोच की नाही? यज्ञहिंसा हाच जर वैदिकधर्माचा खरा आत्मा असता तर, श्रीमच्छंकराचार्यांनी बौद्धमतखंडनपूर्वक दिग्विजय समाप्त केल्याबरोबर, प्रथम देशभर यज्ञवेदीच निर्माण करून होमधूपाने आणि 'वषट्कार' गर्जनेने दशदिशा भरून धुंद करून टाकल्या नसत्या काय? यज्ञहिंसा हीच हिंदुधर्माच्या मते मोक्षपदाची खरी गुरुकिल्ली असती तर वेदान्तानंतर प्रेमळ व परम कारुणिक अशा भागवतधर्माचा प्रसार का झाला असता व तो लोकांस कसा पटला असता? आज आर्यसमाजिस्टांनी वैदिकधर्माचे पुनरुज्जीवन करण्याच्या कामी सर्वांत पुढे मजल मारली आहे, सर्व नित्यनैमित्तिक कर्मांचा त्यांचा ओनामा होमहवनाने होत असताहि यज्ञहिंसा त्यांनी वर्ज्य का मानिली आहे? व आश्चर्य हे की, केवळ यज्ञसंबंधी मांसभक्षण वैदिक धर्माने विहित मानले असता, आर्यसमाजाच्या एका शाखेने आत्मपुष्टयर्थ मांसभक्षण शिल्लक ठेवून त्याचा यज्ञसंबंध मात्र काढून टाकला! 'अश्वमेध,' 'पलपैतृक' वगैरे गोष्टी कलियुगांत वर्ज्य करून ठेवण्यांत स्मृतिकारांचा काय हेतु असेल बरे! व या स्मृतिकारांनी जे केले तेच अन्यरीतीने गौतमबुद्धाने केले असे म्हणण्यास काय हरकत?

चातुर्वर्ण्यनिषेधासंबंधानें बुद्धाचा कटाक्ष ब्राह्मण्यास वरच्या पायरीवरून खाली ओढण्याचा नसून खालच्या दर्जाच्या लोकांस वरच्या पायरीस नेण्याचा होता या बाबतींत भक्तिमार्गाची व बौद्धमताची एकवाक्यता आहे खऱ्या भक्तिपंथांत जातीची आडकाठी भक्तजनांच्या मार्गांत येऊं शकत नाही. बुद्धाने झाले तरी ब्राह्मण्याची विशेष लक्षणे असे जे गुण त्या गुणांस केव्हांहि कमीपणा न देता, बुद्धसंघांत प्रवेश करण्यास जातीची अडचण राहू नये असे ठरविले. भक्तिमार्गांत सेना न्हावी, गोरा कुंभार, चोखामेळा महार वगैरेंना ज्या कारणाकरितां मान देण्यांत येतो, त्याच कारणाकरितां बुद्धसंघांतहि अनेक हीन जातीच्या लोकांना घेऊन बुद्धाने गौरविले

होते सुविनीत भिक्षु हा मूळचा हलालखोर होता उपाली हा मूळचा न्हावी होता पण बुद्धसघात समाविष्ट होऊन त्याची योग्यता इतकी वाढली होती की, महाकाश्यपाच्या अध्यक्षतेखाली भरलेल्या धर्मपरिषदेत त्रिपीटक नामक बौद्धग्रथसमूहापैकी 'विनय' सूत्रे म्हणण्याचे काम त्याजकडे होते तात्पर्य, कोणासहि धर्मोच्छेदक किंवा नास्तिक म्हणणे फार सोपे आहे, पण ते म्हणण्यापूर्वी ज्याने त्याने आपण स्वत असा विचार करावा की, हिदुधर्माची साधारण व्याख्या काय आहे? त्या व्याख्येत मी स्वत कितपत येतो? ज्याना ज्याना मी हिदु हे पद लावतो ते ते त्या व्याख्येत कितपत येतात ? हिदुधर्माची सर्व अगे सर्वकाळ सारखीच नित्य व अबाधित राहिली आहेत की काय ? नसल्यास कोणत्या अगात फेरबदल झाला आहे? त्याच्या अनेक अगापैकी कोणतेहि एखादे अग मान्य केल्याने हिदुत्वास बाध येऊ शकतो की काय? अशा रीतीने बाध येऊ लागल्यास आपणास व इतरास हिदुत्वाचे अधिष्ठान कितपत हक्काने मागता येईल ?' हिदु ' नावाच्या धर्माने उत्पन्न केलेली ती हिदु जात किंवा 'हिदु' म्हणविणाऱ्या जातीने बनविलेला तो हिदुधर्म ? निदान बुद्धाच्या आक्षेपकानी तरी हे प्रश्न विचार करण्यासारखे आहेत यात शका नाही वर सागितलेले दोष लक्षात घेतले तरी बौद्धमतास फार तर अपभ्रष्ट हिदुधर्म म्हणता येईल, पण स्वभाषेच्या अपभ्रशाचा स्वभाषेतच जसा अतर्भाव होतो--अपभ्रष्ट स्वरूपामुळे त्याच्या भाषेचे गोत्र बदलत नाही--त्याचप्रमाणे स्वधर्माचे अपभ्रशहि स्वधर्मातच समाविष्ट मानावे लागतात कारण अपभ्रश हा कितीहि झाले तरी मूळ पायाच्या परपरेवर रचलेला असतो पुष्कळ वेळा भाषेप्रमाणे धर्माचा अपभ्रशहि देशकालानुरूप योग्य व लोकास इष्ट असा असतो, व म्हणून तो ग्राह्यहि होतो बुद्धधर्माची जी विशिष्ट म्हणून अगे आहेत ती पुष्कळ अशी वैदिक धर्मग्रथ व धर्ममते यातून घेतलेली आहेत किंबहुना रामायणातील ' यथा चोरस्तथा बुद्ध ' या उल्लेखाचा ग्रथ परवा डॉ. गर्दे यानी मार्मिकपणाने लावून दाखविला, त्याप्रमाणे लाविला असता सकृद्दर्शनी बुद्धाची जी निदा तीच परिणामी स्तुति ठरते म्हणजे बुद्धाने आपला पथ स्थापताना जरी मताची चोरी केली असें मानले तरी ती चोरी वैदिक परपरेतील प्राचीनाचार्यांच्या मताचीच होय. आजदेखील जशी प्राचीनतमाचा आधार देऊन प्राचीनतर खोडून टाकण्याचा

प्रयत्न कित्येक सद्बुद्धिप्रेरित समाजसुधारक करतात तसलाच प्रयत्न बुद्धाचाहि असावा, असे वाटते प्राचीनतर गोष्टीचा आधार घेणे हे जर धार्मिक भावनेशी विसगत नाही, तर प्राचीनतम गोष्टीचा आधार घेणे हेहि तसेच मानिले पाहिजे कलिवर्ज्यासारख्या प्राचीनतर गोष्टी केवळ काल-मानानुसार म्हणून प्राचीनतम गोष्टीविरुद्ध प्रवर्तित करता येतात, त्याच-प्रमाणे हेच कालमान फिरून बदलले म्हणजे नवीन अशा प्राचीनतर गोष्टीचा निषेध होऊ लागून मन प्राचीनतम गोष्टीकडे धावते.

कोठेहि धर्मचरित्रात विशिष्ट गोष्टीची अतिशयोक्ति व तिजमुळे होणारी प्रतिक्रिया ही जोडी वारवार आढळते प्युरिटन व क्वेकर लोक यानी रोमन कॅथोलिक लोकाचा जो निषेध केला तो त्यास स्वत स बायबल नापसत होते म्हणून नाही ? तर कॅथोलिक लोकाच्या आचाराचा निषेध करता येण्यासारखी वचने व विचारसरणी बायबलातच आढळते म्हणून बौद्धमत हेहि सर्व वैदिक परपरा झुगारून देण्याकरिता म्हणून पुढे आले नव्हते, तर त्या काळच्या अर्वाचीन वदिक आचारात म्हणजे यज्ञयागादिकात एक प्रकारची अतिशयोक्ति झाली होती व त्याविरुद्ध प्रतिक्रिया ( Protest ) करणे जरूर होते म्हणून पण बौद्धमत हे केवळ प्रतिक्रियारूप नव्हते तर कोणाहि धार्मिक व समजस मनुष्यास पटेल अशा तऱ्हेचा वैदिक परपरेतून एकत्र केलेला नीतिवाद अधिक ग्राह्य म्हणून त्याने लोकापुढे माडला, तो लोकास मानवला व त्यामुळेच बौद्धमताचा त्यावेळी विजय झाला. बौद्धाने उपदेशाचे काम सुरू करताच ब्राह्मणधर्मातील मोठमोठी धेडे येऊन त्यास मिळाली, याचे कारण तरी हेच होय सारीपुत्र, महामोगलान, महाकाश्यप, अशोकाच्या वेळी सर्वश्रेष्ठ मानिलेला बुद्ध भिक्षु–तित्सा हे सर्व ब्राह्मण होते, व ते अप्रामाणिक किंवा धर्मलड होते, असे म्हणण्यास आपल्याला अधिकार नाही बौद्धमताची मुख्य लक्षणे म्हटली म्हणजे अशी आहेत. एक तर ते मत अत्यत विनयसपन्न आहे मनुष्याने मनुष्याशी केलेला प्राजल युक्तिवाद त्यात भरलेला असून आपण ईश्वरप्रणीत आहो, अर्थात् आपल्यास न मानील तो प्रत्यक्ष ईश्वराचा अपराधी आहे अशी प्रौढी ते मत मारीत नाही. बुद्धाने सागितलेली चार प्रकारची सत्ये, आठ प्रकारचे कर्मभाग वगैरे गोष्टी अगदी आधुनिक किंवा अगदी प्राचीन अशा नीति-

वेत्यानाहि मान्य होण्यासारख्या आहेत, व हेच त्याच्या यशाचे कारण. हे यश पुढे अनतकाल टिकले नाहीं, ही गोष्ट वेगळी, व त्याची कारणेहि वेगळी आहेत नदीच्या मुळातले निर्मल पाणी ज्याप्रमाणे तिच्या प्रवाहात पुढे तसेच टिकत नाही, त्याचप्रमाणे अनेक मतानुयायाच्या अप्रबुद्धपणामुळे बौद्धमताचे निर्मल स्वरूपहि पुढे टिकले नाही वैराग्य, समबुद्धि, दाक्षिण्य, शुचिर्भुतता, विनय वगैरे बौद्धमतातले मुळचे गुण नष्ट होऊन सुमारे चारपाचशे वर्षांच्या आतच हिंदुस्थानात तरी बौद्धमताचे वैशिष्टच नाहीसे झाले आणि बौद्धमतवाले अनेक रीतीने हिदु समाजाशी मिळून एकजीव झाले एक हजार वर्षाच्या अवधीनतर जगद्गुरु शकराचार्य यानी बौद्धमताचे जे खडन केले तेहि वरील कारणामुळेच होय पण शकराचार्यांनी मारलेली लढाई ब्राह्मणी व बौद्धधर्माच्या युद्धातील पहिली नसून शेवटची होती, हे लक्षात ठेवणे जरूर आहे बौद्धधर्माच्या किल्ल्यावर ब्राह्मणी धर्माचा झेडा फिरून रोवण्याचा मान शकराचार्यांना यथायोग्य मिळाला खरा, पण या किल्ल्यातील तटबदीत खिडारे पाडण्याचे काम पूर्वीच दुसऱ्याने केलेले होते बौद्धधर्माच्या स्वरूपाची खरी परीक्षा करावयाची ती शकराचार्यांनी पाडाव केलेले बौद्धमत व बौद्धाचार याजवरून करावयाची नसून खुद्द बुद्ध किवा अशोक याच्या वेळी शकराचार्यांच्या तोडीचे बुद्धिमान ब्राह्मण त्या मतास येऊन मिळाले व त्यानी बौद्ध दीक्षा घेतली, यावरूनच करावयाची आहे.

कसेहि असले तरी बौद्ध व ब्राह्मण याची पांचव्या सहाव्या शतकात भाडणे झाली ती त्या काळास योग्य होती. आज ती भाडणे उसनी घेऊन भाडण्याचे किवा त्याविषयीचे त्या काळचे वैषम्य आज आपण मनात बाळगण्याचे कारण राहिलेले नाही शिवाय बौद्धधर्माच्या पुनरुज्जीवनाचे धोरण, आजचा ब्राह्मणवर्ग जशा प्रकारचा धर्म प्रत्यक्ष पाळतो, त्याच्याशी बरेच जुळून आहे. बौद्धधर्मासबधाने लौकिक स्वरूपाचे काही आक्षेप पुढे आणण्यात येतात कोणी म्हणतात, बौद्धमत हे क्षात्रगुणाचा नाश करणारे आहे शाति-ब्रह्मपद पावण्याची हाव धरणे म्हणजे सर्व प्रकारच्या ऐहिक महत्त्वाकाक्षेस रजा देण्यासारखे आहे आमच्या मते हा आक्षेप बरोबर नाही बौद्धधर्माच्या वेळी जितके राजकीय स्वातत्र्य आम्हास होतें, तितके बौद्धधर्माचा समूळ

उच्छेद झाल्यावर आपणामध्ये फार तर पाचसहाशे वर्षे टिकले, व तेव्हापासून आज हजार वर्षे म्हणजे ज्या काळात आमच्या राजकीय स्वातंत्र्यावर वारवार घाले पडले त्यावेळी आम्ही बौद्धधर्माचे कोठे अनुयायी होतो? एकोणिसाव्या शतकाच्या प्रारंभी इकडे आपण कडकडीत ब्राह्मणधर्म पाळीत असता आपले राज्य का गेले? बौद्धधर्माचा उत्कर्ष शिखरास पोहोचला होता अशा काळी अशोक हा सर्व हिंदुस्थानावर साम्राज्य कसे करता झाला, व आज जेथे जो काही धर्म म्हणून आहे तो बौद्धधर्मच अशा जपानने एवढे राजकीय यश कसे मिळविले? या निरनिराळ्या प्रश्नांची उत्तरे देताना बौद्धधर्म हा क्षात्रगुणविध्वंसक आहे, या आक्षेपास उत्तर सहजच मिळणार आहे तात्पर्य, बुद्धजयंतीसारख्या प्रसंगी गौतमबुद्ध या अवतारी पुरुषाचे व त्याच्या विशिष्ट मताचे खरे गुण कोणते आहेत हे पाहणे व त्यावर नसते दोषारोप न करणे हेच अधिक श्रेयस्कर होईल.

काही झाले तरी बौद्धधर्म ही शाखा व ब्राह्मणी धर्म ही शाखा या दोन्ही एकाच भारतधर्मवृक्षाच्या खोडापासून निघाल्या आहेत, व यामुळेच ख्रिस्ती व महमदी धर्मापेक्षा तोच आपणास अधिक जवळ आहे, या दृष्टीने या दोन धर्माहून बौद्धधर्मावरच आमचे ममत्व विशेष असले पाहिजे

———

# शि. म. परांजपे

## अर्जुनाचा वेडेपणा

### ● परमेश्वर स्वमूलोच्छेदनाच्या सत्कृत्याला हातभार लावो!

कौरवपाडवाचा इतिहास सर्वांना माहीतच आहे. पाडवाचे राज्य कौरवानीं घे‍तले होते ते परत मिळविण्याचे सर्व सामोपचाराचे उपाय व्यर्थ झाले, आणि अखेरीस लढाईवर पाळी आली दोन्ही बाजूची सैन्ये कुरुक्षेत्राच्या मैदानावर येऊन उभी राहिली भीष्माचार्यांनी सिंहनाद केला इकडे भीमाने आपला पौंड्रनामक महाशख वाजविला त्याच्या मागोमाग सर्व योद्धयानी आपले भयकर शख वाजविले नगारे आणि नौबती याच्या कर्णभैरव गर्जना होऊ लागल्या जिकडे तिकडे तुमुल रणवाद्याची एकच गर्दी उसळून गेली. भयकर प्रतिध्वनि उठू लागले त्या भयकर निनादामुळे समुद्राचे पाणी वर उसळले, मेरु डळमळू लागला, आणि झाडावरील फुलाप्रमाणे आकाशातील नक्षत्रे खाली गळून पडली इतक्या रगाला रणसग्रामाची तयारी येऊन पोहोचली, तेव्हा अर्जुनाच्या आज्ञेप्रमाणे अर्जुनाच्या रथाचे घोडे श्रीकृष्णानी कौरवाच्या सेनेकडे वळविले अर्जुनाचा रथ दोन्ही सैन्याच्या मध्यभागी येऊन उभा राहिला अर्जुनाने आपली दृष्टि कौरवसैन्याकडे फेकली आणि त्या क्षणापासून अर्जुनाच्या वेडेपणाला सुरुवात झाली

कोणताहि पाश्चिमात्य अर्जुन अशा स्थितीत उभा राहिला तर तो अर्जुनासारखे धर्मशास्त्र कधीहि बरळत सुटणार नाही. अर्जुन एवढा शूर आणि मुत्सद्दी म्हणून म्हणतात, पण त्याचे शौर्य आणि राजकारस्थान हल्लीच्या कसोटीच्या दगडाना लावून पाहिले तर ते अगदी फिक्के पडते. ज्याच्या अगात शौर्य आहे त्याने धर्माची चिकित्सा करीत बसायचे? ही केवढी चूक! ज्याच्या अगात देवाने दुसऱ्याना ठोकून त्याच्यापासून त्याचे घरदार, धनधान्य, वतन व राज्य लुटून घेण्याचे सामर्थ्य ठेविले आहे, ते जर धर्मशास्त्राचा कीस काढीत बसले तर मग बायकापोरांनी आणि भटाभिक्षुकानी काय करावे? "धर्म हा मूळ देवाने अशक्त बायकामुले आणि अज्ञानी भट-

भिक्षुक याचा वेळ जाण्याकरिता केलेला आहे ते त्यांचें खळणे, तो त्याचा करमणुकीचा जिन्नस, बलाढ्य लोकानी आपल्या हातात हिसकावून घेतला तर दुसऱ्याचे खून कोण करील ? दुसऱ्याना लुटील कोण ? आणि दुसऱ्याची राज्ये हरण करील कोण ? जे फक्त दुसऱ्याना आपल्या जुलुमाखाली तुडविण्याकरिता देवाने निर्माण केलेले आहेत ते जर आपले काम सोडून दुसऱ्याच्या कामात ढवळाढवळ करू लागतील, तर मग या जगातील वर्णव्यवस्था बिघडून जाऊन एकदर अव्यवस्था होईल, धर्म कोणी पाळावा, आणि कत्तली कोणी कराव्या, याच्याबद्दलच्या श्रमविभागाच्या सर्व योजना अनवस्थेप्रत जाऊन पोहोचतील, आणि येथून तेथून सर्व एकच सकर माजून राहील परतु हे अर्जुनाच्या मुळीच लक्षात आले नाही पण सुदैवाची गोष्ट ही आहे की, अर्जुनाप्रमाणे त्याच्या पाठीमागून येणारे सर्वच योद्धे अशी चूक करण्याला प्रवृत्त झाले नाहीत ✓ अशी चूक होण्याची चुकूनसुद्धा भीति करू नये यासाठी धर्मतत्त्वे आणि राज्यहरणतत्त्वे याच्यामध्य अलीकडे मोठी थोरली अतिशय उच अशी भित बाधून टाकण्यात आलेली आहे त्यामुळ आपल्या कृत्याचा आणि धर्माचा अर्थाअर्थी काही सबध आहे असे आता कोण च्या स्वप्नातहि येत नाही हल्लीच्या युगातील प्रत्येक लबाड मनुष्याकडून धर्म हा शब्द बरोबर शभर वेळा घोकून घेण्यात येतो, व प्रत्येक लबाडीचे काम करीत असताना मी हे धर्मासाठी, न्यायासाठी, सुधारणेसाठी, लोककल्याणासाठी आणि खुद्द परमेश्वरासाठी करीत आहे, असे त्याने म्हटलेच पाहिजे, असे सक्त हुकूम सोडण्यात आलेले आहेत त्यामुळे धर्माच्या आणि लबाडीच्या दरम्यान घातलेल्या उच भितीकडे कोणाचेहि लक्ष न जाता सर्व जगाची रहाटी पूर्वीप्रमाणे हल्लीहि धर्माच्याच पायावर चालली आहे, असा सर्वांचा समज कायम राहून बलाढ्य लबाडाना गरीब माणसाना लुबाडण्याची फारच निर्वेध सधि सापडू लागली आहे हा अर्वाचीन सुधारणेच्या कल्पकतेपासून जगाचा कितो मोठा फायदा झाला आहे इकडे अद्यापि कोणाचे जितके जावे तितके लक्ष गेले नाही, ही मोठधा खेदाची गोष्ट आहे

"न काक्षे विजय कृष्ण नच राज्य सुखानि च । कि नो राज्येन गोविद कि भोगैर्जीवितेन वा ॥" हे जे नेभळटपणाचे उद्गार अर्जुनाच्या तोडून

निघाले आहेत, तसे हल्लीच्या कोणत्याहि योद्धयाच्या तोडून निघावयाचे नाहीत "आम्हाला राज्य घेऊन काय करावयाचे आहे? (किं नो राज्येन)" अशा शब्दानी आपली जीभ विटाळून टाकण्याइतका एक तरी मूर्ख योद्धा आज पृथ्वीच्या पाठीवर आढळेल काय? राज्य घेऊन करावयाचे काय म्हणजे! राज्य घेऊन तेथील लोकाना लुटावयाचे! तेथील सपत्ति आपल्या घरी न्यावयाची! आणि तेथील लोकाना उपासमारीच्या विस्तवावर भाजून यमाच्या घरी पाठवावयाचे! राज्य घेऊन त्याचा उपयोग काय करावयाचा हे माहीत नसल्यामुळेच अर्जुनाच्या तोडून असे उद्गार निघाले. नारळाच्या आतील खोबरे पोखरून पोखरून खावयाचे आणि ज्याचा नारळ असेल त्याच्या हातात प्रामाणिकपणाने त्याच्या करवटचा द्यावयाच्या, हा नारळाचा उपयोग ज्या मनुष्याला ठाऊक नाही तो स्वभाविकपणेच असे म्हणणार की, देवा, हा नारळ घेऊन मी काय करू? तशी बहुतकरून अर्जुनाच्या मनाची स्थिति झालेली असावी.

वेडाच्या भरामध्ये अर्जुन जी कित्येक धर्माची तत्त्वे बरळला आहे ती फार विलक्षण आहेत कोणताहि समजस मनुष्य इतका धर्मवेडा होणार नाही. आणि ज्याला राज्य मिळवावयाचे आहे तो लबाड मनुष्य तर धर्माची इतकी पर्वा कधीच ठेवणार नाही. लबाड मनुष्यास जुने धर्मशास्त्र जर सोईचे वाटत नसले, तर तो आपल्याकरिता नवे धर्मशास्त्र बनवील. कारण, पहिले धर्मशास्त्रसुद्धा कोणीतरी असेच काही तरी हेतु मनात धरून बनविलेले असले पाहिजे की नाही? मग लबाड बलाढ्याच्या मनातून जर दुसऱ्याना मारून त्याची सपत्ति लुटावयाची असेल तर त्याकरिता त्यानी आपले धर्मशास्त्र का बनवू नये? 'एतान्न हन्तुमिच्छामि घ्नतोपि मधुसूदन। अपि त्रैलोक्यराज्यस्य हेतो किं नु महीकृते॥" हे अर्जुनाच्या वेळचे नेभळटपणाचे धर्मशास्त्र काही एक कामाचे नाही. भगवतानी अर्जुनाच्या असल्या विचारसरणीला क्लैब्य हे अगदी यथार्थ नाव दिले आहे जर कोणी कोणाला मारावयाचेच नाही व दुसऱ्यापासून कोणी काही लुबाडून घ्यावयाचेच नाहीं असे ठरले, तर मग या जगात लोक श्रीमत होणार कसे, आणि श्रीमताचे राजे होणार कसे? कोणी राजे झाले नाहीत, तर मग अनाथ प्रजेपासून कर कोण घेईल? त्याना पावलोपावलीं फायद्यावाचूनहि प्रतिबध कोण करील? आणि त्याना अपराधावाचून

तुरुगात कोण घालील ? सर्व पृथ्वीवर हाहा कार उडून जाईल! दुसऱ्याला मारण्याची आणि त्याला लुबाडण्याची जर बदी झाली, तर राजा होण्याचीच बदी झाली असे म्हणावयाचे! मग राज्याभिषेकाचे मत्र, राजधर्म, राजानी करावयाची यज्ञादिक कर्मे, या गोष्टी धर्मशास्त्राने सागितल्या असत्या कशाला? पण त्या तर सागितल्या आहेत तेव्हा यावरून लोकास मारणे, लुटणे, वगैरे जे राज्य मिळविण्याचे राजमान्य उपाय आहेत ते धर्मशास्त्राला पसत आहेत, असे सिद्ध होत नाही काय ? अशी अनुमाने हल्लीचे धर्मशास्त्रकार काढतात परतु यावरून हल्लीच्या धर्मशास्त्राना अनवस्था दोष माहीत नाही, असे मात्र कोणाला म्हणता यावयाचे नाही, अर्वाचीन उपयुक्त धर्मशास्त्रात खून हा गुन्हाच नाही असे नाही पण तो केव्हा होतो याबद्दल मात्र फार सूक्ष्म विचार केला पाहिजे फक्त एकच मनुष्य मारला, तर तो खून होतो! राजरोसपणा न पत्करता किंवा जाहीरनामे छापून ती गोष्ट प्रसिद्ध न करता एखाद्याला चोरून मारले तर तो खून होतो. अतिशय सुधारलेल्या साधनाचा आणि हत्याराचा उपयोग न करता कोयती, पहार, कुऱ्हाड, सोटे, दगड वगैरे रानटी उपायानी जर एखाद्याचा प्राण घेतला गेला, तर तो खून होतो! खून ओळखण्याचे असे हे बारीकसारीक भेद आहेत थोडया पैशासाठी किंवा एखाद्या लहानशा इस्टेटीसाठी एखाद्याला मारले, तर तोहि खून होतो! ही ठिकाणे वर्ज्य करून बाकीच्या ठिकाणी अलीकडच्या उपर्युक्त धर्मशास्त्राने खुनाची पूर्ण समति दिली असल्याचे हल्लीच्या प्रतिष्ठित लोकाच्या कृतीवरून दिसत आहे "त्रैलोक्याचे राज्य मिळविण्यासाठीदेखील मी कोणाचा वध करावयाचा नाही, मग य कश्चित् पृथ्वीसाठी मी मनुष्यवध करू?" असे बोलून अर्जुनाने या अतिशय सन्माननीय अशा पृथ्वीचा अपमान केला आहे ही बहुमान्य पृथ्वी इतकी तुच्छ आहे काय ? आणि हिच्यापेक्षा त्या कवडीमोल आणि केवळ राजाच्या खेळण्यासाठी निर्माण केलेल्या भिकारड्या माणसाची किमत अधिक आहे काय ? य कश्चित् पृथ्वीसाठी मी मनुष्यवध करू? असे अर्जुन विचारतो. अरे, या पृथ्वीच्या एक वीतभर तुकड्यासाठीदेखील लाखो माणसाचे खून झाले तरी केले पाहिजेत, मग सबध पृथ्वीची गोष्ट कशाला विचारतोस? हल्लीचे जे लोक आपापली साम्राज्ये वाढवू इच्छीत आहेत, ना त्या जर कोणी त्रैलोक्याचें राज्य देऊ लागेल, तर त्रैलोक्यात स्वतःखेरीज जितकी

माणसे आहेत तितक्याचेहि पाहिजे असल्यास ते खून करण्याला तयार होतील. मग अर्जुनालाच काही पाचपन्नास लाख माणसाचे खून करण्याला एवढी दहशत काय म्हणून वाटत होती? "भुजीय भोगान् रुधिरप्रदिग्धान्" या वचनावरून रुधिरप्रदिग्ध भोग आपण कसे भोगावे, अशी अर्जुनाला शका वाटत असावी असे मात्र एक दिसते

पण हा केवढा खुळचटपणा आहे ? रक्ताचे डाग कायम राहतात काय? रक्ताचे डाग पाण्याने, फार झाले तर साबण लावून धुतले म्हणजे जातात, एवढी साधी रसायनशास्त्रातील गोष्ट अर्जुनाला माहीत नसावी हे अतिशय लज्जास्पद आहे. खून केलेल्या मनुष्याचे रक्त साडणार कुरुक्षेत्रातील जमिनी-वर, आणि अर्जुन नाना प्रकारच्या चैनीच्या भोगाचा उपभोग घेणार हस्तिना-पुरातील सिहासनावर! आणि कुरुक्षेत्रातून हस्तिनापुराला चालत येण्याला माणसासारखे माणसाच्या रक्ताला काही पाय नाहीत! मग अर्जुनाचे भोग रुधिरप्रदिग्ध कसे झाले असते! रक्तामध्ये अशी चालण्याची शक्ति असती तर राजाना लबाडीने मिळविलेल्या आपल्या स्वतःच्या राज्याचा कधी उप-भोगच घेता आला नसता पण असे कोठे झाले आहे ? शेकडो लबाड राजानी कोटयवधि अनाथ लोकाचे आतापर्यंत खून केले आहेत पण म्हणून त्याचे भोग कधी रुधिरप्रदिग्ध झाले आहेत ? त्यानी मेजवानीकरिता एखादे पाढरे शुभ्र पक्वान्न तयार केले, तर त्यानी मारलेल्या माणसाच्या रक्ताने ते सगळ लालभडक होऊन गेले, असे कधी झाले आहे काय ? किवा परस्त्रियाचा जेथे बलात्काराने सभोग करावयाचा, अशा त्याच्या शय्येवर जर पाढरे शुभ्र वस्त्र पसरलेले असले तर ते वस्त्र त्यानी मारलेल्या लोकाच्या रक्ताने भिजून ओले होऊन गेले, असे तरी कधी झाले आहे काय ? हॅम्लेट आणि मॅकबेथ या नाटकाच्या सविधानकातील मूळच्या गोष्टी जेव्हा घडून आल्या त्या वेळी राज्यलोभाने मारली गेलेली माणसे भुते होऊन आपले खून करणाऱ्याना भेवडावण्याकरिता येत असत पण त्याचा काही उपयोग होत नाही असे पाहून कटाळून मारल्या गेलेल्या लोकानी तीहि पद्धत टाकून दिलेली आहे. म्हणून आता तीहि भीति नको सारांश, हा सगळा मनाचा वेडेपणा आहे. वास्तविक, मारलेल्या माणसाचे रक्त चालत नाही, किवा उपभोगाचे विषय त्याच्या रक्ताच्या डागानी बिघडून जाऊ शकत नाहीत, किंवा मारलेली माणसें

भुते होऊन फिरून या जगात येत नाहीत असे जर असते तर अर्जुनाच्या पाठीमागून येणाऱ्या लबाड बलाढ्याना या जगात जिवत राहण्याचीहि सोय नव्हती. कारण अर्जुनाने पाहिली नसतील इतकी माणसे या राजानी नुसती मारली आहेत. तेव्हा जर या मारलेल्या माणसाच्या रक्तात आपला सूड उगविण्याचे सामर्थ्य असते, तर या राजाच्या राज्यावर बारा महिने एकसारखा रक्ताचा पाऊस पडून राहिला असता पाढरा रग त्याच्या राज्यात पाहावयालाहि मिळाला नसता, चित्रकला त्याच्या राज्यात लोप पावली असती आणि त्याच्या राज्यातील कोरड्या अन्नाला लागणाऱ्या कालवणाची गरजच उरली नसती! तसेच त्यानी मारलेल्या असख्य लोकानी जर भुते होऊन त्याच्या मानेस बसण्याचे मनात आणले असते, तर एकेकाच्या मानेभोवती इतकी भुते जमली असती की, ती सूक्ष्म देहाने आली असताहि त्याना त्याच्य मानेवर बसण्याला सगळ्याना जागा न मिळाल्यामुळे त्रासून ती माघारी गेली असती! असे भोग जर रुधिरप्रदिग्ध होऊ लागले असते, तर अर्जुनाच्या पाठीमागून आलेल्या राजाना या जगात राहवले नसते पण असे कोठे आहे? मागचे राहू द्या? पण अलीकडचीच गोष्ट घेतली तरी असे कोठे दिसून येत आहे? हल्ली काही कमी लोक मारले गेले आहेत असे नाही अर्जुनालाच मोठी घमेड नको अगदी अलीकडच्या दिवसातसुद्धा किती तरी लोक मारले गेलेले आहेत! नीग्रो, क्यूबन, फिलिपिनो, दरवेशी, हिरोरो, सोमाली, काफीर, बोअर, आफ्रिडी, तिबेटी, ब्रह्मी, चिनी, जपानी, रशियन, ज्यू, आर्मेनियन वगैरे किती तरी लोक या यादीत येतात! सुधारणादेवीच्या प्रसाराच्या चरणतळी बळी म्हणून पशूप्रमाणे कापून काढलेल्या या असख्य मुडक्याची गणना कोण करू शकणार आहे? पण इतके लोक ही मर्त्यभूमि सोडून स्वर्ग-लोकातील नदनवनामध्ये राहण्याकरिता गेले म्हणून पाठीमागे त्याच्या रक्ताने कोणाच्या कपड्याना डाग पडले आहेत? जगातील प्रत्येक मनुष्याचा हात पाहावा तो बर्फासारखा पाढराशुभ्र दिसत आहे! राजाकडे पाहावे, तर त्याचे पोषाख धुऊन काढण्याला आपल्याला अतिशय त्रास पडतो अशी कोणत्याहि राजाच्या परिटाची तक्रार नाही! सगळ्या राजाना रात्रीच्या स्वस्थ झोपा लागतात! लेडी मॅक्बेथप्रमाणे आपण केलेल्या खुनाची आठवण होऊन कोणी राजे किंवा त्याच्या राण्या आपल्या अथरुणातून उठतात आणि दिवसा

केलेली पापकर्मे रात्रीच्या झोपेत बडबडतात, असा कोणत्याहि राजवैद्याकडून बोभाटा बाहेर आलेला नाही! सर्व राजे खुशाल खातात, पितात, घोड्यांवर बसतात, गाड्यातून फिरतात, नाच नाचतात, मेजवान्या रगडतात, आणि फिरून लोकाना नीतीचा आणि न्यायाचा उपदेश करतात! अशी अव्याहत चैन प्रत्यक्ष चालली असतां अर्जुनाला भोगाच्या रुधिरप्रदिग्धत्वाची एवढी भीति वाटावी हे मोठे आश्चर्य आहे!

"याना मारले तर पाप लागेल (पापमेवाश्रयेदस्मान्)", 'राज्यलोभासाठी आम्ही मोठे पाप करण्याला प्रयुक्त झालो आहो (अहो बत महत्पाप कर्तु व्यवसिता वयम्)", "या पातकासाठी आपल्याला नरकात राहावे लागेल (नरके नियत वासो भवतीत्यनुशुश्रुम।)" इत्यादि श्लोकातून उक्त आणि अनुक्त अशी जी भये अर्जुनाला वाटत होती तीहि अगदी निराधार आहेत जगात पाप म्हणून काही पदार्थ आहे आणि ते केले म्हणजे स्वर्गात देव म्हणून दुसरा कोणी एक पदार्थ आहे तो आपल्याला शासन करतो, अनेक साधनानी आपला नाश करतो, आणि आपल्याला नरकात टाकतो, या कल्पना अगदी पोरकटपणाच्या आणि वेडगळपणाच्या आहेत पाप आणि पुण्य, देव आणि शासन व स्वर्ग आणि नरक या वस्तु जर कौरवपाडवाच्या वेळी खरोखर अस्तित्वात होत्या असे मानले, तर त्या अलीकडेच एकाकी कशा नाहीशा व्हाव्यात? अलीकडेसुद्धा लाखो लोकाचे प्रतिवर्षी खून चालले आहेत, त्याबद्दलची ठळक ठळक उदाहरणे वर दिलेलीच आहेत आता यात जर पाप असते आणि आकाशात जर देव असता, तर असख्य माणसाचे प्राण घेणाऱ्या या लोकाना देवाने त्याच्या पापाबद्दल काहीच भयकर शासन केले नसते काय? पण तसे कोणाला होत आहे? हल्लीचे खडोगणती राजे जमिनीवर चालत असतात, पण त्याच्या पायाखाली धरणीकप होत नाहीत! ते पाण्यावर नावातून तरगत असतात, पण त्या नावा आपल्या प्रचड पोटात गट्ट करून टाकण्याविषयी देव समुद्राला कधीहि चुणकावीत नाही! ते पर्वताच्या शिखरावर जाऊन राहतात, पण ते पर्वत शासन करणाऱ्या परमेश्वराच्या हुकमाने कधीहि ज्वालामुखी पर्वत बनत नाहीत! ते माणसाच्या रक्ताने तृप्त न होऊन फुरसतीच्या वेळी करमणुकीसाठी पर्वताच्या जगलांमधील वाघाना मारण्याकरिता जातात; पण

मनुष्यवध आणि व्याघ्रवध ही जर पातके असती आणि ती देवाला दु:सह झाली असती, तर ती पातके करणाराचे पारिपत्य करण्याला देवाला काय अडचण होती ? जो वाघ मरणारा तोच मारणारा करण्याला देवाला काही अवकाश असतो काय? पण नाही असे नाहीं असा काही एक अपघात न होता फक्त वाघच मरतात, यावरून पातक आणि देव हेच नसले पाहिजेत, असे सिद्ध होते हत्तीचे गंडस्थळ आणि हत्तीचे पदतळ याच्यामध्यें तीनचार हाता-पेक्षा काय जास्त अतर असते ? लाखो लोकाच्या खुनाने धुंद झालेला आणि रक्ताने लाल झालेला प्राणी मारलेल्या माणसाच्या पाठीच्या तक्क्याचे जिने करून त्यावरून हत्तीच्या गंडस्थळावर चढून मोठ्या डौलाने बसतो. आता यात जर देवाला—आंधळ्या देवाला—काही गुन्हा दिसता तर हत्तीच्या गंड-स्थळापासून हत्तीचा पाय दूर असतो काय ? पण तसे होत नाही यावरून-सुद्धा देवाच्या अस्तित्वाला मोठा धक्का बसतो. अशा स्थितीत देव आहे असे म्हणण्याचे धाडस कोण समजस मनुष्य करू शकेल ? नास्तिकानी देव नाही म्हणून ठरविले आहे. हा त्याच्यावर वृथा आक्षेप आहे नास्तिकाच्या वितंडवादापेक्षा देवाने आपल्या स्वतःच्या कृतीनेच आपल्यावरील लोकाची श्रद्धा जास्त उडवून घेतली आहे. तसेच नरक तरी कोठे आहे ? मागील युगांतील मनुष्याचें मन रानटी अवस्थेमध्ये होते त्या वेळी त्याने स्वर्ग वर असतो आणि नरक खालीं असतो, अशी आपली कल्पना करून घेतली आहे. पण वर काही नाहीं आणि खालीहि काही नाही ! अर्जुनाच्या वेळी लोकाना पृथ्वीचा फारच थोडा भाग माहीत होता, व पृथ्वीच्या पोटात काय आहे. याबद्दल तर बिलकूलच कल्पना नव्हती तेव्हा नरक खालीं आहे ही कल्पना खून करणाऱ्या राजाना दबकावण्याला बरी होती. पण आता आपल्याखालीं म्हणजे अमेरिका घेतली, तर अमेरिकेन काय आहे, हे हल्लीच्या राजांना माहीत झालेले आहे. तेथें अमेरिकेतील स्वतंत्र संस्थाने आहेत, हें त्यानी प्रत्यक्ष पाहिलें आहे, व तेथें नरक नाही अशी त्यांची पक्की खात्री झालेली आहे. आता खाली म्हणजे या पृथ्वीच्या पोटात नरक आहे अशी कोणाला शंका असेल, तर भूगर्भशास्त्रवेत्त्यांनी त्याहि शंकेला जागा ठेविली नाही. एकदर पृथ्वीच्या मध्यभागापर्यंत काय काय भरलेलें आहे ह्या सगळ्या-बद्दलची इत्थंभूत माहिती अर्वाचीन राजापाशीं आहे. तेव्हां जर देव, पाप,

नरक वगैरे वस्तु वास्तविक अस्तित्वातच नाहीत, तर मग त्याच्याबद्दल भीति कोण बाळगणार आहे ?

सारांश, भोग जर खरोखर रुधिरप्रदिग्ध होत असते, मारलेल्या माणसामध्ये भुते होऊन सूड उगविण्याचे जर खरोखर सामर्थ्य असते, पाप आणि देव ह्या जर खरोखर अस्तित्वात असणाऱ्या वस्तु असून पापाबद्दल देव शासन करता, धरणीकंप, खवळलेला समुद्र ज्वालामुखी पर्वताचा स्फोट, चवताळलेल्या वाघाची उडी, आणि मदोन्मत्त झालेल्या हत्तीचा पाय, ही जर पातकाच्या पारिपत्याची प्रचीतिदायक साधने असती, आणि प्रवाशाना अमेरिकेत व भूगर्भशास्त्रवेत्याना पृथ्वीच्या पोटात जर कोठे खरोखर नरक आढळला असता, तर आजकाल जे योद्धे जास्त खुनाबद्दल जास्त छाती वर काढून चालत आहेत, त्याचीहि दुसऱ्याचे निष्कारण खून करण्यापूर्वी अर्जुनाप्रमाणे स्थिति झाली असती, पातकाच्या भीतीमुळे त्याचीहि गात्रे खिन्न झाली असती, मुख परिम्लान झाले असते, शरिराला कंप सुटला असता, सर्व अंगावर रोमांच उभे राहिले असते, हातातून शस्त्रे गळाली असती, मन भ्रमण पावू लागले असते, अपशकुन दिसू लागले असते, आणि हातातून आयुधे टाकून डोळ्यातून पाणी काढीत ते स्तब्ध बसले असते. पण अशी स्थिति कोणाची तरी होत आहे काय ? नाही. प्रत्येकाला लढाईच्या वेळचे खून करावयाला जाताना आपण अतिशय पवित्र काम करावयाला जात आहो असे वाटतें ! देवाची भीति बिलकुल उरलेली नाही. मनुष्य मनुष्यांना वाघाप्रमाणे खाऊ लागले आहेत, तरीहि देव असून नसून सारखा झाल्याप्रमाणे झाला आहे गांजलेल्या मनुष्यानाहि आपले आपण सरंक्षण करून घेण्यावाचून देवाच्या मदतीचा वगैरे दुसरा काही मार्ग उरला नाही. या सगळ्या अर्वाचीन स्थितीवरून काय सिद्ध होते ? पाप, पुण्य, स्वर्ग, नरक, देव, धर्म वगैरे जुन्या गोष्टी नव्या राजानीं अगदी थोतांडें ठरवून टाकली आहेत. चार्वाकानी नास्तिकपणाचा प्रसार केला असें म्हणतात. परंतु असंख्य लोकांचे खून करूनहि सर्व सृष्टिनियमांविरुद्ध प्रतिदिवशी जास्त जास्त भरभराटीस चढणाऱ्या अलीकडच्या लोकांनी नास्तिकपणाला जास्त उत्तेजन दिले आहे. साम्राज्य हा देव, कोणताहि न्याय किंवा अन्याय करून त्या साम्राज्याचा प्रसार करणें हे पुण्य, आणि इतरानी स्वदेशभक्तीने

प्रेरित होऊन अतिशय प्रिय अशा स्वदेशाच्या सरक्षणासाठी त्या प्रसाराच्या आड येणे हे पाप, अशी आजकालची स्थिति आहे. ही तत्त्वे लक्षात बाळगून अर्जुन वागला नाही, व भलभलत्याच शका काढीत बसला, हे अगदी गैरशिस्त होय. जेथे दुसऱ्याना मारून बेलाशक त्याचे राज्य घ्याव-याचे, तेथे 'न चैतद्विद्मः कतरन्नो गरीयो यद्वा जयेम यदि वा नो जयेयु' अशा शका काढीत अर्जुनाने बसावे, यावरून त्यावेळचे लोक धार्मिक कल्प-नाच्या बाबतीत मागासलेले होते असे म्हणावे लागते अर्जुनाचा हा रानटीपणा पाहून कोणालाहि हसू आल्यावाचून राहणार नाही तेव्हापासून जर ही देवाधर्माची कल्पना गुडाळून ठेवण्यात आली असती, तर आजला मनुष्यप्राण्याची प्रगति फारच वाढली असती ! पण दुर्दैव जगाचे ! परतु असो वेडपणामुळे जी तत्त्वे त्या वेळच्या अर्जुनाला समजली नाहीत ती हल्लीच्या अर्जुनाना समजून ते त्याप्रमाणे जगाची वाट लावीत आहेत, ही काही थोडया समाधानाची गोष्ट आहे असे नाही. देव असल्यास तो या स्वमूलोच्छेदनाच्या सत्कृत्याला हातभार लावो !

# ना. गो. चापेकर

## समाजधर्म

देवधर्माचा हेतु देवाराधना हा असतो, आणि समाजधर्मामध्ये समाजाची सुस्थिति हेच प्रत्येक माणसाचे ध्येय असते. मनुष्यप्राणी सुखाकरिता जन्मास आलेला नाही, ऐहिक सुखाच्या मागेच मनुष्य लागल्यास त्याचा नाश झाल्याशिवाय राहणार नाही. म्हणून सुख हे मनुष्यप्राण्याचे ध्येय ठरत नाही. आपण वंशरूपाने व समाजरूपाने निरंतर राहणे हेच मनुष्याने साधावयाचे आहे समाजाव्यतिरिक्त मनुष्याचा निभाव लागणार नाही, हे आपण पाहिलेच आहे. अर्थात् समाजात राहूनच व्यक्तीने आपली शक्य ती उन्नति करून घेतली पाहिजे. याकरिता समाजाचे चिरस्थायित्व जेणेकरून कायम राहील अशा रीतीने वागण्याची जबाबदारी प्रत्येक माणसावर येऊन पडते, आणि ही जबाबदारी विवेकशक्तीच्या आधारावरच तो पार पाडू शकेल. मनुष्याच्या भावना, वासना अशा पाहिजेत की, त्याच्यायोगाने समाजाचे स्वास्थ्य वृद्धिंगत व्हावे कायदा व रूढि ही शासनाची बाह्य साधने होत, तर स्वतःच्या वासना अथवा मन हे अंतर्गत साधन होय बाह्य साधनाइतकीच आवश्यकता या अंतःस्थ साधनाची असते. एका अर्थी हे अंतःस्थ साधन बाह्य साधनाहून अधिक महत्त्वाचे व श्रेष्ठ ठरते कायद्याच्या व्यतिरिक्त क्षेत्रात आपण आपले स्वतःचे शासक असतो हे तर खरेच, पण आपल्या सुविचाराच्या योगाने कायद्याचा अमलहि सुकर होण्यास मदत होते, हे ध्यानात ठेविले पाहिजे. तात्पर्य, आपल्या वासना तृप्त झाल्या असता आपल्याला किती सुख मिळते, ही कसोटी सोडून मानववंशक्षय न होण्याला त्या वासना किती प्रमाणाने उपयोगी पडतात, याचाच मुख्यतः आपण विचार केला पाहिजे; आणि ही गोष्ट साध्य होण्यास सर्व मानवजातीची एकात्मता ह्या प्रमुख तत्त्वाची जोपासना मनुष्यमात्रानें केली पाहिजे. समानवीर्यत्व हे या समाजधर्माचे आद्य तत्त्व असून समाजांतर्गत व्यक्ति ही या धर्माची उपास्य देवता होय. अखिल

मानवजातीच्या बंधुत्वाची कल्पना जेव्हा सर्व जगात प्रस्थापित होईल तेव्हांच या समाजधर्माचे बीजारोपण झाले असे म्हणता येईल. असस्कृत समाजात विश्वबधुत्वाची कल्पना उद्‌भूत झालेली नसते, एवढेच नव्हे, तर दुसरा मनुष्य आपला शत्रूच आहे या भावनेनेच तो प्रेरित झालेला असतो. आज सर्व बाजूनी मनुष्यजातीची प्रचड सुधारणा झालेली दिसत असूनहि या विश्वबधुत्वाच्या बाबतीत प्राथमिक समाजाच्या पुढे आपण फारसे गेलो आहो असे मानण्यास काही कारण दिसत नाही. देवस्थान युधिष्ठिरास सागतो –" कोणाचाहि द्रोह न करणे, सत्यभाषण करणे, आपल्या सपत्तीत दुसऱ्याचाहि भाग आहे असे समजणे, दुसऱ्यालाहि आपल्या सपत्तीचा अश देणे, दया, इन्द्रियदमन, मृदुपणा, स्वस्त्रीच्या ठिकाणीच प्रजोत्पत्ति, हाच मुख्य धर्म होय " ( शातिपर्व अ २१ ) सामाजिक मनुष्याचे हे उत्कृष्ट वर्णन आहे

आता विश्वबधुत्वाच्या कल्पनेशी अनेक प्रचलित धर्मपथ विसगत असल्यामुळे अशा धर्माचे जगातून उच्चाटन होणे अत्यत अगत्याचें आहे. एक मुसलमान दुसऱ्या मुसलमानाला बधु समजत असला तरी मुसलमानेतराला तो काफीरच समजतो. त्याचप्रमाणे एक क्रिस्ती दुसऱ्या क्रिस्त्यावर प्रेम करतो, पण क्रिस्ती धर्माच्या बाहेरील माणसाचा तो दुष्टावाच करीत असतो म्हणून या निरनिराळ्या धर्माचे बधुत्व मतलबाचे व दाभिक आहे असेच म्हणावे लागते विश्वबधुत्वाची कल्पना ज्या समाजाला मानवली नाही ते सर्व समाज नष्ट झाले, व जे हल्ली जीव धरून आहेत तेहि पुढे नाश पावतील यात काही शका नाही. समाजाव्यतिरिक्त नुसत्या व्यक्तीचा विचार केला तर सर्व जग हे माझ्याकरिता निर्माण झाले आहे व मीच या अखिल जगाचा मध्यबिदु आहे, अशा कल्पनेने तो भारलेला असतो, आणि हेच तत्त्व त्याच्या वागणुकीचें बीज ठरतें. परतु समाजात राहणाऱ्या माणसाच्या वागणुकीचा पाया त्याच्या अगदी विरुद्ध असतो. मी सर्व जगाकरिता आहे, हाच त्याच्या वागणुकीचा महामत्र असावा लागतो पाश्चात्य देशांत ही कल्पना अद्यापि आचारात उतरली नाहीं. परतु हिदु समाजाच्या वागणुकीचे हे तत्त्व हजारो वर्षांपूर्वीपासून ठरून गेल्यासारखे आहे. मनुष्याची सहज प्रवृत्ति अथवा स्वाभाविक वासना या

स्वार्थमूलक असतात. समाजहिताला ही स्वार्थबुद्धि विघातक असते. म्हणून ती दाबून समाजहिताचा विचार करून तदनुसार आपले वर्तन ठेवणे, हे सुधारणेचे दर्शक होय हे कालावधीचे कार्य आहे हे उघड आहे, व हे प्रत्ये-काला साध्य होणे अशक्य आहे, एवढ्याकरिता कोणत्याहि समाजात नेहमी दोन प्रकारचे लोक असतात (१) विचारवत, व (२) त्याच्या शासनात राहणारे. विचार करणारे लोक कोठेहि गेले तरी थोडेच असतात बहुजन-समाज शेळ्यामेढ्यासारखाच असतो. विचाराचे काम त्याच्याकडून होत नाही सयमी, नि स्वार्थी व विचारी अशा लोकाच्या उपदेशाप्रमाणे अथवा त्यानी घालून दिलेल्या नियमाप्रमाणे ज्या समाजात इतर लोक वागतात, तोच समाज शिस्तीच्या व स्वास्थ्याच्या दृष्टीने उन्नतीला येत आहे असे मानले पाहिजे. अशा समाजात राहणारा मनुष्य हा नेमस्त असतो प्रबळ मनोविकाराचा मनुष्य समाजाच्या हिताच्या आड येत असल्यामुळे समाजात वाढण्यास योग्य परिस्थिति त्याला मिळत नाही व म्हणून त्याचा नाश होतो समाजाचे ध्येय, समाजाचे विचार व समाजाची नीति, तसेच समाजाची अपेक्षा याना अनुरूप जो आपली वागणूक ठेवतो तोच समाजात टिकतो

अशा रीतीने वागावयाचे म्हटले म्हणजे प्रत्येक अचारासबधाने लोकमत काय आहे हे पाहावे लागते रूढीइतकेच लोकमत प्रभावी असते जेथे खरा-खुरा समाज अस्तित्वात असतो तेथेच लोकमताचा विचार केला जातो रानटी लोकात लोकमतानुसार वागण्याची कल्पनाच उद्‌भूत झालेली नसते रानटी मनुष्य आपल्या स्वत.च्या आवडीनावडीप्रमाणेच वागत असतो प्रगमनशील समाजात आपणास एखादी गोष्ट आवडली तरी ती लोकमताच्या विरुद्ध असल्यास ती करण्याचे धाडस आपल्या हातून होत नाही लोकमताविरुद्ध आपण वागलो तरी आपले मनच आपणास खात असते, आणि लोकमताची तऱ्हा तरी अशी असते की, लोक ज्याना चागले म्हणतील ते चागले व वाईट म्हणतील ते वाईट. कायदा मोडला असता ठरलेली शिक्षा भोगावी लागते तद्वतच लोकमताविरुद्ध वागल्यास लोक आपणास बहिष्कार घालतात बहिष्कार हे लोकाच्या हातातील लोकास ताळ्यावर आणण्याचे भयकर शस्त्र होय सामा-जिक, धार्मिक, राजकीय, आर्थिक इत्यादि सर्व बाबतीतच लोकमताचा अमल चालत असतो. गाधीनी सुरू केलेल्या गेल्या कायदेभगाच्या चळवळीत चळवळी-

विरुद्ध वागणाऱ्याच्या बायकामुलांनीहि त्यास सोडल्याची उदाहरणे घडून आलीं आहेत. स्वराज्य आम्हाला नको असे म्हणण्यास हल्ली कोणताहि राजनिष्ठ हिंदी गृहस्थ कचरतो याचे कारण लोकमताचा वाढता प्रभाव हेच होय तो मनापासून इंग्रजनिष्ठ असला तरीसुद्धा स्वराज्य नको म्हणण्याची छाती त्याच्याने करवत नाही पूर्वी समाजाविरुद्ध वागणे हा घोर गुन्हा समजला जात असे, व ते उचितहि होते कारण असा मनुष्य समाजाच्या चिर-स्थायित्वाला अपायकारक होतो, आणि त्याला उत्तम शिक्षा म्हणजे समाजातून काढून टाकणे हीच होय समाजहिताविरुद्ध वागणाऱ्याचे शासन करण्यास बहिष्कारासारखा दुसरा उपायच सापडणार नाही

कायदा हा लोकमतानुसारीच असतो, म्हणजे कायद्यात लोकमत व्यक्त झालेले असते परंतु प्रत्येक लोकमत कायद्याच्या रूपाने प्रकट होऊ शकत नाही कायद्यानेच सुशील व प्रेमळ आई कशी बनेल ? बालहत्या केली असता आईला शिक्षा होईल, परंतु मुलाची जोपासना जी काळजीने व प्रेमानें आईच्या हातून होते, ती काही कायद्यामुळे नव्हे गरीब विधवेपासून तिच्या-जवळ असलेला एकच रुपया सक्तीने काढून घेऊन सावकाराला कायदा देईल, तथापि लोकमताला ती गोष्ट रुचणार नाही म्हणून कायद्याचे सहाय्य असून-हि इतकी निष्ठुरता दाखविण्यास सावकार उद्युक्त होत नाही. कारण लोकाची त्याला भीति वाटते तसेच सद्‌गुणाचे अथवा सद्वर्तनाचे चीज कर-ण्यास कायदा असमर्थ असतो परंतु अशा प्रकारचे सामर्थ्य लोकमतात असते. जगामध्ये आज जे सद्वर्तन होत आहे, त्यापैकी तीनचतुर्थांश सद्वर्तन तरी लोकमताच्या प्रभावाचाच परिणाम होय लोक काय म्हणतील ही धास्ती सर्वानाच असते व लोकाकडून वाहवा मिळवून घेण्याची उत्कट इच्छा प्रत्येका-मध्ये वास करते

एवढे असले तरी लोकमताचे दोषहि ठळक आहेत. प्रथमत: लोकमत केव्हा बदलेल याचा नियम नसतो, आणि कोणत्या रीतीने ते शासन करील याचाहि नियम सांगता येत नाही. कायदा जितका निश्चित व स्पष्ट असतो तितके लोकमत नसते तसेच लोक फार विसराळू असतात, अन्यायी लोकाचें अन्याय्य वर्तन लोकाच्या स्मरणातून अल्पकाळात निघून जाते. अपराधी माणूस काही काळ बाहेर जाऊन मग परत गावी आला तर त्याच्या अन्यायाचें

स्मरण कोणाला क्वचितच असलेले आढळून येते दुसरी गोष्ट अशी की, अपराधी मनुष्य श्रीमंत असेल तर त्याचे आश्रित त्याच्या पक्षास मिळतात आणि समाजात त्यामुळे दुही उत्पन्न होते. शिवाय पुष्कळ लोकानी मिळून अन्याय केल्यास त्यासंबधी लोकमत लवकर क्षुब्ध होत नाही व्यक्तीचे अन्याय्य कृत्य समाजास असह्य होते व बहिष्कारादि सर्व शस्त्रास्त्रानी समाज त्या व्यक्तीचे शासन करण्यास उद्युक्त होतो. एकाच माणसाने लाच खाल्ली तर लोकाचा क्षोभ ज्या मानाने होतो, त्या मानाने लोकलबोर्ड व म्युनिसिपालिटी ही लाच खाऊ लागली असताहि होत नाही.

लोकमत नेहमी निर्दोषी असतेच असा नियम नाही. अनेक वेळा ते अन्यायाचे, क्रूरपणाचे व अनीतिमूलक असते पुष्कळ समाजात लाच खाण्याच्या कृत्याबद्दल कोणाच्याच मनात उद्विग्नता उत्पन्न होत नाही शत्रूविषयी व परधर्मीयाविषयी असहनशीलतेची तर अनेक ठिकाणी प्रशसाच केली जाते स्वार्थपरायणता, दाभिकपणा इत्यादि दोषाबद्दल आमचा समाज बेफिकीर असतो त्याचप्रमाणे स्वदेशप्रेम व करारी वागणूक याचे चीज आजकालच्या आपल्या समाजात होत नाही, ही गोष्ट नेहमीच्या अनुभवाचीच आहे म्हणून लोक सुसस्कृत झाल्याशिवाय समाजाची शिस्त ठेवण्याच्या कामी लोकमत निरुपयोगी ठरते लोकमत मनुष्याच्या वर्तनाला वळण लावते त्या वर्तनाची न्याय्यान्याय्यता ठरवीत नाही वर्तनाला वळण लावण्याच्या कामी मागे सागितल्याप्रमाणे निस्पृह असे शिष्ट लोकच उपयोगी पडतात सुव्यवस्थित समाजात शिष्टाचे श्रेष्ठत्व मान्य केले जाते. लोकसत्तेच्या काळात लोकमत अत्यत प्रबळ असणे स्वाभाविकच आहे, आणि म्हणून वर्तमानपत्रातील स्तुति-निदेचा परिणाम लोकावर होत असतो, परतु वर निर्दिष्ट केल्याप्रमाणे लोकमत इष्ट मार्गानेच व्यक्त होत असते, असे मात्र म्हणवत नाही. नुसते लोकमत हेच जर वागणुकीचे प्रमाण ठरले तर त्या समाजाचा विनाशकाल जवळच ठेपला असे म्हणावे लागेल बहुजनमत हे उच्छृखल असते. त्याच्या मुळाशी निःस्पृहता दिसून येत नाही. त्याचप्रमाणे ते विवेकप्रेरितहि नसते.

कोणत्याहि समाजात शिष्ट हेच वागणुकीचे नियम घालून देतात. त्याना जरी धर्माचे अवगुठन दिलेले असले तरी ते समाजाच्या हिताच्या

दृष्टीनेच योजिलेले असतात. शुक्राचार्यांनी दारू बंद केली, मनूने मांसाहाराला आळा घातला, शंकराचार्यांनी अखिल मानवजाति परमार्थत एकच आहे, एवढेच नव्हे तर ती ब्रह्मरूप आहे, असे सर्व जगास शिकवून मनुष्याच्या ठिकाणी आत्मविश्वास व पावित्र्य ही निर्माण केली अशा प्रकारची अनेक उदाहरणे देता येतील तात्पर्य, हे शिष्टांचे निर्बंध समाजाने आत्मसात् केले म्हणजे जे लोकमत बनते, तेच खरे लोकमत होय शिष्ट हे समाजाला हळूहळू पुढे नेत असतात काही निर्बंध समाजाने पचविले म्हणजे दुसरे अधिक वरच्या दर्जाचे निर्बंध समाजाने ग्रहण करण्याकरिता ते घालून देतात, परंतु याबरोबरच अत्युच्च ध्येय हेहि समाजापुढे ठेवावे लागते मनुष्यस्वभावात बदल किंवा मनोविकाराचा लोप हा प्रकार फारच मंदगतीने होत असल्यामुळे समाजातील काही थोडे लोकच शिष्टांचे ध्येय एकदम उचलू शकतात, आणि या कारणाकरिता समाजात निरनिराळ्या जाति उत्पन्न होतात इतिहासपूर्व काळातील शुक्राचार्य व मनु यांनी मद्य व मांस यांचा निषेध केला असता अद्यापि पुष्कळांस या पदार्थांची चटक सुटत नाही हे आपण पाहतोच सारांश, शिष्टांच्या मनाची छाप ज्या लोकमतावर असेल तेच खरे लोकमत आणि तेच समाजस्थितीला कारणीभूत होते याच दृष्टीने लोकमत पारखून घेतले पाहिजे

लोकमत म्हणजे बहुजनमत होय म्हणून लोकमताप्रमाणे प्रत्येकाचे मत असतेच असा नियम नसतो याच्या उलट, लोकसमजुती ज्या असतात त्या बहुधा प्रत्येक व्यक्तीच्या असतात यांपैकी काही समजुती तत्त्वज्ञानावर अधिष्ठित झालेल्या असल्या तरी काही काल्पनिक असतात यात शंका नाही. एकादशीचे उपोषण केले असता मनुष्याला स्वर्गप्राप्ति होते, उलट, त्या दिवशी अन्न भक्षण केले असता नरकाची वाट धरण्याचा प्रसंग येतो, अशासारख्या समजुतींना तत्त्वत आधार नसल्यामुळे त्या भ्रामक म्हणून म्हणता येतील तथापि कांहीं समजुती एका प्रकारच्या विशिष्ट तत्त्वज्ञानामुळे उद्भूत झालेल्या असतात, म्हणून त्यांचा अंमल साधारणत समाजातील प्रत्येक व्यक्तीवर असू शकतो या समजुतींची इमारत धर्माच्या पायावर उभारलेली असते, आणि धर्माचा उगम देवाच्या कल्पनेत असल्यामुळे देवाविषयी कल्पना जसजशी बदलते तसतशा या समजुतीहि पालटत जातात.

सर्वशक्तिमान असा एक परमेश्वर आहे, असा एकदां मनुष्याचा विश्वास ठाम झाला म्हणजे तो आपल्या दुष्कर्माबद्दल ह्याच जन्मीं आपणास शासन करील असें प्रथम मनुष्याला वाटूं लागतें. ह्या भीतीनें त्याच्या समजुती-प्रमाणें जें दुष्कर्म तें करण्यापासून तो परावृत्त होतो; परंतु कांहीं कालानंतर त्यास हळूहळू असा अनुभव येऊं लागतो कीं, दुष्कर्मी लोक सुखी अस-तात; उलट सत्कर्मी लोकांच्याच कपाळीं हालअपेष्टा ठेविलेल्या आहेत. या अनुभवाचा परिणाम याच जन्मीं परमेश्वर दुष्टाला शासन करतो, ही समजूत नाहींशी करण्यांत होतो. यानंतर परमेश्वर मनुष्याला मरणोत्तर त्याच्या दुष्कृत्यांबद्दल शासन करतो, असें मानण्याकडे मनुष्याची प्रवृत्ति होते. परमेश्वराची कल्पना रूढ झाल्यानंतर अनाचाराची तो उपेक्षा करील असा विचार मनांत येणें शक्यच नाहीं. अशा स्थितींत स्वर्ग-नरकांच्या कल्पना अस्तित्वांत येतात. हिंदूंचा कर्मभोगाचा सिद्धान्त आज जरी देवाशीं अगदीं चिकटलेला नसला, तरी कोणत्याहि कर्माचें चांगलेवाईटपणाचें फळ मिळालेंच पाहिजे, या समजुतींत कर्मभोगतत्त्वाचें बीज आहे. अनतकालपर्यन्त मनुष्य पुन: पुन: जन्म घेत असल्यामुळें त्याच्या कर्माचें फळ त्यास केव्हां तरी मिळालेंच पाहिजे, असें हें तत्त्वज्ञान आहे. हिंदु समाजांतील या सर्व-मान्य श्रद्धेमुळें बहुजनसमाज शिस्तीच्या मर्यादेंत राहात असतो

मेलेले पितर स्वर्गांतून आपलें कृत्य पाहात असतात, ही एक पुष्कळ समाजांत सर्वमान्य झालेली समजूत आहे. आपल्या निंद्य कर्माच्या योगानें पितरांना दु:ख व त्रास हीं होतात, असा चिनी व जपानी लोकांचा दृढ विश्वास आहे, हें सर्वश्रुतच आहे. पितृधर्माचा उगम याच कल्पनेंत आहे. ईश्वराच्या सामर्थ्याची भीति लोकांना वाटत असते तोंपर्यंत यज्ञयाग, पूजा-अर्चा इत्यादि कृत्यांनीं त्याला संतुष्ट करण्याचा प्रयत्न मनुष्य करीत असतो. परंतु परमेश्वर न्यायी आहे, या समजुतीवर मनुष्याचा अधिक विश्वास बसूं लागला म्हणजे केवळ पूजेअर्चेनें परमेश्वर संतुष्ट होणार नाहीं, तर तो आपल्या सत्कृत्यांनींच संतुष्ट होईल ह्या कल्पनेचा अंमल सुरू होतो. हा समज म्हणजे मनुष्याच्या प्रगतीची पुढची पायरी होय; आणि म्हणून समाज-स्वास्थ्याच्या कामीं या समजुतीचा फार उपयोग होतो. कायदा व लोकमत यांचा अंमल प्रत्यक्ष घडलेल्या कृत्यावर चालतो; या दोहोंपैकीं एकहि

मनाची वृत्ति बदलू शकत नाही. म्हणून कर्माचा उगम ज्यात आहे असे जे मन त्या मनावर वरीलसारख्या सर्वमान्य लौकिक समजुतीच्या योगाने सस्कार घडत असतो, आणि यातच या समजुतीचे महत्त्व फार आहे, असे समाजशास्त्रज्ञाना वाटत असते

देव हा पवित्र असून अमगळ असे त्याला कांही खपत नाही, अशा समजुतीनेसुद्धा पुष्कळ माणसाना निष्पाप ठेविले आहे कित्येक सदाचाराची उत्पत्ति या श्रद्धेत असल्याचे ऐतिहासिक पुराव्यावरून दाखविता येण्यासारखें आहे देव सर्वत्र आहेच, तथापि ज्या ठिकाणी त्याचे विशिष्ट अधिष्ठान असेल त्या ठिकाणी तरी दुराचरण करू नये, अशी वृत्ति माणसाची बनू लागते. या दोन्ही प्रकारची उदाहरणे आपणास देता येतील. यज्ञाची दीक्षा घेतल्यानतर माससेवन अथवा सुरापान करू नये असा निर्बन्ध शास्त्रकारानी घातला, हे सूत्रग्रथावरून उघड दिसून येते हिंदुसमाजापैकी ब्राह्मणसमाज मासनिवृत्त झाला याचे कारण वरील गोष्टीत सापडण्यासारखे आहे क्षेत्राच्या ठिकाणी आपल्या हातून दुष्कर्म घडू नये अशाविषयी मनुष्य अधिक दक्षता बाळगतो. तसेच देवालयाच्या आवाराच्या बाहेर जितके दुष्कर्म घडते तितके खुद्द देवालयात अथवा देवालयाच्या आवारात घडत नाही, ही सामान्यत आपल्या अनुभवाची गोष्ट आहेच. क्वचित् आपल्या हातून दुष्कर्म घडल्यास परमेश्वर त्यास शासन करीपर्यतहि मनुष्य वाट बघत नाही देवापर्यत जाण्याच्या पूर्वीच प्रायश्चित्त रूपाने तो स्वतःस आपल्या दुष्कर्माबद्दल् शासन करून घेतो. प्रायश्चित्त घेणे म्हणजे आपला अपराध उघड रीतीने कबूल करणे होय प्रायश्चित्ताच्या योगाने ह्याच जन्मी आणि तेहि तात्काल आपल्या पापाचे निरसन झाले अशी मनुष्याची समजूत असते. उपोषणे, व्रते, यात्रा इत्यादि प्रकार पुष्कळ वेळा पुण्यसपादनाच्या ऐवजी पापनिरसनार्थंच करण्यात येतात. या सर्व गोष्टीच्या पाठीमागे देवविषयक कल्पना असतात. म्हणून या गोष्टीचा उपहास न करता त्यापासून समाजाचे हित किती झाले आहे हेच विचारात घेतले पाहिजे.

# श्री. म. माटे

## अज्ञान–वृक्षाच्या सांवलींत !

इंद्रायणीच्या तीरची पंचक्रोशी नाना प्रकारच्या स्मृतींनी समृद्ध बनलेली आहे. ज्ञानेश्वराने जेव्हा या नदीच्या काठी समाधि घेतली तेव्हा नामदेवाचा जीव अगदी गलबलून गेला या उदात्त प्रसंगी महाराष्ट्रातील सर्व पारमार्थिक लोकशाही इंद्रायणीच्या काठी जमा झालेली होती तेथे नामा शिंपी होता, सावता माळी होता, सेना न्हावी होता, गोरा कुंभार होता, स्त्रीत्वाच्या आणि दासीपणाच्या दुहेरी जाणिवेने खिन्न झालेली जनाबाई होती पंढरपूरच्या विठ्ठलाची मूर्ति प्रत्यक्ष डोळ्यांनी पाहिलेला चोखोबाहि होता जातोजात जे सारे संत संभवलेले होते ते येथे जमा झाले होते. परंतु, या संतांना इंद्रायणीच्या तीराचा महिमा पटविण्यासाठी नामदेवाने सांगितले की ही पंचक्रोशी पुरातन आहे, हिचे पुरातनत्व फक्त चतुराननालाच माहीत असले पाहिजे या ठिकाणीच एक कोटी यज्ञ झालेले होते, या ठिकाणीच ऋषीमुनींनी युगानुयुग तप केलेले होते; या ठिकाणीच त्रिवेणी गुप्त आहे या ठिकाणचा महिमा असा आहे की, देव हे पक्ष्यांचे रूप धारण करून या वनातील वृक्षांवर आणि वेलींवर कूजन करीत बसतात नामदेवाच्या या अद्भुत वर्णनाने त्या जमलेल्या लोकशाहीला अर्थातच आनंद झाला असेल, आणि त्या इंद्रायणीच्या तीराचे आधीच सिद्ध असलेले पवित्रपण त्यांना पटले असेल परंतु या नदीचे आधीचे हे पवित्रपण ज्ञानेश्वराच्या समाधीनंतर सहस्रपटीने वाढलेले आहे देव पक्ष्यांची रूपे घेऊन वृक्षवेलींवर बसतात हा तर केवळ काव्यगौरव आहे आणि येथे एक कोट यज्ञ झाले होते ही प्राचीन काळची परंपरेने प्राप्त झालेली एक नवलकथा आहे परंतु ज्ञानेश्वराने या ठिकाणी जिवंत समाधि घेतली हा सर्वमान्य इतिहास आहे आणि आताच सांगितलेली महाराष्ट्रातील पारमार्थिक लोकशाही येथे जमा झालेली होती हेहि नामदेवानेंच सांगून ठेविलेले आहे. अशा या पवित्र स्थली एखादे वेळीं मनाने तरी जावेसे वाटते.

प्रत्यक्ष जाण्यापेक्षा मनाने जाण्यात पुष्कळदा जास्त आनंद असतो. आणि

त्या मोहात मनाने गुजारव करीत बसावे असें आपल्याला वाटतें. ज्ञानेश्वराच्या समाधीचे असेच आहे. मनाने तेथे जाण्यात आणि तेथे आपल्याशीच सवाद करण्यात खरे खरे सुख प्राप्त होते. जी मोठमोठाली देवस्थाने आहेत, तेथे मला फारसे चैन पडत नाही पडलेच तर ते येवढ्यापुरते की, या मूर्तीच्या पायावर श्रेष्ठ लोकांनी आपली मस्तके लवविली होती. खुद्द मूर्तींचा किवा स्थानाचा महिमा मला काहीच वाटत नाही नाना ठिकाणच्या आणि जातीच्या साधुसतानी पाया पडून पडून विठ्ठलाची पाऊले पातळ केली आहेत या गोष्टीमुळेच पढरपूरचा महिमा मला विशेष वाटतो ज्ञानेश्वराची समाधि याच दृष्टीने मला अत्यत प्रिय वाटते तेथे एक मोठा रसिक तत्त्वज्ञानी समाधि लावून बसला आहे येवढ्यामुळेच मला त्या ठिकाणासबधाने आत्मीयता वाटते. ज्ञानेश्वर आपल्यापेक्षा केवढाहि मोठा असो. पण तो आपल्या माणसाच्या जातीचा होता. येवढे लागतेपण मला पुरेसे वाटते. एका समान भूमिकेवर येण्याला येवढे आमन पुरेसे आहे

त्याच्या त्या अजान-वृक्षाखाली बसून थोडे रेलावे आणि आपल्याच मनाशी गुणगुणत पडावे असे कितीदा तरी वाटते ज्ञानेश्वराच्या दारातला पिपळ हा सोन्याचा आहे असे अनेक भक्तानी म्हटलेले आहे या पिपळाची पाने जर खऱ्या सोन्याची असती तर ज्ञानेश्वराचे भक्त हे विरक्त आहेत असे मानूनसुद्धा या पिपळाला एकहि पान शिल्लक राहिले नसते असे वाटते. ज्याला त्याला ज्ञानेश्वराचा प्रसाद हवा असणारच ! आणि प्रसाद किती घ्यावा याला सीमा नसल्यामुळे सर्व यात्रेकरूनी मिळून या पिपळाचा खराटा करून सोडला असता, आणि पुढल्या वसतात हा सोन्याचा पिपळ पुन्हा फुलणार आहे ही आशा मनात तेवत ठेवूनच ही भक्तमंडळी घरोघर गेली असती. परतु हा पिंपळ सोन्याचा आहे हे ज्यानी पहिल्याने म्हटले आणि त्याचे अभग जे गात असतात त्या दोघानीहि प्रेमाच्या पोटीं एक अतिशय मनोरम अतिशयोक्ति केलेली आहे ज्ञानेश्वराच्या दारात आल्यानें किती सुख वाटते ? ज्ञानेश्वराच्या दारांत कसला वृक्ष बहरून जावा ? तर ज्या सोन्याने प्रपचांत सुख उत्पन्न होते आणि ज्याच्या योगानें प्रपंचाला बहर येतो, त्या सोन्याचाच हा वृक्ष असावा अशी अनुकूल कल्पना भक्तांच्या कवि-मनाने केली. भक्त मोठे लाघवी कवि होते. पंढरपूरचें स्तवन करतां करतां नामदेव

एकदा म्हणाला, ' आधी वसविली पढरी। मग वैकुठ नगरी ।। जव्हा नव्हते चराचर। तेव्हा होते पढरपूर ।। जेव्हां नव्हती गोदा गगा। तेव्हा होती चद्र-भागा ।। ' ही अतिशयोक्ति करणाराला आणि ती ऐकणाराला दोघानाहि तिचे मर्म आणि तिचे लाघव ही कळतच होती. तसेच ह्या सोन्याच्या पिपळाचे सुद्धा आहे या पिपळाचा महिमा थोड्या विषयातराने मी वर्णन केला पण स्फुट विचाराच्या आविष्कारात, गमतीचे विषयातर हेहि मनाला उत्तेजक बनते. या पिपळाखाली बसले म्हणजे समाधीत बसलेल्या ज्ञानेश्वराला उद्देशून बोलावेसे वाटते.

खरोखर! या समाधीत येऊन आसनस्थ होताना हे योगियाच्या राजा! तुला ज्यानी पाहिले असेल त्याच्या हृदयाचे कद त्या दिवशी उन्मळून आले असतील. भोवती उभे असलेले सारे वेदान्ती–भक्तच होते, परतु वेदान्त्याना-सुद्धा माणुसकी सुटत नाही. त्याना ती चुकविता येत नाही नामदेवानेच म्हटले आहे की हे लोक गहिवरून गेले आणि काही तर ढसढसा रडू लागले आज इतकी वर्षे होऊन गेल्यानतर आधुनिक विचारात खारलेले माझे मन-सुद्धा जर तुझ्या दारी एकदम इतके द्रवू लागते, तर ज्यानी तुझे हे दारुण तप आपल्या डोळ्यानी पाहिले त्याच्या मनाची काय कालवाकालव झाली असेल हे कल्पनेने आणि सहानुभूतीने ओळखावयास हवे. पण तसे तरी कशाला? नामदेवाची जबानी अगदी उघड आहे. माझ्या ज्ञानेश्वरा! तुझा तो वडील भाऊ निवृत्ति हा तर 'सकोचला ससार। पुरुषला व्यवहार' या मन:स्थितीला जाऊन पोचलेला होता. ससाराची क्षितिजापर्यंत पसरलेली सावली ज्याच्या केवळ पायाखाली येऊन ठेपली आणि ज्याला जगाच्या प्रपंचात केवळ रखरखीतपणा, म्हणजे पारुष्य उत्पन्न झाले, तो तुझा निवृत्ति-सुद्धा लहान मुलासारखा रडू लागला. वेदान्ताचें वैराग्य आणि माणुसकीचे ममत्व याचा चमत्कारिक सकर या योग्याच्या मनात त्या वेळी झाला असेल. मुक्ताबाई तर बोलून चालून लहानच होती, तिला साऱ्या जुन्या आठवणी होऊ लागल्या. या लोकाच्या मनाची प्रवृत्तीच जरी आता वेदान्ताची आणि वैराग्याची बनलेली असली तरी या प्रसगी त्याची मानुषविकृति वर उचंबळून आली; आणि त्या मुलीने गहिवरून सांगितले की, " मला खेळविण्यासाठी सोपानाला घरी ठेवून हा ज्ञानेश्वरदादा कोरान्न मागण्यासाठीं मधुकरीचें

फडके घेऊन बाहेर जात असे मला तो प्रसग आता आठवतो तो गेला म्हणजे दादा कोठे गेला ? म्हणून मी विचारी. परतु हे कोराम्राचे रहस्य मला तेव्हा कळत नव्हते. आता हा योग्याचा राणा बनलेला, आणि पारमार्थिक बुभुक्षिताना पोटभर जेवू घालणारा हा ज्ञानेश्वर आता कायमचा दृष्टिआड होतो यामुळे माझे मन उद्वेगाने भरून जाते" खरोखर इतका करुणास्पद देखावा महाराष्ट्राच्या इतिहासात दुसरीकडे कोठे दिसला असेल असे वाटत नाही

माझे बोलणे भोळेपणाचे, विनाकारण भावनातिरेकाचे असे वाटेल, पण मला खरे बोलल्याचे श्रेय मात्र मिळेल कितीदा तरी वाटते की आपल्याला ती ती माणसे आणि ते ते देखावे पुन्हा दिसावे, पतिव्रताची राणी ती जानकी, आणि एकपत्नीव्रत जगाला शिकविलेला क्षत्रियाचा राजा तो धनुर्धर राम, द्रौपदीच्या वेणीची आठवण होऊन क्रुद्ध बनलेला आणि कौरवाच्या शासनाला उद्युक्त झालेला तो स्त्रियाचा पक्षपाती श्रीकृष्ण, ससाराची सर्व वाताहत होऊन हिमालयाची वाट चालू लागलेले ते पाच पाडव आणि त्याची पत्नी ती द्रौपदी, हे सारे मला एकदा तरी दिसावें असे वाटते ते दिसले तर उरलेल्या आयुष्याची किमत मी खुषीने देईन ते चक्क चर्मचक्षूनी दिसावे ज्ञानेश्वरा! तुझ्यासबधानेहि मला असेच वाटते. तुमच्या लहानपणी मी जर तिथे असतो, तर मुक्ताबाईला मी खेळवीत बसलो असतो, नाहीतर ज्ञानेश्वरी मुखाने सागण्यास तुला स्वास्थ्य राहावे म्हणून, स्वत च कोराम्राला जाऊन ते तुला आणून घातले असते त्या नेवाशाच्या खाबाला टेकून ज्ञानेश्वरीचे, अत्यत मधुर काव्यरसाने भरलेले. आणि वेदान्ताची मोहरी लाविलेले, ते भाष्य तू सागत असताना मी ते उतरून घ्यावयास बसलो असतो, आणि रेड्याच्या पाठीवर मारलेल्या आसुडाचे वळ तुझ्या पाठीवर जर खरोखरच दिसले असते तर, वेडा बनून सगळ्या गावांत मी ओरडत फिरलो असतो की, "काय अद्‌भुत चमत्कार झाला आहे पाहा! ज्ञानेश्वराचे सर्वव्यापी ममत्व पाहा!"

ज्ञानेश्वरा! येवढ्या लहानपणी तू आपल्या दारांत कैवल्यस्वरूपाचा वेल लाविलास आणि त्याचे पोषण तू एवढ्या उत्सुकतेनें केल्येस की तो हा हा म्हणता गगनांत जाऊन पोचला. या मोगऱ्याचा विस्तार खूपच झाला. आणि

मग, तुझ्या वाणीला जेव्हा बहर आला, तेव्हा, " मोगरा फुलला, फुले वेचायला चला " असे गावातले लोक एकमेकाना ओरडून सागू लागले या लोकात जर मी असतो तर फार बरे झाले असते माझ्याशी बोलताना एकदा पागारकर म्हणाले, " एकदा मी अर्धवट जागा आणि अर्धवट सुषुप्तीत असताना मला एक कसला तरी प्रचड झोत दिसला त्यात त्या चाफळच्या बैराग्याची भव्य मूर्ति उभी होती दासानी मला सागितले, ' आमच्या भक्तमडळीत तू होतास, तुझे नाव केशव असे होते ' पागारकराच्या मनाचा हा धर्म माझ्या वाट्याला खचित आलेला नाही. त्यामुळे जागृतीत तर नव्हेच नव्हे, पण सुषुप्तीतसुद्धा मला असला झोत कधी दिसेल असे वाटत नाही सर्व ज्ञानाची प्रसविका जी शका आणि मनाला तद्रूप्रमाणे एकाच ठिकाणी बद्ध करून टाकणारे जे विकल्प आणि या सर्वांना पाणी घालणारा तो जो जबरदस्त तर्क यानी माझ्या मनाचा पुरता कबजा घेतलेला आहे आणि ' तर्क तो अर्क जाणावा ' हे रामदासाचे वचन वाचल्यापासून तर मला त्याची सगति मुळीच सोडवत नाही परतु, हे सारे जमेस धरून सुद्धा मला खरोखर असें वाटते की या महानुभाव लोकाची प्रत्यक्ष दर्शने अवश्य व्हावी

माणसाची जात उत्तरोत्तर प्रगल्भ होत चाललेली आहे, आणि म्हणून पुढल्या पुढल्या काळी उत्पन्न होणारी माणसे पूर्वकालीन माणसाच्यापेक्षा अधिक परिणत बुद्धीची निघतील याविषयी मला मुळीच शका नाही पण हे खरे असले तरी मागे होऊन गेलेल्या माणसाच्या सबधाने कोणा कोणा लोकाच्या मनात जी क्षुद्र बुद्धीची जाणीव असते, तिचा एक लेशहि माझ्या मनात नसतो पुढे उत्पन्न होणारे मोठे लोक हे आभाळातून पडणार आहेत असे मुळीच नाही. मानवी जीविताचा झोत अखड चाललेला आहे आणि कालानुक्रमाने त्याचा विस्तार विशाल होत आहे पण या, पुढल्या विस्ताराला मागला विस्तार कारणीभूत झालेला आहे व होणार आहे ही गोष्ट मला विसरता येत नाही. समकालीन लोकाच्या मानाने ज्याच्या कर्तृत्वाची आणि बुद्धीची झेंप मोठी, ते या विस्ताराला कारण होत आलेले आहेत. अर्थात् त्यांचें स्मरण मनात होत राहणे हे मानवी जीवनाच्या सामरस्याच्या दृष्टीनें अगदी ओघानें येतें. आणि म्हणूनच ते मागले मागले लोक आपल्या दृष्टीस पडावे असे मला वाटते.

म्हणूनच, तुझ्या दारांत बसून काहीं चिंतन करावें असेंहि वाटतें.

आजवर कोटयवधि लोक जन्माला आले आहेत आणि कोटयवधि लोक एकाच खाईकडे निघून गेलेले आहेत त्याचे स्मरण कोण ठेवतो ? पण ज्यानी आपल्या बुद्धीने आणि कर्तृत्वाने काही नवे सकल्पिले आणि आचरिले त्यानीच आम्हा मानवाना हे आजचे वैभव प्राप्त करून दिलेले आहे म्हणून माझे मन पुन पुन्हा त्याच्याकडे वळते शिवाय, आणखीहि एक बारकासा विचार मनात बोचत राहतोच पुढे काही मोठे होणार आहे असा फक्त अदाज आहे पण जे मागे झाले आहे ते निश्चित असून हस्तगत झालेले आहे खगोलशास्त्री सागतात की दर पधरा पधरा हजार वर्षानी पृथ्वीवर हिमप्रलय होणार असतो हे जर का खरे असले तर भावी कालात फार प्रचड माणसे उत्पन्न होण्याची आशाच खुटल्यासारखी होणार आहे माणसाने जमा केलेले आणि उत्पन्न केलेले सगळे वैभव या बर्फाच्या लोढयाखाली गुदमरून मरून जाईल, किवा त्याच्या थडीने तरी कुडकुडून मरून जाईल अर्थात् भावी कालासबधाने थोडीशी अशाश्वती आहेच परतु जे धीरगभीर पराक्रमी आणि स्वतत्र बुद्धीचे पुरुष आजपर्यंत होऊन गेले त्याची नावे मनात कायमची ठसलेली आहेत आणि म्हणून आमचे मन पुन पुन्हा मागे वळते ही एक ऐतिहासिक रसिकता आहे

ज्ञानेश्वरा ! भूतकाळाच्या वाटेवरील एक मोठी विश्रातीची जागा म्हणजे तुझी ही समाधि आणि तुझा हा अजान-वृक्ष आहे याचा लोभ माझ्यासारख्या माणसालाच वाटतो असे नव्हे पैठणच्या त्या उदारधी ब्राह्मणाला हाच मोह पडलेला होता. तुझे ज्ञान भूतकाळात कोठेतरी गळबटून पडलेले होते, ते मुक्त व्हावे, आणि त्याचे पाट महाराष्ट्रात पुन जिकडे तिकडे वाहू लागावे असे त्या एकनाथाला वाटू लागले तुझ्या गळयालाच झाडाची मुळी लागलेली आहे, असा दृष्टान्त त्याला झाला आणि हा पैठणचा ब्राह्मण तुझ्या समाधीपाशी येऊन ठेपला. तुझ्या गळयाला लागलेली मुळी त्याने बाजूला सारली म्हणजे काय केले, हे आता महाराष्ट्राला खास माहीत झालेले आहे. घरोघरी आणि क्षेत्रोक्षेत्री तुझ्या ग्रथाची पारायणे चालू आहेत, आणि प्रत्येक क्षेत्राच्या ठिकाणी लक्षावधि यात्रेकरू या आईचे म्हणजे ज्ञानेश्वरीचे स्तवन टाळया पिटून करीत आहेत. इतकेच काय, पण ज्याना आधुनिक पद्धतीचे विद्वान् म्हणून म्हणतात, त्याना सुद्धां तुझ्या वाङमयाचा मोह इतका विलक्षण पडला

आहे की त्याची अध्ययने करण्यात प्रौढ विद्यार्थ्यांना आणि त्याची अध्यापने करण्यात प्रौढ शिक्षकाना आत्मगौरवच वाटत आहे पण हे सारे एकनाथाने तुझ्या गळ्याची मुळी काढली म्हणून झाले मागल्या मागल्या श्रेष्ठ पुरुषाचे स्मरण आणि रसग्रहण पुढिलानी करीत राहवे व त्यानी ऐतिहासिक रसिकता दाखवावी हें आमच्या वाढीच्या दृष्टीनेच युक्त आहे

ज्ञानेश्वरा ! तुझ्या जीविताचे साऱ्या लोकाना जे नवल वाटने ते हे की, तू एवढ्या लहान वयात, नाना प्रकारच्या विचाराची क्षेत्रे उल्लघिलीस तरी कशी ? तुझ्या मानाने, हे जग रेम्याडोक्या माणसानी भरलेले आहे असे वाटते भुईला नाक लागेपर्यंत माणसे जगलेली आहेत पण याना कसलीहि जागृति प्राप्त झालेली नाही. आजचा दिवस कालच्यासारखा आणि उद्याचा आजच्यासारखा असेच त्याचे चालले आहे तू मात्र, तुझ्या या पारमार्थिक कुलात पुढे उत्पन्न झालेल्या तुकारामाने वर्णिल्याप्रमाणे, जागृतीचा नित्य नवा दीस पाहात होतास, एकेक ज्ञानाचा खड झपाझप मागे टाकून तू पुढील स्तबकात प्रविष्ट होत होतास. या कामी तुझ्या बुद्धीने आणि मनाने जे चापल्य दाखविले ते मानवी इतिहासात केवळ अद्‌भुतच होय विचाराची केवढी प्रचड आदोलने तुझ्या मनात चालू असतील एकीकडे "कुचे पताका झळकती, टाळ मृदग वाजती !" हा भक्तिमार्गीयाचा प्रेमळ घोष आणि दुसरीकडे "अवघ्या बाही म्या व्योम कवळिले" ही वेदान्ताची गर्जना तू निरनिराळ्या वेळी केलीस ? का ही दोनहि तुझ्या मनात एकाच वेळी चालू होती ? आणि या घोषाचा आणि या गर्जनेचा परस्पराना अत्यत अनुकूल असा काही अत सबध होता ? "सुदर सुरेख वोतिले, परब्रह्मतेज फाकले" हा तुझा भक्तिमार्गाचा घोष आणि "मेघधारी तपन केले, तारा पुष्पी वरी पूजिले, । चद्रफळ म्या वाहिले, ओवाळिले रविदीपें ।।" हे तुझे निर्गुणातील उड्डाण ही दोनहि तुझ्या मनाच्या म्यानात एकदमच सामावली होती काय? कां ही दोनहि निरनिराळ्या वेळी तू तेथें खोचून बसविली होतीस ? त्याचा परस्पराचा काही अनुकूल अत सबध आहे काय ? एकीकडे चद्रभागेच्या तिरावर टाळ-मृदुगाचा घोष चालूं असताना, दुसरीकडे त्याच वेळी "माझा मीच श्रोता, माझा मीच वक्ता, माझा मीच दाता, त्रिभुवनी," असें तू म्हणत होतास. जनसमर्दाच्या कोलाहलांत बसून तू भक्तीचे सुख अनुभवीत होतास त्याच वेळीं "एकल्यानें

एकला, अनतरूपे देखिला, दुजेपणा मुकला, ज्ञानदेवा ।। " हा वेदान्त्याचा अनुभव तू निर्लेपपणाने सेवीत होतास " सकळ धर्मांचे कारण, नामस्मरण हरिकीर्तन । तया क्षमा समाधान, सत जन साधिती ।। " हे तुझे प्रतिपादन एकीकडे चालू असता, " विश्वाचे आर्त माझ्या मनी प्रकाशले, अवघेचि झाले देह ब्रह्म । आवडीचे वालभ माझेनि कोदाटले, " " नवल देखिले, नभाकार गे माय । " हा वेदान्त्याचा अनुभव तुला त्याच वेळी येत होता काय ? असे झाले असले, तर या दोन्ही गोष्टीचा आतून काय सबध असेल याचे चितन करीत राहणे हे विचारी लोकाना प्राप्तच आहे

" आम्ही सन्यास घेतला, देहादिकाचा त्याग केला । पहाता पहाता मी धरठाया गेले, तेथे एक देखिले महाभूत । " ह्या ओळी अनुभवाच्या दृष्टीने एकामागून एक येतात काय ? पण ज्ञानेश्वरा ! मला न कळणाऱ्या गोष्टीच्या खोल पाण्यात मी शिरत आहे अशी शका मला येते. येवढी मात्र खात्री मला वाटते की, तुझ्या मनाचे परिभ्रमण गरुडालासुद्धा लाजवील असे होते आणि घार जशी सूर्यबिबाकडे निश्चल दृष्टि लावून आकाशात झेपावत सुटते तशी तुझी परमार्थ बुद्धि, डोळे दिपू न देता, त्या शेवटच्या कैवल्याकडे पाहात झेपावत चाललेली होती

मला यातले काहीहि साधेल असे वाटत नाही. आम्हा चारचौघा लोकाचा जो मार्ग आहे, तो ' पिपीलिका ' मार्ग म्हणजे मुगीचा मार्ग आहे. आणि तुझा जो ज्ञानमार्ग आहे तो विहगमाचा मार्ग आहे म्हणून, मी आता तुला गरुडाची उपमा दिली या आमच्या मुगीच्या मार्गाने तमाम दुनियेच्या सहवासात आम्ही मुक्कामाला केव्हा पोचू तेव्हा पोचू पारमार्थिक लोक मला मनातून काय म्हणतील ते म्हणोत हा खरा मुमुक्षू बनलेला नाही असा दोष त्यानी मला दिला तरी चालेल, कारण मला ती घाई खरोखरीच झालेली नाही आहे यात काय वाईट आहे ? प्रपच हा प्रपच म्हणून जर दु खमय असला तर त्याच्यातील दु खे नाहीशी करण्याचे यत्न आम्ही माणसानी अव्याहत चालविलेले आहेत आणि ते सारे यशस्वी होत चाललेले आहेत पूर्वीच्या काळी प्रपच जितका दुःखमय होता तितका तो सध्या राहिलेला नाही. आपली बुद्धि चालवावी आणि तिच्या बळावर आपले हाल कमी करून घ्यावे हे इगितच माणसाच्या ध्यानांत आलेले नव्हते, तोपर्यंत अगतिक बनून तो

दु खाचा टाहो फोडीत असे, आणि या ससारातून पळून जाण्याच्या गोष्टी बोलू लागे ससारातून पळून जाऊन देवाच्या गाभाऱ्यात शिरावे, निदान त्याच्या मदिराच्या वळचणीखाली तरी टाळी वाजवीत उभे राहावे असे त्याला वाटे. किबहुना, दु खमय प्रपचाच्या या खिडारातूनच परमेश्वराच्या रम्य मदिराकडे वाट जाते, असा सिद्धान्तच ह्यानी आपल्या मनाशी बाधलेला होता तुझ्यासारख्या आमच्या सगळ्या सतानी असे निग्रहाने सागितले आहे की प्रपचात हाल व्हावेत तेव्हाच लोक परमार्थाकडे वळतात, व वाङमयाचा इतिहास वाचीत असताना ही गोष्ट पदोपदी प्रत्ययास येते की, अमुक अमुक गृहस्थ हे प्रपचाच्या बाधेने अगदी हैराण होऊन गेले व म्हणूनच परमार्थाकडे वळले पण आधुनिक कालाचा महिमा असा आहे की, हे प्रपचातील हाल आता कमी होत चाललेले आहेत माणसाच्या सुखाची शीग आता वाढत चाललेली आहे आणि प्रपचातून पळून जाण्याच्या ऐवजी प्रपच ही भोग्य आणि अगी लागण्यासारखी वस्तु आहे असे त्याला वाटू लागले आहे असे जर आहे तर निवृत्तीला अत्यावश्य अशी जी प्रपचाची घृणा ती अत पर शिल्लकच उरणार नाही आणि मग त्या प्रपचावर रागावून परमेश्वराच्या मदिराची वाट चालू लागावी असेहि फारसे कोणास वाटणार नाही हा फरक आधुनिक शास्त्राच्या अभ्यासाने आमच्या जीवितात पडलेला आहे ' सुख पहाता जवापाडे, दु ख पर्वतायेवढे ' हे तुकारामाचे वचन प्रपचापुरते तरी आता खरे नाही मग प्रपचात सौख्य उत्पन्न झाले म्हणून परमेश्वराकडे वळण्याची माणसाची प्रवृत्ति बद होईल की काय ?

मला तर असे वाटते की, मनुष्य जो जो अधिकाधिक सुखी होत जाईल तो तो जास्त जिज्ञासू बनत जाईल आणि दु खाच्या काटयाकुटयातून परमेश्वराच्या मदिराची वाट चालू लागण्याऐवजी जिज्ञासेच्या अतिशय तीव्र पण नरम आणि सुखमय अशा भूमिकेवरून तो या मदिराकडे जाऊ लागेल सध्या परमेश्वराची भक्ति ही प्रापचिक दु खाची प्रतिक्रिया आहे की काय असे सुद्धा पुष्कळदा मनात येते पण त्याची भक्ति करून काय करावयाचे आहे ? काय साधावयाचे आहे ? प्रपचांत जें सुख साधावयाचें असेल ते परमेश्वर-निरपेक्ष अशा शास्त्रीय सशोधनाने आतां सहज साधता येत आहे. त्याला परमेश्वराच्या भक्तींत शिरण्याची आवश्यकता नाही. म्हणून मला असे वाटतें की,

परमेश्वराची भक्ति ही शब्दसहति मागे पडेल परमेश्वराचे ज्ञान करून घेणे आणि मनाने त्या ज्ञानाचे सशोधन करणे हेच काय ते उन्नत मनाची माणसे करीत राहतील. परमेश्वराचे स्वरूप समजावून घेणे हा एक सशोधनाचा विषय बनेल आणि ज्याना त्याचा अभ्यास झेपेल ते तो करू लागतील इतर भौतिक शास्त्राचे जसे अभ्यास आहेत तसा त्या शास्त्राच्या फार पलीकडे असलेला जो परमेश्वर त्याचे सशोधन करणे हाहि एक अभ्यासाचा विषय बनेल ज्ञानेश्वरा ! तुम्ही ज्ञानमार्गी लोक तरी असे सशोधनच करीत असता असे माझ्यासारख्या तिऱ्हाईत माणसाला वाटते त्या सशोधनात काही वासनाच्या साफल्याची इच्छा, प्रपचातील सुखे हे विषयच येऊ शकत नाहीत एका गूढस्थ महान् कारणाचे ते एक सशोधन असते इतकेच हे ज्याच्याने करवेल ते करतील आणि बाकीचे लोक, ससार सुखाचे होत चाललेले असल्यामुळे, तेवढ्यासाठी जी भक्ति करावयाची असते त्या भक्तीकडे वळणारहि नाहीत

कोणाकोणा पारमार्थिकाचे म्हणणे असे आहे की प्रपच हो वस्तु आणि भोवतालचा हा सारा पसारा प्रकृतित च दु खमूल आहे पण यात कसली दु खें आहेत ? तुकारामाने म्हटले आहे–' येणे दु खे माझा फुटो पाहे प्राण ' येणे म्हणजे कोणत्या दु खाने ? जगाची अशाश्वती हीच तुकारामाला बाधत होती काय ? की तुझ्यापासून आत्मतः दूर राहिल्याचे दु ख त्याला होत होते ? पण यात तरी दु ख कसले ? ती एक मनाची किवा आत्म्याची अमुक काळापुरती स्थिति असेल इतकेच काय ते यात दु ख कोणते हे मात्र ध्यानात येत नाही मला असे वाटते की आधुनिक काळात आपल्या कल्पनाचे पृथक्करण जास्त व्यवस्थित होत आहे आणि भौतिक शास्त्रशोधाचे सुखप्रद परिणाम प्रपचावर इतके होत आहेत की, पूर्वीच्या आपल्या परमार्थाविषयीच्या कल्पना आपल्याला खास बदलाव्या लागतील म्हणजे प्रपचात प्रत्यक्ष दु ख असे फारसे उरणारच नाही आणि प्रपच अथवा ऐहिक जिणे ही वस्तु प्रकृतित च दु खगर्भ आहे ही कल्पना सध्या वाटते तितकी बाधक राहणार नाही. आपणच उत्पन्न केलेल्या या जाचातून मानवप्राणी बाहेर पडेल आणि सर्व वस्तुजाताच्या नाभिस्थानी असलेले ते जे कोणते एक सनातन, शाश्वत आणि निरामय तत्त्व असेल त्याच्या सशोधनाला शुद्ध जिज्ञासा म्हणून तो मनाने प्रवृत्त होईल अखिल मानवजात येवढ्या उचीवर खास येऊन बसेल हे सशोधन जर ती करीना

तर तिने आपले मनुष्यत्व सोडले आणि आपली बुद्धि गमावली असाच त्याचा अर्थ होईल बुद्धीची आणि जिज्ञासेची अहता म्हणूनच मनुष्यप्राणी परमेश्वराचे सशोधन करीत राहील आणि यात काहीहि चूक नाही

ज्ञानेश्वरा! या विचारात फार पाखड भरलेले आहे असे परमेश्वराचे भक्त खासच म्हणतील पण तुझ्या अजान-वृक्षाखाली बसून हे विचार मनात आणण्यात मला कसलेहि पातक वाटत नाही, कारण तू ज्ञानशीलाचा मुकुटमणि आहेस आणि म्हणून, आपल्या मनात जे नानाप्रकारचे विकल्प येतात ते सागणे त्यात काहीच चूक नाही तू जे अत्यत सुरस असे वाङमयवैभव निर्माण केले आहेस, त्यामुळे लक्षावधि लोकाच्या मनाची झड तुझ्या ग्रथावर पडत असते परतु मला तुझ्या ग्रथापेक्षासुद्धा तुझ्या त्या चरित्राचे महत्त्व जास्त वाटते मानव्याचे जे प्रचड प्रतिनिधि आजवर झाले आहेत, त्यातच तुझी गणना करावयास हवी मानवी मनाची तू एक बेरीज आहेस एखाद्या छोटयाशा पेटिकेत, दशयोजने व्यापून टाकील असा कस्तुरीचा सुगध कोडून धरावा, तसे तुझ्या त्या लहानशा चरित्रात उत्तरोत्तर प्रगल्भ होत जाणारे मानवी मनाचे सर्व अनुभव कोडून धरलेले आहेत

माणसाच्या मनाला पडणारे सगळे प्रश्न तुला पडलेले होते तुझे वैभव असे की तू ते सारे सोडविलेस आणि आता काही करावयाचे राहिले नाही म्हणून जीविताच्या या धर्मशाळेतून तू आपण होऊन बाहेर पडलास जिवत समाधीच्या या कल्पनेचे अतरग अत्यत विशाल आणि प्रगल्भ असे आहे. जिवत समाधि हा काही वैराग्याचा आलेला झटका नव्हे, ही काही नैराश्याची लहर नव्हे, ही काही घृणेची तामसी तपस्या नव्हे जिवत समाधि ही सर्व काही आटोपल्याची दर्शक आहे ज्या हुशार विद्यार्थ्याने तास दीडतासाच्या आत प्रश्नपत्रिकेतील सर्व प्रश्नाची उत्तरे देऊन टाकलेली आहेत, तो जसा परीक्षेच्या मडपातून सुखासमाधानाने लवकर बाहेर पडतो तसा तू या मानवी जीवनातून बाहेर पडलास, या विचाराने माझे मन हजारदा मोहित झालेले आहे आणि मोहित होत राहील त्या मोहाच्या पाशात बारीकसा विचार करीत मनाने तरी तुझ्या दारात येऊन बसावे म्हणून मी या

सोन्याच्या पिपळाखाली येऊन बसलों होतो. तुझी ती पारमार्थिक लोकशाही केवढी सपन्न आणि प्रसन्न होती ! आम्ही त्या लोकशाहीत प्रविष्टहि झालेलो नाही पण मनाने केव्हा केव्हां तुझ्या दाराशी यावे आणि तिने पावन केलेला त्या पिपळाचा वारा घ्यावा असे मधून मधून वाटते.

------

# द. के. केळकर

## — समाजशास्त्रांतील विवेकवाद —

मन्वतराचा जुना पुराणोक्त अर्थ काही असो, इग्रजी अमल सुरू झाल्या-पासून आणि पौर्वात्य व पाश्चिमात्य सस्कृतीच्या अहर्निश गाठी-भेटी होऊ लागल्यापासून आपल्या देशात एक नवे मन्वतर अवतीर्ण होऊ घातले आहे हें खचित ज्या ज्या काळी समाजाच्या घटनेत, ध्येयात, शासननियमांत कालातराने साचत आलेल्या दोषाची जागीव उदय पावते, ज्या ज्या काळी आपणाहून स्वरूपत· भिन्न असणाऱ्या व पूर्वी अपरिचित असलेल्या समाजाची ओळख झाल्याने सामाजिक प्रश्नाचे ज्ञान विस्तृत होऊन ते उकलण्याची नवी दृष्टि प्राप्त होते, व ज्या ज्या काळी समाज-सघटनेविषयी नवीन तत्त्वज्ञान अस्तित्वात येऊ पाहते त्या त्या काळाला मन्वतर हे नाव सार्थ होय या अर्थी गेल्या पन्नास–पाऊणशे वर्षांचा काल हा चालू नवीन मन्वतराचा प्रभातकाल होय असे मानण्यास हरकत नाही

प्राचीन दतकथाच्या धूसर धुक्यात दडलेला काल सोडून दिला तर इति-हासाच्या स्वच्छ प्रकाशातील कालात तीन मन्वतरे नजरेस येतात पहिले गौतमबुद्धाच्या पावलावर पाऊल टाकून आलेले दुसरे महमदी समशेरीच्या खणखणाटातून अवतीर्ण झालेले तिसरे पाश्चात्य चिकित्साप्रधान सस्कृतीने पश्चिमेकडे वाढविलेले व पूर्वेच्या उमाठ्यावर नुकतेच उदयास येऊ पाहात असलेले चालू मन्वतर प्रत्येक मन्वतराच्या सुरुवातीस जुन्या विचारसरणीला, चालीरीतीना, कायदे-कानूना, धरणीकप झाल्याप्रमाणे एकामागून एक धक्के बसतात या धक्क्याबरोबर काही चालीर ती निष्प्राण, निर्वीर्य व निरुपयोगी होतात. काही आचार-विचाराची पडझड होते धरणीकपाने नवीन अस्तित्वात येणाऱ्या प्रदेशाप्रमाणे जुन्या चालीरीतीच्या समुद्रातून नवीन चालीरीतीची बेटे डोकावू लागतात व धरणीकपाशी सहोदरत्वाच्या नात्याने जन्मास येणाऱ्या मन्वतरकालीन समाज-कलहरूपी ज्वालामुखीच्या तप्त रसाखाली काही सुदर व सार्थ आचार-विचार गाडले जातात.

बुद्धकालीन मन्वतराच्या वेळी नवविचाराचे असे विलक्षण वावटळ सुटले की, त्याने लाबवर पाळेमुळे गेलेल्या यज्ञसस्थेचा अश्वत्थ वृक्ष सपूर्ण खिळखिळा झाला यज्ञमडपाची पाळे उडून जाऊन यूप मोडून पडले व स्थलावरून उडालेल्या विभूतीने माखल्यामुळे अगाला राख फासून मन्यस्त होण्याची वृत्ति जनतेत बळावली

महमदी मन्वतराच्या वेळीहि राष्ट्राला जबरदस्त धक्के बसले, लाखो प्रजा जबरदस्तीने व फसगतीने धर्मातराला बळी पडली आणि वेष व भाषा बहुताशी परकी बनली पण महमदी वीराची भिस्त शास्त्रापेक्षा शस्त्रावर अधिक असल्याने समाज-घटनेत किंवा सामाजिक तत्त्वज्ञानात मात्र फारसा फरक झाला नाही धार्मिक तत्त्वज्ञानात फरक झाला तो येवढाच की, बुद्धधर्माच्या शिकवणीने आधीच निवृत्तिपर झालेला समाज मुसलमानाच्या जबर मान्याने पूर्ण निवृत्तिपर किबहुना हताश होण्याच्या पथाला लागला

## मन्वंतराचा उदय

आता वरील दोन्हीहून विलक्षण असे नवीन मन्वतर उदय पावले आहे. त्याच्या उदयाबरोबर जे विचाराचे उल्कापात होऊ लागले आहेत, पूर्व परपराविषयक श्रद्धेची जी वृष्टि अनावृष्टि होऊ लागली आहे, जीवितध्येयाबाबत वादविवादाचे जे प्रभजन सुटू लागले आहेत त्यावरून भविष्य वर्तविता हा ग्रह बलिष्ठ असून त्याच्या दशेत, समाजाच्या घटनेत, आचार-विचारात, कायदे-कानूत महत्त्वाचे फरक घडून येणार अशी चिन्हे सर्वत्र दिसत आहेत. आचाराना अथवा चालीरीतीना नवे धुमारे फुटण्यास नव्या विचाराचे नवपर्जन्यजल मिळावे लागते काही काही खाचरात परिस्थितीच्या दाबाने अपक्व विचाराचे वळीव पाऊस पडून जुन्या चालीरीतीतून नवीन कोंब आजच डोकावू लागले आहेत पण अद्याप नवविचारमेघाचा गडगडाटच फार ऐकू येत आहे. शात जलस्वरूपी हिंदी सस्कृति व जयिष्णु ज्योतिस्वरूपी युरोपियन सस्कृति याच्या समिश्रणाने बौद्धिक नभोमडळात नवविचार-मेघाची गर्दी उसळली आहे सुभाषितकाराने म्हटल्याप्रमाणे योग्य काल आला असता हे वारिधर पडल्याशिवाय राहणार नाहीत लवकरच हा काल प्राप्त होऊन नवीन विचार सर्गास कृतीत येण्याचा पर्जन्यमोसम सुरू होईल अशा वेळी आपल्या समाजक्षेत्राचे परीक्षण करून त्यात कोणते पीक येऊ शकेल, कोणत्य

पिकाने जमिनीची नासाडी होईल, कोणते बी रुजणारच नाही याची माहिती करून घेणे आवश्यक आहे.

## दप्तरींचें धर्मरहस्य

या धोरणाचे निदर्शक असे समाज-घटनचे व ध्येयाचे अथवा व्यापक शब्दात बोलावयाचे असल्यास धर्माचे निरीक्षण-परीक्षण करणारे ग्रथ गेल्या पन्नास वर्षात निर्माण होत आहेत, व आगरकर, चिपळूणकर, गोळे, लोकहितवादी, केळकर, केतकर, भाटे, माटे, दिवेकर याचे स्फुट निबध, टिळकाचे गीतारहस्य, भटाचा महाराष्ट्रधर्म, गोविंदसुताचे आधिभौतिक सुधारणा व अध्यात्मिक धारणा, सतोजीमहाराजाच्या प्रोत्साहनाने निर्माण झालेला सनातन-धर्म-प्रदीप वगैरे ग्रथ हे समाजाच्या आचार-विचारात म्हणजेच धर्मात होऊ घातलेली क्राति कोणत्या स्वरूपाची होईल व कोणत्या स्वरूपाची व्हावी ह्याच्याच ऊहापोहाला वाहिलेले आहेत या ग्रथमालिकेत नाशिकच्या सस्कृत विद्यापीठाचे आचार्य व महाभारतीय युद्धकालनिर्णय, वैदिक कालगणनापद्धति, चिकित्सा, परीक्षण, करणकल्पलता वगैरे ग्रथाचे कर्ते श्रीयुत दप्तरी यानी धर्मरहस्य-विचार या ग्रथाने चागली भर टाकली आहे

ग्रथातील प्रमाणविचार या अध्यायात ग्रथकाराला जुन्या रूढ समजुतीशी चागला सामना करावा लागला आहे उपनिषदे व गीता याचा अर्थ लावण्याच्या अधिकारित्वाचा मान ज्याप्रमाणे सूत्रकार बादरायण व भाष्य-कार शकराचार्य वगैरे याच्याकडे जातो त्याप्रमाणे सहिता व ब्राह्मण या ग्रथाचा अर्थ लावण्याचा विशेषत चोदनालक्षण धर्माच्या पुरता अर्थ लाव-ण्याचा मान, सूत्रकार जैमिनी व भाष्यकार शबरस्वामी याच्याकडे येतो. पैकी गीतेचा शकराचार्यानी काढलेला मथितार्थ वाजवी आहे की तत्कालीन निवृत्तिप्रवण परिस्थितीला जुळेलसा ओढून-ताणून बसविलेला आहे ह्या वादग्रस्त व रूढ समजुतीला बोचक अशा प्रश्नाचा ऊहापोह गीतारहस्य-कारानी केला तर धर्मरहस्यकारानी जैमिनीच्या सूत्राचा शबरस्वामीने लाव-लेला अर्थ हा पुष्कळ ठिकाणी पूर्वापर सदर्भास सोडून अतएव अग्राह्य आहे, व वेद हे अपौरुषेय होत या समजुतीला उपबृहक म्हणून योजिलेले युक्तिवाद पोचट व भ्रामक आहेत अशा मताचा ऊहापोह केला आहे

## सूत्रग्रंथांचा अर्थ

पूर्वीच्या सूत्रग्रथाचा अर्थ लावणे हे करपुतळीत पाहून भविष्य वर्तविणे किवा पाहणाऱ्याच्या दृष्टिकोनाप्रमाणे भिन्न स्वरूप धारण करणाऱ्या मेघाचा आकार ठरविणे यासारखेच काहीसे अनिश्चित स्वरूपाचे आहे मागे मुबईस भरलेल्या प्रदर्शनात तादुळाचे सूक्ष्म दाण्यावर कोरलेली एक मुरलीधराची मूर्ति ठेवलेली असून ती सूक्ष्मदर्शक यत्राचे साहाय्याने पाहावी लागते असे वर्णन आले होते पूर्वीच्या सूत्रकाराचीहि महत्त्वाकाक्षा आपला सर्व ग्रथ तादुळाच्या सूक्ष्म दाण्यावर कोरून मावला जावा अशीच असावी ! एका पदाचा वा पदाक्षराचा सक्षेप करता आल्यास पुत्रजन्मतुल्य आनदाने नाचणाऱ्या सूत्रकारानी सक्षेपाच्या चरख्यावर इतके तलम सूत काढले आहे की, असल्या सुताचे वर्णन करताना सात आठ कपडे एकावर एक चढविले तरी लज्जारक्षण होऊ नये असे जसे अतिशयोक्तीने वर्णन करावे तद्वत् मूळ सूत्रात अनेक बाह्य शब्दाची भर घालूनहि मूळ अर्थाचे लक्षण करणे अवघड जाते अशा स्थितीत शबरस्वामीना उमगणारा अर्थ खरा, की दप्तरी याना वाटणारा अर्थ खरा हे त्या प्रकारच्या वाङमयात निरतर अवगाहन करणाराशिवाय इतराना आकलन होणे दुर्घट पण हा शास्त्रीय मुद्दा सोडून दिला तर जुन्या ग्रथाचा स्वतत्र दृष्टीने नवा अर्थ बसविण्यात त्याच्या बुद्धीची कुशाग्रता दिसून येते प्राचीन ऋषि व आचार्याप्रमाणे अर्वाचीन कालाच्या विद्वत्श्रेष्ठाना व समाजनेत्यानाहि धर्मग्रथाचा अर्थ लावण्याचा अधिकार आहे हे मत सक्रिय प्रतिपादण्यात जे धैर्य दाखविले गेले आहे त्याबद्दल ग्रथकाराचे अभिनदन करणे वाजवी होय.

या 'प्रमाणविचार' अध्यायातल्याप्रमाणे अन्यत्रहि ग्रथकर्त्याचे विवेचन उद्बोधक आहे धर्माच्या प्रातात शिरले की, धर्माचे प्रमाणग्रथ श्रुतिस्मृति व त्याचे प्रणेते ऋषि याच्याविषयीच्या अवास्तव आदराने धार्मिक प्रश्नाभोवती एक प्रकारचे गूढ तेजोवलय उत्पन्न होते व त्याच्या प्रकाशाने दिपल्याने स्थिर दृष्टीने त्याच्याकडे पाहणे अशक्य होऊन बसते चिकित्सादृष्टीवरील हे पटल नाहीसे करण्याच्या हेतूने ग्रथकाराने इद्र व मन्वतरकालीन शास्त्रप्रणेते सप्तर्षि हे कोण याचा खुलासा केला आहे "आता देव म्हणजे कोण ? मला वाटते, देव म्हणजे इद्र, म्हणजे त्या त्या वेळचा आर्यभूमीतील अत्यत बलवान् सार्वभौम किवा चक्रवर्ति मानला गेलेला राजा असावा. इद्र

हा शब्द इद्र म्हणजे बलवान् असणे या धातूवरून निघाला आहे यावरून असे वाटते की, अत्यत बलवान् अर्थात् सार्वभौम राजा हाच इद्र होय व यालाच यथे देव म्हटले आहे वायुपुराणात तर ब्रह्मदेव सप्तर्षींची नेमणूक करी असे स्पष्ट म्हटले आहे आणि ब्रह्मदेव तर आर्याचा अधिपति होय हे मागे दाखविलेच आहे. तात्पर्य, सार्वभौम राजा सप्तर्षींची नेमणूक करी व ते चोदनालक्षण धर्म निर्माण करीत ''

## धर्माचा विकास

श्रुतीचे अपौरुषेयत्व अशा रीतीने हिरावून घेतल्यावर श्रुति ह्या सनातन व अचल होत हे मत सोडून श्रुतिप्रणीत धर्मनियमात विकास, उत्क्राति व चलनशीलता मानणे हे ओघानेच येते व ग्रथकाराने हा मुद्दा स्पष्ट शब्दात माडला आहे "आणि अधिकृत असे जे सत त्यानी केलेले नियम ह्याच श्रुति असून श्रुतीत वेळोवेळी बदल करणे जरूर आहे हे बदल करणे सुरू असेल तर, किवा शास्त्राप्रमाणे शक्य असेल तर, त्या अवस्थेला श्रुतीची प्रागतिक अवस्था म्हणू, व बदल करणे शास्त्राप्रमाणे मना असेल तर त्याला श्रुतीची स्थिरावस्था म्हणू वैदिक धर्माचा विचार केल्यास असे दिसून येते की, श्रुतीना स्थिरावस्था शबराने भाष्य केले त्याच्या बऱ्याच काळापूर्वी आली असली पाहिजे कारण शबराने जैमिनीय सूत्राच्या आधाराने जे शास्त्र उत्पन्न केले त्याप्रमाणे श्रुतीमध्ये बदलच होऊ शकत नाही असे चुकीचे भाष्य करणे पुरातन खरे मत लोपून बराच काळ गेल्याशिवाय शक्य नाही पण श्रुतीला स्थिरावस्था प्राप्त झाली म्हणून राष्ट्र काही स्थिर राहू शकत नाही. म्हणून पुढील काळात राष्ट्राची प्रगति खुटू नये, म्हणून श्रुतीचे महत्त्व कमी करून आचाराचे महत्त्व वाढविण्यात आले 'व्यवहारो बलवान् धर्मस्तेनावहीयते' या नारदस्मृतीतील वचनात याचा पुरावा पाहावयास मिळतो ''

धर्माची जी दोन अगे प्रवृत्ति व निवृत्ति त्या दोहोत विरोध उत्पन्न झाला असता कोणते अधिक प्रभावी समजावे याविषयी रामदासानी 'प्रपच सोडुनी परमार्थ केला। तरि अन्न न मिळे खायाला। मग तया करटयाला। परमार्थ कैचा.' अशा स्पष्ट वाणीने जो निर्णय दिला आहे त्याचाच अनुवाद ग्रथकाराने केला आहे "निवृत्ति व प्रवृत्ति या धर्माच्या दोन अगात विरोध येईल

तेव्हा निवृत्त्यगापासून उत्पन्न झालेल्या कर्माचा त्याग करावा कारण 'अधं तम प्रविशन्ति येऽविद्यामुपासते। ततो भूय इव ते तमो ये विद्याया रता ॥' या ईशावास्योपनिषदातील वचनाप्रमाणे केवळ निवृत्तीचा स्वीकार करणारे, केवळ प्रवृत्तीचा स्वीकार करणारे जातात, त्यापेक्षा जास्त भयकर अध कारात जातात समजा की एका मुलाला गुरूजवळ आत्मज्ञान शिकावयाचे आहे, परतु उदरनिर्वाहाचे कोणतेच साधन उपलब्ध नसल्यामुळे काही धदा करणे प्राप्त आहे, तर अशा वेळी आधी त्याने धदाच करावा ईश्वरचितन हे धर्माचे निवृत्त्यग आहे हे करण्याच्या वेळीच वृत्तीच्या साधनाचे अत्यत आवश्यक कर्तव्य उपस्थित झाले तर हे दुसरे कर्तव्य आधी स्वीकारले पाहिजे "

"धर्माचे निवृत्त्यग फाजील बळावणे हे राष्ट्राच्या प्रस्तुत अवनतीच्या कारणापैकी एक प्रमुख कारण होय' धर्माचे रहस्य आकलन न झाल्यामुळे राष्ट्राच्या हातून इतरहि अनेक प्रमाद घडत आले आहेत व त्या सर्व सचिताचा विपाक म्हणजे चालू हीनावस्था होय ग्रथकाराने आपल्या मताप्रमाणे पाचसहा प्रकारचे प्रमाद वर्णिले आहेत ते असे —' आत्म त्राणे वर्णसकरे वा ब्राह्मणवैश्यौ शस्त्रमाददीयाताम् ' या वशिष्ठवचनात ब्राह्मणवैश्यानीहि प्रसगविशेषी लढावे असे सागितले आहे या पुरातन नियमाकडे दुर्लक्ष होत आलेले आहे, ही पहिली चूक पृथ्वीराजाचा पराभव झाला तेव्हा ब्राह्मण-वैश्यानी काहीच केले नाही कनोजचा राजा जयचद वेडेचार करू लागला त्या वेळीहि ब्राह्मण स्वस्थच बसले दुसरी चूक म्हणजे ब्राह्मणाच्या कर्मामध्ये अध्ययन-अध्यापनापेक्षा यजन-याजनाचे स्तोम फार वाढले. धर्मग्रथ जे स्मृति ते वाचणारे देखील ब्राह्मणांत कोणी सापडत नाहीत मग ब्राह्मणानाच धर्म न समजल्यामुळे सर्वांचीच दिशाभूल होत गेली. तिसरी चूक म्हणजे आरभी जे सर्व वर्णांमध्ये अन्नव्यवहार व विवाहव्यवहार होत असत ते बद करण्यात आले हे व्यवहार बद पडल्याने भिन्न वर्णांमध्ये सघटन कमी होऊन कोणतेहि कार्य एकदिलाने करणे अशक्य झाले चौथी चूक म्हणजे वर्णांतराची व्यवस्था नाहीशी झाली ही व्यवस्था नष्ट झाल्याने ज्याना जे शिक्षण मिळावयास पाहिजे ते मिळाले नाही. उदाहरणार्थ, मराठे जरी वास्तविक क्षत्रियच होते तरी ते धर्मदृष्टीने शूद्रच मानले जात असल्यामुळे, क्षत्रियाना आवश्यक जे शिक्षण ते त्याना मिळाले नाही व राष्ट्राचें नुकसान झाले. आणखी एक

महत्त्वाची चूक म्हणजे वर्णांतराशिवाय वर्णांतराची कृत्ये लोक करू लागल्यामुळे वर्णाचे वर्णत्व जाऊन त्याला जातित्व प्राप्त झाले व नंतर एकच धंदा करणारांत जसा मत्सर उत्पन्न व्हावा तसा होऊ लागला. उदाहरणार्थ, पेशव्यांच्या वेळी पुष्कळ ब्राह्मण वर्णांतराशिवाय क्षत्रियाचे कर्म करावयास लागले मराठेहि क्षत्रिय कर्म करणारे पूर्वीपासून होतेच त्यामुळे ब्राह्मण योद्धे ही जात निराळी व मराठा योद्धे ही जात निराळी होऊन मत्सर उत्पन्न झाला पूर्वीच्या काळी कर्म बदलताच वर्ण बदलण्याचीहि व्यवस्था असे

या दिग्दर्शनावरून धर्मप्रश्नाकडे पाहताना ग्रंथकाराने कोणती दृष्टि राखली आहे याची अटकळ करता येईल ती दृष्टि ही की, एकीकडे प्राचीन ग्रंथांत शतकानुशतकाच्या अनुभवाचा विचार साठविला असल्याने त्याचा आस्थापूर्वक अभ्यास करून आपल्या समाजाच्या प्राचीन परंपरेशी परिचय करून घेणे, पण दुसरीकडे त्याचबरोबर ती परंपरा पुढील काळाला सर्वस्वी बंधनकारक होय ह्या आग्रही मताचा त्याग करणे ही होय

## धर्माचे तीन नेत्र

व्यक्ति व समाज या दोहोंना सुस्थिति प्राप्त करून देणे हे धर्माचे रहस्य होय. प्राचीन धर्मशास्त्राचे ग्रंथ जे स्मृति त्यांत धर्माचा व्यक्ति व समाज या दोनहि अंगांनी विचार केलेला असे दान व प्रायश्चित्त यांचेच तेवढे वर्णन करणाऱ्या काही लघुस्मृति सोडल्या तर सर्व प्रमुख स्मृतिग्रंथांत राजशासन ऊर्फ व्यवहार, वर्णजातिशासन ऊर्फ समाज-घटनानियम आणि श्राद्धव्रतादि पारलौकिक धर्मानुशासन हे धर्मपुरुषाचे तीन नेत्र कल्पिले आहेत पण कालान्तराने पृथ्वीवरील समाजाच्या व्यवहाराकडे पाहणाऱ्या नेत्राची दृष्टि मंदावली व पारलौकिक स्वर्गाकडे पाहणारा ऊर्ध्वमुख नेत्र हाच धर्मपुरुषाचा मुख्य नेत्र अशी समजूत बळावली स्मृतीच्या काळात विशेषतः मुसलमानांच्या परकीय अमलाच्या प्रवाहांत व्यवहार अथवा कायदेकानू करणे व बजावणे हे धर्माचे अंग स्वकीयांच्या हातून सुटल्याने व्यवहार आणि धर्म यांचा काही अन्योन्यसंबंध असू शकतो ही जाणीवहि नदीप्रवाहांत पायाखालून सरणाऱ्या वालुकाकणाप्रमाणे हळूहळू नष्ट होत गेली व धर्म या शब्दाचा 'धारणाद्धर्ममिति आहु:' (समाजाची धारणा अथवा सुस्थिति राखणारा तो धर्म)

हा व्यापक अर्थ सकोच पावत जाऊन धर्म म्हणजे व्यक्तिनिष्ठ, पारलौकिक, सुस्थितिप्रेरक पण ऐहिक समाजसुस्थितीविषयी उदासीन आचार असा एकागी अर्थ रूढ झाला प्राचीन ग्रथात राजकारण, समाजकारण व परलोककारण ही धर्माची अन्योन्यसलग्न अशी तीन अगे गणली जात व धर्मशास्त्राचे प्रणेते त्या तीनहि अगाचा आपल्या ग्रथात विचार करीत आता ही तीनहि अगे स्वतन्त्र तरी मानली पाहिजेत वा अन्योन्याश्रित तरी मानली पाहिजेत पण सध्या स्थिति सदिग्ध झाली आहे धर्म शब्दाच्या अर्थाचा सकोच पावत असता राजकारणाचे एक अग साफ बाहेर फेकले गेले पण दुसरे समाजकारणाचे अग हे व्यक्तिनिष्ठ मोक्षधर्माला अर्धवट बिलगून राहिले आहे.

## व्यापक धर्माचा संकोच

म्हणजे असे की, वर्णांतर, जातिभेद, अस्पृश्यता वगैरे ज्या बाबी केवळ समाजकारणाच्या होत त्या पूर्वीच्या धर्मग्रथात वर्णिल्या असत व पूर्वीच्या व्यापक धर्माच्या त्या अगभूत असत, म्हणून सध्याच्या सकुचित अर्थाने पारलौकिक मोक्षधर्माच्याहि अगभूत मानण्यात येत आहेत याचा परिणाम असा की, अस्पृश्याशी व्यवहार करणे किवा निषिद्ध जातीत आपली मुलगी देणे ह्या गोष्टी समाजधर्माच्या विरुद्ध म्हणून त्याज्य समजण्यात न येता पारलौकिक मोक्षधर्माच्या म्हणून गर्हणीय मानल्या जाऊ लागल्या आहेत. आता ‘इष्ट धर्मेण योजयेत्’ या न्यायाने इष्ट असणाऱ्या सर्व गोष्टी मग त्या समाजकारणाच्या, राजकारणाच्या किवा आरोग्यकारणाच्या असोत, सर्वच धर्माच्या चक्राशी निगडित कराव्या म्हणजे धर्माच्या पालनाबरोबर इतर सर्व इष्ट नियमाचें पालन स्वत सिद्धच होईल ही विचारसरणी वावगी नाही पण तिच्या बजावणीचे काही अनपेक्षित परिणाम कसे उद्भवतात हे पाहणे जरूर आहे मुख्य परिणाम असा की, पारलौकिक म्हणजे इद्रियातीत अतएव तर्काने असाध्य व केवळ आप्तवाक्यसाध्य अशा धर्माशी इतर गोष्टीची सागड घातली गेल्याने पारलौकिक धर्मातील सनातनत्व, अचलत्व व सर्वगामित्व हे लौकिक बुद्धिगम्य व परिस्थित्यनुरूप चलनशील अशा रोजच्या व्यवहारातील गोष्टीशी येऊन भिडले व समाजाच्या व्यवहाराला साचलेल्या जलाशयाप्रमाणे कृत्रिम स्थिरत्व प्राप्त होऊन त्यावर अर्थशून्य चालीरीतींचें शेवाळें माजले व जातिवैमनस्याची घाण मारू लागली.

## परक्यांच्या लाथांचें पाप

बरे, पूर्वीच्या धर्मग्रथात लौकिक व पारलौकिक धर्माचरणाचा एक विचार केला जात असे म्हणून आजहि सामाजिक व पारलौकिक धर्म ह अन्योन्यमिश्रित समजावयाची तर पूर्वीच्या त्रयीतील राजकारणालाहि धर्माच्य अमलात योग्य स्थान देऊन त्याचीहि पापपुण्यात्मक कल्पनेशी गाठ घालू द्यावयास नको काय? अस्पृश्याला स्पर्श केला तर जर पाप लागते त राजकारणात परक्याच्या लाथा खाण्यात पाप का मानू नये? जाति बुडवि ल्याने पारलौकिक धर्माच्या दृष्टीने पतित व पापी ठरणारा माणूस हा स्वातंत्र्य बुडविल्याने पापी म्हणून मानला जाणे जरूर नाही काय? जाति बुडवि णाराला वाळीत टाकणे ज्या विचारसरणीने योग्य ठरेल त्याच विचारसरणी राष्ट्र बुडविणाऱ्याला बहिष्कृत करणे शतपटीने योग्य ठरू नये काय? 'इष्ट धर्मेण योजयेत्' हे सूत्र जर सर्वाना लागू करावयाचे तर सामाजिक गुन्ह्या प्रमाणे राजकीय गुन्ह्याचीहि पापपुण्यात्मक कल्पनाशी सागड घालून दें आवश्यक नाही का?

तशी सागड घातली गेली नाही उघड कारण असे की राजधर्म, वारसा फसवेगिरी वगैरे शासनात्मक अथवा व्यवहारप्रकरणातर्गत धर्मनियम कालमानानुसार बदलणे अत्यावश्यक असते व ते बदलत आलेहि हे नियम प्रत्येक राजवटीत बदललेले स्पष्ट दिसत म्हणून त्याना सनातन म्हणण्यात आले नसावे उलट, सामाजिक चालीरीतीतहि फरक पडत असतोच पण त कायद्याने घडून आणलेल्या फरकाइतका शीघ्र व स्पष्ट नसतो आणि सामा न्यत: त्याला अवधीहि फार लागतो यामुळे प्राचीन धर्मग्रथातील तीन प्रक रणापैकी राजशासनात्मक धर्म हा धर्माच्या कक्षेतून निसटला व समाज घटनात्मक धर्म हा धर्माच्या म्हणजे पारलौकिक पापपुण्यात्मक धर्माशि बिलगून बसला. यावरून पापपुण्यात्मक कल्पनाचे लौकिक गोष्टीशी साहचर्य जोडण्यात सुसगति न राहता विचाऱ्याची गुतागुत झाली आहे, हे दिसून येईल.

ही गुतागुत विचरून काढण्याचे दोन मार्ग, एक म्हणजे राजशासनात्मक व आर्थिक नियमानाहि सामाजिक नियमाप्रमाणे पापपुण्याच्या कक्षेत समाविष्ट

करणे, व सर्व लौकिक कायदेकानूना पारलौकिक धर्माची विभूति फासून सर्वांच्या जटा वळणे किंवा व्यवहार, समाजघटनानियमन व पारलौकिक धर्माचरण ही तीनहि अलग राखणे हा होय यापैकी दुसरा मार्गच श्रेयस्कर होय हे सांगणे नकोच.

वर सांगितल्याप्रमाणे धर्माची तीन अंगे स्वतंत्र मानली म्हणजे त्याच्या विशिष्ट प्रांतातील प्रश्न सोडविणे काहीसे सोपे होते पैकी राजशासनप्रधान कायदेकानू कालमानानुसार ठरत असल्याने त्याच्या मार्गांत जुने शास्त्रीय ग्रंथ फारसे आडवे येऊ शकत नाहीत चोराला शिक्षा करावयाची असल्यास पांच अंगुळे लांबीच्या लोखंडी तापलेल्या खिळ्याने करावी किंवा अन्य तऱ्हेनें करावी हे पाहण्याकरिता मनुस्मृतीत दाखला पाहण्याचा कोणी आग्रह धरीत नाही तसेच दुसरा पारलौकिक धर्माचरणाचा म्हणजे यज्ञयागाचा व जपजाप्याचा धर्म पूर्ण व्यक्तिनिष्ठ असल्याने जुन्या शास्त्रीय ग्रंथावर पूर्ण सोपविण्यात येतो व त्याच्या आड कालपरिस्थित्यनुरूप राष्ट्रधर्म होता होईतो येऊ इच्छित नाही तेव्हा उरलासुरला धर्माचा तिसरा घटक जो समाजघटनाधर्म त्याच्या बाबतीत मात्र जुन्या शास्त्रीय ग्रंथात ग्रथित असलेले नियम व बदलणाऱ्या कालपरिस्थितीप्रमाणे इष्ट वाटणारे नवे नियम याच्यांत झगडा सुरू होतो अशा वेळी जुन्या धर्मग्रंथाकडे कोणत्या दृष्टीने पाहावे ह्या प्रश्नाला मोठे महत्त्व प्राप्त होते

## नवी विचारसरणी

जुन्या धर्मग्रंथाच्या प्रामाण्यासंबंधी वाद निघाला की, एका प्रकारची मनोवृत्ति कपाळाला आठ्या घालून काहीसे झिटकारून बोलू लागते की, चालू समाजव्यवस्थेत काय फेरफार इष्ट आहेत याचा विचार कर्तव्य असताना जुन्यापुराण्या युगांतरींच्या स्मृतिग्रंथाची भाषा काढावीच कशाला ? आज आपल्यापुढे सर्व परिस्थिति ढळढळीत उभी आहे. ती समजून घेण्याची अक्कल असलेली माणसे आपणात आहेत. नवीन कायदेकानूचे सुष्टदुष्ट परिणाम भोगण्याची धमक आमच्यात आहे अशा परिस्थितीत जुन्या स्मृतिग्रंथाचे, की ज्याच्या काळी सध्यांच्या युगातील दळणवळणाच्या साधनांचा मागमूसहि नव्हता व समाजशास्त्राचा शास्त्रीय दृष्ट्या विचार करण्यास लागणारे अनेक

भिन्नभिन्न समाजसंस्कृतीचे तुलनात्मक ज्ञानहि उदयास आले नव्हते, त्या स्मृतिग्रंथाच्या परिशीलनाने मेंदूस नसता शीण आणणे हा वेळेचा व ज्ञानाचा अपव्यय नाही का? जुन्या काळच्या ग्रंथात आजच्या समाजस्थितीत मार्गदर्शक होणारी वचने सापडतील या आशेने ती धुंडाळीत बसणे व्यर्थ नव्हे काय? क्वचित् केव्हा तरी चुकून माकून अस्पृश्याची सावली पडली तर सचैल स्नान करून स्मृतिकाराच्या आज्ञेचा मान ठेवणे पूर्वी शक्य होते पण नव्या काळात अंतरिक्षातून स्वैर संचार करणाऱ्या विमानात बसलेल्या अस्पृश्याची सावली टाळावयाची झाली तर पुराणांतरीच्या कालेय राक्षसाप्रमाणे बारामास अष्टौप्रहर एखाद्या समुद्रात किंवा नदीतच बसून राहावे लागेल. तात्पर्य काय की जी परिस्थिति पूर्वी कल्पनेतहि नव्हती ती, सध्याच्या नव्या मनूतील परिस्थितीचा विचार, जुन्या ग्रंथांतरी शोधीत बसणे हा जुन्याचा अवास्तव अभिमान होय.

## पुराणप्रिय विचारसरणी

ही विचारसरणी पाहून पुराणप्रिय व श्रद्धावती वृत्ति हेटाळणीच्या स्वराने उद्गारील की, नवी परिस्थिति नवी परिस्थिति म्हणून जी उद्घोषणा आजकाल सर्वत्र एकू येत आहे ती नवी परिस्थिति म्हणजे आहे तरी काय? नवी परिस्थिति म्हणजे अनाचाराचा फैलाव हाच अर्थ ना! मग तो आमच्या त्रिकालज्ञ ऋषींनी फार पुरातन काळीच हेरून ठेवला आहे कलियुगात अनाचार सर्वत्र माजणार ही गोष्ट नवी नसून ती पूर्वीच्या धर्मशास्त्रकारांना पूर्ण अवगत होती, इतकेच नव्हे तर त्या परिस्थितीत सूज्ञांनी कसे वर्तन ठेवावे याचे दिग्दर्शनहि त्यांनी करून ठेवले आहे, आणि म्हणूनच पूर्वीचे धर्मग्रंथ आजच्या स्थितीतहि पूर्ण प्रमाण आहेत. कालचक्राच्या भ्रमणाबरोबर चालीरीतीत फरक पडत चालला आहे. स्पर्शास्पर्श व जातिनिर्बंधने शिथिल होत चालली आहेत. बाटगे ठरलेले पुनः परत येऊन मिसळत आहेत निषिद्ध धंदे उच्चवर्णीय लोक अहमहमिकेने करू लागले आहेत. हे सर्व अपरिहार्यपणे घडून येत आहे व ते थांबविणे कदाचित् शक्यहि नसेल. पण कालप्रवाहाला थोपवून धरणे शक्य नसले तरी त्यास स्वतःला स्वैर वाहू दिले जावे की कर्तव्याला स्मरून अल्पस्वल्प विरोध करावा? पूर्वीच्या धर्मग्रंथाची वचने जेथे स्पष्ट

असतील तेथे त्याच्यावर विसबून नव्या परिस्थितीला रोखून धरण्याचा प्रयत्न करणे हेच धर्माभिमानी गृहस्थाचे कर्तव्य होय पाश्चात्यात धर्मशास्त्राचे अथवा समाजशास्त्राचे अध्ययन अलिकडे चालू आहे पण त्या नव्या समाजशास्त्रानें हुरळून जाण्याचें काहीच कारण नाही ह्या शास्त्राचा अभ्यास शेसवाशे वर्षांहूनहि अधिक वडील नाही उलट, आपल्या स्मृतिकाराचा अनुभव व ज्ञान हजारो वर्षे परिणत होत आलेले आहे अशा स्थितीत पाश्चात्याच्या नादाने आम्हीहि नाचू लागून जुने धर्मग्रथ निरुपयोगी म्हणून प्रलाप काढावे हें स्वाभिमानविघातक होय.

## तोंड वळेना, सत्य गवसेना

वरील दोनहि मनोवृत्ती ह्या नेहमी विरुद्ध बाजूस तोंड करून उभ्या असल्याने त्याच्या पाठीशी पण त्याच्यामध्ये उभ्या असलेल्या सत्याची व त्याची कधीच दृष्टिभेट होत नाही एक मनोवृत्ति वडिलोपार्जित घराबाहेर एकहि पाऊल टाकणे हे वाकडे पाऊल पडण्याइतके गहर्य समजते, तर दुसरी मोडकळीस येऊन पडू लागलेल्या घरातून बाहेर पडण्याप्रमाणे जुन्या शास्त्रातून बाहेर निसटणे हे सावधगिरीचे लक्षण मानते ह्या दोनहि मनोवृत्तीचा खरा मिलाफ व दिलसफाई झाल्याविना पूर्वीच्या धर्मग्रथाचे खरे परिशीलन व त्यापासून मिळणारे उपयुक्त ज्ञान केव्हाहि पदरात पडणार नाही.

जुने ग्रथ आजकालचे सामाजिक प्रश्न सोडविण्यास सर्वस्वी निरुपयोगी होत, असे समजणाऱ्या विचारसरणीस हे बजावले पाहिजे की, इतर शास्त्रात जुन्या ग्रथाची योग्यता एकपट असली तर समाजशास्त्रात ती कमी तर नाहीच, तर उलट दसपट आहे. कारण असे की, रसायन, पदार्थविज्ञान वगैरे शास्त्रातील जुने ग्रथ नष्ट झाले व काही प्रयोगाचे ज्ञान लुप्त झाले तर त्या प्रयोगाचें प्रयोगशाळेत पुनः पुनरुज्जीवन करता येते. पण समाजशास्त्रातील प्रयोगाचे प्रयोग हे अलोट सपत्ति किवा अमर्याद सत्ता यानाहि असाध्य आहेत. अविभक्त कुटुबपद्धति व विभक्त पद्धति, असगोत्र विवाह व सगोत्र विवाह, जातिनिर्बंध व जाति-स्वातत्र्य, एकपत्नीत्व व बहुपत्नीत्व, समाईक दौलत व खाजगी दौलत, राजसत्ता व प्रजासत्ता वगैरे जे समाजशास्त्रातर्गत प्रश्न आहेत त्याचे प्रयोग केवळ सत्तेच्या जोरावर कोणी करूं पाहील तर ते चक्रवर्तीलाहि

अशक्य होत ते जगाच्या पाठीवर हजारो वर्षे घडत आलेले आहेत व ते तत्कालीन ग्रंथावरूनच समजून घेतले पाहिजेत

दुसरे असें की निव्वळ ग्रथप्रामाण्यावर विसबून बसण्यापेक्षा प्रत्येक गोष्ट तर्क व युक्ति यांनी पारखून घेणे युक्त खरे, पण तर्क झाला तरी ज्या मुद्द्या-पत्त्यावरून अनुमानें बांधावयाची किवा ज्या ऐतिहासिक पुराव्यावरून धोरण आंखावयाचे त्या मुद्द्यापुराव्याशिवाय तो आधळाच होय आणि तर्काला आधारभूत असा जुना ऐतिहासिक पुरावा गोळा करावयाचा तो जुन्या ग्रथा-तूनच हुडकावयाचा असतो अमुक गोष्ट समाजात नवीन जोम उत्पन्न करील किवा अमक्याने त्याला कीड लागेल हे ठरविण्याचे एक साधन म्हणजे तत्स-दृश धोरणाचा पूर्वी झालेला परिणाम ध्यानात घेणे हाच होय एकाच्या हुबे-हूब दुसऱ्याचा तोडावळा आढळणे जितके कठीण त्याहूनहि एका प्रसगासारखा ततोतत दुसरा प्रसग गवसणे दुर्मिळ, पण ततोतत नसला तरी तत्सदृश प्रसगाचे अवलोकन करून अनुमाने बाधणे शक्य असल्यामुळेच जुन्या इति-हासाचे सर्वत्र आस्थेने परिशीलन केले जाते

या दृष्टीने विचार केल्यास "जुन्या स्मृतिग्रथाचे अध्ययन उपयुक्त का आहे हे सहज लक्षात येईल या ग्रथात हजारो वर्षांत समाजात ज्या उलाढाली व स्थित्यतरे झाली, तसेच त्या त्या कालात समाजाला काही विशिष्ट वळण लावण्याकरिता जे कायदेकानू प्रचलित केले गेले त्याचें यथार्थ प्रतिबिंब आपणांस उपलब्ध होतें आणि या प्रतिबिबाच्या निरीक्षणानेच समाज-चक्राचें अतरग उकलणे साध्य होते" म्हणूनच श्रुति-स्मृतीसारख्या प्रौढ ग्रथा-चेच काय पण आफ्रिकेंतल्या झुडपात राहणाऱ्या रानटी लोकांचे किवा नरमास-भक्षक पशुवृत्तीच्या लोकाचेहि विचार समजून घेण्याचा प्रयत्न समाजशास्त्र-जिज्ञासूकडून केला जातो "तात्पर्य, आज समाजापुढे असणाऱ्या प्रश्नाचा विचार करणारांस आपल्या समाजाचा पूर्वीचा इतिहास ज्यात संचित केला आहे त्या स्मृतिग्रथाचें परिशीलन आवश्यक होय

आतां हें परिशीलन कोणत्या भावनेनें करावयाचे यात वर उल्लेखिलेल्या दुसऱ्या म्हणजे निनान्तपुराणवादी मनोवृत्तीला उत्तर मिळणारे आहे परि-शीलनाची एक पद्धतीहि श्रुतिस्मृति-द्रष्टे व कर्ते हे ' कर्तुमकर्तुमन्यथा कर्तुं ' अशा लोकोत्तर सामर्थ्याचे व सर्व काळाला व सर्व विश्वाला व्यापून दशांगुळें

उरणाऱ्या अतर्क्य व अनंत ज्ञानाचे पुतळे होत असें समजून त्याच्या डोळ्याशी डोळा न भिडविता अधोमुख होत्साती याची अमृतवाणी ऐकण्यातच केवळ स्वतःस धन्य समजते दुसऱ्या पद्धतीच्या मतातहि प्राचीन समाजशास्त्रप्रणेत्या विद्वान् व धोरणी ऋषिवर्याविषयी योग्य आदर व पूज्यभाव वसत असतो, पण त्याच्या लोकोत्तर ज्ञानाविषयीच्या अवास्तव कल्पनानी ती गांगरून जात नसल्याने विनीतपणे पण धीटपणे त्याच्याशी ती खुली चर्चा करू शकते.

आणि खुद्द त्या ऋषिवर्यांचीहि अशीच इच्छा नसणार काय? आपले वंशज नेभळे निपजून वाडवडिलानी कमविलेल्या थोरवीवरच त्यानी स्वतःस सदैव विकावे, व कालपरिस्थितीप्रमाणे धोरण बदलण्याची अक्कल त्याच्यात नसावी, अशी कोणत्या सत्पुरुषाची बुद्धि असणार? आपली संस्कृति ही जगातील अत्यंत प्रौढ पुराणसंस्कृति होय ह्या कल्पनेने अभिमान वाटणें साहजिक व वाजवी होय पण तिच्या पुराणत्वाचा गैरफायदा घेऊन लक्ष्यार्थी नव्हे तर वाच्यार्थी तिला सनातन पदवीने भूषविणे व तिच्यातील धर्मनियम हे सनातन अतएव सर्वगामी व अचल ठरवून त्या भूषणानाच बंधनाची कळा आणणे हे धर्माभिमानाचे लक्षण ठरेल काय?

## सुधारक ऋषि

आपल्या प्राचीन ऋषिवर्याची धर्माभिमानाची कल्पना अशी अनुदार मुळीच नव्हती. ज्या ऋषिवर्यांचे समाजशासननियम आज आपण सनातन व त्रिकालाबाधित समजतो त्यानी स्वतः आपल्या ज्ञानाच्या अनंतत्वाबद्दल केव्हाहि ग्वाही दिलेली नाही, किंवा श्रुतीच्या पलीकडे धर्म असू शकत नाहीत अशी कूपमंडूक वृत्तीहि स्वीकारलेली नाही 'विद्वद्भिः सेवितः सद्भिर्नित्यमद्वेषरागिभि', 'हृदयेनाभ्यनुज्ञात' ही मनूची धर्माची व्याख्या सर्वश्रुतच आहे. इतर शास्त्रकाराचीहि वचने त्याच्या व्यापक व उदार दृष्टीस शोभण्यासारखीच आहेत 'यस्त्वार्या प्रशसन्ति स धर्मः। यदर्हन्ते सोऽधर्मः' या आपस्तंबाच्या व्याख्येपेक्षा अधिक व्यापक व्याख्या कोण करूं शकेल? याच धर्मसूत्रकाराच्या ग्रंथातील पहिली तीन सूत्रे महत्त्वाची आहेत. ती अशी—,
'अथातः समयाचारिकान् धर्मान् व्याख्यास्यामः। धर्मज्ञसमयः प्रमाणम्।

वेदाश्च।' या सूत्रातील 'समय' म्हणजे शिष्ट विद्वानाच्या सभेने मान्य केलेला ठराव सूत्रकाराचा भावार्थ असा की, धर्मनियम तयार होतात ते विद्वानाच्या सभेंत मान्यता पावन होतात विद्वानाची मान्यता हे पहिले प्रमाण आणि श्रेष्ठ प्रमाण, व वेद हे दुसरे म्हणजे दुय्यम प्रमाण होय तत्कालपरिस्थित्यनुरूप विद्वानाना योग्य वाटणे हे पहिले लक्षण आणि त्यालाच श्रुतीचाहि आधार सापडला तर 'अधिकस्याधिक फलम्'; पण श्रुतीचा आधार दुय्यम समजला पाहिजे असा आपस्तबाचा रोख दिसतो एरवी प्रत्येक शब्द तोलून लिहिलेल्या सूत्रग्रथात वेदाचा उल्लेख धर्मज्ञाच्या नतर असा क्रम आढळता ना. वृद्ध वेदाना हरि हरि म्हणावयास लावून लोकरुचि व कालमान ह्या तरुणाच्या अगावर जबाबदारी टाकण्याची आवश्यकता याज्ञवल्क्यालाहि पटली होती, हे त्याचे वचन 'अस्वर्ग्य लोकविद्विष्ट धर्ममप्याचरेन्न तु' केव्हाहि बोलून दाखवील स्मृतिकार नारदाची साक्ष तर याहूनहि अधिक स्पष्ट व निःसदिग्ध आहे. तो म्हणतो की, व्यवहार हाच समाजाच्या घरातील कर्ता मालक व त्याच्या तत्रानेच धर्मनियमानी चालले पाहिजे 'व्यवहारो बलवान् धर्मस्तेनावधीयते' ह्या सर्व स्मृतिकाराना जुन्या श्रुतिकाराच्या उज्ज्वल ज्ञानाबद्दल योग्य आदर असे, पण कालमान व व्यवहार बदलला तरी पूर्वनियम जसेच्या तसे अखड राखण्याइतके ते भोळसर नव्हते!

येथे हे सागितले पाहिजे की, वरील अनुमान केवळ इतस्तत पसरलेल्या वचनांवरच अधिष्ठित नाही. कारण फुटकळ वचनावरून एखादा मुद्दा सिद्ध करू लागले तर उलटसुलट वचने दाखवून वादीचा मुद्दा वादीच्याच गळयात बाधणे मुळीच कठीण जाणार नाही. तर स्मृतिकार हे कालमान ओळखीत असत हे त्याच्या कृतीवरून म्हणजेच त्यांनी स्वत बदललेल्या नियमावरूनच स्पष्ट आहे. आणि त्याकरिता फार खोलात शिरावयास नको नुसत्या कलिवर्जाच्या लाबलचक यादीची आठवण दिली तरी हा मुद्दा ध्यानात येण्यास अवकाश लागणार नाही. जसजसा व्यवहार बदलत गेला तसतसे पूर्वी शिष्ट, सुसंस्कृत व नागर म्हणून ठरलेल्या नियमांची हळूहळू निषिद्ध म्हणून गणना होऊन त्यांना कलिवर्जाच्या तुरुंगांत कायमचे डाबून टाकण्यात आले विधवा निपुत्रिका असल्यास दिराच्या करवीं नियोगपद्धतीनें पुत्रप्राप्ति करणे हें एके काळीं शिष्ट व अभिजात म्हणून खुशाल मिरवीत असे पण कालातराने, प्रत्यक्ष

वृर्तन तर राहोच पण त्याच्या नुसत्या नामोच्चारानेहि धर्माच्या अगावर काटा उभा राहू लागला. भातात गोमास शिजवून खाल्ले असता बुद्धि तरतरीत होते असा एका काळचा अनुभव व शिष्ट पाहुण्याच्या स्वागतार्थ गोमास राधणे हा तर शास्त्रपूत सप्रदाय ! पण कालातराने गोमातेच्या मासाचा विचार करणारास स्वत चे मास अर्पण करण्याचा प्रसग येऊन ठेपला यज्ञात नरमेध करणे एके काळी प्रशस्त मानले जात असे, पण कालातराने मानुषवधच नव्हे तर पशुवधहि त्याज्य ठरला हे फरक बदलत्या कालमानाप्रमाणे व बदलत्या लोकरुचीप्रमाणे आवश्यक होते व ते तसे श्रुतीच्या आज्ञेचे फाजील स्तोम न माजविता अमलातहि आणले गेले"

मात्र स्मृतिकार हे समजस लोकनायक असल्याने किवा श्रुतीविषयी लोकात त्या काळी अत्यादर असल्याने श्रुतीचा बोज राखण्याकरिता आपल्याकडे गौणपणा घेऊन नवीन फरकाचा श्रुतीशी मेळ घालीत उदाहरणार्थ, बदलत्या आर्थिक परिस्थितीने व नीतिकल्पनानी नियोगाची चाल सर्वस्वी त्याज्य ठरविल्यानतर तिचा स्पष्ट निषेध करणे प्राप्त होते, पण पूर्वाचार्यांनी तर त्यावर प्रशस्ततेचा शेरा मारलेला या खोड्यातून आपस्तब सूत्रकाराने मोठ्या शिताफीने आपणास सोडवून घेतले आहे तो म्हणतो, आपल्या पूर्वजाचे तेज व वीर्य अचाट होते म्हणून त्याना अनेक गोष्टी खपत, पण आपण पामर त्याचे अनुकरण करू लागलो तर व्यर्थ खोड्यात मात्र येऊ (द्रष्टो धर्मव्यतिक्रम साहस च पूर्वेषाम्। तेषा तेजोविशेषेण प्रत्यवायो न विद्यते। तदन्वीत्य प्रयुजाना सीदत्यवर ।) तसेच श्रुति अनन्त असून आज त्याच्यापैकी पुष्कळशा लुप्त आहेत पण जुन्या स्मृतिकाराच्या वेळी त्या प्रकाशमान असाव्यात ही कल्पना घ्या, किवा भिन्न युगात भिन्न स्मृति प्रमाण मानण्यात याव्या ही कल्पना घ्या, त्या सर्व कल्पना श्रुतीचा बोज राखण्याकरिताच बसविण्यात आल्या प्राचीन ग्रथाचे प्रमाणत्व वरपागी कायम राखण्याच्या ह्या प्रयत्नाचें कौतुक करण्यास हरकत नाही पण हा वरपागी देखावा बाजूस सारला म्हणजे मुद्दा उरतो तो हा की,"बदलत्या कालमानाप्रमाणे समाजनियत्रणनियम बदलणे जरूर आहे असेच स्मृतिकार मानीत व त्याप्रमाणे धर्मग्रंथात नवीन शोध घालीत क्वचित् ठिकाणी तर वेदाच्या विरुद्ध असलेले आचार प्रमाण होत असेहि आडपडदा न ठेवता रोखठोक लिहिण्यास ते कचरत नसत" या-

संबधात वसिष्ठस्मृतीतील खालील वचन नजरेखाली घालण्यासारखें आहे. " विहितो धर्म । तदलाभे शिष्टाचार: प्रमाणम् । प्रागादर्शात्प्रत्यक्काल-कवनात् दक्षिणेन हिमवत उत्तरेण विध्यस्य ये धर्मा ये आचारा ते सर्वत्र प्रत्येतव्या नत्वन्ये प्रतिलोमकल्प धर्मा: " यातील प्रतिलोमक म्हणजे वेदविरुद्ध आचाराविषयी स्मृतिकाराचे सागणे असे की, आर्यावर्तातील वेद-विरुद्ध आचारहि प्रमाण समजावे, इतर ठिकाणचे मात्र तसे समजू नयेत. वेदविरुद्ध आचारहि प्रमाण होत असें येथे नि सदिग्ध रीतीने सागितले आहे. बौद्धायनालाहि दक्षिणेत व उत्तरेत वेदविरुद्ध आचार प्रसृत असलेले माहीत होते. तथापि त्या देशात ते प्रशस्त होत असेच त्याने आपले मत दिले आहे. " पचधा विप्रतिपत्ति पचधा दक्षिणत तथा उत्तरत । तत्र तत्र देशप्रामाण्य-मेव स्यात् । " तात्पर्य, श्रुत्यतर्गत समाजशासननियम हे प्रमाण नित्य अचल व सनातन असे न मानता परिस्थितिनिष्ठ व चल असेच स्मृतिकार मानीत व ते योग्य कारणास्तव बदलण्याचा आपला हक्कहि यथान्याय बजावीत अर्थात् या श्रुतिस्मृति ग्रथाच्या आजच्या अभ्यासकानेहि ते देशकालातीत व सनातन समजून गागरून जाण्याचे कारण नाही

चिकित्सक दृष्टीने श्रुतिस्मृत्यादि धर्मग्रथाचे परिशीलन केले असता असे आढळून येते की, नीतिविषयक व समाजविषयक कल्पनात कधी उन्नति होत गेली तर कधी साचलेल्या पाण्याप्रमाणे त्यातील चैतन्य लोपून गेले नियोग, नृमेध, गोवध वगैरे काही बाबतीत प्राचीन कालापेक्षा पुढील कालात प्रगति दिसते, तर जातीची अनेक शकले होणे व ती एकत्र बाधण्याचे सूत्र धर्म-नियमाच्या फाजील ताणामुळे तुटून जाणे, फुलाचे फळ झाल्यावर फिरून फूल होणे जितके दुर्घट त्याहिपेक्षा धर्मभ्रष्ट फिरून धर्मस्थित होणे दुर्घट समजले जाणे, वैदिक कालातील उत्साह आशा, हुरूप याचा प्रकाशकाल सपून निराशा व निरुत्साह याची कृष्णछाया पसरणे या बाबतीत परागति दिसते. यामुळे अमुक एका काळात समाज सुधारणेच्या अत्युच्च शिखरावर होता असे गृहीत धरणे व त्यावर दृष्टि स्थिर करून मार्ग आक्रमण कर-ण्याचा उपदेश करणे कठीण आहे. अर्थात् पूर्वग्रथाच्या अभ्यासाने समाज-शास्त्रप्रमेयाचे तात्पर्यात्मक ज्ञान सपादणे व त्यावरून स्वकालानुरूप शासन-नियम तयार करणे येवढाच मार्ग चिकित्सक सुधारकाच्या पुढे उभा राहतो.

*

# न. र. फाटक

## सत्य आणि अहिंसा

गाधीजीनी हिदी राजकारणाला अगदी नवे वळण (अज्ञातपूर्व असे वळण) लावले, ही गोष्ट अगदी निर्विवाद आहे त्यानी कॉग्रेस १९२० साली नागपुरास जिकली व तेव्हापासून आजतागायत कॅाग्रेसच्या द्वारे किवा कॉग्रेसच्या विश्वासाचे अद्वितीय पुढारी म्हणून ते हिदी राजकारणाचे प्रश्न सोडवीत आहेत गाधीनी राजकारणाला नवे वळण लावताना कित्येक तत्त्वे स्वीकारली असून त्यातल्या दोन तत्त्वाविषयी पुष्कळ ठिकाणी मतभेद झाल्याचे आपण पाहातो. सत्य व अहिसा हीच ती तत्त्वे होत ही दोन्ही नावे सारखीच वादग्रस्त असून सामाजिक उन्नतीच्या दृष्टीने सारखीच महत्त्वाची आहेत त्यासबधीचा वाद आजकालचा नवा नाही ही तत्त्वे जितकी जुनी तितका त्याच्या आचरणाबद्दलचा वादसुद्धा जुनाच आहे पण त्यामुळे त्याचे महत्त्व कमी होत नाही गाधीनी या तत्त्वाच्या स्वीकाराने हिदी राजकारण चालावे असा आग्रह धरताना जगाच्या इतिहासाचे किती परिशीलन केले हे सागणे शक्य नसले तरी मानवी स्वभावाची त्यानी अत्यत सूक्ष्म परीक्षा केली असली पाहिजे असे विचार करणाराना पटायला हरकत नाही मानवी स्वभावात जर या तत्त्वाची बीजे असतील तर त्याच्या स्वीकाराने गाधीनी काही विलक्षण प्रकार हिदी राजकारणात माडलेला नाही, याचे निराळे विवेचन नको

## महात्माजींचे राजकारण १९१९-४२

गाधीनी कॉग्रेसची सूत्रे आपल्या हाती घेण्यापूर्वी तीन चार वर्षे कित्येक दिव्ये करून दाखविली सत्याग्रहाचे त्यानी प्रयोग केले व १९१९ साली रौलट कायद्याच्या वेळी त्यानी अखिल भारतीय आदोलन उठवून एक नवसामर्थ्य उदयास येत असल्याबद्दल जनतेची व सरकारची खात्री पटविली. या सत्याग्रहामागे कॉग्रेसचा पाठिबा नव्हता. त्यानी केवळ स्वत.च्या जबाब-

दारीवर त्याची प्रचड उठावणी केली उठावणीच्या परिणामी कॉंग्रेसला या सत्याग्रहाशी सबध जोडावा लागला. या सत्याग्रहाने लोकाच्या असतोषाची व गाधीच्या लोकप्रियतेची परीक्षा झाली सत्याचा आग्रह अहिसेने साधण्यात उणीवा दिसून आल्यामुळे गाधीनी सत्याग्रह आवरला, आपली चूक जाहीर केली पण सरकारने याबाबत योजलेल्या उपायातील अन्याय जगासमोर ओढून आणायला त्यानी मागेपुढे पाहिले नाही. जालियनवाला बागेतील लष्करी गोळीबाराचा अत्याचार सरकारतर्फे खुबीदार शब्दाची मखलाशी लढविली गेली तरी झाकला जाण्यासारखा नव्हता गाधीनी कॉंग्रेसमार्फत सदर व इतर आनुषगिक अत्याचाराची चौकशी करविली परतु कॉंग्रेसचा पुढारीपणा या वेळी गाधीकडे नव्हता १९१९ मध्ये अमृतसरला भरलेल्या कॉंग्रेसच्या अधिवेशनात गाधी अग्रेसरत्वाने वागले नाहीत, हे प्रसिद्धच आहे १९२० च्या ऑगस्टमध्ये त्यानी असहकारितेच्या चळवळीचे शिग फुकले. सप्टेबरात कॉंग्रेसचे जादा अधिवेशन भरले तेव्हा त्याचाच विजय झाला १९२० च्या डिसेबरात नेहमीचे अधिवेशन भरल्यावेळी दास-नेहरूसारखी आधी किंकर्तव्यमूढ दिसणारी माणसे पूर्णपणे गाधीच्या पुढाकाराखाली गेली गाधीनी दोन वर्षे असहकाराच्या चळवळीने देश हादरून सोडला व लोकजागृतीकडून पराक्रम घडविण्यासाठी बारडोली तालुक्यात साराबदीच्या प्रयोगाचे ठाण माडले हा प्रयोग अमलात येण्यापूर्वीच चौरीचुरा येथील हत्याकाडामुळे गाधीना ती गुडाळून टाकण्याची आवश्यकता भासली लोकामध्ये निराशा पसरली व सरकारने त्याना राजद्रोहानिमित्त खटला भरून सहा वर्षाची कैद फर्माविली ! त्याच्या गैरहजेरीत कॉंग्रेसच्या अनुयायामध्ये दुफळी होऊन दास–नेहरूच्या पक्षाची सद्दी उचावत असल्याचा अनुभव आला

सहा वर्षे पुरी होण्याच्या आधीच गाधी १९२४ मध्ये अवघ्या दोन वर्षांनी सुटले दास–नेहरूच्या राजकारणाला मैदान खुले सोडून गाधींनी खादीच्या कार्यास स्वत ला वाहून घेतले दास–नेहरूचे राजकारण १९३० पर्यन्त चालले होते. गाधीनी या पाचसहा वर्षांत खादी–चरख्याची सघटना भक्कम बनविली १९३० मध्यें कायदेभगाच्या चळवळीचे तुफान गाधीच्या नेतृत्वानें उठलें. गाधी पुन. तुरुंगात पाठविलें गेले पण आता त्याचें तुरुगातून देखील राजकारणाला गति देण्याइतके सामर्थ्य वाढले होते. १९३२ मध्ये त्यानी

हरिजनवर्ग हिंदु समाजातून फुटून जाऊ नये म्हणून केलेला यशस्वी उपवास त्याच्या सामर्थ्याची साक्ष देणारा आहे १९३३ मध्ये त्यांची सुटका झाली कॉंग्रेसचे राजकारण पुढाऱ्याच्या तुरुगवासामुळे व इतर दडपशाहीमुळे मदावल्यासारखे झाले होते कायदेमडळाचा मोह न आवरणारा वर्ग कॉंग्रेसमध्ये कायमचाच आहे गाधीनीच त्याविषयी याप्रमाणे एकदा अभिप्राय दिला होता. या वर्गाने कायदेमडळात जाण्याची उत्सुकता दाखविण्याचे काम चालू ठेवले होते गाधी त्याच्या उत्सुकतेआड आले नाहीत त्याची वाट कॉंग्रेसच्या मान्यतेने मोकळी झाली इतक्यात राज्यसुधारणाचा नवा कायदा पसार होऊन कायदे-मडळवाल्याना राज्याधिकार घेण्यात पुरुषार्थ असल्याची जाणीव झाली व निवडणुकीनतर थोडा विलब लावून त्यानी आपली जागीव क्रियेत उतरवली गाधी या काळात हरिजनाच्या व खेड्याच्या उद्धाराचे कार्य करू लागले होते १९३९ मध्ये नव्या महायुद्धाचा वणवा पेटताच कॉंग्रेसने राज्याधिकार सोडला, कारागृहवासाचा रस्ता धरला ! १९४२ सालच्या ऑगस्टपासून कालपरवापर्यंत काय घडले त्याचा वृत्तात अगदी ताजा म्हणून सर्वाच्या परिचयाचा आहे १९२० च्या नतर गाधीनी हिंदी जनतेची किती प्रकारे सेवा केली याचा हा ठोकळ आढावा आहे या आढाव्यातून पुष्कळ उलट-सुलट प्रश्न निघणारे आहेत. तूर्त त्याची चर्चा बाजूस ठेवून गाधीच्या तत्त्व-ज्ञानाचे दर्शन घ्यावे हे विषय-सगतीच्या दृष्टीने उचित वाटते

## सत्य, अहिंसा आर्यांचें सनातनतत्त्व

सत्य, अहिसा ही तत्त्वे मानवसमाजाच्या इतिहासात अनादि आहेत एके-कट्याने स्वतःच्या बळावर जगण्याची अवस्था सुटून मनुष्य जेव्हा सघटनेच्या किंवा समाजाच्या अवस्थेत शिरला, तेव्हा त्याला ही अवस्था टिकविण्याला व मजबूत करण्याला सत्य, अहिसा प्रभृति तत्त्वाची कास धरावी लागली, नव्हे या तत्त्वाना आपल्या स्वभावात कायमचे स्थान देणे माणसाला भाग पडले सत्य, अहिसा, अस्तेय, ब्रह्मचर्य इत्यादि तत्त्वावाचून माणसाची 'समाज' या नात्याने ओळखली जाणारी स्थिति टिकली आणि वाढली नसती, हे समजण्याला वस्तुत फारसे कठीण नाही. पण कालातराने हीं तत्त्वे व्यावहारिक नसून आध्यात्मिक व पारमार्थिक असल्याचा भ्रम उद्भवल्याने व तोच बळावल्याने वरील तत्त्वाविषयी चम-

रुकारिक विपरीत ग्रह माणसाच्या स्वभावावर असे चिकटून बसले आहेत, की तो त्याकडे फक्त शाश्वत मूल्याच्या योग्यतेने पाहात असतो अधिक विचार केल्यास 'आध्यात्मिक' आध्यात्मिक' म्हणून ज्यावर शिक्का मारला जातो त्यातले एकहि तत्त्व सामान्य मानवी व्यवहाराच्या बाहेरचे नाही, हे पटण्यास हरकत नाही गीता जास्त परिचित एवढयासाठी की तिच्यातील आध्यात्मिक मानलेल्या सद्गुणाची तपासणी केल्यास त्यातील प्रत्येक सद्गुण मनुष्याच्या व्यवहाराशी सबध असल्याबद्दल शका उरणार नाही 'तुल्य-निदा-स्तुति', 'यदृच्छा-लाभसतुष्ट.', 'मानापमानयोस्तुल्य' यापैकी एकहि सद्गुण असा नाही की ज्याला मनुष्याच्या व्यवहाराबाहेर काही मोल असेल मनुष्याचा व्यवहार शुद्ध होऊन प्रत्येकाला सुखाचा उपभोग घेता यावा असा या सद्-गुणाचा उद्देश स्पष्ट असता ते सद्गुण केवळ व्यक्तीच्या समाजनिरपेक्ष उन्नती-साठीं आहेत, सर्वांसाठीं त्याचा उपदेश केलेला नाही, व उपयोग हि नाही, अशी त्याबद्दल कल्पना आढळते

## सर्वं सत्ये प्रतिष्ठितम्

'सत्य' या तत्त्वाची दशा अशीच झालेली आहे सृष्टीची सगळी कामे ज्या नियमाने चालतात, त्याना 'सत्य' ही सज्ञा दिल्यास चुकीचे ठरणार नाही. सृष्टीचा अढळ नियमितपणा माणसाच्या कारभारात असता तर सत्याची मीमासा करून महति सागण्याचे कारण नव्हते. पण तितका अढळ नियमित-पणा नाही, म्हणून त्याच्या कारभारात सत्याचे अस्तित्वच नाही व असलेच तर ते सक्तीमुळे किंचित् आहे, अशी समजूत करून घेण्याची जरूर नाही. महाभारतात अनेक स्थळी सृष्टीचा क्रम दाखल्यासाठी घेऊनच सत्याची माणसाच्या दृष्टीने थोरवी गाइलेली आहे. उद्या आपण उगवू असा आज मावळताना सूर्य करार करीत नाही. उन्हाळा, पावसाळा, हिवाळा असे ठर-ल्यावेळी बिनचूक अनुभवास येणारे ऋतुमान शपथेच्या, कराराच्या किवा साक्षीदाराच्या आधारावर चाललेले नाही, गहू पेरल्यास गव्हाचे पीक हाती आले पाहिजे याबद्दल माणसाला जो विश्वास वाटतो याचे कारण सृष्टीनिय-माच्या सत्यतेशिवाय दुसरे काय सागता येणार ? महाभारतात हाच मुद्दा लक्षात घेऊन 'सर्वं सत्ये प्रतिष्ठितम्' अशा उपक्रमानिशी वायूची चचलता,

सूर्याचे उगवणे, अग्नीची दाहकता ही सारी सत्येच होत-सत्येन वायुरभ्येति सत्येन तपते रवि । सत्येन चाग्निर्दहति-असे सांगितले आहे. ज्याला धर्म म्हणतात, तेथे सत्य असतेच-सत्यानेच उत्कर्ष होत असतो. 'सर्व सत्येन वर्धते '- असा या प्रकरणाचा उपसंहार केलेला आहे

## सत्यानेंच समाजधारणा होते

सृष्टीतील घटना मनुष्याच्या कारभारात पाहावयास जाणे हा अविचार आहे, व मनुष्याच्या ठिकाणी बुद्धीची शक्ति असून तिच्या कमजास्तपणाने चालणाऱ्या खटाटोपात सत्याची अपेक्षा बाळगणे हे अवस्त्वारोपाप्रमाणे मूर्ख-पणाचे दिसते, असे म्हणणारासाठी महाभारतकाराने एक मार्मिक उदाहरण नमूद केलेले आहे समाजव्यवस्थेचे नियम धाब्यावर बसवून स्वैर वर्तन कर-णारे भयंकर गुन्हेगार लोक सत्याची आराधना करीत असतील असे कोणाच्या स्वप्नीहि यावयाचे नाही पण तेसुद्धा आपसात सत्याने वागतात. ही विचाराने कळणारी गोष्ट महाभारतकारांनी आपल्या विवेचनात दाखल करून सत्याचा प्रभाव निदर्शनास आणला आहे ! त्यांची कामे एकमेकाबद्दलच्या विश्वासाने चालतात, त्यांनी परस्पराशी जे करारमदार केलेले असतात, ते त्यांच्या हातून चोख पाळले जाण्याचा संभव नसेल तर गुन्हेगारीच्या कामात त्यांना यशस्वी पाऊल टाकणे अशक्य होईल. गुन्हेगारांना जर सत्याचा आश्रय करावा लागतो तर इतरांना त्याशिवाय गत्यंतर नाही, हे कळण्याला सोपे आहे समाजाची जी कामे रोजच्या रोज पार पडतात, ती सत्याविषयी न कळत असणाऱ्या आदराचा परिणाम म्हणावा लागतो व्यापारात प्रत्यक्ष रोकडीहून पतीची किंमत जास्त मानली जाते व्यापारातील पत हे सत्याचेंच एक रूप आहे शील, अब्रू, इभ्रत हे सर्व शब्द सत्याचेच पर्याय आहेत समाजाची स्थिरता किंवा संघटना-सर्वांचा व्यवहार गुण्यागोविंदाने चालण्याला सत्याशिवाय दुसरा मार्गच नाही समाजाची कामे सत्याच्या प्रभावामुळे फार मोठ्या प्रमाणामध्ये पार पडतात, परंतु त्याच्या मागे सत्याचे अधिष्ठान असल्याचे मनुष्याला भानच नसते. कारण ही कामें त्याच्या इतक्यापरिचयाची असतात व त्याबद्दल त्याला इतकी खात्री असते, की त्याच्या कार्यकारणभावाचे स्वतंत्र संशोधन करण्याची त्याला गरजच वाटत नाही. अशी ही व्यवस्था अंगवळणी पडली असताहि जेव्हा तिच्यात कोणी

विघ्न उत्पन्न करतो तेव्हा तो समाजाचा गुन्हेगार समजून त्याला शासन दिले जाते समाज सुरक्षित व उत्कर्षोन्मुख राहावा, म्हणून जे नियम अस्तित्वात असतील ते नियम म्हणजे सत्याचा प्रकार असून त्याला बाधा करणारी कृत्ये करून माणसाकडून सत्याची पायमल्ली घडते व तशी पायमल्ली घडू दिल्यास समाजाचा पायाच खिळखिळा केल्यासारखे होईल, व मग समाजात त्राण उरणार नाही, अशा विचाराने गुन्हेगाराना शिक्षा देण्याचे शास्त्र निर्माण झालेले आहे ज्याने त्याने आपापल्या बळावर एकेकटे राहून आयुष्य कठण्याची रानटी आद्यावस्था जाऊन माणसे एकमेकाच्या आधाराने जेव्हा समुदाय करून राहण्यास शिकली तेव्हा त्याच्या व्यवहारात सत्याचा प्रादुर्भाव झाला कोणी कोणाचा घातपात करणार नाही, असा विश्वास एकमेकाबद्दल वाटू लागल्या-शिवाय माणसे निश्चितपणे एकत्र राहणारच नाहीत ह्या विश्वासालाच सत्य हे व्यापक, तात्त्विक दृष्टीने दुसरे नाव प्राप्त झालेले आहे समाजाची एकजूट अशा तऱ्हेच्या सत्याखेरीज सभवत नाही. गाधीना हिंदी समाजात सत्याच्या व्यवहाराचा अभाव दिसला, तो त्याच्या प्रत्ययाला कोणकोणत्या प्रत्ययाने आला असेल याचा पाढा वाचू लागल्यास अतिशय विस्तार होईल हिंदुस्थानातील माणसामाणसाच्या वागणुकीत सत्याची लाज मुळीच उरलेली नाही असे ध्यानात घेऊन गाधीनी येथील जनतेला राष्ट्र या नात्याने अवश्य असलेल्या गुणाची शिकवण देण्याला सुरुवात केली जगातील बलाढ्य देशातून सत्याचा जो आदर व अमल आहे, तो येथे दिसू लागला तर हिंदी जनतेची ऊर्जितावस्था दूर नाही, असा गाधीचा निश्चय झाल्यामुळेच त्यानी सत्याला स्मरून प्रत्येक कार्य करावे असा आपल्या अनुयायाना नियम घालून दिला

## अहिंसेचा बागुलबुवा

सत्याहून जास्त वाद अहिंसेच्या सबंधांत चाललेला दिसतो त्यातल्या त्यात राजकारण व अहिसा यांची सागड घालण्याचा गाधीचा प्रयत्न अतिशय चमत्काराचा वाटतो. राजकारण म्हणजे दोन परस्परविरोधी सामर्थ्यांचा झगडा, या झगड्यात जीव देण्याघेण्याची क्रिया सदैव चालते. जीव देण्याला कोणी हिंसा समजत नाही, परतु दुसऱ्याचा जीव घेण्याच्या कृतीला हिंसा म्हणतात. दोन देशात अनावर बेबनाव माजला कीं, त्याचा निकाल त्या

दोन्ही देशातील लोक एकमेकाच्या सहारास प्रवृत्त होऊन लावून घेतात. असल्या कथानकांनी जगाचा इतिहास भरला असता, राजकारणात हिंसा नसावी, असे प्रतिपादन करणाराला वेड्यात ढकलण्याला कोणी सिद्ध झाला तर ते सकृद्दर्शनी सरळच वाटते. लहानपणापासून जगाच्या पाठीवर सर्वत्र 'अरे तर कारे,' 'ठोशास ठोसा,' 'जशास तसे,' अशा अर्थाच्या म्हणीच्या वातावरणात माणसे वाढत असल्यामुळे 'हिंसा' वृत्ति हा माणसाच्या स्वभावाचा अपरिहार्य घटक आहे, अशी कल्पना स्वीकारणे भाग पडते, व या कल्पनेच्या आधारावरच हिंसेची तरफदारी केली जाते परंतु बारकाईने या विषयाच्या मुळापर्यंत जाऊन पाहिल्यास हिंसा हा मनुष्याचा स्वभाव नसून 'अहिंसा' वृत्ति हीच त्याच्या संबंधात स्वाभाविक असल्याचे दिसून येईल. हिंसावृत्तीला प्राधान्य असेल तर मनुष्यांना समुदायाने सहकारपूर्वक एकत्र शतकानुशतके नांदणेच अशक्य होऊन जाईल सहकार, सहानुभूति, सौहृद्य, संरक्षण इत्यादि तत्त्वाच्या पायावरच जुटीने एकत्र बसणाऱ्या मानवसमुदायाला समाज ही संज्ञा देण्यात आलेली आहे हिंसावृत्तीच्या शेजारी वरीलपैकी कोणतेच तत्त्व टिकणारे नाही व माणसाला सामाजिकता लाभणारे नाही हिंसा आणि संघटना याचे साहचर्य निसर्गात नसल्यामुळे मनुष्याला समाजासाठी अर्थात् संघटनेप्रीत्यर्थ अहिंसेला शरण जावे लागेल दोन माणसानी एकोप्याने राहावयाचे ठरविले, की त्याना आपल्या स्वभावातील पुष्कळशा खाचाखोचा बुजविण्याशिवाय गत्यंतरच नाही त्या खाचाखोचा साफ करताना अहिंसेचा प्रभाव कसा माणसाच्या मनाचा नकळत कबजा घेतो, याची कल्पना येण्यासाठी थोडा विस्तार करणे जरूर आहे

## हिंसेची भावना आणि कृति

'जशास तसे,' 'ये यथा मां प्रपद्यन्ते तांस्तथैव भजाम्यहम्,' 'ठोशास ठोसा' या म्हणी-सुभाषिताच्या साहाय्याने हिंसेच्या स्वाभाविकतेची तरफदारी करण्यात येत असते. परंतु अनुभव निराळाच दिसतो. रस्त्यात दोन माणसे बाचाबाचीवरून मारामारीवर आल्यास, आजूबाजूला पुष्कळ माणसे तमासगीर वृत्तीने जमणारी असली तरी, काही माणसे मध्ये पडून मारामारी सोडविण्याचा यत्न करतात व त्याच्या प्रयत्नाला तमासगिराकडून तर अडथळा

होत नाहीच, पण खुद्द मारामारी करणारेदेखील त्या प्रयत्नाचा आपल्यावर अनुकूल परिणाम घडू देतात. हिंसा स्वाभाविक असती तर तटा तोडण्याच्या उद्योगाला विरोध झाला असता तो ज्या अर्थी होत नाही त्या अर्थी हिंसेपेक्षा मानवी स्वभावात अहिंसेचा पगडा जास्त असल्याचे उघडच सिद्ध होते 'ठोशाला ठोसा' चा प्रयोग चालला असता तो स्वाभाविक म्हणून त्याला उत्तेजन देण्याचा प्रकार कुठेच आढळत नाही, उलट हा प्रयोग थांबविणारालाच उत्तेजन मिळते, याचे रहस्य मनुष्याच्या समाजव्यवस्थेत आहे सामाजिक जीवनाला हिंसा बाधते हे लक्षात घेऊन तिचे दमन समाजव्यवस्थेने केलेले आहे व ते जगात सर्वत्र केलेले आहे हिंसा हा मनुष्याचा स्वभाव असता तर तिला कायद्याने प्रतिबंध करण्याचे कारण नव्हते परंतु कायद्याच्या व्यवहारात हिंसा व अहिंसा याचे तात्पर्य नीट गळी उतरविणारी उदाहरणे आढळतात ज्याला 'खुनी' म्हणतात तो हिंसा करतो व न्यायाधीश या नात्याने या 'खुनी' इसमाला जो फासावर चढविण्याची शिक्षा सुनावतो व शेवटी जो त्याच्या गळ्याला फास बांधतो तो, हे सुद्धा वरवर पाहिल्यास हिंसकच ठरतात परंतु न्यायाधिशाला कोणी खुनी म्हणत नाही हा भेद कशाने घडतो ? ज्याला खुनी म्हणतात तो आपल्या स्वार्थासाठी दुसऱ्याचा जीव घेतो व या खुनी इसमाला जो शिक्षा फर्मावितो किंवा जो ती शिक्षा अमलात आणतो, त्याला स्वार्थ नसतो खुनी मनुष्य समाजाचा गुन्हेगार ठरतो व त्याला प्रायश्चित्त देणारा समाजाचा एक प्रकारे हितचिंतक गणला जातो म्हणजे हिंसा ही भावनेत असते, प्रत्यक्ष कृतीत नसते, असा विवेक म गांधीनी प्रतिपादिलेल्या हिंसेच्या निषेधात दृष्टीस पडतो. गांधीजीचा कटाक्ष हिंसेच्या कृतीपेक्षा ती घडविणाऱ्या चित्ताच्या भ्रष्टतेवर जास्त आहे तथापि हिंसेच्या निषेधाबरोबर ते भेकडपणाचाहि निषेध करतात, हे विसरणें योग्य नाही, असे त्यांनी वेळोवेळी जनतेला बजावलेलें आहे हिंसा आणि भीति याचा परस्परसंबंध प्रसिद्धच आहे. पुष्कळदा हिंसा भीतीमुळे होत असते. एखाद्याला तो निःशस्त्र आणि बेसावध असताना मारून कोणी पळ काढल्यास त्या मारणाराला समाजाकडून शूरपणाची शाबासकी मिळत नाहीं. समाज त्याच्या कृत्यावर भित्रेपणाचा शिक्का ठोकूनच विचार करतो. विचार करणारांना ही उदाहरणें पुरेशीं आहेत

## युद्ध आणि हिंसा

हिंसा हा माणसाचा स्वभाव नाही हे सिद्ध होण्यासाठीं 'युद्ध' या नावानें जगात झालेल्या व चाललेल्या सहारकर्माची तपासणी बोधप्रद असल्याचें दिसून येईल हजारो वर्षापासून मानवी समाज युद्धे खेळत आहे परतु त्याला युद्ध नको असेंच वाटते तरीसुद्धा युद्धे होतातच आणि यामुळे युद्धात निष्कारण प्राणनाश टाळण्याचा प्रयत्न होत असतो यासाठी युरोपातील राष्ट्रानीं वारवार आपापल्या प्रतिनिधीमार्फत करारमदार केल्याचे स्मरण येथे पुष्कळाना होईल 'हेग कन्वेन्शन' हा शब्द या बाबतीत नेहमी ऐकू येतो शरण येणाराला मारू नये, नि शस्त्र किवा जखमी असतील त्याच्यावर हत्यार चालवू नये, स्त्री, वृद्ध, बाल याना प्राणदान करावे, इत्यादि नियम करण्याचा हेतु उघड आहे शत्रूच्या जखमी कैद्याना औषधोपचार करण्याची प्रथा काय सुचविते ? शत्रूचे जहाज फोडल्यावर शस्त्रे टाकून जिवाखातर समुद्रात धडपडणाऱ्या लढाऊ खलाशाना वाचविण्याचे काम हे हिंसेचे माणसाला स्वाभाविक प्रेम नाही व प्रत्यक्ष सहाराच्या धडाक्यातहि शक्य तेथे तो हिंसा टाळतो, असे निदर्शनास आणून देणारे नाही काय ? शत्रूची माणसें मरत असतील तर मरू देत, त्याना वाचविणे आपले कर्तव्य नाही, अशी भावना बाळगण्याऐवजी शत्रूची हिंसकता नष्ट झालेली दिसताच त्याला आश्रय द्यावा, त्याचा जीव घेऊ नये, अशी निराळी भावना मनात वागविणे हें हिंसेच्या अप्रीतीचे लक्षण आहे, आणि हे लक्षण ज्याअर्थीं मनुष्य अभिमानानें स्वीकारतो त्याअर्थीं स्वाभाविक काय, हिंसा की अहिंसा—या प्रश्नाचा निर्णय आपोआपच लागतो

## सामुदायिक झुंज आणि मानवसमाज

मानवसमाजाच्या विकासाचा इतिहास पाहणाराना असें आढळून चुकलें आहे, की एकदा मनुष्याला समुदायाची झुंज म्हणजे लढाई ही गोष्ट मुळींच ठाऊक नव्हती. अने बन्नी काही आगळीक केल्यास बने त्याच्याशी व्यक्तिशः झगडावे आणि आपल्या आगळिकीचा निकाल लावून घ्यावा. साधारणपणें मनुष्येतर प्राण्यांत युद्ध ही संस्था आढळत नाहीं. शिकारीच्या मागें लाडगें कळपानें लागतात; पण शिकार म्हणजे युद्ध नव्हे. एका टोळीतील लांडग्यांनी

दुसऱ्या टापूतील लाडग्यावर जमावाने हल्ला केल्याचे उदाहरण सापडणार नाहीं (मुगी हा एक अपवाद येथे दाखविला जातो) समाजाला स्थिरता आल्यावर बहुत काळाने शिपाईगिरीचा धदा उदयास आला असला पाहिजे. असा मानवशास्त्रज्ञाचा एक तर्क आहे मगच समाजात जमावाने प्रतिपक्षावर चालून जाणाऱ्या लोकाचा वर्ग निर्माण झाला जरुरीच्या वेळी एकत्र जमून प्रतिपक्षाशी लढावे आणि जरूर सपल्यावर परत आपल्या घरी जावे, या स्थितीतून खड्या फौजा उभ्या करण्याचा प्रकार निघाला, जास्तजास्त सहार साधणारी शस्त्रे तयार होऊ लागली. तथापि युद्ध किवा सामुदायिक हिसा हे मानवाला भूषण आहे, असे आजवर कोणी मानले नाही. युद्धामुळे लाभापेक्षा हानीच जास्त सोसण्याची पाळी ओढवते, इकडे लक्ष देऊन युद्धे थाबतील कशी या प्रश्नाचा देशोदेशीचे कर्ते पुरुष अगदी मनापासून नाना तऱ्हेने अखड विचार करीत आहेत युद्ध थाबण्याचा सुदिन जेव्हा उगवावयाचा असेल तेव्हा उगवो, तोवर निदान जरुरीहून जास्त तरी प्राणनाश होऊ देऊ नये अशा उद्देशाने लढणारी राष्ट्रेहि शक्य तोवर वागण्याचा यत्न करतात साराश, हिसा हा मनुष्याचा स्वभाव नाही, त्याला शातताच प्रिय असते पण स्वार्थाच्या मोहाने तो हिसेला प्रवृत्त होतो हिसा सोडली यासाठी स्वार्थ सुटतोच असे नाही म्हणून, हिसेवाचून स्वार्थ साधण्याला उपयोगी पडणारी मनोरचना अस्तित्वात यावी आणि दृढ व्हावी म्हणून म गाधी अहिसेबरोबर इतर कितीतरी आध्यात्मिक गुणाची शिकवण देत होते मनुष्याच्या मूळच्या चागुलपणावर त्याचा निस्सीम विश्वास होता. त्या चागुलपणावर शेकडो वर्षे साचत असलेला मळ झाडावा अशी त्याची आकाक्षा होती.

## क्षमा, हिंसा आणि बलशालित्व

हत्याराची झुज अहिसेच्या सूत्रात बसणारी नाही. शत्रूला जिकण्यासाठीं अहिसा हत्याराची कास धरीत नाही. अहिसेच्या शास्त्राप्रमाणे अहिसा हेच शत्रूला जिकण्याचे शस्त्र ठरते. विजय सपादण्यास लागणारी बलाढ्यता ज्याच्या ठिकाणी असेल तोच अहिसा आचरू शकतो, असे अहिसेचे आणखी एक अग आहे. अहिसा दुर्बळाकरिता नाही. शत्रूचा तडाखा बसल्यावर आपल्या उलट तडाख्यानें शत्रूला लोळविण्याला जो समर्थ असेल त्यानें आपला हात

आवरल्यास त्याच्या या कृत्याला क्षमा म्हणता येईल. शत्रूला उलट मार देण्याची शक्ति नसलेल्याने 'जा, मी तुला क्षमा करतो' असे म्हटल्यास हा उद्गार साहजिकच हास्यास्पद गणला जाईल जो न्याय क्षमादि गुणाचा तोच अहिसेचा अहिसेत आत्मक्लेशाला प्रतिबध नाही दुसऱ्याचा मार सहन करावयाचा हे दुरून दुबळेपणाचे लक्षण वाटले तरी या मार सहन करण्याच्या क्रियेने फार लोकजागृति सिद्धीस जाते, हे विसरणे योग्य नव्हे आपला सत्पक्ष आहे, या खात्रीने जो पुरुष अन्यायाचे क्लेश सहन करतो, तो आपल्या क्लेशाच्या द्वारे त्या अन्यायाचा निटकारा उत्पन्न करतो, याची साक्ष अनेक साप्रदायाच्या इतिहासातून भरपूर दिसते म. गाधीनी अहिसेचे निशाण हिदी राजकारणात उभारल्यावर या चमत्काराचा विचार देशोदेशी होऊ लागला व गेल्या २५ वर्षात याबद्दल कितीतरी पुस्तके इग्रजीमध्ये प्रसिद्ध झालेली आहेत.

# पां. स. साने

## आपल्या पूर्वजांचा परिचय करून देणारा चार्लस डार्विन

## - १ -

पास्कल एकदा म्हणाला की, क्लिओपात्रा हिच्या नाकाच्या आकारामुळें साऱ्या जगाचे स्वरूप बदलून गेले. त्यानतर जवळ जवळ दोन हजार वर्षांनी इतिहासाचे सारे स्वरूप एका केसावर आधारलेले होते, दुसऱ्या एकाच्या नाकावर--नाकाच्या आकारावर--इतिहास लोबकळत होता तो १८३१ मधील मदीचा काळ होता बावीस वर्षाचा धर्माभ्यासक चार्लस डार्विन बादशहाच्या गलबतातून अवैतनिक निसर्गाभ्यासक म्हणून जाणार होता, पण गलबताचा कप्तान फिट्झ्रॉय त्याला घेईना त्याचे नाक पाहून शास्त्रज्ञ होण्याची पात्रता अगर त्यासाठी अवश्य तो उत्साह त्याच्या (डार्विनच्या) ठिकाणी असेल असे कप्तानाला वाटेना

डार्विन या 'बीगल' नामक जहाजातून न जाता, तर तो धर्मोपदेशक झाला असता मानवाच्या उत्क्रातीवरील त्याच्या युगप्रवर्तक सशोधनाला जग मुकले असते व या शोधामुळे इतिहास समृद्ध झाला तसा झाला नसता डार्विन वस्तुत धर्मोपाध्यायच व्हावयाचा, पण थोडक्यात चुकले एकोणिसाव्या शतकाच्या आरभी मस्तिष्कशास्त्राचा फार बोलबाला होता, एका मस्तिष्कशास्त्रज्ञाने डार्विनचे डोके तपासून सागितले की, तो धर्माचा मोठा आधारस्तभ होईल. कारण, त्याला त्याच्या डोक्यातला धर्मशास्त्रदर्शक भाग चागलाच वर आलेला दिसला. दहा सामान्य धर्मोपाध्यायाच्या डोक्यातल्या भागाइतका भाग त्याच्या एकट्याच्या डोक्यात त्या मस्तिष्कशास्त्र्याला आढळला. डार्विनचे नाक तसेंच त्याचे डोकें त्याला सरळ इग्लंडमधील चर्चच्या सिहासनावर नेऊन बसविणार असे दिसत असता, मानवजातीच्या सुदैवाने कप्तानाचे डार्विनच्या नाकाबद्दलचें मत बदलले व डार्विनला 'बीगल' गलबतावर जागा मिळाली त्यानें बायबल मिटलें, त्यांतील सृष्टिनिर्मितीच्या

कल्पित कथा सोडून दिल्या व साता समुद्रात फिरून पशुपक्षात, फुलाफळात, वृक्षवनस्पतीत जगाचा इतिहास पाहण्यास प्रारभ केला. जगाच्या इतिहासावरील प्रवचने दगडाधोंड्यातून, नद्यातून, वाळवटातून व पर्वतातून ऐकत तो सर्वत्र हिडला किती मनोरजक व सत्यमय ही जगाची कथा ! परत आल्यावर पूर्वी धर्मोपदेशक होऊ इच्छित असलेलाच डार्विन ज्या आधारावर चर्चची उभारणी झाली होती त्या आधाराच्याच सत्यतेविषयी शका घेऊ लागला ! त्याने आव्हान दिले अदृश्य स्वर्गाचा अभ्यास व परलोकाचा विचार सोडून देऊन तो प्रत्यक्ष पृथ्वीचा अभ्यास करू लागला जग एका धर्मोपदेशकाला मुकले खरे, पण त्याला एक अत्यत मोठा शास्त्रज्ञ लाभला

— २ —

डार्विन व एब्राहाम लिकन एकाच दिवशी – १२ फेब्रुवारी १८०९ रोजी जन्मल्यामुळे प्रोफेसर लल म्हणे की, लिकनने मानवाचे देह गुलामगिरीतून मुक्त केले त्याप्रमाणे डार्विनने मानवी मन अज्ञानाच्या बधनापासून मुक्त केले १८०९ साल महापुरुषाच्या जन्मानी भरलेले आहे या वर्षी निसर्गाने मानवजातीच्या माडीवर जणू महापुरुषाचे ताटच वाढून ठेविले. डार्विन, लिकन, गॉड्स्ट्, मेडेलसन, चॉपिन, पो, टेनिसन, ऑलिव्हर वेडेल होल्म्स, एलिझाबेथ बॅरेट ब्राउनिग या सर्वाचा जन्म याच वर्षी झाला आणखीहि कित्येक याच साली जन्मले असतील यापैकी प्रत्येकाने मानवजातीला शाश्वत सुदरतेची व उदात्ततेची जोड करून दिली आहे, त्यात भरपूर भर घातली आहे. डार्विनने घातलेली भरहि काही कमी नव्हती.

डार्विनची मातृकुल व पितृकुल दोन्ही चागली होती. त्याच्या वडिलाचे वडील इरॅस्मस डार्विन हे प्रसिद्ध निसर्गशास्त्री होते. त्यानी 'वनस्पतीच्या प्रेमलीला' हे काव्य तसेच 'लॉज् ऑफ् ऑरगॅनिक् लाइफ्' (सेद्रिय जीवनाचे नियम) हे पुस्तक लिहिले. त्याचे आईकडचे पणजोबा चिनी मातीच्या भाड्याचे मोठे कारखानदार होते, त्याचे नाव जोशिया वेजवुड. शास्त्रे व कला ह्यात खूप रस घेणारे वातावरण डार्विनच्या घरात असणें साहजिकच आहे. लहानपणी डार्विन सौम्यवृत्तीचा व चिंतनशील होता. त्याला लहान लहान खडे,

दगड, शिपले, नाणी, फुले, कृमि, जीवजतू, पक्ष्याची अडी, कीटक वगैरे जमविण्याचा फार नाद होता तो जिवत कीटक पकडीत नसे, मेलेले आढळले तरच उचली. फुलपाखरासहि तो मारीत नसे पण पक्षी मात्र आपल्या छोटया बदुकीने तो खुशाल मारी ! दुरून जीव घेण्यात त्याच्या बालमनाला जणू हरकत वाटत नसावी. पुष्कळ वर्षे त्याला शिकारीचा नाद होता, पण एके दिवशी एका जखमी पक्ष्याच्या वेदना पाहून त्याच्या मनावर खूप परिणाम झाला व केवळ करमणुकीखातर पुन प्राण्याची हिसा करावयाची नाही असा निश्चय त्याने केला त्याची आई तो आठ वर्षाचा असता वारली त्याचा बाप रॉबर्ट वेअरिग डार्विन हा भीमकाय पुरुष होता त्याचे वजन साडेतीनशे पौण्ड होते तो अत्यत आनदी व कार्यक्षम होता, पण त्याला पुत्राचा स्वभाव मात्र नीट समजला नाही तो निरुपयोगी, उडाणटप्पू आहे असे त्याचे मत होते. जगातला सारा केरकचरा–फुले, पाखरे, दगडधोडे–घरात आणून भरणारा हा पोरगा पुढे काय करणार, असे त्याला वाटे मुलाच्या हातून काही कर्तबगारी होईल असे बापास वाटेना त्याच्या डोक्यात थोडेफार जुने ज्ञान कोंबण्यासाठी बापाने त्याला ग्रीक व लॅटिन शिकविणाऱ्या एका शाळेत घातले, पण मुलाने शिक्षणाकडे लक्ष न देता बापाच्या बागेतच एक गुप्त प्रयोगशाळा सुरू करून रसायनशास्त्राचे व पदार्थविज्ञानाचे प्रयोग चालविले त्यामुळे त्याला सारेजण वेडपट म्हणू लागले मुले त्याला 'गॅस' म्हणत हेडमास्तरानी त्याला 'निष्काळजी माणूस' ही पदवी दिली मुलाच्या या प्रयोगामुळे व उदीर पकडण्याच्या खेळामुळे विटून व घाबरून बापाने त्याला क्लासिकल शाळेतून काढून घेऊन एडिबरो येथे वैद्यकाचा अभ्यास करण्यास पाठविले

पित्याच्या धद्याचे शिक्षण घेण्यात डार्विन थोडा वेळ रमला, पण ॲनॉटमीची व्याख्याने त्याला कटाळवाणी वाटू लागली शस्त्रक्रियेचे प्रयोगहि त्याला बघवेनात एका मुलावर करण्यात येत असलेली शस्त्रक्रिया पाहून डार्विन खोलीतून पळून गेला ! त्या वेळी गुगी आणणारा क्लोरोफॉर्म नसल्यामुळे तो मुलगा फोडीत असलेल्या किकाळया पुढे कित्येक वर्षे तो विसरू शकला नाही गटेप्रमाणेच तो वर्गात फारसे शिकला नाही तो शाळेबाहेरच बरेचसे शिकला. तो दारु पिई, जुगार खेळे, प्रेम करी. हे सर्व करीत असतां तो आपल्या अजबखान्यात अधिकाधिक वस्तूची भर घाली 'मुलगा डॉक्टर

होणें शक्य नाही' असे वाटल्यामुळे बापाने त्याला धर्मोपदेशक करावयाचें ठरवून केंब्रिजच्या ख्रिश्चन कॉलेजात घातले. या वेळी तो अठरा वर्षांचा होता. येथे तो तीन वर्षे होता "ही तीन वर्षे फुकट गेली, वाईट वाटते नुसतीं फुकट जाती तर बरे, पण प्रार्थना, दारु पिणें, गाणे, पत्ते खेळणे या आणखी गोष्टी त्यात होत्या"

## -३-

'बीगल' गलबतावरच्या प्रवासाने डार्विनच्या जीवनाला तर नवीन दिशा लावलीच, पण साऱ्या मानवी विचाराचीहि दिशा बदलली ही युगप्रवर्तक सफर पाच वर्षे चालली होती गलबतातून पृथ्वीप्रदक्षिणा करून डार्विननें जीवनाचे कोडे उलगडण्यासाठी निसर्गाच्या अनेक वस्तू जमा केल्या, सृष्टीत सर्वत्र विखरलेले नाना नमुने त्याने पाहिले, गोळा केले व त्याचे वर्गीकरण केले त्याची दृष्टि शास्त्रज्ञाची होती त्याचे मन व त्याची बुद्धि ही कवीचीं होती त्याने जमविलेले प्राण्यांचे हजारो नमुने एकत्र जोडून त्यातून सुसगत अशी प्राण्याच्या उत्पत्तीची मीमासा करून उपपत्ति लावली व त्याच्या विविध-तेचें विवेचन केले आपले सशोधन आपणास कोठे घेऊन जात आहे याची तो गलबतावर होता तेव्हा त्याला नीटशी कल्पना आली नव्हती प्रत्येक खऱ्या निरीक्षकाप्रमाणे आधीच मनात एखादी मीमासा निश्चित करून तो निघाला नाही. प्रत्यक्ष वस्तुस्थिति पाहून तो सिद्धान्ताकडे जाई वीस वर्षे त्याचे सशो-धन अखड व परिश्रमपूर्वक चालू होते त्याने अपरपार माहिती मिळविली व तिची निःपक्षपातीपणे छाननी केल्यावर त्याला उत्क्रान्तीची महत्त्वाची उप-पत्ति आढळून आली

हे सारे जगत म्हणजे डार्विनपुढे एक प्रश्नचिन्ह होते, एक गूढ व बिकट अशी समस्या होती तो जणू गणितातलाच एक प्रश्न होता, भूमितीतील एक सिद्धान्त होता तो सोडवावयास पाहिजे होता त्यात पुष्कळच अज्ञात राशी होत्या. जग हे कौतुक करण्यासारखी कलाकृति नसून ते एक गणित आहे, एक कोडे आहे, असे डार्विनला वाटे. वाङ्मयाची त्याची आवड कधीच नष्ट झाली होती, पण त्याचे विज्ञानच त्याला वाङ्मयाप्रमाणे, कलेप्रमाणे, सगीता-

प्रमाणें झाले होतें. मानवाविषयीचे त्याचे प्रेम कधीहि नष्ट झाले नाही. विज्ञानाखालोखाल त्याला न्यायाविषयी उत्कट आस्था वाटे. एकदा त्याचें ' बीगल ' गलबत ब्राझिल येथे थाबले. काही निग्रो गुलाम पळत होते. त्यामध्ये एक स्त्रीहि होती पाठलाग करणाऱ्याचे हाती लागू नये म्हणून, त्या म्हाताऱ्या निग्रो स्त्रीने कड्यावरून उडी घेतली तिचे तुकडे तुकडे झाले ! डार्विन लिहितो, " एखाद्या पोक्त व पावन रोमन स्त्रीने जर असे केले असते तर ' केवढे हे स्वातत्र्यप्रेम ! ' असे म्हटले गेले असते, पण तेच निग्रो स्त्रीने केले म्हणून त्याचे ' पाशवी हट्टीपणा ' असे विकृत वर्णन करण्यात आले ! " गुलामगिरीवर अन्यत्र टीका करताना तो लिहितो (आणि त्याने अमेरिकेतील सिव्हिल वॉर्च्या आधी वीस वर्षे हे लिहिले होते हे लक्षात घेतले पाहिजे) " गुलामाच्या धन्याकडे करुणेने व आस्थेने पण गुलामाकडे मात्र निष्ठुरतेने पाहणारे लोक स्वतः गुलामाच्या स्थितीत असल्याची कल्पना करून पाहतील तर गुलामाची स्थिति किती निराशाजनक असते हे त्याना कळून येईल आशेचा किरण नाही, उत्साह नाही, आनद नाही, जीवनात कधी काही फरक पडण्याची वा स्थिति सुधारण्याची तिळमात्र शक्यता नाही ! किती केविलवाणे जीवन ! आपली मुलेबाळे व पत्नी आपणापासून केव्हा वियुक्त केली जातील, ओढून नेली जातील याचा नेम नाही, क्षणोक्षणी ताटातूट होण्याची चिंता सतावीत आहे अशी परिस्थिति डोळ्यासमोर आणा ही 'माझी पत्नी, ' ' ही माझी मुलेबाळे ! ' असे म्हणण्याचा निसर्गानेहि न नाकारलेला गुलामाचा हक्क हिरावून घेऊन त्याची लाडकी मुलेबाळे, त्याची प्रियतम पत्नी, याची गुराढोराप्रमाणे अधिकात अधिक किमत देणाराना विक्री करण्यात येते ! आणि तीहि कोणाकडून ? तर शेजाऱ्यावरहि आपल्याइतकेंच प्रेम करण्याचा आव आणणाऱ्याकडून ! ईश्वरावर श्रद्धा ठेवणारे, त्याच्या इच्छेप्रमाणे पृथ्वीवर सर्वांनी वागावे असे उपदेशिणारेच या प्रकारचे पुरस्कर्ते असावे, त्यानीं त्याचें समर्थन करावे व ' यात काय आहे ! ' असे म्हणून उडवाउडवी करावी हें केवढें आश्चर्य ! "

' बीगल ' मधून सफर करीत असता मानवप्राण्याची उत्पत्ति कसकशी होत गेली, हे शोधून काढण्यासाठी ज्याप्रमाणे त्यानें बारकाईने निरीक्षण

चालविले होते, त्याप्रमाणेच मानवाच्या दुःखाकडेहि त्याची बारीक नजर होती. त्याकडे तो कानाडोळा करीत नव्हता, करुणेने पाहत होता.

सफरीहून परत आल्यावर त्याने आपली भाची एम्मा वेजवुड हिजशी विवाह केला. त्याला पुढे दहा मुले झाली या मुलांचे खरे पूर्वज कोण याचाहि शोध तो करीतच राहिला त्याने खेड्यात एक घर खरेदी केले, त्याच्याभोवती विस्तृत बगीचा होता सुदैवाने त्याला पोटासाठी काम करण्याची आवश्यकता नव्हती त्याच्या वडिलानी भरपूर मिळवून ठेविले होते आपली मुले काहीहि कष्ट न करता नीट जगू शकतील, आळसात राहू शकतील अगर आपल्या उज्ज्वल प्रतिभेची व अपूर्व बुद्धिमत्तेची करामत दाखवू शकतील अशी सोय त्यानी करून ठेविली होती चार्लस् डार्विन आपल्या प्रतिभेच्या पूजनात रमला.

लग्न करण्याच्या किंचित् आधी त्याची प्रकृति बरीच खालावली होती, ती कधीच सुधारली नाही तो जवळ जवळ चाळीस वर्षे आजाऱ्यासारखाच होता, तरीहि त्याने एकट्याने दहा माणसाइतके काम केले ! प्रथम त्याने 'बीगल' वरून केलेल्या प्रवासाचे इतिवृत्त प्रसिद्ध केले हे पुस्तक शास्त्रीय असूनहि एखाद्या मनोरजक कादबरीप्रमाणे रसाळ वाटते हरएक गोष्ट लिहिताना त्याच्या डोळ्यासमोर एकच ध्येय असे लिहिलेले सर्वांना समजेल अशी भाषाशैली तो वापरी तो लिहितो, "लहान लहान जुने सॅक्सन शब्द वापरणे चागले. 'एकादे लहान रोपटे अफू घेतल्याप्रमाणे जणू गुंगीत असते आणि अशा वृत्तीनेच ते जगते,' असली वाक्ये कानाला इंग्रजी नाही वाटत, त्याचे भाषांतर करावेसे वाटते, पण हेहि खरे की, भाषाशैली अति सोपी, सहजसुदर व प्रासादिक असावी यासाठी फार श्रम घेणे बरे नाही. वाग्वैभव केवळ निरुपयोगी असेंहि नाही लिखाणात परमोच्च वक्तृत्व असूनहि फारसा आटापिटा न करता प्रसाद व सहजसुदरता दोन्ही साधता येतील तर चागलेच "

भाषा सहजसुदर व स्वच्छ आणि विशद अर्थ सांगणारी व्हावी म्हणून डार्विनने खूप प्रयत्न केले. सुदर लिहिणे प्रथम त्याला जड जात होते. पण अविरत प्रयत्नाने त्याने स्वतःची एक विशिष्ट भाषाशैली बनविली. मोकळी, सोपी व मनोहर भाषाशैली त्याने निर्मिली. त्याच्या जीवनाचे ब्रीदवाक्य "सतत प्रयत्नाने कार्य होते" हे होते. काव्याविषयी आपणास फार आवड

नसल्याबद्दल त्याला वाईट वाटे, तरीहि पण 'बीगलवरील प्रवास' या त्याच्या पुस्तकात कविताचे पुष्कळ उतारे आहेत ब्राझिलचे पुढील वर्णन पाहा — "येथील जमीन म्हणजे एक विस्तृत, अनिर्बंध, भव्य, भीषण व वैभवसपन्न असे निसर्गाचे जणू उष्ण मदिरच आहे. पण निसर्गाच्या या घराचा कब्जा मानवाने घेतला आहे येथे मानवाने ठायी ठायी सुदर घरे व लहान लहान बागा निर्मिल्या आहेत" ब्राझिलची भूमि पाहून त्याला प्रथम काय वाटले ते पाहा : तो म्हणतो "आनदाच्या व आश्चर्याच्या वादळात मी बुडून गेलो" व मग लिहितो, "नारिगे, सत्री, नारळ, ताड, आबे, केळी वगैरेचीं बाह्य रूपे पृथक् पृथक् आहेत. पण या भिन्न भिन्न वृक्षवनस्पतीची सहस्रावधि सौदर्ये शेवटी एक भव्य अशी सौदर्यकल्पना देतात. आणि वेगवेगळी सुदर रूपे विलीन होऊन एकच सौदर्यकल्पना मनात राहते. पण ही विविधता गेली तरीहि अस्पष्ट पण अत्यत सुदर अशा आकृतीची चित्रे हृदयफलकावर राहतात"

'बीगलवरील प्रवास' हे पुस्तक लिहून शभर वर्षे होऊन गेली तरीहि ते पुस्तक अरबी भाषेतील सुरस गोष्टीप्रमाणे गोड वाटते. डार्विनचे यानतरचें पुस्तक मात्र केवळ शास्त्रीय होते, त्यात निसर्गाच्या स्वरूपाविषयी बरीच माहिती असून समुद्रातल्या बार्नेकल नामक प्राण्याचीहि हकीकत आहे हा प्राणि आपल्या शिपल्यात डोक्यावर उभा असतो व आपल्या पायानी तोडात अन्न फेकतो हे पुस्तक डार्विन आठ वर्षे लिहीत होता. त्याच्या आयुष्यातली ही आठ वर्षे अत्यत उपयोगी कामात गेली या एका विषयाला सतत आठ वर्षे चिकटून बसून डार्विनने स्वतःमध्येहि जणू बार्नेकलची चिकाटी बाणवून घेतली असल्या विषयावर निरर्थक इतके प्रयत्न करण्याबद्दल डार्विनचे मित्र त्याची खूप टिगल करीत, पण डार्विन हळूहळू 'सर्वांत मोठा सृष्टिज्ञानी व निसर्गाभ्यासी' अशी आपली प्रतिष्ठा प्रस्थापित करीत होता, व आपल्या आयुष्यातल्या सर्वांत मोठ्या कामासाठी आपले मन—आपल्या मनाचे स्नायू—मजबूत करीत होता

ही आठ वर्षे किती मोलाची ! तो सारखा माहिती मिळवीत होता व चिकित्सक बुद्धीने त्या माहितीतून सत्य शोधीत, निवडानिवड करीत होता.

'निरनिराळ्या जातीची उत्पत्ति आणि मानवाची उत्क्रांति (मानवाचा अवतार)' यासबधीची आपली उपपत्ति पूर्णावस्थेस नेऊ पाहात होता

## — ४ —

ग्रीकाना व रोमनाना उत्क्रांतीचे तत्त्व अज्ञात नव्हते हे आपण एपिक्यूरसवरील प्रकरणात पाहिलेच आहे पण ख्रिश्चन धर्म येताच उत्क्रांतीचा विसर पडून बायबलमधील सृष्टयुत्पत्तीची कल्पित कथा खरी मानली जाऊ लागली. गॅलिलीच्या कल्पनाप्रिय कोळचाच्या सगतीत मानवजात जणू शास्त्रीय दृष्टि विसरून गेली, गमावून बसली ! ती शास्त्रीय दृष्टि परत येण्यास व तिला गति मिळण्यास अठराशें वर्षे लागली जगन्निर्मितीबाबतच्या ज्यूडोख्रिश्चन कल्पनेने पाश्चिमात्य जगावर इतका परिणाम केला होता की, डार्विनने आपली उत्क्रांतीची कल्पना—उत्क्रांतीची उपपत्ति मोडली तेव्हा तो सृष्टि-निर्मात्या ईश्वराचा खून करीत असल्यासारखा भासला। लोकाना तो खुनी वाटला मनुष्याच्या अमर आत्म्याच्या मनोहर कथेचा डार्विन जणू वध करीत होता ! ते मधुर काव्य तो मातीस मिळवीत होता ! प्रत्येकजण आपला तिरस्कार करील हे डार्विनने अपेक्षिलेच होते. हार्वर्ड येथील स्नेही प्रोफेसर असाग्रे याना लिहिलेल्या पत्रात डार्विन म्हणतो, "मला तुम्हास प्रामाणिकपणे सागावेसे वाटते की, रूढ कल्पनेहून वेगळ्या निर्णयाप्रत मी आलो आहे. निरनिराळे प्राणी अलग अलग निर्माण करण्यात आलेले नसून ते सारे परस्परावलबी आहेत हे वाचून तुम्ही माझा तिरस्कार कराल हे तर खरेच; पण मी तुमच्यापासून माझा निर्णय लपवीन तर मी प्रामाणिक कसा राहू शकेन ? " त्याच्या प्रतिभेने व बुद्धीने लावलेला शोध सर्व जगाला ज्ञात करून देईतो त्याचा प्रामाणिकपणा त्याला स्वस्थ बसू देईना

'Origin of Species' हा ग्रंथ लिहिण्यापूर्वी वीस वर्षे म्हणजे १८३९ सालीच त्याने उत्क्रांतीची चालचलाऊ उपपत्ति लोकापुढे माडली होती त्या रूपरेषेचा विस्तार करून १८४२ साली त्याने पस्तीस पृष्ठाचा निबंध लिहिला व तोच पुढे वाढवून १८४४ साली २३० पृष्ठाचा केला हा सर्व काल व पुढील पधरा वर्षे ही मीमासा पारखून व पडताळून पाहण्यात व तिच्यातील

दोष काढून टाकण्यात खर्चून जे नवे निर्णय निघाले त्याचे तो पुन पुन्हा पर्यालोचन करीत होता डार्विन स्वत च स्वत.चा निर्भीड टीकाकार असल्यामुळे विरोधकाचे आक्षेप आधीच कल्पून त्याना बिनतोड उत्तरे देण्यास तयार होता.

१८५८ साली डार्विन आपल्या सशोधनाला शेवटचे स्वरूप देत असता अकस्मात् एके दिवशी त्याला दिसून आले की, दुसऱ्या एका शास्त्रज्ञाने नकळत आपली सारी विद्युत् चोरून घेतली. जूनच्या अठराव्या तारखेस त्याचा मित्र आल्फ्रेड रसेल वॅलेस य ने उत्क्रातीवरचा एक स्वतत्र लेख डार्विनकडे पाठविला व ' मी माडलेल्या उपपत्तीवरील तुमचे प्रामाणिक मत कळवा, तीवर मनमोकळी टीका करा ' असे त्याला कळविले वॅलेस अमेरिकेत होता डार्विन वीस वर्षे प्राण्याच्या उत्पत्तीचे सशोधन करीत होता हे त्याला माहीत नव्हते, त्यामुळे ' उत्क्रातीच्या उपपत्तीचा सशोधक ' म्हणून जगाला आपली ओळख करून देण्याबद्दल त्याने डार्विनला विनति केली अशा परिस्थितीत डार्विनने काय करावे ? त्या विषयावरील आपल्या सशोधनाच्या व लिखाण्याच्या अगदी बरहुकूम वॅलेसचे सशोधन, तसेच लिखाणहि होते हे पाहून सुप्रसिद्ध भूगर्भशास्त्रवेत्ता डॉ० लायल यास डार्विनने लिहिले, " असा योगायोग मी कधीच पाहिला नाही किती आश्चर्यकारक योगायोग ! १८४२ साली मी लिहिलेले हस्तलिखित वॅलेसजवळ असते तर याहून अधिक सक्षिप्त साराश त्याला काढता येणे अशक्य होते. " एकदा तर सारे श्रेय वॅलेसलाच देऊन टाकावे असे त्याला वाटले! " क्षुद्र वृत्तीने मी वागलो अशी शकाहि कोणास येऊ नये म्हणून माझी सर्व हस्तलिखिते जाळून टाकावीसे मला वाटते " असे त्याने लायलला लिहिले. त्यावर लायलने उत्तर दिले, " तुम्ही आपले सर्व विचार तावडतोब प्रसिद्ध करा. स्वत च्या बाबतीत अन्याय नका करून घेऊ. आपल्या आधी वीस वर्षे डार्विनने ही उपपत्ति अजमावली होती हे ऐकून वॅलेसला वाईट न वाटता आनदच होईल. " शेवटी लिनयिन सोसायटीसमोर आपले व वॅलेसचे सयुक्त सशोधन म्हणून ही उपपत्ति माडण्याचे त्याने ठरविले. तथापि उदारपणात आपणहि मागे नाही. हे " ज्या उपपत्तीचे संपूर्ण श्रेय वस्तुत. डार्विनचे आहे तिच्या श्रेयात मलाहि भाग मिळावा हे माझे केवळें सदैव ! " असे जाहीर करून वॅलेसने दाखविलें. अशा रीतीनें ही

सुप्रसिद्ध चर्चा थांबली. प्रत्येकानें आपल्या कीर्तीचा प्रश्न बाजूस सारून दुसऱ्याचे नाव मोठे व्हावे म्हणून मोठे मन दाखविले.

शास्त्रज्ञासमोर आपली उपपत्ति माडल्यानतर ती छापून काढण्यासाठी डार्विन आपले हस्तलिखित झपाट्याने तयार करू लागला २४ नोव्हेंबर १८५६ रोजी पुस्तकाची पहिली आवृत्ति तयार झाली पुस्तकाला " नैसर्गिक निवडीने प्राण्याची उत्पत्ति किवा जीवनार्थ कलहात अधिक कृपापात्र प्राण्याच्या जातीचे टिकून राहणे " असे लाबलचक व अवजड नाव देण्यात आले होते.

ज्या शास्त्रीय पुराव्याच्या महापुराने ॲडम व ईव्ह याची गोष्ट, स्वर्गातील बाग, वगैरे सारे पार वाहून गेले, त्याचा थोडक्यात गोषवारा असा या जगात जिवत प्राणी सारखे अमर्यादपणे वाढत असतात, पण अन्नपुरवठा अगर राहण्याची जागा या मात्र मर्यादितच असल्यामुळे सर्व सजीव प्राण्यात जीवनार्थ कलह अहोरात्र चाललेला असतो परिस्थितीशी झगडण्यात अधिक समर्थ असणारे टिकतात, बाकीचे मरतात, उत्क्रान्तीवादी याला ' समर्थ असतात ते टिकतात' असे म्हणतात, पण आजूबाजूची परिस्थिति देखील बदलत असतेच समुद्र असतो तेथे जमीन होते, जमीन असते तेथे समुद्र येतो, पर्वत जाऊन त्याच्या जागी दऱ्या येतात, बर्फ असते तेथेच एकदम उष्णता पुढे येते. आजूबाजूच्या नैसर्गिक जगांत हे फरक होत असल्यामुळे प्राण्यासहि स्वत.-मध्ये व स्वतःच्या राहणीत बदलत्या परिस्थितीत जगतां यावे म्हणून फेरफार करावे लागतात हे फरक कधी कधी क्रातिकारक होतात. एका प्राण्यातून दुसरेच प्राणि जन्माला येतात. असे करूनच ते जगू शकतात ज्या पद्धतीने ही उत्क्राति होत जाते, तिला दुसरे चागले नाव सापडत नसल्यामुळे ' नैसर्गिक निवड ' हे नाव देण्यात येत असते नैसर्गिक निवड म्हणजे ज्या प्राण्याना जिवत राहण्यासाठी फरक करावे लागले व ते ज्यानी केले तेच जगावे, टिकावे असेच जणू निसर्गाने ठरविले त्या फरकाची जगण्याला क्षम म्हणून निसर्गानेच निवड केली व नवीन परिस्थितीत जरूर न राहिलेल्या बाबी हळूहळू काढून टाकण्याचेहि निसर्गानेच नक्की केले.

उत्क्रातीची थोडक्यात उपपत्ति अशी आहे ' जीवनाची अमर्याद वाढ होत असल्यामुळे जीवनार्थ कलह सुरू असतो व त्यात अधिक क्षम व समर्थ असणारे टिकतात, बाकीच्या प्राण्याच्या जाती नष्ट होतात; एकीतून दुसरी

उत्पन्न होते ' या उपपत्तीप्रमाणे आपण जे अगदीं खालचे प्राणी म्हणून समजतो त्याच्यापासून मानव फार दूर नाही त्याचीच पुढची पायरी म्हणजेच मानवप्राणी ही पुढची पायरी डार्विनने ' मानवाचा अवतार ' या पुस्तकात प्रतिपादिली आहे मानवप्राणी माकडापासून उत्क्रान्त झाला या उपपत्तीचे श्रेय वा अश्रेय सामान्यत डार्विनला देण्यात येत असते, पण खरोखर पाहिल्यास डार्विनने असे काही एक म्हटलेले नाही त्याने जास्तीत जास्त इतकेच सागितले की, मानव व वानर हे एकाच पूर्वजापासून केव्हा तरी जन्मले हा प्राचीन प्रागनैतिहासिक पूर्वज आज अस्तित्वात नाही म्हणजेच वानर हा आपला आजोबा नसून भाऊ आहे. डार्विनच्या मते प्राण्यातील परमोच्च विकास मानवात झाला आहे सर्वांत जास्त विकसित प्राणी म्हणजे मानव ' समर्थांचे अस्तित्व ' या कायद्याप्रमाणे त्याने इतर प्राण्यावर प्रभुत्व मिळविले आहे समर्थ व क्षम या शब्दाचा डार्विनचा अभिप्रेत अर्थ ' अति बलाढ्य किंवा अति निर्दय ' असा नाही खालच्या प्राण्यात कोणी टिकावयाचे व कोणी नष्ट व्हावयाचें हे बलाबलानेच ( शारीरिक झटापटीनेच ) ठरतें पण मानवाच्या बाबतीत वैयक्तिक झगडा नष्ट होऊन सर्व मानवप्राण्याचे सामाजिक सहकार्यच सरक्षणाचे साधन बनते स्वार्थी आक्रमणशीलता जाऊन तिच्या जागी हळूहळू अन्योन्य–साह्य व सहकार्य याचे तत्त्व रूढ होते. मानवी जीवनाला अत:पर जगलाचा कायदा लावणे बरे नाही व्यक्तीचे जीवन नीट राहावयाला पाहिजे असेल तर सर्व मानवजातीने नीट जगावे यासाठीच खटपट केली पाहिजे सर्व मानवाच्या जीवनार्थ झटण्यातच व्यक्तीच्याहि सरक्षणाचा परमोत्तम मार्ग आहे. ही गोष्ट हळूहळू का होईना पण आपण शिकत आहो

म्हणून मनुष्य हा सामाजिक प्राणी आहे तो ईश्वराची प्रतिकृति म्हणून जन्मलेला नाही तो पडलेला–अधोगत–देवदूत नसून उत्क्रांतीच्या सोपानाने उन्नत होत असलेला रानटी पशु आहे, रानटी मानव आहे त्याचा मार्ग उत्तरोत्तर वरचा आहे तो अधिक खाली नाही जाणार. या जगात जे जे सजीव आहे, जे जे जीवनार्थ धडपडत आहे, त्या त्याशी मानवाचा सबध आहे. त्यांच्यामध्यें पशुत्वाचे व लाखो कोडो प्राण्यांचे अंश आहेत. जीवन उत्क्रांत

होत असून मनुष्याला अद्यापि एक प्राणी म्हणूनच म्हणावे लागेल, पण प्रेमाची अपरपार–अनत–शक्यता असणारा हा प्राणी आहे

## –६–

खुद्द डार्विनचेच जीवन त्याच्या उपपत्तीचा सबळ व उत्कृष्ट पुरावा आहे. त्याची प्रेमशक्ति सारखी वाढत होती त्याच्या उपपत्तीसाठी त्याच्यावर टीका निंदा, शिव्याशाप, याची लाखोली वाहण्यात आली तरी त्याने निंदकाविरुद्ध एकहि कटु शब्द उच्चारला नाही आपल्या सहकाऱ्याशी त्याचा एक नम्र साहाय्यक म्हणून तो वागे, त्याने त्याच्यावर कधीहि वरचष्मा गाजविला नाही. ज्याची नावेहि कोणास माहीत नसत अशा प्रयोगशाळेतल्या कामगारा-विषयी व माहिती गोळा करून देणाऱ्याविषयी तो फार कृतज्ञता दाखवी. ते अमोल मदत देत. डार्विन त्याना विज्ञानशास्त्रातील हमाल म्हणे प्राणी कितीहि क्षुद्र असला तरी तो त्याचा तिरस्कार करीत नसे प्राणिमात्र त्याला पवित्र वाटे बुद्धाला साऱ्या विश्वाविषयी अपार प्रेम वाटे तसाच थोडासा डार्विनचा प्रकार होता तो बुद्धाच्याच जातीचा होता, त्याला सारे जीवन पवित्र वाटे. सजीव प्राण्याविषयी बोलावे तसे तो झाडेमाडे, तृणवेली, वगैरेविषयीहि बोले त्याने लावलेल्या एखाद्या झाडाचे अगर गवताचे रोवलेले अगर खोव-लेले पान वर आले की त्याची ती हुषारी पाहून तो म्हणे, ‘अरे लबाडा, वर आलास? मी तुला अडकवून, डाबून ठेवले तरी वर डोके काढलेसच अं?’ अशी त्याची प्रेमाने खरडपट्टी काढून तो त्याच्यावर रागवायचा. काही बीजा-कुरावर प्रयोग करता करता तो चिडून म्हणे, ‘ही भिकारडी चिमुरडी मला पाहिजे त्याच्या नेमके विरुद्ध करतात! चावट कोठची!’ प्रत्येक रोपटे त्याला जणू व्यक्तित्वसंपन्न पवित्र व्यक्तीच वाटे. फुलांचें सौंदर्य पाहून त्याची जणू समाधि लागे! फुलापासून मिळणाऱ्या निर्दोष व निरुपम आनंदाबद्दल तो सदैव कृतज्ञता प्रगट करी. तो फुलाच्या पाकळ्याना अगदी हळुवारपणे स्पर्श करी, त्या वेळी त्याच्या डोक्यात एखाद्या संताचे अपरपार प्रेम वा एखाद्या बालकाचें निष्कपटी कुतूहल दिसे. त्याचा ख्रिश्चन धर्मावर विश्वास नव्हता तरीहि त्याचा स्वभाव मात्र ख्रिस्तासारखा होता. तो म्हणे, ‘ईश्वरानें कोणाला

एखादा ग्रंथ दिला याबर माझा तरी विश्वास बसत नाही.' तो अज्ञेयवादी होता अपरपार दु खाने भरलेल्या या जगाची रचना एखादा ज्ञानी ईश्वर करणे शक्य आहे का असे तो विचारी तो लिहितो, 'या जगाच्या पाठीमागें काही कल्याणावह योजना तर नाहीच नाही, पण मुळी योजनाच असेलसे वाटत नाही' पण तो केवळ नास्तिक नव्हता तो जपून जाणारा होता तो या निर्णयाप्रत आला की, 'हा सारा विषय मानवी बुद्धीच्या अतीत आहे. मनुष्याने आपले कर्तव्य करावे म्हणजे झाले'

डार्विनच्या मते त्याचे स्वत चे कर्तव्य आमरण सारखें श्रमत राहणे हे होते आपल्या बाधवाना ज्ञानाचा प्रकाश देण्यासाठी अविरत झटणे हे त्याचे कर्तव्य होते. पण श्रम करताना त्याला वरचेवर दोन अडथळे येत तो सुखी व सपन्न असल्यामुळे त्याला फार श्रमण्याची सवय नव्हती प्रकृति बरी नसल्यामुळे काबाडकष्ट करणे त्याला अशक्यच होई पण आपल्या इच्छाशक्तीच्या जोरावर त्याने या दोन्ही अडचणीवर जय मिळविला सुखासीनतेची सवय त्याने मोडून दिली पत्नीच्या प्रेमळ सेवापरायणतेमुळें शारीरिक व्यथेची व आजाराची अडचण दूर झाली डार्विनची पत्नी अत्यत दयाळू व फार थोर स्त्री होती डार्विनने तिला 'अत्युत्तम व अति प्रेमळ' असे सबोधून अमर केले आहे 'अशी पत्नी लाभल्यामुळेच मी ताण सहन करू शकलो व शेवटपर्यंत नीट धडपड चालविली.' असे डार्विनने लिहिले आहे डार्विन नेहमी आजारी आजारीच असावयाचा, त्याच्या पत्नीने त्याच्या या प्रकृतीला अनुरूप असे शात जीवन ठेविले, कधी आदळआपट नाही, कधी रागवारागवी नाही. ती त्याला उत्साह देई, पण टोचीत नसे 'भराभरा आटपा' ती कधी म्हणत नसे त्याच्या प्रयोगाशी ती परिचित राही, प्रुफे तपासण्याच्या कामी त्याला मदत करी व त्याला शारीरिक वेदना होत तेव्हा त्याची इतक्या प्रेमळपणे व कनवाळूपणे शुश्रूषा करी कीं, तो म्हणे, 'तुझ्याकडून शुश्रूषा करून घेण्यासाठी आजारी पडणेहि बरे.'

एम्माचें डार्विनवर जितकें प्रेम होते तितकेच डार्विनचें एम्मावरहि होतें. दोघाचें हें अन्योन्य प्रेम त्याच्या मुलाच्या स्वभावात पूर्णपणें उतरले होतें. पूर्णपणें विकसित अशा जीवाचें हे कुटुब होतें. त्यांचें संवर्धन फारच उत्कृष्टपणें झालें होतें. ती मुलें आनंद, सौम्यता व अन्योन्य आदर अशा वातावरणांत

वाढली होती आदरभाव म्हणजे काय? दुसऱ्याच्या भावनाची सहानुभूतिपूर्वक जाणीव. सानुकंप विचार म्हणजे सद्‌भाव, आदरभाव. डार्विनच्या चारित्र्याची ही मुख्य किल्ली आहे वयाच्या ऱ्याहत्तराव्या वर्षी त्याने लंडनला शेवटची भेट दिली. आपल्या एका मित्राच्या घरात शिरत असता त्याला घेरी येऊ लागलीसे पाहून त्याचा मित्र बाहेर गेलेला होता तरी आचाऱ्यानें त्याला 'आत या ना?' असे म्हटले, पण बटलरला कशाला उगीच त्रास, या भावनेने डार्विन आत न जाता धडपडत बाहेर गेला व गाडी पाहूं लागला. पुढें तीन महिन्यानी म्हणजे १८८२ सालच्या मार्चच्या सातव्या तारखस तो मरण पावला त्याला मरणाची यत्किंचित्‌हि क्षिति वाटली नाही तो मरण्यास तयारच होता. त्याच्या अधार्मिक मतासाठी त्याच्या शत्रूनी त्याला नरकाचा धनी ठरविले, पण एका धर्मशील स्त्रीच्या मतें, 'तो इतका चागला होता की. तो खात्रीने स्वर्गासच गेला असला पाहिजे डार्विनचें ईश्वराशिवाय चालेल, पण त्या सर्वशक्तिमान् प्रभूचे डार्विनशिवाय कसे चालणार?'

# शं. द. जावडेकर

## विज्ञान व जीवननिष्ठा

विज्ञानशास्त्राची वाढ आणि त्या वाढीमुळे मनुष्याच्या सामर्थ्यात पडलेली भर हे आजच्या युगाचे एक महत्त्वाचे लक्षण व वैशिष्ट्य आहे यांत शका नाही यामुळेच या युगाला 'विज्ञानयुग' असेहि नाव देण्यात येत असते विज्ञानाचा परिणाम मानवी जीवनावर आणि जीवननिष्ठेवर झाला आहे व होत आहे. मानवसंस्कृति आणि त्याची जीवननिष्ठा याच्यावर विज्ञानाचा कोणता परिणाम घडत आहे त्याचा विचार केल्यावाचून आपणास आजच्या जगात जगताहि येणार नाही. जगता आले तरी चागल्या प्रकारे जगता येणार नाही आणि चागल्या प्रकारें जगणे म्हणजे काय याचाहि उलगडा त्याला करता येणार नाही. विज्ञानशास्त्राच्या वाढीचे कोणते परिणाम आमच्या जीवननिष्ठेवर होत आहेत, त्यापैकी कोणते परिणाम इष्ट व टिकाऊ आहेत आणि कोणते परिणाम अनिष्ट व टाकाऊ आहेत यासबधी आपली भूमिका आता निश्चित करणे अवश्य झाले आहे आज एक सस्कृति नष्ट होत आहे आणि तिच्या जागी दुसरी सस्कृति निर्माण होण्याची चिन्हे दिसत आहेत जी सस्कृति मरत आहे ती सस्कृति कशा प्रकारची होती व तिची जागा घेणारी दुसरी सस्कृति कशा प्रकारची असेल अथवा असावी याचा निर्णय केल्यावाचून आपणास आज जे राष्ट्रनिर्मितीचें व सस्कृतिसस्थापनेचे कार्य करावयाचें आहे ते योग्य प्रकारे करता येणार नाही. विज्ञानशास्त्राच्या वाढीमुळे सृष्टीच्या भौतिक घटनेचे आमचे ज्ञान गेली तीन चार शतके इतके वाढले आहे की त्या काळात मानवाला आपल्या सामर्थ्याचा फार मोठा प्रत्यय येऊ लागला

आज त्याचे हे भौतिक सामर्थ्य येवढे वाढलें आहे की, त्या सामर्थ्याचा उपयोग करण्यात यत्किंचित् चूक होईल तर सर्व मनुष्यजात भस्मसात् होण्याला फार काळ लागणार नाही. याच्या उलट जर याच सामर्थ्याचा सदुपयोग करण्याची बुद्धि त्याच्यात जागृत झाली तर या पृथ्वीवर तो स्वर्ग निर्माण करू शकेल. मानवी अत करणांत क्रोधाचा प्रादुर्भाव होऊन किंवा द्वेषाचा अति-

रेक होऊन त्याच्या बुद्धीत सर्व जग भस्मसात् करण्याची वासना निर्माण होणे, यात नवे असे काही नाही, परतु ती वासना तृप्त करण्याचे सामर्थ्य त्याच्यापाशी नव्हते. त्या सामर्थ्यासाठी त्याला रुद्राला आवाहन करावे लागे व त्याने नम आवाहन केले तरी तो रुद्र प्रकट होत नसे तो रुद्र केवळ कल्पनागोचर किंवा काल्पनिकच होता, पण आता तो रुद्र त्याला इतका वश झाला आहे की, सर्व जग भस्मसात् करणे ही केवळ अतिशयोक्तीची भाषा उरलेली नाही तसेच पृथ्वीवर स्वर्ग अवतरावा हीहि मानवी अंतःकरणातील वासना फार प्राचीन आहे ती नवी नाही, पण ही वासना तृप्त करून खरोखरच पृथ्वीचा स्वर्ग बनविणे त्याला अशक्य उरलेले नाही नवी सृष्टि निर्माण करणारा ब्रह्मदेवहि त्याला वश झालेला आहे भौतिक विद्येतून निर्माण झालेले हे सामर्थ्य खोटे नाही त्याच्यापैकी काहीची बुद्धि अहकाराच्या इतकी आधीन झालेली आहे की ते नित्य रुद्रालाच आवाहन करीत असतात ब्रह्मदेवाला आवाहन करून नवी सृष्टि निर्माण करण्याची इच्छा सामान्य जनतेला होत असते आणि तिला तशी आश्वासनेहि देण्यात येत असतात पण ही आश्वासने केव्हाच पुरी होत नाहीत आणि नवी सृष्टि निर्माण करणारा ब्रह्मदेव कोठे दिसतच नाही यामुळे मानवाला विज्ञानशास्त्राच्या वाढीमुळे जे प्रचड सामर्थ्य प्राप्त झाले आहे त्या सामर्थ्याचा उपयोग सर्व मनुष्यजातीचा महार करण्याच्या कामी न करता सर्व जनतेला हवा असणारा स्वर्ग पृथ्वीवर अवतरविण्याकडे मनुष्ये कसा करू लागतील हाच आमच्यापुढील म्हणजे मानवसस्कृतीपुढील आज महत्त्वाचा प्रश्न आहे हा प्रश्न सोडविण्यास त्याला विज्ञानापेक्षा मनोविज्ञान आणि आत्मज्ञान याचाच उपयोग अधिक होणार आहे. याचा अर्थ यापुढे विज्ञानशास्त्रात वाढ होणार नाही किंवा ती वाढ होण्याची आवश्यकता नाही असा नव्हे, तर त्या वाढीहून मनोविज्ञान आणि आत्मज्ञान याच्या वाढीवर मानवाचे भवितव्य आज अधिक अवलबून आहे त्याच्या जीवननिष्ठेत विज्ञानशास्त्राला प्राधान्य देऊन मनोविज्ञान व आत्मज्ञान याच्या वाढीकडे दुर्लक्ष झाल्याचे दुष्परिणाम फार भयकर झाल्याचे स्पष्ट दिसत आहे. म्हणूनच आज मानवसंस्कृतीला आध्यात्मिक अधिष्ठान निर्माण करणारी अथवा करू पाहणारी सत्याग्रहनिष्ठा मानवाच्या जीवननिष्ठेत प्रधान बनण्याची आवश्यकता निर्माण होत आहे. मानवसंस्कृतीचे केवळ विज्ञानयुग संपून आत्मज्ञानाला

प्राधान्य देणारे नवे युग मानवी इतिहासात सुरू होत आहे असे मला वाटतें. मात्र या नव्या युगातहि मानवाची जीवननिष्ठा आत्मज्ञानप्रधान बनली, तरी विज्ञानप्रधान युगात त्याच्या संस्कृतीत जी महत्त्वाची भर पडलेली आहे, ती नाहीशी होणार नाही व होणे इष्ट नाही. पुढील युग हे आत्मज्ञान-प्रधान असे बनले तरी साधनदृष्टीने विज्ञानाचे महत्त्व केव्हाहि कमी होणार नाही. इतकेच नाही तर या विज्ञानयुगात मानवी जीवननिष्ठेत जी महत्त्वाची भर पडलेली आहे तीहि नष्ट होणार नाही व होता कामा नये

जीवननिष्ठा या दृष्टीने विज्ञानयुगात – जी कायमची भर पडलेली आहे असे मला वाटते त्यासंबंधी तीनचार विचार मी आपल्यापुढे मांडू इच्छितो विश्वाची भौतिक घटना, त्या घटनेतील नियति आणि भौतिक विश्वाचे वास्तविक अस्तित्व या बाबतीत मानवाची दृष्टि आता अधिक स्वच्छ झालेली आहे भौतिक विश्व ही एक केवळ आपली कल्पना आहे, ती माया आहे ते स्वप्न आहे तो आभास आहे किंवा तें मिथ्या आहे हा विचार मानवी जीवन-विषयक निष्ठेतून किंवा तत्त्वज्ञानातून आता कायमचा लुप्त झाला असे मानण्यास हरकत नाही आधुनिक युरोपात या विज्ञानयुगातच भौतिक विश्वाच्या अस्तित्वासंबंधी कल्पनावादाचा पुरस्कार करणारे अनेक तत्त्वज्ञ होऊन गेले एकोणिसाव्या शतकात जर्मनीत हेगेल प्रभृति वेदान्त्यांनी अध्यात्मशास्त्राची जी मांडणी केली त्या मांडणीतून भौतिक विश्वासंबंधीचा कल्पनावाद तर्क-दृष्टीने सिद्ध करता येईल असे मानणारे तत्त्वज्ञ त्या शतकाच्या अखेरीस व विसाव्या शतकाच्या प्रारंभी बरेच निघाले होते. त्यानंतर या शतकातहि पहिलें महायुद्ध होऊन गेल्यानंतर विज्ञानशास्त्रातील अगदी अलीकडील शोधाच्या आधारें या कल्पनावादाची सिद्धि होऊ शकेल असे प्रतिपादन करणारे कांही प्रसिद्ध भौतिकशास्त्रज्ञ तत्त्ववेत्ते कांही काळ पुढे आले होते. परंतु हेगेल संप्रदायातून निर्माण झालेले पहिले तत्त्वज्ञ किंवा भौतिक शास्त्रातील अद्यावत् संशोधनाच्या आधारावर अध्यात्माला आधार घेणारे जीन्स, एडिंग्टन प्रभृति नवे तत्त्वज्ञ यांपैकी कोणीहि भौतिक विश्वांचे वास्तविक अस्तित्व नाकारूं शकत नाहीं, हें आतां सर्वमान्य झाले आहे. इंग्लंडांतील रसेल प्रभृति तत्त्वज्ञांचा एक एक जो संप्रदाय आहे त्यानीं भौतिक विश्वासंबंधीं कल्पना-वादाचा पुरस्कार करणें कसें युक्तिसिद्ध नाहीं ते दाखवून देण्यात यश संपा-

दन केले असून भौतिक विश्वाचे अस्तित्व हे वास्तविक आहे. ही निष्ठा आता मानवी जीवननिष्ठेत पुन दृढमूल बनली आहे रसेल प्रभृतीचा विवेचक वास्तववाद ( Critical Realism) म्हणून जो एक नवा वाद विसाव्या शतकात ब्रिटनमध्ये निर्माण झाला त्याचे मुख्य कार्य एवढेच होते व त्यात तो यशस्वी झाला आहे तसेच बाह्य विश्वाचे वास्तविक अस्तित्व गृहीत धरल्यावाचून ज्या विज्ञानशास्त्राला आपला कोणताहि व्यवहार करता येणार नाही त्याच विज्ञानशास्त्राच्या आधारे त्या विश्वाला माया ठरविता येणे शक्य आहे हा विचारहि आता भ्रामकच ठरला आहे

याच काळात हिंदुस्थानात जे तत्त्वज्ञानी झाले, त्यानीहि प्रथम प्रथम आपल्या वेदान्तातील मायावादास पाश्चात्य तत्त्वज्ञ व भौतिक शास्त्रज्ञ याचा आधार मिळू शकेल असे दाखवून देण्याचा प्रयत्न केला असला तरी अखेरीस 'माया' म्हणजे मिथ्या नव्हे, केवळ भ्रम नव्हे, स्वप्न नव्हे, केवळ कल्पना नव्हे असे म्हणता म्हणता मायावादाला कायमची समाधि दिलेली आहे असेच दिसून येईल इतकेच नाही तर आमच्या मध्ययुगीन भागवतधर्मी सतानीहि मायावाद स्वीकारला नव्हता असे आम्ही सिद्ध करू लागलो आहो स्वत. शकराचार्यहि एके ठिकाणी म्हणतात

**" सत्यं जगदिति भानं।**
**संसृतये स्यादपक्वचित्तानाम् ॥**
**तस्मादसत्यमेतत्। निखिलं प्रतिपादयन्ति निगमान्ता**
**परिपक्वमानसां। पुरुषवराणां पुरातनै सुकृतै ।**
**ब्रह्मैवेदं सर्वं। जगदिति भूय प्रबोधयत्येव ॥ "**

म्हणजे जग हे सत्य आहे, असे अज्ञानी लोकाना वाटू लागल्यास ते ससारातच निमग्न राहातील म्हणून वेदान्त त्याना हे जग मिथ्या आहे असे सागतो, पण पुरातन पुण्यकर्मांनी ज्याची मने परिपक्क झाली आहेत त्याना वेदान्त अखेरीस असे सागतो की, जग हे ब्रह्मच आहे, याचा अर्थ काय ? माझ्या मते याचा स्पष्ट अर्थ असा आहे की, " ब्रह्म सत्य जगन्मिथ्या " हा सिद्धान्त हें वेदान्तातील अतिम सत्य नव्हे. या दृष्टीने आपण असे म्हणू शकू की अद्वैत वेदान्तात " जगन्मिथ्यावाद " आणि " जगद्ब्रह्मवाद " असे दोन

सिद्धान्त आहेत. त्यापैकी "जगद्ब्रह्मवाद" हाच सिद्धान्त अतिम सत्य असून तो प्रथमच सागितल्यास अज्ञानी लोक ससारातच निमग्न राहातील व आत्मज्ञानाकडे दुर्लक्ष करतील, म्हणून अशा अज्ञानी जीवाना ससारापासून निवृत्त करण्यासाठी "जगन्मिथ्या" वादाचा उपदेश वेदान्तात केलेला असतो. हे दोन श्लोक शकराचार्याच्या "स्वात्मनिरूपण" या प्रकरणातील असून ते जर त्याचेच असतील तर त्याच्या मतानेहि "जगन्मिथ्यावाद" हे पारमार्थिक सत्य नसून ते एक प्रचारकी सत्य आहे "जगद्ब्रह्मवाद" हेच अतिम सत्य होय असे सिद्ध होते याच मतावर ज्ञानेश्वरादि भागवतधर्मी सतानी विशेष भर देऊन जग ही परब्रह्माची लीला आहे, तो एक त्याची प्रभा आहे, स्फूर्ति आहे असे वर्णन केले मध्ययुगीन साधुसतानी विश्वाचे वास्तविक स्वरूप मान्य करून त्याचे सौदर्यवर्णन केले, तसेच त्याची मोहकताहि दाखवून दिली माया या शब्दावर टीका करताना माधवदास नावाचा एक मध्ययुगीन सत लिहितो

**मोहितसे विश्वासि या ।**
**म्हणोनि विश्वमोहिनी माया ।**
**अथवा विश्वशोभा रचाया ।**
**हेचि म्हणोनि विश्वमोहिनी ॥**

म्हणजे "माया" ही विश्वमोहिनी असे म्हणतात, त्याची दोन कारणे आहेत ती सर्व विश्वाला मोह पाडिते म्हणून तिचे नाव विश्वमोहिनी असे आहे. अथवा विश्वाला शोभा देणे हे तिचे कार्य आहे म्हणूनहि तिला विश्वमोहिनी म्हणता येते अशा प्रकारे 'माया' शब्दाचा अर्थ बदलून सतानी आपला विश्वासबधीचा वास्तववाद बनविला, इतकेच नाही तर या मायेचे नियत्रण करणे हाच खरा पुरुषार्थ आहे असेहि प्रतिपादन केले पण या त्याच्या आकाक्षेस मूर्त स्वरूप देण्यास केवळ आत्मज्ञान पुरे पडणे शक्य नाही त्यासाठी विज्ञानशास्त्राचीच उपासना केली पाहिजे. मात्र हे विज्ञान आत्मज्ञानावाचून जगत्कल्याणास कारण न होता जगत्सहारासच ते कारण होते याचाहि अनुभव आज आम्हास येत आहे म्हणून आमच्या जीवननिष्ठेत आत्मज्ञानास प्राधान्य दिले पाहिजे असे मला वाटते. आधुनिक जग आज आत्मज्ञानाचे महत्त्व ओळखू लागले आहे तरी ते विज्ञानपूर्व युगात जाणार नाही व तसे

त्याने जाणे ही त्याची सांस्कृतिक उन्नतिहि होणार नाही ती त्याची परागति होईल विज्ञानाने जे भौतिक बल मानवाला प्राप्त झालेले आहे ते सत्कार्मी कमे लावावे हाच प्रमुख प्रश्न आपल्यापुढे आहे व त्यासाठी आत्मज्ञान व त्याचे महत्त्व ओळखून त्यात भर टाकण्यालाच यापुढे विशेष महत्त्व प्राप्त होणार आहे हे खरे आहे या दृष्टीने आपण आगामी सांस्कृतिक युगाला जरी आत्मज्ञानयुग असे नाव दिले तरी ते आत्मज्ञानयुग हे विज्ञानपूर्वकालीन होणार नसून ते विज्ञानोत्तरकालीन होणार आहे हे विसरता कामा नये या आत्मज्ञानयुगात भौतिक बल व आत्मिक बल यातील द्वैतहि नष्ट होणार आहे व व्हावयास हवे

विज्ञानयुगाने भौतिक विश्वाचे वास्तविक अस्तित्व निर्विवादपणे सिद्ध केले आहे त्याचप्रमाणे सत्यसंशोधनाच्या कार्यातील प्रयोगपद्धतीचे महत्त्वहि या विज्ञानयुगात मानवाला विशेषत्वाने प्रतीत झालेले आहे मनुष्याच्या बुद्धीचे तर्क आणि अनुभव असे दोन पाय आहेत. तर्कापेक्षा अनुभवाला अधिक प्राधान्य दिले पाहिजे ही मानवाची वृत्ति विज्ञानयुगात अधिक वाढली असून प्रयोगपद्धतीमुळे अनुभवाचे क्षेत्र अधिक विस्तृत व व्यापक बनले आहे रसेल प्रभृति ब्रिटिश तत्त्वज्ञाचा विवेचक वास्तववाद ( Critical Realism ) हा जरी विज्ञानशास्त्राच्या आधारावर व त्या वृत्तीवरच उभारलेला असला, तरी त्या तत्त्वज्ञानात प्रयोगपद्धतीला जितके महत्त्व द्यावयास हवे तितके देण्यात आलेले नाही व तार्किक सुसंगति हाच सत्यसंशोधनाचा व सत्यसिद्धीचा निकष बनविला आहे असा आक्षेप त्याच्यावर घेण्यात येतो. तसेच रसेलच्या विवेचक वास्तववादात भौतिक विश्वाला वास्तविक अस्तित्व आहे असे मान्य करण्यात आले असले तरी त्या विश्वाचे जे स्वरूप इंद्रियगोचर आहे, तो आभास आहे असा निष्कर्ष काढण्याइतका कल्पनावाद किंवा आभासवाद त्यात अंतर्भूत होतो असाहि त्यावर दुसरा एक आक्षेप घेण्यात येतो याच्या उलट तर्कापेक्षा अनुभवाला, प्रयोगाला व व्यवहाराला अधिक महत्त्व देण्याच्या वृत्तीतून एक प्रयोगवाद ( Pragmatism ) नावाचा तत्त्वज्ञानसांप्रदाय निर्माण झाला आहे तो प्रयोगसाफल्य हीच सत्याची कसोटी मानतो इतकेच नाही तर सत्य हे प्रयोगजन्यच आहे असे म्हणून प्रयोगातून व अनुभवातून मानवी-बुद्धि सत्य निर्माण करीत असते असे मानण्याकडे या प्रयोगवादाचा कल आहे

भौतिक विश्वाच्या घटनेसबंधींचा कोणताहि सिद्धान्त अंतिम किंवा पूर्ण सत्य नाही असा अनुभव विज्ञानयुगांत येऊ लागला. पूर्वीची सत्ये मागे पडून नवी सत्ये प्रस्थापित होऊ लागलीं. यावरून सत्यें ही मानवीबुद्धि निर्माण करीत असतात व त्यापैकी जी सत्ये अनुभवण्याच्या व प्रयोगाच्या कसोटीस उतरतील ती टिकतात व जी त्या कसोटीस उतरणार नाहीत ती टिकत नाहीत असा निष्कर्ष हा वाद काढतो ही प्रयोगपद्धति तो जीवनाच्या सर्व अंगाना लागू करतो मनोविज्ञान व आत्मज्ञान या क्षेत्रातहि प्रयोगाच्या कसोटीला जे सिद्धान्त उतरतील ते खरे मानावेत अशी याची वृत्ति आहे. या प्रयोगवादाचा आद्य प्रणेता विल्यम जेम्स हा अमेरिकन मानसशास्त्रज्ञ होऊन गेला त्याने धर्मानुभूतीच्या आधारे व प्रार्थनेपासून मनुष्याला शांति लाभते या अनुभवाच्या आधारे एक प्रकारचा ईश्वरवाद सिद्ध होतो असे दाखविण्याचा प्रयत्न केला. आत्मज्ञानाच्या क्षेत्रात धर्मानुभवांना प्रयोगासारखे महत्त्वाचे स्थान आहे हें त्याचे मत जरी आता बहुमान्य झालेलें आहे, तरी धर्मानुभवाच्या प्रयोगपद्धतीने ईश्वरवाद सिद्ध होतो हे त्याचे मत आज त्याचे अनुयायीसुद्धा निर्विवाद मानीत नाहीत याचे एक मुख्य कारण असें आहे की श्रीकृष्णासारखे ईश्वरवादी, महावीरासारखे अनीश्वरवादी आणि गौतमबुद्धासारखे अज्ञेयवादी हे सर्वच आपले सिद्धान्त धर्मानुभवाच्या अथवा आत्मानुभवाच्या आधारे समर्थन करीत असतात. ज्या अर्थी हे तीन सिद्धान्त परस्पराहून भिन्न आहेत व तर्कदृष्टीने ते तीनहि सारखेच सत्य आहेत असें म्हणता येत नाही, त्या अर्थी धर्मानुभवाच्या आधारे ईश्वरवाद निर्विवाद सिद्ध होतो असे म्हणता येत नाही

प्रयोगवादाचा आजचा प्रमुख प्रणेता जॉन ड्यूई हा अमेरिकन तत्त्वज्ञ असून इंग्लंडातील रसेल प्रभृतींचा विवेचक वास्तववाद आणि ड्यूईचा प्रयोगवाद हे दोनहि तत्त्वज्ञानातील वाद आता मागे पडत असून मार्क्सवादी कम्युनिष्टाचा विरोधविकासी भौतिक वाद हा एक तत्त्वज्ञानातील अभिनव वाद पुढे आला त्यात रसेलचा वास्तववाद आणि ड्यूईप्रभृतींचा प्रयोगवाद यातील महत्त्वाची तत्त्वे अंतर्भूत झालेली आहेत, एवढेच नाही तर त्यात भौतिक शास्त्रीय संस्कृतीचें एक क्रांतिकारक परिणत स्वरूप आपणास आढळते. शिवाय रसेलप्रभृतींच्या वास्तववादांतील व ड्यूईच्या प्रयोगवादातील काहीं उणीवा या विरोधविकासी भौतिक वादांत आढळत नाहींत. प्रयोगवादी

सांप्रदायाचा कल सत्य हे प्रयोगजन्य आहे व ती मानवबुद्धीची निर्मिति आहे असे मानण्याकडे होतो यामुळे विश्वात वास्तविक सत्य आहे, ते शोधून काढणे हे बुद्धीचे कार्य आहे इकडे त्याचे दुर्लक्ष होत आहे, असा आक्षेप या वादावर येत असतो प्रयोगाने विश्वातील सत्य अवगत होते हे म्हणणे निराळे आणि सत्य हे मानवबुद्धि निर्माण करते असे म्हणणें निराळें दुसरा पक्ष खरा मानला तर विश्व व त्यातील भौतिक नियति ही एक मानवीबुद्धीने निर्माण केलेली सृष्टि किंवा लीला ठरेल व अध्यात्मिक मायावादाप्रमाणे हा एक कल्पनावादच ठरेल हा दोष रसेलप्रभृतीच्या वास्तववादात नाही त्यात विश्वाचे व त्याच्या नियतीचे वास्तविक अस्तित्व मान्य करण्यावर सर्व भर दिलेला आहे पण रसेलप्रभृतीच्या वास्तववादात मानवाच्या आत्मस्वातंत्र्याला आणि स्वतंत्र कर्तृत्वाला मुळीच अवसर ठेवलेला नाही विश्वाची नियति मानवाला जिकडे खेचील तिकडे वाहवत जाणे येवढेच मानवाचे भवितव्य आहे असा या वास्तववादाचा निष्कर्ष निघतो.

रसेल हा मानवाला विचारस्वातंत्र्य किंवा बुद्धिस्वातंत्र्य आहे, हे मान्य करतो; तथापि त्यात आत्मस्वातंत्र्य व मानवी कर्तृत्व यांना फारसा अवकाश नाही तो एक भौतिक शास्त्रीय नियतिवाद किंवा परिणामदृष्ट्या दैववादच आहे असे म्हणावे लागते. प्रयोगवाद हा कल्पनावादी तर वास्तववाद हा नियतिवादी असे दोहोंवर दोन आक्षेप येत असतात. माझ्या मते मार्क्सच्या विरोधविकासी भौतिकवादाला हे दोनहि आक्षेप यथार्थतेने लागू पडत नाहीत विश्व व त्यातील नियति ही बुद्धिजन्य कल्पना नसून त्याची निर्मिति करणे हे मानवबुद्धीचे कार्य नाही त्यांतील वास्तविक सत्य शोधून काढणें हे मानवाचें वैशिष्ट्य आहे हे या भौतिकवादात मान्य केलेले आहे पण त्याच्याबरोबर मानवाला या विश्वनियतीचे ज्ञान करून घेऊन एक नवी सामाजिक सृष्टि निर्माण करण्याचे स्वतंत्र कर्तृत्व हे मान्य करून मार्क्सने भौतिक वादातील नियतिवादी प्रवृत्ति खोडून काढली आहे मानवसृष्टि ही मानवेतर जीवनसृष्टीतूनच विकास पावलेली आहे आणि जीवसृष्टि ही तत्पूर्वीच्या जडसृष्टीतूनच विकास पावलेली आहे हा सृष्टीच्या विकासाचा एतिहासिक क्रम गृहीत धरून मार्क्सनें सृष्टीच्या प्रारंभी ईश्वर, किंवा आत्मतत्त्व होते व नंतर तें जड बनलें, हा हेगेलचा अध्यात्मवादी सिद्धान्त केवळ कल्पनाविलास ठरविला आहे. याच्या उलट

सृष्टि प्रथम अचेतन असून नतर तिच्यात सचेतनत्व येते असे तो मानतो. तथापि हेगेलने व इतर अध्यात्मवाद्यानी मानवाला जे मर्यादित बुद्धिस्वातत्र्य व आत्मस्वातत्र्य कल्पिले आहे ते तो मान्य करतो मात्र मानवाचे बुद्धि-स्वातत्र्य व आत्मस्वातत्र्य सृष्टीची नियति उल्लघन करू शकणार नाही ती नियति समजून घेऊन व तिचा आधार घेऊनच त्याला नवी समाजसृष्टि निर्माण करता येते, असे हा विरोधविकासी भौतिकवाद मानतो विश्व-नियति आणि मानवाचे आत्मस्वातत्र्य या दोहोनाहि योग्य अवसर देण्यासाठीच मार्क्सने आपला विरोधविकासी भौतिकवादाचा सिद्धान्त बनविला आहे तसेच बुद्धीचे कार्य केवळ जगाचे ज्ञान करून घेणे येवढेच नसून त्या जगात आपणास अनुकूल असे बदल घडवून आणणे, हे आहे असे मार्क्सवादाचे म्हणणे आहे यामुळे तो केवळ ज्ञानयोगी नसून कर्म-योगी व क्रातिकारक कर्मयोगी आहे असे म्हणता येते बुद्धीचे व आत्म्याचे स्वातत्र्य आणि मानवाचे कर्तृत्व मान्य केल्यामुळेच मार्क्सचा भौतिकवाद हा दुसऱ्या म्हणजे यात्रिक भौतिकवादाहून भिन्न बनलेला आहे विश्वघटनेचे यत्र जाणून घेणारा व त्याची नियति शोधून काढणारा मानव हा जरी त्या विश्वाचाच एक अश आहे तरी त्या नियतीचा उपयोग करून नवी समाज-सृष्टि निर्माण करण्याचे स्वातत्र्य मानवाला आहे हाहि अनुभव विज्ञानयुगात मनुष्याला आलेला आहे या अनुभवाला भ्रामक ठरविणारा यात्रिक भौतिकवाद ही मानवाची जीवननिष्ठा बनू शकत नाही हे ओळखूनच मार्क्सने एकोणि-साव्या शतकाच्या मध्यभागी आपला विरोधविकासी भौतिकवाद हा सिद्धान्त बनविला विज्ञानयुगात जी नवी तत्त्वज्ञाने निघाली, त्या सर्वात मला हाच सिद्धान्त विशेष महत्त्वाचा वाटतो विज्ञानयुगापूर्वीच्या काळात विश्वघटने-सबधी आणि विश्वाच्या निर्मितीसबधी जे विचार मनुष्याने निर्मिले होते त्यापैकी बहुतेक आता नष्ट झाले आहेत व त्याच्या जागी अधिक शास्त्रीय विचार आलेले आहेत जुन्या विचाराचे समर्थन करण्यासाठी नवे युक्तिवाद काढून ईश्वरवाद, पुनर्जन्म किवा मरणोत्तर जीवनासबधीच्या विविध कल्पना याना सिद्ध करण्याचे जे प्रयत्न या युगात निरनिराळ्या तत्त्ववेत्त्यानी केले ते सफळ झाल्याचे दिसत नाही.

असे असले तरी विज्ञानशास्त्रानी शोधून काढलेल्या विश्वनियतीच्या

आधारावर जो यांत्रिक भौतिकवाद निघाला होता त्यामुळे मानवाचे आत्म-स्वातंत्र्य नष्ट झाले होते, ते त्याचे स्वातंत्र्य मान्य करणे भौतिकवादालाहि भाग आहे. हा बोध मार्क्सच्या विरोधविकासी भौतिकवादापासून सर्व भौतिक-वाद्यांनीहि घेतला पाहिजे म्हणून भौतिक विश्वाचे वास्तविक सत्यत्व, प्रयोग-पद्धतीचे महत्त्व आणि विश्वघटनेतील विरोधविकासतत्त्व हे तीन महत्त्वाचे विचार विज्ञानयुगात निघाले असून त्यांना आधुनिक मानवाच्या जीवननिष्ठेत कायमचे स्थान लाभले आहे असे मला वाटते त्याचप्रमाणे मानवाचे बुद्धि-स्वातंत्र्य व आत्मस्वातंत्र्य कितीहि मर्यादित असले तरी तो केवळ भ्रम आहे, हा यांत्रिक भौतिकवादाचा सिद्धान्त आज निराधार ठरला आहे यांत्रिक नियतिवाद हा सृष्टीतील जीवनसृष्टीचे व मानवसृष्टीचे व्यवहार उलगडून दाखविण्यास पुरा पडू शकत नाही इतकेच न्हे तर जड भौतिक सृष्टीच्या बुडाशी जे अणु, परमाणु अथवा विद्युदणु आहेत त्यांचे व्यापार समजण्यासहि यांत्रिक नियतिवाद पुरा पडू शकत नाही असे आता भौतिक शास्त्रज्ञच मान्य करू लागले आहेत या त्यांच्या मान्यतेमुळे अध्यात्मवादातील जुने सिद्धान्त सिद्ध करण्याचा नवा प्रयत्न जीन्स, एडिंग्टनप्रभृति भौतिक शास्त्रज्ञांनी अलीकडे केला, पण त्या प्रयत्नात त्यांना फारसे यश आलेले नाही मात्र मानवाच्या आत्मस्वातंत्र्याचा—मर्यादित आत्मस्वातंत्र्याचा—सिद्धान्त या काळात अबाधित असल्याचे पुनः एकदा मान्य झाले असे म्हणता येईल

## विरोधविकास आणि सत्याग्रह

आजच्या जगात विरोधविकासी भौतिकवाद आणि सत्याग्रह ही दोनच तत्त्वज्ञाने विशेष महत्त्वाची असून त्या दोहोंचा समन्वय करणे, हेच तत्त्वज्ञान व समाजशास्त्र यांचे यापुढील कार्य आहे, असे मला वाटते सत्याग्रहाला अद्यापि शास्त्रीय स्वरूप प्राप्त झालेले नाही व त्याची बुद्धिवादी दृष्टीने मांडणीहि झालेली नाही. सत्याग्रह अद्यापि आत्मप्रेरणेच्या अथवा स्फूर्तीच्या अवस्थेतच आहे या आत्मप्रेरणेच्या वा आत्मस्फूर्तीच्या आधारावर जे नवे जग अथवा नवी संस्कृति निर्माण होईल असे वाटते त्या नव्या जगाचा वा नव्या संस्कृतीचा आकार बुद्धिवादी दृष्टीने अद्यापि निश्चित स्वरूपात मांडता येत नाही सत्याग्रहाची मूळ प्रेरणा आत्मिक असून मानवसंस्कृतीत आत्मप्रेरणा,

आत्मस्वातंत्र्य आणि आत्मबल यांचे क्रांतिकारक व विधायक महत्त्व सत्याग्रहाने दाखवून दिले आहे जगाची मीमांसा करणे येवढेच मानवी बुद्धीचे कार्य नसून जग बदलणे हे मानवाचे कार्य आहे या विचाराची भर टाकून तत्त्वज्ञानाला व मानवीबुद्धीला आपल्या क्रांतिकार्याची जाणीव मार्क्सने करून दिली त्याचप्रमाणे जगाचे वास्तविक स्वरूप व त्यातील नियति समजून घेतल्यावाचून वाटेल तेव्हा, वाटेल ती क्रांति घडविता येईल, हा क्रांतिकारकाचा कल्पनारम्य स्वप्नवाद खोडून काढून क्रांतिवादाची शास्त्रीय मांडणी त्याने केली समाजघटनेच्या आर्थिक अधिष्ठानात फरक का व कसे घडतात, आणि त्या फरकामुळेच जुनी समाजसृष्टि मोडून नवी समाजसृष्टि निर्माण करणे का व कसे अवश्य बनते ते मार्क्सवादाने बरोबर दाखवून दिले आहे समाजात नेहमी वर्गकलह कसा चालू असतो, आज भांडवलशाही युगात या वर्गकलहाला कोणते स्वरूप प्राप्त झालेले आहे, या वर्गकलहातूनच भांडवलशाही जग कसे नष्ट होणार आहे आणि नवे समाजवादी जग कसे निर्माण होणार आहे, यासंबंधी मार्क्सचे मत आज सर्वमान्य होत आहे फक्त जुन्या भांडवलशाही जगाच्या विनाशाचा व नव्या जगाच्या निर्मितीचा काही अधिक समंजस, अधिक अहिंसक आणि अधिक विधायक मार्ग सापडला तर तो जगाला हवा आहे नाहीतर आज महायुद्धे व रक्तपाती क्रांत्या यांच्या आपत्तीत सापडलेली मानवसंस्कृति खरोखरच भस्मसात् होईल, अशी साधार भीति विचारवंताना वाटत आहे विरोधविकासी भौतिकवादापाशी या कूटप्रश्नाला उत्तर नाही, म्हणूनच ती जीवननिष्ठा विचारवंताना स्वीकारता येत नाही विरोधविकासी भौतिकवादात आत्मस्वातंत्र्य व बुद्धिस्वातंत्र्य याना अवसर ठेविलेला आहे, पण आत्मबल व आत्मप्रेरणा यांच्या आधारे बुद्धीला निरहंकारी बनविली आणि ती सत्यनिष्ठ राहिली तर आजच्या जगात अवश्य असणारी क्रांति अनत्याचारी मार्गांनी यशस्वी करण्याचे सामर्थ्य मानवाला येईल व तो आपल्या या आत्मनिष्ठ बुद्धीच्या जोरावर नवी सृष्टि निर्माण करू शकेल, हा आत्मविश्वास सत्याग्रहाने मानवाला दिला आहे. हा आत्मविश्वास खरा करून दाखविताना आणि नव्या संस्कृतीची निर्मिति करताना सत्याग्रही तत्त्वज्ञानाला बुद्धिवादी व वास्तववादी शास्त्रीय स्वरूप द्यावें लागणार आहे. हे बुद्धिवादी व वास्तववादी स्वरूप देताना सत्याग्रहाच्या

व आत्मबलाच्या विशिष्ट देशकालपरिस्थितीतील मर्यादा ओळखून समाजधारणेचे व समाजक्रांतीचे शास्त्र बनवावे लागणार आहे. समाजवाद व सत्याग्रह याच्या समन्वयाची आवश्यकता येथेच निर्माण होते सत्याग्रहाने विरोधविकासाचे समाजवादी तत्त्व स्वीकारले पाहिजे असे म्हटल्याबरोबर मार्क्सवादी व गाधीवादी दोघेहि प्रक्षुब्ध होतात हे मला माहीत आहे. पण त्याना येवढेच नम्रपणे सुचवितो की विरोधविकासाचे हे तत्त्व मार्क्सनेच शोधून काढिलेलें नसून ते त्याने अध्यात्मवादी हेगेलपासून घेतलेले आहे मग त्याच तत्त्वाला सत्याग्रही स्वरूप येईल असे समजले तर त्यात अशास्त्रीयता येते असा आग्रह का असावा ? तसेच गाधीवाद्याना जर लोकशाही व समाजवाद ही तत्त्वे आत्मसात् करणे कमीपणाचे वाटत नाही किवा त्यात काही विसगति वाटत नाही, तर जे विरोधविकासाचे तत्त्व प्रथमत. अध्यात्मवाद्यानीच पुरस्कारिले ते भौतिकवाद्यानी स्वीकारले म्हणूनच केवळ आम्ही ते त्याज्य मानितो, अशी वृत्ति धारण करणे हे सत्याग्रही तत्त्वाशी कितपत सुसगत आहे ? मला तरी या दोनहि पक्षाकडून येणारे हे आक्षेप सयुक्तिक वाटत नाहीत. प्रत्यक्ष म. गाधीचे वर्तन पाहिले तरी त्याच्या राजकीय व्यवहारात सत्याग्रही विरोधविकास हेच धोरण प्रकट झाल्याचे मला दिसते समाजाचा विकास विरोधावाचून होऊ शकत नाही आणि प्रतिगामी व पुरोगामी शक्तीचा विरोध हे एक समाजविकासाचे शाश्वत लक्षण आहे हे प्रत्येक वास्तववादी मनुष्याने मान्य केले पाहिजे हा विरोध केव्हा राष्ट्राराष्ट्रामध्ये निर्माण होईल तर तो केव्हा वर्गावर्गामध्ये निर्माण होईल.

आतापर्यंत आपलें राष्ट्र ज्या प्रकारच्या राजकीय लढ्यात गुतले होते त्याचे स्वरूप प्रामुख्याने राष्ट्राराष्ट्रातील लढ्याचे अथवा विरोधाचे होते हा राजकीय विरोध नाकारणे हे सत्याग्रहींना शक्य नव्हतें. म. गाधीनीं हा विरोध नाकारला नाहीं तर तो विरोध सत्याग्रहाच्या मर्यादा उल्लंघून जाणार नाही एवढी दक्षता घेतली. ते या विरोधात केवळ तटस्थ राहिले नाहीत. त्यानी दलित राष्ट्राचा पक्ष घेतला आणि त्या दलित राष्ट्राला सत्याग्रहाच्या वृत्तीने व सत्याग्रहाच्या साधनाने यशस्वी होण्याचा मार्ग दाखवून दिला. त्याचप्रमाणें आज हा देश स्वतत्र झाला असल्याने येथील राजकारणाला प्रामुख्यानें वर्गविरोधाचे स्वरूप येणे अपरिहार्य आहे हे वास्तविक सत्य आहे

व ते कोणीहि सत्याग्रही नाकारू शकत नाही. या वर्गविरोधाने सत्याग्रही मर्यादाचे उल्लघन करू नये व त्यातून रक्तपात न घडता एक वर्गस्थापना व्हावी अशी खटपट करणे एवढेच सत्याग्रही वृत्तीशी सुसगत आहे तेव्हा वर्ग-विरोध व विरोधविकासाचे तत्त्व सत्याग्रही तत्त्वज्ञानाशी विसगत नसून सत्याग्रही क्रातिकारकासहि वर्गविरोध व विरोधविकास ही तत्त्वे आत्मसात् करावी लागणार आहेत सत्याग्रहाची बुद्धिवादी व वास्तववादी दृष्टीने माडणी करताना ही गोष्ट अपरिहार्य आहे.

---

# श्री. दा. सातवळेकर

## प्रचण्ड शक्तीचा आवेश

मनुष्यामध्ये वाणी ही एक प्रचण्ड शक्ति आहे. हिच्यामुळेच मनुष्यामध्ये विलक्षण सामर्थ्य वाढलेले आहे ऋग्वेदाच्या १० व्या मडलातील वाक्सूक्तामध्ये वाणीच्या प्रचड सामर्थ्याचे फारच बहारीचे वर्णन आहे ते या सूक्तामध्यें 'वाणी स्वत च आपल्या सामर्थ्याचे वर्णन करीत आहे ' असा वर्णनाचा प्रसग आहे 'मी स्वत च वाणी आहे मी तेजस्वी राष्ट्रीय शक्ति आहे सर्व धनाचे एकत्रीकरण करण्याचे सामर्थ्य मज वाणीमध्ये आहे सर्व पूज्य देवतामध्ये माझी–वाणीची पूजा प्रथम झाली पाहिजे मी लोकामध्ये पुष्कळच आवेश उत्पन्न करणारी अशी प्रचड शक्ति आहे. अनेक स्थितीमध्ये असणाऱ्या मानवाचे सरक्षण मी अनेक प्रकारानी करते, म्हणून देवसुद्धा मला विशेष मान देतात ज्याला हे सर्व मी सागत आहे ते समजते, त्यालाच अन्न खावयास मिळते जे लोक माझा अपमान करतात, त्याचा नाश होतो मीच लोकाना उग्र, शूर, वीर, ऋषि, मुनि, ज्ञानी व बुद्धिमान बनविते मीच शूराला शस्त्रास्त्रे सज्ज करून देते व त्या शस्त्राने तो वीर ज्ञानद्वेष्ट्या घातक शत्रूचा वध करतो मीच लोकहितासाठी युद्ध करते व सर्व जगात प्रचड आवेश उत्पन्न करते या राष्ट्र वर रक्षक अशा राजाला निर्माण करणे माझ्याच आधीन आहे '

## राजा व साहित्यिक

अशा प्रकारचे हे वर्णन प्रत्येक वाङमय–सेवकाने लक्षपूर्वक पाहाण्यासारखे आहे या सूक्तामध्ये वाणीचे प्रचड सामर्थ्य वर्णन केले आहे "सर्व जगातील लहान-मोठ्या राष्ट्रांतील अनत कालच्या इतिहासाकडे लक्ष दिले असता आपणास असें आढळून येईल की, त्या राष्ट्रातील राजकीय, सामाजिक व औद्योगिक अशा सर्व क्रांत्या या सर्व वाणीच्या सामर्थ्यानेच झालेल्या आहेत राजा आपणांस प्रचड सामर्थ्याने युक्त दिसतो खरा, पण तो आपल्या गादीवर तेथपर्यंतच बसूं शकतो की, जेथपर्यंत उत्तम वक्ते व सामर्थ्यवान् लेखक

त्याच्याविरुद्ध आपल्या वाणीचा प्रयोग करू लागले नाहीत केंव्हा केंव्हा राजे लोक आपल्याविरुद्ध असलेल्या लेखकास, वक्त्यास व उपदेशकास तुरुंगात घालताना दिसतात खरे, पण त्यात राजाचे सामर्थ्य व्यक्त होत नसून त्याने राजे हे वाङमयोपासकास भितात, हेच उघड होत असते. राजसत्तेच्या पाठीमागे विद्वानाच्या वाणीचे सामर्थ्य असेल तरच ती राजसत्ता टिकते व जेव्हा हे सामर्थ्य सिहासनाना मिळत नाही, तेव्हा ती उलथून पडलेली दिसतात याचप्रमाणे धर्मक्रात्या काय व औद्योगिक क्रान्त्या काय, या सर्व उलथापालथी या प्रचड वाणीच्या योगाने होत असतात इतिहासाची ही शिकवण पाहिली म्हणजे वाणीच्या प्रचड शक्तीची उत्तम कल्पना येते एवढे सामर्थ्य ईश्वराने मनुष्याजवळ ठेवलेले आहे, पण या शक्तीचा सदुपयोग हा मनुष्य करीत आहे काय ?

## स्फूर्ति देणारें भाषण

प्रभावशाली वक्त्याचे भाषण ऐकून निरुत्साही लोक प्रचड उत्साहाची कामें करण्यासाठी उठून उभे राहतात, तर कित्येक लोक निधड्या छातीने शत्रूच्या तोफेच्या माऱ्यासमोर उभे राहण्यासहि सिद्ध होतात व आपणास असमर्थ समजणारे लोक विलक्षण सामर्थ्य दाखवू शकतात. आजपर्यंत मनुष्याकडून जी मोठमोठी कामे झाली आहेत, ती या वाणीच्या प्रेरणेमुळेच झालेलीं आहेत त्याच्या उलट नेभळ्या उपदेशाने सत्ववान् लोकसुद्धा पारतन्त्र्यात कुजत पडलेले आहेत, असे आपणास इतिहासात दिसून येईल. "वाणीचा सदुपयोग केला म्हणजे मनुष्याची उन्नति होऊ शकते व तिच्याच दुरुपयोगानें मानवाची अधोगतीहि होते."

वाणीची शक्ति अग्नीप्रमाणे आहे. अग्नि हा मनुष्याना सहाय्यकहि होऊं शकतो व मारकहि होऊ शकतो. कोणतीहि शक्ति स्वत: काहीच करू शकत नाही ! तिला जसे वापरावे तसे तिच्यापासून हित किवा अहित होऊ शकते ! म्हणून कोणतीहि शक्ति प्राप्त झाली असता मनुष्याने आनद मानू नये, तर तिचा चांगला उपयोग करण्याची पात्रता आपल्या अंगी असली तरच तिच्यापासून कांहीं तरी फायदा होईल, हे नीट लक्ष्यांत ठेवावे. मनुष्याजवळ वाणी ही मोठी प्रचंड शक्ति आहे खरी पण मनुष्याला तिच्या शक्तीचा म्हावा तसा

उपयोग होत नाही, याचे कारण मनुष्य या शक्तीचा उपयोग फारच निष्काळजीपणानें करीत आहे, म्हणून फायद्यापेक्षा केव्हा केव्हा नुकसानच अधिक झाल्याचे दिसत आहे असे होऊ नये म्हणून ऋषीनी फार चागली सूचना दिलेली आहे ती पाहा —

कल्याणकारक भाषण बोला व ऐका

**भद्रं कर्णेभिः शृणुयाम देवा भद्रं पश्येमाक्षिभिर्यजत्रा ॥**

(ऋग्वेद १।८९।८)

समाजामध्ये अशी परिस्थिति उत्पन्न झाली पाहिजे की, "कानाना चागलेच शब्द ऐकावयाला मिळावे व डोळयानी वाचावयाचे शब्दहि चागलेच दिसत असावे" वरील मत्रात 'भद्र' असा शब्द आहे कानानी भद्र विचार ऐकले व डोळयानी भद्र विचार वाचले, तरच माणसाची उन्नति होणे शक्य आहे असे न होता जर अभद्र शब्द आमच्या कानावर पडू लागले व अभद्र विचार वाचण्याचा परिपाठ सुरू झाला, तर समाजहि अभद्र स्थितीला जाऊन पोचल्याशिवाय राहणार नाही.

भद्र विचार म्हणजे उन्नतिकारक, उच्च अवस्थेकडे नेणारे, खरें हित करणारे तेजस्वी विचार होत ज्यानी आपली शक्ति वाढेल, बल वृद्धिगत होईल व आपले तेज व यश चहूंकडे पसरेल, ते भद्र विचार होत

याच्या उलट जे विचार असतील, ते अभद्र विचार होत सध्या जे काय आपण वाचतो व ऐकतों, ते 'भद्र' आहे की 'अभद्र' आहे, याचा विचार वाचकानी केला पाहिजे

वाचताक्षणीच मनास बरे वाटणारे वाङ्मय 'भद्र' असते, असे कोणीहि समजू नये. जगात अशा पुष्कळच गोष्टी आहेत की, त्या पाहताक्षणीच आपले मन हरून नेतात व त्या मनाला बऱ्याहि वाटतात, पण परिणामी हानिकारक असल्यामुळे त्या त्याज्य आहेत, असे विचारी लोक मानतात परदेशी कपडा, चहा, कॉफी किंवा स्वदेशी भजी, चिवडा व चमचमीत मसालेदार पदार्थ हे सर्व मनास बरे वाटतात, सर्वास आवडतात, याचा खपहि फार होतो, म्हणून हे हितकारक व चागले आहेत असे जर कोणी म्हणेल, तर तें मात्र चूक आहे. त्यापेक्षा तत्क्षणी मनास न आवडणारी खादी, तात्काळ न आवडणारे सात्विक खानपान, हेच मनुष्यास सर्वतोपरि हितकारक आहे.

वाङमयाचेहि असेच आहे. जे वाङमय पुष्कळ खपते, लोकास चटक लावते, वाचकाचे मन आकर्षून घेते, तेच हितकारक आहे, असे मानणे हा वाचकाचा भ्रम आहे व असे जे समजतील, त्या वाचकाची फसवणूक होत आहे, असे समजावे नियमच जर बांधावयाचा असेल, तर असे समजण्यास हरकत नाही की, "जे वाङमय अधिक खपते, नेमके तेच हानिकारक असते," कारण सर्व-साधारण जनतेची रुचि बरे–वाईट समजण्याइतकी शुद्ध असत नाही जेवढे हानिकारक, अपायकारक व घातक असेल, तेवढे लोकास घ्यावेसे वाटते तबाखू व दारू पिण्याचा उपदेश कोणी करीत नाही, पण त्याचा खप फारच वाढत आहे, पण ही व्यसने सोडा, असे सांगण्यासाठी मोठमोठ्या संस्था आहेत, तरी त्याचा फारसा उपयोग होत नाही याचे कारण जनतेची पडण्या-कडे प्रवृत्ति आपोआप असते, तशी ती उठण्याकडे नसते, यासाठी हीन वाङ-मय लिहिणारे व प्रसिद्ध करणारे या जनतेच्या सर्वसाधारण प्रवृत्तीचा फायदा करून घेतात व आपली कमाई करून यशस्वी झालो, असे समजतात, पण त्यांचें यश हे जनतेचे मरण आहे, हे त्यासहि कळत नाही व जनतेस तर कळणे शक्यच नसते, मांस खावे, मद्य प्यावे व यथेच्छ विहार करावे, ही तर सर्व प्राण्याची प्रवृत्तीच आहे याच प्रवृत्तीला उत्तेजन देणारे जे लेख असतील, तेच लोकास आवडणार ! याच्या उलट संयम करा, कर्मफलाचा त्याग करा, असे विचार लोकास सहजासहजी आवडणारे नाहीत म्हणून असें प्रतिपादन करणारे लेख जनता नापसंत करणार, हे अगदी उघड आहे हे जरी उघड असले तरी राष्ट्राची भवितव्यता ज्या लेखकावर व ज्या वाङमय–सेवकावर आहे, त्यानी काय लिहावे, काय छापावे व कशाचा प्रचार करावा, याचा विचार केला पाहिजे.

## प्रचाराचें साधन

मनुष्याजवळ वाणी फार प्राचीन काळापासून होती, पण सध्या जसें प्रचाराचे साधन त्याच्याजवळ आलेले आहे, तसे ते यापूर्वी नव्हतें, म्हणून सध्या लहान बेगावध लेखापासून जसा जनतेचा नाश होऊ शकतो, तसा नाश होण्याचा पूर्वी संभवच नव्हता

जेव्हा कित्येक लोक म्हणतात की, "पूर्वीच्या संस्कृत कवीनीहि भाण-

प्रहसनादि अश्लील रचना केलेल्या आहेत, मग आम्हासच तशा रचना करण्यास का प्रतिबंध करण्यात येतो ?" असा प्रश्न करणारे शांत डोक्याने थोडासा विचार करतील, तर त्यास तेव्हाच कळून येईल की, पूर्वीच्या अश्लील काव्याने सध्याप्रमाणे नुकसान होणे शक्य नव्हते समजा, एखाद्या संस्कृत कवीने एखादे अश्लील काव्य केले, तर त्याच्या हजार पाचशे वर्षात पाच चार प्रती निघत व फक्त संस्कृत जाणणाऱ्या पंडितास माणसांनाच त्याचा दुष्परिणाम सोसावा लागे मध्यकाली तर संस्कृत भाषा ही जनतेची दैनिक व्यवहाराची भाषा मुळीच नव्हती व ग्रंथाच्या पुष्कळ प्रती निघण्याची युक्तिहि तेव्हा नसल्यामुळे कवीचे बरेवाईट विचार कवीमध्येच राहात, किंवा फार तर त्याच्या दहापाच इष्टमित्रापर्यंत ते पोचत यापेक्षा त्याचा जास्त प्रसार होत नसे

## हीन वृत्तीला प्रोत्साहन

पण आजची स्थिति किती भयंकर आहे पहा. ज्याला लिहिता वाचता येते, त्याने हवे ते अचकट विचकट लिहावे, छापण्याच्या खर्चाची व्यवस्था करता आली की, हव्या तितक्या प्रती छापाव्या. आणा, दोन आणे, तीन आणे, चार आणे-माला काढाव्या, अधिक प्रसार व्हावा म्हणून जनतेस आवडतील त्याच वैषयिक गोष्टी लिहाव्या, विशेषत स्त्रीविषयक सुखसंबंधाची भडक कल्पनाचित्रे रेखाटावी, चित्रकाराकडून सुंदर स्त्रियांचे रंगीत मुखवटे काढून ते पुस्तकावर उठावदार छापवावे व आतहि तशीच सूचक चित्रे द्यावीं, शक्य ते करून सर्वसाधारण जनतेमध्ये स्वाभाविक असणाऱ्या भोगवासनेस व विलासप्रवृत्तीस चालना देता येईल तितकी द्यावी, जनतेचें यातच हित आहे, असे दाखवणाऱ्या शब्दयोजना करून भडक जाहिराती द्याव्या, स्वदेशी मालाचा किंवा ग्राहकाच्या हिताहिताचा विचार न करता जे पैसे देतील त्याच्या हव्या त्या जाहिराती छापाव्या व त्याहि वाचनाच्या मजकुरात छापाव्या, प्रथमत. उत्तेजक दिसणारी पण शेवटी निर्वीर्य करून सोडणारी औषधे, रॉकेलात तयार केलेली केशभंजक तेले, . पुढीत . गुण दाखविणारी विलासचूर्णे, संततिनियमनाची पण विषयप्रवृत्ति वाढविणारी साधनें, या प्रकारच्या हव्या त्या नाशक व घातक पदार्थांच्या जाहिराती, पैसे

कमाविण्यासाठी छापून त्या ग्राहकाच्या घरी अगदी बायकामध्ये व मुला-मुलीमध्ये पसरवाव्या व आपण स्वत त्याच्या आरोग्यावर आणि नीतिमत्ते-वर अग्नि ठेवून आपली पोळी पिकवीत असताहि, आपणच या सर्व स्त्री-पुरुषाचे व तरुणाचे हित करीत आहो, अशी द्वाही फिरवावी ! ! ! हा प्रकार जो सध्यां राजरोस चालू आहे, असा पूर्वी केव्हाहि चालू नव्हता सस्कृत-मध्ये एखादे अश्लील नाटक असले तरी ते त्याच्या पासगालाहि लागणार नाही. सध्यां जशी ही आरोग्याचा सहार करणारी अवदसा सहार करण्या-साठी थैमान घालीत आहे तशी ती कोणत्याहि कालामध्ये पूर्वी घालीत नव्हती !

संस्कृतातील काही अश्लील नाटकाच्या अस्तित्वाने सध्याची कृति कधी-हि समर्थनीय होऊ शकणार नाही सध्याची नवीन सस्कृति येण्यापूर्वी साधु-सत, कवि, हरिदास, पुराणिक व प्रवचनकार हे सर्व जनतेमध्ये एकच आध्यात्मिक वायुमडल उत्पन्न करण्यामध्ये दग झालेले आपणास दिसतात व त्याच्या त्या पवित्र कृतीचा सर्व जनतेवर एक फारच गभीर असा परि-णाम झालेला आहे, ही गोष्ट आजहि आपल्या अनुभवास येत आहे इतर कोणत्याहि देशातील सर्वसाधारण जनतेमधील शेपन्नास लोक घेतले व त्याच्यात जी ' खावे प्यावे व काय वाटेल ते करून गमत करावी ' एवढीच पाशवी वृत्ति दिसते, ती पाहिली व त्याच पायरीवरील आपल्या देशांतील लोक पाहिले म्हणजे वरील साधुसंतानी येथे जे कार्य केले, ते अजूनहि लोप-लेले नाही व त्या योगानेच आपल्या लोकामध्ये माणुसकी शिल्लक राहिलेली आहे, या गोष्टीचा प्रत्यय येतो.

" वाणीचा उपयोग करून श्रोत्याच्या किवा वाचकाच्या मनातील पाशवी भाव कमी केला पाहिजे व सात्त्विक दैवी भाव वाढविला पाहिजे." तो तसा सध्याच्या लिखाणाने होत आहे की काय, याचा विचार करण्याची वेळ सध्या आलेली आहे "नराचा नारायण व पुरुषाचा पुरुषोत्तम बनला पाहिजे; प्रत्येक ' जीवाचा ' शिव बनला पाहिजे, प्रत्येक स्त्री महालक्ष्मी बनली पाहिजे ; यासाठी साधुसतानी प्रयत्न केले, आपल्या वाणीचा सदुपयोग केला व अशत तरी कार्य करून दाखविले त्याच्या वेळेस छापखाने, वृत्तपत्रे, मासिकपत्रें, टपालाची सोय वगैरे काही नव्हते, तरी त्यानी लाखो लोकास राक्षस-

मार्गावरून काढून दैवी सन्मार्गावर आणले, हे आपण आजहि पाहात आहो. त्याच्या काळी वाङ्मयप्रसाराच्या ज्या सोयी नव्हत्या, त्या आज आपल्याजवळ आहेत. दैनिके काढून, साप्ताहिके छापून, मासिके प्रसृत करून नियमितपणे लाखो लोकाशी आज आपणास बोलता येते व त्यास माहित नसलेली गोष्ट समजावून देता येते. या साधनाचा योग्य उपयोग वाङ्मयसेवक आज करीत आहेत काय ? सध्या ज्या रीतीचे वाङ्मय–लेखन चालू आहे, त्यापैकी कितीसे वाङ्मय जनतेस राक्षस बनण्यापासून निवृत्त करून देव बनण्यास प्रवृत्त करणारे आहे ?

नियतकालिकामध्ये अर्ध्या अधिक जाहिराती असतात. त्या देशी धद्यास उत्तेजन देणाऱ्या, लोकाचे स्वास्थ्यसुख वाढविणाऱ्या, लोकास सत्प्रवृत्त करणाऱ्या किती असतात ? मजकुरामध्येहि अशीच छाननी केली, तर नरा ( Man ) चा नारायण ( Superman ) बनेल, अशा प्रकारचे लिखाण किती असते, हे एक वेळ पाहिले पाहिजे, म्हणजे सध्याच्या लोकाकडे एवढी योग्य साधने आली असताहि लोक त्याचा दुरुपयोग करून आपली हानि कशी करून घेत आहेत, हे ध्यानी येईल.

## मुद्रणकलेचें साहाय्य

वक्तृत्व, लेखन, काव्य आदि प्रकारानीच केवळ आपण शिक्षणाचे कार्य करीत नसून नियतकालिके हीहि शिक्षणाची उत्तम अगेच आहेत छापण्याची कलाहि त्यास मिळाल्यामुळे पराकाष्ठेचे उत्तम साधन आज लोकाच्या हाती आले आहे ऋषिकाली किवा संताच्या काळी जे काम करण्यासाठी ५०० वर्षे लागत, ते कार्य आज वर्ष सहा महिन्यात घडवून आणता येईल, पण लेखकानी व मुद्रकानी नराचा नारायण बनविण्याचे ध्येय आपल्या दृष्टीसमोर ठेवून लेखनास प्रवृत्त झाले पाहिजे, तरच ते साध्य होईल, पण सध्या प्रवृत्ति कशी आहे? जो काम मनुष्यामध्ये स्वभावतच प्रबल आहे, तोच शक्य तितका अधिक वाढावा, अशाकडे काही लेखकाचा कल आहे व त्याच लेखकास थोडी धनप्राप्ति अधिक होते, असे पाहून इतरहि तिकडेच झुकत आहेत। कित्येक मासिककारानी आम्हास असे स्पष्ट सागितले की, अमुक प्रकारचे शृगारिक चित्र मुखपृष्ठावर असले तरच आपले मासिक खपते, नाहीतर

त्याकडे कोणीसुद्धा पाहात नाही. यामुळे जी मासिके निघताना राष्ट्रीय ब्रीद पुढे ठवून निर्विकार वाङमय छापावे म्हणून निघाली, तीच आता आतबाहेर श्रृंगारिक बनलेली आहेत !!

'बोलपट' हेहि एक शिक्षणाचे नवे साधन आपणाकडे आले आहे प्रारंभी चित्रपट पाहून लोक चोऱ्या करू लागले व अशाच तऱ्हेची अनिष्ट कारस्थाने करू लागले, असा विलायतेत व येथेहि बराच बोभाटा झाला स्त्रैण वृत्ति बळावली, अशीहि गुणगुण बरीच झालेली आहे, काही अश्लील दृष्याना बदी करावी, अशा प्रकारची चळवळ झाली व शेवटी सरकारीरीत्या चित्र-पटाचे नियत्रण करणारे मडळ स्थापित झाले ते आपले काम नीट करते आहे की नाही, हा प्रश्न स्वतत्र आहे पण एवढी गोष्ट खरी की जे जे साधन भौतिक शोधानी माणसाकडे येत आहे, त्याचा त्याचा दुरुपयोग होत आहे जसा लेखनाचा, मुद्रणाचा त्याचप्रमाणे पटाचा व बोलपटाचाहि दुरुपयोग होत आहे याचे कारण काय बरे असेल? आमच्या दृष्टीने याचे कारण हेच आहे की, " विदेशात व स्वदेशात जे शिक्षण दिले जाते, त्यातून सामान्य धर्मभावनेला उच्चाटण मिळाले आहे "

यावरून वाचकाच्या लक्षात आलेच असेल की, वाङमयप्रसाराची इतकी उत्तमोत्तम साधने मनुष्याकडे आली असताहि त्यापासून मानवी समाजाची खरी उन्नति होण्याच्या दृष्टीने फारशी प्रगति झालेली नाही, इतकेच नव्हे तर प्रवृत्ति दुसऱ्याच बाजूला वहात चाललेली आहे! यावरून प्राप्त झालेल्या साधनाचा दुरुपयोग होत आहे, असे कष्टाने म्हणावे लागत आहे याच कारणाने एकदरीत मनुष्याची शक्ति दीर्घायुष्य, निरोगीपणा व मानसिक शाति या बाबतीत प्रत्यही हानि होत चालली आहे. वस्तुत ज्ञानाने यात प्रगति झाली पाहिजे, पण तसे होत नाही

अहिसा – सत्य – अस्तेय – ब्रह्मचर्य – अपरिग्रह

पावित्र्य – सतोष – तप – स्वाध्याय – ईश्वरप्रणिधान.

ही दहा लक्षणे मानवी धर्माची सामान्यत: आहेत या धर्माकडे शिक्षिताची प्रवृत्ति होईल, असा शिक्षणक्रम नाही याच्या उलट प्रवृत्ति वाढावी, अशा प्रकारचे साक्षरतेचे शिक्षण वाढत आहे यामुळे मनुष्याजवळ आलेले प्रत्येक साधन मानवी हिताच्या कामी न लागता ते घातपाताच्या कार्याकडे लावले

जाते नाही तर ही सर्व साधने मनुष्याचे हित करण्यास समर्थ आहेत, पण त्याचा उपयोग संहार करण्याकडे होत आहे! म्हणूनच वाईट वाटते

जो अश्लीलपणा वाङमयात आहे, तोच चित्रपटात व बोलपटातहि दिसत आहे सर्वत्र मन एकाच दिशेने कार्य करीत आहे. सर्व साधनाचा उपयोग एकाच मार्गाने केला जात आहे," यामुळे अमृतहि विषसमान होऊ लागले आहे 'वास्तविक पाहाता मनुष्यामध्ये असलेली बुद्धि अशी सामर्थ्यवान् आहे की, तिच्यायोगाने विष अमृतासारखे हितकर बनवता येईल, पण येथे प्रत्यक्ष अमृतासारखी प्रचड शक्तिशालिनी वाणी आपणाकडे असता, तिचा उपयोग करून काही लोक आपलाच घात करून घेत आहेत !

लेखकानी आपणावरील ही जबाबदारी ओळखावी आज क्षणभर फायदा दिसत आहे, म्हणून हीन वाङमय निर्माण करण्यामध्ये आपल्या शक्तीचा अपव्यय करू नये, यापेक्षा लिखाण न लिहिले तरी त्यापासून कोणाचे अहित होणार नाही ज्या लेखकाच्या लेखणीमध्ये काही शक्ति आहे, त्यानी तर आपल्या देशाची स्थिति पाहून व विचार करून विशिष्ट उच्च वातावरण निर्माण करण्यासाठीच तिचा उपयोग केला पाहिजे आपला देश जर आज पारतन्त्र्यात असेल, तर त्याची जबाबदारी वक्ते व लेखक यावरच सर्वस्वी आहे, हे त्यानी विसरून चालावयाचे नाही

ज्या वाङमयाने नीति स्थिर राहात नाही, वाचकाची व्यभिचाराकडे प्रवृत्ति होते व विकारी मनोभावना उत्तेजित होऊन आरोग्यहि नाश पावते, त्या वाङमयाचा सर्वत्र निषेध झाला पाहिजे सर्व समाजाची स्थिरता स्त्री-पुरुषविषयक व्यवहाराच्या नीतीवर अवलबून आहे, हे लेखकानी विसरता नये. नीतीचा पाया ढासळला की, समाज विस्कळित झालाच म्हणून समजावे. व एकदा का अशी घसरगुडी लागली, म्हणजे पुढे ती सुधारणे कठीण होणार आहे, म्हणून वक्ते, लेखक व इतर वाङमय-सेवक यानी या गोष्टीकडे विशेष लक्ष द्यावे, अशी त्यास विनति आहे.

# शं. वा. किर्लोस्कर

## महाराष्ट्रांतील औद्योगिक क्रांति

गल्या पन्नास वर्षांत जे महत्त्वाचे फेरबदल महाराष्ट्राच्या जीवनात घडून आले, त्यात या प्रांताचे औद्योगिक क्षेत्रातील पदार्पण व प्रगति याचा प्रामुख्याने उल्लेख करावा लागेल.

पन्नास वर्षांखाली महाराष्ट्रीयांच्या मालकीचे व त्यांनी चालविलेले कारखाने आपल्याकडे फारच थोडे अस्तित्वात होते त्यांची संख्या हाताच्या बोटावर मोजण्याइतकी देखील भरली नसती. त्या वेळी तुम्ही हिंदुस्थानात तयार झालेली एक साधी काड्याची पेटी अथवा शिसपेन्सिल घेण्याकरिता कुठल्याहि बाजारात गेला असता तरी ती मिळू शकली नसती. लहान मुलांच्या खेळण्यापासून आगगाडीच्या एंजिनापर्यंत हरएक प्रकारची वस्तु तेव्हा विलायतेहून येत असे. हिंदुस्थानातील संपत्तीला व उद्योगधंद्यांना त्यामुळे प्रचंड ओहोटी लागून साऱ्या राष्ट्रावर उपासमारीची पाळी येणार असे दुश्चिन्ह दिसू लागले.

त्या काळच्या लोकांची कल्पनाहि अशी, की मॅंचेस्टरच्या कापडासारखे तलम कापड, पीयर्ससारखा उंची प्रतीचा साबण अथवा रॉजर्ससारखी चाकू, कात्री तयार करण्याची पात्रता केवळ इंग्रज लोकांत आहे आपल्या महाराष्ट्रीयांना ते काम जुळण्यासारखे नाही त्यामुळे कोणी त्या दिशेने प्रयत्न करण्याचे मनात आणल्यास त्याला उत्तेजन न मिळता त्याची कुचेष्टाच होई

परंतु तो जमाना आता बदलला आहे. महाराष्ट्रातील बहुतेक शहरांतून आता लहानमोठ्या कारखान्यांची व गिरण्यांची चक्रे फिरू लागली असून त्यातून कापडचोपड, यंत्रसामान, चॉकोलेट, बिस्किटे, गव्हाचे पोहे, रबरी फुगे, कंदील आणि प्रयोगशाळेत लागणारे सामान इत्यादि विविध प्रकारच्या वस्तू बाहेर पडत आहेत काचेचे सामान, कागद, सुधारलेली शेतीची औते आणि साखर व गूळ तयार करणारे तर आपल्याकडे मोठमोठे कारखाने नावारूपाला आले असून, त्यामुळे महाराष्ट्राचे औद्योगीकरण झपाट्याने चालू

आहे. औद्योगिक क्षेत्रात इंग्लड-अमेरिकेमारख्या जगात अग्रेसर असलेल्या देशाच्या मानाने अर्थात् आपण अद्याप किती तरी मागे आहो. एवढेच काय, पण आपल्याच देशात गुजराथी व मारवाडीवर्गाने व्यापार कारखानदारीमध्ये जे बलिष्ठ स्थान पटकावले आहे, त्याच्याशी तुलना केल्यासहि महाराष्ट्रीयाचा नबर खालीच लागेल तथापि, या अल्पावधीतच का होईना महाराष्ट्रीयानी औद्योगिक क्षेत्रात जी सरशी मिळवली आहे, ती खचित अभिनदनीय आहे, आणि तिच्याकडे पाहाता महाराष्ट्रीयाचे पाऊल कारखानदारीत उत्तरोत्तर पुढेच पडत राहील याबद्दल पूर्ण विश्वास वाटतो

## उज्ज्वल बुद्धिवैभव, पण...

सह्याद्रीच्या आसमतात् पसरलेल्या या प्रातात औद्योगिक उन्नतीचे बीजारोपण कसे झाले, त्या रोपाची वाढ करण्यास किती प्रयास पडले, त्याला आपले डोके वर करण्यास कशी सधि मिळाली, व आज या औद्योगिक वृक्षावर कोणीकडून आघात होण्याचा सभव आहे, हा इतिहास मोठा मनोवेधक व विचारप्रवर्तक आहे तो येथे आपल्यापुढे थोडक्यात माडण्याचे मी योजिले आहे.

या ठिकाणी सुरवातीलाच आपणास एक प्रश्न विचारात घ्यावा लागेल तो हा—आपल्या पूर्वजाच्या बुद्धिमत्तेबद्दल, कलाकौशल्याबद्दल व पराक्रमाबद्दल एके काळी सर्व जगाकडून त्याचा गौरव होत होता त्यानी हिदुस्थानला सुधारणेच्या व सस्कृतीच्या उच्च पायरीला नेऊन पोचविले होते पण पुढे ही सुधारणेची वाढ कशाने खुटली ? आमच्या कल्पकतेचा व शोधक बुद्धीचा लोप कशामुळे झाला ? साता समुद्रापलीकडे एका टीचभर बेटावर राहाणाऱ्या आणि आमच्याहून मागासलेल्या लोकाना जे शोध लावता आले, जी यत्रे करता आली, ते काम एवढ्या विशाल भरतखडातील कोट्यवधि जनतेपैकी कोणालाहि करता येऊ नये, हा काय चमत्कार आहे !

आमच्यातील ज्ञानेश्वर आणि इग्लडमधील कॅक्स्टन दोघेहि जुन्या काळातील मोठे पुरुष. नुसत्या बुद्धीचीच परीक्षा केली तर, कॅक्स्टनपेक्षा ज्ञानेश्वराची योग्यता किती थोर ! असे असता छापण्याच्या यत्राचा शोध लावून कॅक्स्टनने मानवजातीच्या प्रगतीला जो प्रत्यक्ष हातभार लावला, तसे कार्य

ज्ञानेश्वर करू शकला नाही बौद्धिक क्षेत्रात ज्ञानेश्वराची परपरा चालविणारे आणखी मोठमोठे पुरुष महाराष्ट्रात होऊन गेले, पण आपल्या रोजच्या व्यवहारासाठी, कामधद्यासाठी अथवा आत्मसरक्षणासाठी जी साधने आपण वापरतो त्याच्यासबधी विचार करून त्यात सुधारणा करण्याचा कोणीच कसा प्रयत्न केला नाही ? ताक घुसळण्याची रवी, दाराला घालण्याचे कुलूप, पाणी काढण्याचा रहाट, प्रवासाची गाडी अथवा लोखड तयार करण्याची भट्टी एक ना दोन, अशा शेकडो बाबतीत विचार करून अधिक सुधारलेली साधनें व कृती शोधून काढणे शक्य होते अग्नि, वायु, जलप्रवाह, यात सामावलेली शक्ति रोज दृष्टोत्पत्तीस येत असता, एकाच्या डोक्यात तरी ही शक्ति आपल्या उपयोगासाठी कशी राबवावी, याबद्दल विचार यावयास पाहिजे होता, पण असा प्रयत्न झाल्याचा मुळीच दाखला मिळत नाही. साऱ्या समाजाची कल्पकता अशी मध्येच कशाने थडावली ?

## चातुर्वर्ण्यानें केलेली कोंडी

हे गूढ मला नीट उलगडत नाही तथापि, या विचित्र घटनेबद्दल बराच विचार केल्यावर असे म्हणावेसे वाटते, की आपल्या आचारविचारात शिरलेल्या काही घातुक कल्पनामुळेच समाजाच्या भौतिक प्रगतीला पायबद बसला चातुर्वर्ण्याच्या कल्पनेत श्रमविभागाचे तत्व साधले असेल, परतु त्यामुळे मनुष्याच्या स्वतत्र विचारशक्तीला वाव ठेवला गेला नाही प्रत्येकाचे काम त्याला नेमून दिलेले. त्यानेहि एका ठराविक पद्धतीनेच ते केले पाहिजे असा दडक. प्रत्येकाचे हात अशा रीतीने बाधून टाकल्यावर एखादा नवा प्रयोग करण्याला कोण रिकामा मिळणार ? त्यात निवृत्तिपर वेदान्ताचे म्हणजे निष्क्रियतेचे समाजात बड वाढल्यावर आपले उद्योगधदे व त्यासाठी लागणाऱ्या यत्रसाधनाची सुधारणा करण्याची कोण उठाठेव करतो ! जो तो मोक्षाच्या मागे लागलेला ! इतर वर्गाच्या मानाने ब्राह्मणाला आपल्या बुद्धीचा विकास करण्यास अधिक स्वातत्र्य, पण ही बुद्धि रोजच्या स्नानसध्येत आणि मत्रपठनात अडकलेली त्यामुळे समाजाच्या प्रगतीसाठी हालचाल करणे तिलाहि कठीण होऊन बसले. समाजाच्या आचारविचाराना जडलेली ही विकृति साऱ्या राष्ट्राच्या यात्रिक सुधारणेला मारक होऊन बसली !

या विकृत विचारसरणीचे प्रायश्चित्त आपल्याला अखेर पुरेपूर द्यावे लागले इग्लड-युरोपमध्येहि बायबलप्रणीत धार्मिक कल्पनानी शास्त्रीय सुधारणाचा आघ थोपवून धरण्याचा मोठ्या निकराने प्रयत्न केला पण त्याविरुद्ध बड करून यत्रशोधकानी आपले काम पुढे चालू केले लोखडाचा रस करून ते ओतविण्याची कला युरोपात वाढीस लागली तोफ ओतण्याची युक्ति तिकडूनच प्रथम तुर्कस्तानात आली व पुढे जेव्हा मुसलमानाच्या स्वाऱ्या हिदुस्थानात होऊ लागल्या त्यात त्याच्या तोफाच्या भडिमाराला हिदु सैन्य तोड देऊ शकेना हिदु सैन्याची सारी मदार त्याच्या तरवारीवर, अश्वदळावर व गजदळावर ! सुधारलेल्या यत्रशास्त्रापुढे भरतखडाला शरण जावे लागले !

विजापूरची मुल्कमेदान नावाची अजस्र तोफ चलीबी रूमीखान नावाच्या सरदाराने ओतली तालीकोटच्या लढाईत याच सरदाराने ६०० तोफानिशी रामरायाच्या सैन्याबरोबर युद्ध केले रामराय मोठा शूर पुरुष पण नुसत्या शौर्याचा काय उपयोग ! मुसलमानानी त्याच्या सैन्याचा धुव्वा उडविला. स्वत रामरायहि युद्धात मारला गेला व विजयनगरचें वैभवशाली हिंदु साम्राज्य त्याच्याचबरोबर लयाला गेले

अध्यात्मचिंतनात गढलेल्या भारतवासीयानी त्या वेळी आपली दृष्टि थोडी बाहेरच्या जगाकडे टाकली असती, युरोपात ज्या यत्रविज्ञानाचा विकास चालला होता, ते अभ्यासण्यास काही हिंदी कोलबस तिकडे रवाना करण्यात आले असते तर ? पण हे जमणार कसे ? समुद्रगमन तर धर्मानेच निषिद्ध करून ठेवलेले, तेव्हा बाहेर पाय काढण्याची गोष्टच नको तिकडचे युरोपीय, तुर्क, अरब, हबशी व्यापारी व प्रवासी वाटेल तसे हिदुस्थानात येत, पण त्याच्या देशात जाण्याची कोणा हिंदूची प्राज्ञा नाही मग आम्ही जगाच्या मागे पडल्याशिवाय कसे राहणार ? विलायतेला पहिला ब्राह्मण गेला तो १७८१ साली नाव हणमतराव राजापूरचा राहणारा इग्रजाचे साहाय्य मागण्यासाठी रघुनाथराव पेशव्याने त्याला इग्लडला धाडला तिकडे असतानासुद्धा त्याची स्नानसध्या चुकली नाही या कर्मनिष्ठपणापायी त्याचे अत्यत हाल झाले व मोठ्या शर्तीने तो जगूनवाचून परत मायदेशाला आला या साहसी ब्राह्मणाचे स्वागत तो परत आल्यावर कसे झाले असावे, असे वाटते? त्याला राजापूरकर ब्राह्मणानी धर्मभ्रष्ट ठरवून वाळीत टाकला शेवटी

आपला गाव टाकून गुजराथेत भडोचला जाऊन त्याला राहावे लागले व तिकडेच त्याचा शेवट झाला

## यंत्रांचें सामर्थ्य ओळखलें नाहीं

शिवाजीमहाराजाना स्वराज्य स्थापण्याच्या कामी ज्या समशेरीचा उपयोग झाला ती प्रसिद्ध भवानी तरवार हिंदुस्थानात तयार झाली नव्हती, तर पोर्तुगालमधील एका कारागिरानें तिकडे केली होती, असा आता दाखला सापडतो. आम्ही उत्कृष्ट पोलाद तयार करण्याचे शास्त्र अवगत करून घेतले असते तर अशी का पाळी आली असती ? पुढे या देशात इग्रज आले, त्यानी येथे युद्धसामुग्रीचे कारखाने चालू केले ते पाहून तरी असले मोठे कारखाने पुण्यास उघडावयाचे, पण ते आपल्या हातून झाले नाही दुसऱ्या बाजीरावाचे इग्रजाशी वितुष्ट, पण एल्फिन्स्टनसाहेबाकडेच आपला वकील पाठवून तोफासाठी दारू विकत देण्याबद्दल बाजीराव त्याला काकुलतीने लिहितो याला काय म्हणावे ? ब्राह्मणाच्या रमण्यासाठी लाखो रुपये खर्च करण्याऐवजी पेशव्यांनी सुधारलेल्या बदुकातोफाचे कारखाने काढले असते, तर इग्रजाच्या हातावर राज्याचे उदक सोडण्याची पाळी त्याच्यावर का येती ?

यात्रिक व वैज्ञानिक प्रगतीत आमचे राष्ट्र जगाच्या मागे का पडले, याबद्दल माझी कारणमीमासा वरीलप्रमाणे आहे सुरवातीलाच या मुद्द्याचा इतका खल करण्याचा उद्देश आमच्या चुकीच्या व अनिष्ट विचारसरणीमुळेच आम्ही यात्रिक सुधारणाना कसे पारखे बनलो आणि औद्योगिक दृष्टचा मागसलो हे विशद करावे, हा आहे या घातक कल्पनाच्या तावडीतून अद्यापिहि आपल्या राष्ट्राची सुटका झाल्याचे दिसत नाही आमच्या वद्य पुढाऱ्यानीच आधुनिक यत्राविरुद्ध केवढा गहजब चालविला आहे, तो पाहा. पण यत्राना मज्जाव करून राष्ट्राची प्रगति होणार कशी ? एवढ्यासाठीच महाराष्ट्राची औद्योगिक उन्नति व्हावयाची असल्यास यत्राचे खरे सामर्थ्य ओळखून त्याचा निसकोचपणे स्वीकार करण्यास आपण पुढे सरसावले पाहिजे.

इतर प्राताच्या मानाने महाराष्ट्राची सुपीकता कमी तेव्हा औद्योगिक वाढ झाली, तरच या प्राताचा निभाव लागू शकेल. महाराष्ट्रांत कारखाने काढण्याचे कामहि तितके सोपे नाही. कारण, लोखड, कोळसा आदि मह-

त्याच्या कच्च्या मालाच्या उगमापासून आपण किती तरी दूर, वाहतुकीच्या सोयी इकडे कमी, वाकबगार कामगाराचा अभाव, आणि भाडवल गोळा होण्याची सर्वात मोठी पचाईत तेव्हा महाराष्ट्राचे मोठ्या प्रमाणावर औद्योगीकरण करावयाचे झाल्यास त्यासाठी तितक्याच कळकळीने, नेटाने व पद्धतशीर प्रयत्न झाले पाहिजेत, हे आपोआप लक्षांत येईल.

सुरवातीस म्हटल्याप्रमाणे पन्नास वर्षाखाली कारखाने या नांवाला शोभण्यासारखे फारच थोडे उद्योग महाराष्ट्रात अस्तित्वात होते. नाही म्हणायला मुबईला जावजी दादाजी याचा टाईप करण्याचा कारखाना, घोरपड्याचा पुण्यातील निळ्या काळ्या शाईचा कारखाना, चित्रशाळा, बिवलकराचे आजर्लेमुर्डी येथील वनौषधीचे कारखाने, आणि बारीचा लोखडी घाण्याचा कारखाना, मुढवा पेपर मिल यासारख्या कारखान्याची व मुबई सोलापूरच्या गिरण्याची लोकाना माहिती झाली होती त्या वेळी बटणे, पेन्सिली, चाकू, कात्र्या, इत्यादि वस्तूचे लहान कारखाने काढण्याचे प्रयत्न मधून मधून कोणी करीत, पण त्याची धडपड लवकरच बद पडे

## औद्योगिक क्रांतीचे आद्य सैनिक

या औदासीन्यातून देशाला जागे करण्याचे काम स्वदेशी चळवळीने केले. १९०७ साली बगालच्या फाळणीविरुद्ध हिदुस्थानात सर्वत्र असतोष भडकला आणि ब्रिटिश सरकारला नरम आणण्यासाठी "परदेशी मालावर बहिष्कार घाला व स्वदेशी माल वापरा" हा अमोघ मत्र लोकमान्यानी जनतेला दिला. हा हा म्हणता ही स्वदेशीची लाट चोहोकडे पसरली. परदेशी मालाच्या दुकानावर पिकेटिंग सुरू झाले, विलायती कापडाच्या होळ्या पेटू लागल्या, अनेकानी परदेशी साखर वर्ज्य केली, स्त्रिया परदेशी बागड्याना शिवेनात, व गणपतीच्या मेळ्यातून स्वदेशीच्या प्रचाराची पदे म्हणण्यात येऊ लागली.

या चळवळीमुळे तरुणाची मने स्वदेशी कारखाने काढण्याकडे वळली. सरकारी नोकरी अथवा डॉक्टरवकिलाच्या धद्यापेक्षा स्वतत्र कारखाना काढण्यात खरी देशभक्ति आहे हे तत्त्व या तरुणाच्या मनात बिबले पण त्याना हे औद्योगिक शिक्षण देण्याची कुठे सोय होती ? कित्येक तरुणानी एवढ्यासाठीच परदेशची वाट धरली.

ही उणीव भरून काढण्याचा प्रयत्न प्रथम अताजी दामोदर काळ्यानी पैसाफड काढून सुरू केला त्याच्या योजनेला लो टिळक व नानासाहेब देशमुख याचा हार्दिक पाठिबा मिळाला या पैसाफडातून तळेगाव येथे काच कारखाना सुरू झाला त्यासाठी जपानहून तज्ज्ञ मागविले या कारखान्याशेजारीच प्रो विजापूरकर यानी राष्ट्रीय वृत्तीची जोपासना करण्यासाठी आपले ‘ समर्थ विद्यालय ’ सुरू केले.

वरील दोन सस्थातून बाहेर पडलेले विद्यार्थी हे महाराष्ट्राच्या औद्योगिक क्रातीचे आद्य सैनिक असे म्हणावयास हरकत नाही त्याच्यापैकी काहीची नावे आता त्याच्या कारखान्यामुळे सर्वविश्रुत झाली आहेत श्रीपादराव ओगले व त्याचे बधु यानी महाराष्ट्रातच नव्हे तर या प्राताबाहेर मोठमोठे काच-कारखाने चालविले आहेत नारायणराव नायकानी रेशमाच्या धद्यात मोठीच आघाडी मारली आहे सुपनेकर व कुलकर्णी यानी होजिअरीचा धदा यशस्वी करून दाखविला आहे काचेच्या धद्यातच चादोरकर, पडित, भावे, काळे इत्यादि मडळी ठिकठिकाणी आपले उद्योग चालवीत आहेत समर्थ विद्यालयातील विणकाम–शिक्षक विष्णुपत वेलणकर यानी सागलीला गजानन मिल स्थापन करून विणकामधद्यात कोणते पद गाठले, हे त्याच्या नुकत्याच झालेल्या सुवर्णतुलासमारभावरून सहज लक्षात येईल याखेरीज आणखीहि काही तरुण निरनिराळ्या उद्योगात शिरले

याच वेळी इकडे औद्योगिक क्षेत्रात पाऊल टाकलेल्या इतर काही व्यक्तीना पुढे सरसावण्यास विशेष सधि मिळाली बेळगावला लोखडी नागर करण्याचा लक्ष्मणराव किर्लोस्कराचा कारखाना, सोलापुरास गरम झरे तयार करणारा डॉ किर्लोस्कर याचा कारखाना, शेगा फोडण्याची यत्रे करणारे सागलीचे भिडे, दाडेकर, फडके याचे कारखाने, तादूळ सडण्याची यत्रे करणारा भिवडी येथील दाडेकराचा कारखाना, गज्जर याचे बडोद्याचे अलेबिक वर्क्स व लक्ष्मणराव टिकेकराचा लुगड्याचा कारखाना याना हळूहळू तेजी येऊ लागली

## कारखान्यांनीं केलेली सामाजिक क्रांति

तथापि, महाराष्ट्रात केवळ एक औद्योगिक क्रातीच या वेळी सुरू झाली असे नाही, तर तिच्याबरोबर एका महत्त्वाच्या सामाजिक क्रातीचाहि घरात

प्रवेश होत होता. पूर्वापार चालत आलेल्या चातुर्वर्ण्य व्यवस्थेत प्रत्येक जातीला धदा ठरवून दिला होता परतु ते बधन महाराष्ट्रीयानी कारखानदारी चालू करिताच त्याना झुगारून द्यावे लागले स्वत ब्राह्मणच जिथे लोहार, सुतार, गवडी, विणकर, चितारी बनू लागले, तिथे इतर जातीनी मात्र विवक्षित धदाच केला पाहिजे, ही सक्ती कशी चालणार ? याचा अर्थ असा की, कारखाने येताच औद्योगिक क्षेत्रात प्रवेश करण्याची समाजातील सर्व वर्णांना समान सधि मिळू लागली.

म गाधीनी आयुष्याच्या उत्तरार्धात हरिजनोद्धाराची चळवळ हाती घेतली आणि तेवढ्यासाठी अस्पृश्याना देवालये खुली व्हावी म्हणून प्रयत्न चालू ठेवले पण महाराष्ट्रीय कारखानदारानी अस्पृश्याना आपल्या कारखान्याची फाटके उघडी ठेवून त्याची अस्पृश्यता किती तरी वर्षापासून झाडून टाकण्याचे काम चालविले आहे, हे कोणी विसरता कामा नये

मोठमोठ्या क्रात्या अशाच नकळत घडून येत असतात मोटारगाड्याचे याच सुमारास हिदुस्थानात आगमन झाल्यामुळेदेखील आपल्या सामाजिक जीवनात व आचारविचारात केवढी तरी क्राति घडून आली औद्योगिक क्षेत्रापुरतेच बोलावयाचे तर मोटार–बसच्या धद्यामुळे देशव्यापी यात्रिक शिक्षणाची एक शाळाच उघडल्यासारखे झाले

## औद्योगिक नवरचना कशी असेल ?

या वेळी आमच्या राष्ट्रीय पुढाऱ्यानी एकविचाराने हिदुस्थानची भावी आर्थिक व्यवस्था कशी करावयाची, हे नि सदिग्धपणे ठरविणे जरूर आहे. त्याशिवाय त्याच्या आश्वासनाचा फारसा उपयोग होणार नाही याचे सरळ कारण असे–ब्रिटिशाना 'चले जाव' म्हणून घालवून दिल्यानतर येथे जनतेचे राज्य ऊर्फ समाजसत्तावाद स्थापन केला जाईल अशा घोषणा आतापावेतो जिकडेतिकडे ऐकू येत साम्राज्यशाहीबरोबरच भाडवलशाहीचाहि नायनाट केल्याशिवाय राष्ट्रात खरे स्वातत्र्य व समाधान नादू शकणार नाही, अशी विचारसरणी सर्वत्र प्रसृत करण्यात आलेली आहे इग्रजाचा पाय दरवाजा-बाहेर पडला, की त्याच दरवाजातून वरील क्रातीचे पाऊल आत पडणार, अशी सर्वांची त्यामुळे अपेक्षा बनली होती. हे इग्रज तर आता गेल्यासारखे

आहेत, तेव्हा पाहावयाचे इतकेच, की हिंदुस्थानात कोणत्या नमुन्याचा समाज-सत्तावाद यापुढे प्रस्थापित होणार? इंग्लडचा, अमेरिकेचा, की रशियाचा? रशियाचा नमुना पसत असेल तर त्यात खाजगी मालमत्तेला स्थान नाही सरकारनेच उत्पादनाची सर्व साधने आपल्या ताब्यात ठेवावयाची, व सर्व कारखाने सरकारनेच चालवावयाचे मालक व मजूर असे दोन वर्गच ठेवावयाचे नाहीत अर्थात् या व्यवस्थेत खाजगी भाडवलावर कारखाने काढण्याची सोय नाही, अथवा असा प्रयत्न कोणी केल्यास त्याला उत्तेजनहि मिळणार नाही

रशियाने पुढें ठेवलेला कित्ता कॉंग्रेसला नापसत दिसतो तिला कम्युनिझमचे वावडे आहे त्यामुळे तूर्त तरी हिंदी औद्योगिक क्षेत्रात खाजगी भाडवलावर व स्वतःच्या हिमतीवर ( फ्री एंटरप्राइझ ) कारखाने चालविण्याची प्रथाच कॉंग्रेस राजवटीत अस्तित्वात राहाणार असे दिसते असे आहे तर जनतेला व कारखानदारांना याबाबत बुचकळ्यात न ठेवता आपले स्पष्ट धोरण कॉंग्रेसने जाहीर केले पाहिजे हे उघड आहे सुदैवाने या बाबतीत हिंदुस्थान सरकारने अलीकडे दिलेली आश्वासने, विशेषत पतप्रधान प. जवाहरलाल नेहरूचे कलकत्ता येथील भाषण व दिल्लीच्या परिषदेतून निष्पन्न झालेला औद्योगिक तह या गोष्टी खाजगी उद्योगधद्याना प्रोत्साहन देणाऱ्या आहेत यात शका नाही.

## असंख्य कारखान्यांचें जाळें हवें

सरकारने असे निश्चित धोरण अंगिकारल्याखेरीज महाराष्ट्रातील कारखान्याची वाढ खुटून बसेल. कारण सध्या आपल्याकडे कित्येक कारखाने निघालेले दिसत असले, तरी खऱ्या औद्योगीकरणाच्या दृष्टीने ही फार तर सुरुवात आहे, इतकेच म्हणता येईल महाराष्ट्रीय बहुजनसमाजाची सापत्तिक स्थिति व राहाणीचा दर्जा सुधारावयाचा असल्यास देशभर असख्य कारखान्यांचे जाळें विणावे लागेल महाराष्ट्रात लोखड व कोळसा नाही. ही कमतरता भरून काढण्यासाठी वर खानदेशपासून खाली कारवारपर्यंत सह्याद्रीतून निघणाऱ्या नद्याना प्रचड धरणे बाधून स्वस्तात वीज निर्माण केली पाहिजे. ही वीज शेतकरी, कारखानदार, आणि घरवाल्याना उपयोगी पडेल, तिच्या साहाय्याने आगगाड्या चालविता येतील, व सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे

या विजेवर भट्ट्या चालवून महाराष्ट्रातच लोखड व पोलाद निर्माण करता येईल. यावरून या पाढऱ्या कोळशाची ( विजेची ) महाराष्ट्राला किती जरूर आहे हे कळून येईल

महाराष्ट्रात बॉक्साइटपासून अॅल्युमिनियम तयार होऊ लागल्यास तो एक मोठाच उद्योग होईल तसेच आमच्या जगलातील कदमुळे आणि फळापासून अनेक प्रकारची औषधे, रसायने, कापूर, तेले, डिक, राळ, लगदा इत्यादि तयार करण्यास किती तरी अवसर आहे कोकणात काही काजूचे कारखाने चालतात, आबेघाटात हिरड्यापासून टॅनिक अॅसिड काढण्यासाठी एक कारखाना निघणार असे ऐकिवात आहे, आणि वुड अल्कोहॉलवर फॉर्म्युल डीहाइड करण्याचा उपक्रमहि आपल्याकडे झाला होता, पण आपल्या जगलसपत्तीचा हा फारच अल्प उपयोग

कापसापासून सूत व कापड करण्याच्या गिरण्या, आणि लोकरी कापड विणणारे कारखाने स्वस्त वीज उपलब्ध होताच महाराष्ट्रात ठिकठिकाणी निघू शकतील तीच गोष्ट कातड्याच्या धद्याची महाराष्ट्रातून लाखो रुपयाची कातडी सालीना परमुलखात धाडली जातात, ती कमावण्याच्या व त्यापासून विविध जिनसा तयार करणाऱ्या कारखान्यास महाराष्ट्रात पुष्कळ वाव आहे

हे झाले नैसर्गिक कच्च्या मालाचा उपयोग करणाऱ्या कारखान्यासबधीं. पण अलीकडे रासायनिक क्रियेने निर्माण केलेल्या कच्च्या मालापासून प्लास्टिक्स, रेयान, सिथेटिक रबर, इत्यादि पदार्थ इग्लड–अमेरिकेत निघत आहेत तसले कारखाने इकडे काढावयाचे तर–आणि ते अवश्य काढावे लागणार–महाराष्ट्राची औद्योगिक उत्क्राति करण्यास केवढा अवसर आहे याची कल्पनाच करता येण्यासारखी नाही

इंग्रजाचा पाय येथून निघाला, आता राष्ट्राच्या सरक्षणाचा प्रश्न प्रथम हाती घ्यावा लागेल. हिदुस्थानला आपले सैन्य उभे करावे लागणार, व तें सुसज्ज करण्यासाठी बदुका, मशीनगन, तोफा, रणगाडे, बॉब, क्रूझर इत्यादि हजारों तऱ्हेचे युद्धसाहित्य राष्ट्राला लागणार सुरवातीला हे साहित्य आपणास दुसऱ्या देशाकडून विकत घ्यावे लागेल. पण असे किती दिवस चालणार ? या मालाचे कारखाने भराभर आपले आपल्यासच सुरू केले पाहिजेत.

अशा बाबतीत परावलंबी राहिल्याने केवढा घात होतो, याचा इतिहासाने आपणास चांगलाच धडा दिला आहे !

## कामगारांच्या प्रगतीचा प्रश्न

महाराष्ट्राच्या भावी औद्योगिक विकासाचे हे चित्र या क्षेत्राशी निगडित असलेल्या कामगारांच्या प्रश्नाचा थोडा तरी विचार केल्याशिवाय पुरे होऊ शकणार नाही. आपण वर एके ठिकाणी पाहिलेच आहे, की कारखान्यामुळे औद्योगिक क्रांति होऊ लागताच इतरहि सामाजिक क्रांत्या आपोआप घडून येतात. कामगारांची संघटना अर्थात् ट्रेड युनियनची चळवळ हीदेखील औद्योगिक प्रगतीबरोबर घडून येणारीच एक अपरिहार्य क्रांति आहे. आपल्या देशात या चळवळीने किती मजबूत मूळ धरले आहे ते कोणास निराळे दाखवून द्यायला नको. ही युनियने केवळ कारखान्यातील कामगारांचीच राहिली नसून, शिक्षक, पोस्टमन, कारकून, पोलिस व शहरसफाई करणारे, अशा यच्चयावत् प्रकारच्या नोकरांनी आता संघटनेचा हा मार्ग पत्करला आहे. या युनियनांची इष्टता आता सरकारलाहि पटून ती स्थापन करण्यास व कामगारांचे हक्क संरक्षिण्यासाठी निरनिराळे कायदेहि करण्यात आले आहेत. कामगारांना मिळालेल्या या नवीन सामर्थ्याची जाणीव पहिल्या भरात जिकडे तिकडे संप करून त्यांनी सर्वांना करून दिली आहे. परंतु कामगार चळवळीची ही बाल्यावस्था आता संपली आहे. यापुढे राष्ट्रीय दृष्टि ठेवून व स्वतःवरील जबाबदारी लक्षात घेऊन कामगार संघटनांनी आपले काम चालविले पाहिजे. तसे न झाल्यास चळवळीचे पाऊल पुढे न पडता, कामगारवर्गाचे अहित होण्याचीच खरी भीति आहे, कारण संपाचे हत्यार दुधारी आहे.

संपामुळे कामगारांना आपल्या मागण्या हस्तगत करण्यास मदत होते असे दिसले, तरी त्यामुळे मालाचे उत्पादन बंद पडून जे नुकसान व ज्या गैरसोयी होतात त्या या ना त्या प्रकारे त्यांनाच सोसाव्या लागतात. आजच्या महर्गतेच्या मुळाशी हेच एक मोठे कारण नाही का ? महर्गतेमुळे संप व संपामुळे वाढती महर्गता, असे हे दुष्टचक्र आहे, आणि हे असेच चालल्यास राष्ट्रावर मोठाच अनर्थ गुदरल्यावाचून राहणार नाही. यासाठी राष्ट्रापुढील सध्याचा गंभीर प्रसंग लक्षात घेऊन यापुढे कामगारवर्गाने आपली भूमिका

बदलली पाहिजे. कारखाने बद पाडणे अगर त्याच्या प्रमाणशीर उत्पादनाला बाध आणणे यातच इतिकर्तव्य न समजता, कारखान्याची प्रगति व त्याच्या उत्पादनात वाढ करण्याची जोखीम त्यानी आता आपल्या शिरावर घेतली पाहिजे कामगाराचा पक्ष उचलून धरण्याचे काम तर युनियनाच्या पुढाऱ्यानी केलेच पाहिजे, तसे करताना कारखान्याची कोणत्याहि प्रकारे पीछेहाट होणार नाही, याबद्दलहि त्यानी जपले पाहिजे औद्योगिक तहाचे परिपालन करण्याची जबाबदारी सरकार व कारखानदार याच्याप्रमाणे कामगारवर्गावरहि आहे हे त्यानी ओळखले पाहिजे. त्यानी आपले कर्तव्य अशा कुशलतेने पार पाडले, तरच यापुढे कामगारवर्ग व राष्ट्र या उभयताचे हित त्याना साधता येईल

## नवयुगांतील संभ्रमावस्था

प्रस्तुत लेखावरून औद्योगिक महाराष्ट्राचा उगम व विकास गेल्या पन्नास वर्षात कसा घडून आला, याची बरीच कल्पना येऊ शकेल यापुढे मात्र एका निराळ्याच फेऱ्यात आमचे कारखाने सापडणार असे वाटत असले तरी हे सकट फार काळ टिकणार नाही हे खरे की आज सर्वत्र अस्थिरता, बेबनाव आणि गोधळ माजून राहिला आहे पण परपरागत चालीरीतीना आणि कल्पनाना महायुद्धाने प्रचड हादरा दिल्यावर हा अनवस्था प्रसग निर्माण होणारच तथापि या महायुद्धानेच मानवजातीवर एक मोठा उपकार करून ठेवला आहे तो असा, की आपल्या सामाजिक जीवनात चालू असणाऱ्या सक्रमणाला त्याने एकदम जोराची गति दिली त्यामुळें जो टप्पा गाठण्यास समाजाला कदाचित् पाचपन्नास वर्षांचा काळ लोटला असता, तो टप्पा हा हा म्हणता गाठला गेला आहे, तथापि आपल्या मनाला जडलेल्या सनातनी कल्पनाची उचलबागडी इतक्या झपाट्यात होत नाही, त्यामुळे आज आपण शरिराने नव्या अटॉमिक जगात प्रवेश केला असला, तरी मनाने आपण मागच्या जगातच वावरत आहो, असा विलक्षण प्रकार झाला आहे. ही वस्तुस्थिति ज्या वेळी आपल्या लक्षात येईल, तेव्हाच आपल्या मनात उत्पन्न झालेला सभ्रम आणि अविवेक दूर होऊन आमच्या मुक्तेचा व प्रगतीचा मार्ग स्पष्ट दिसू लागेल. [नवा महाराष्ट्र भाग १ ला, नॅशनल इन्फर्मेशन अॅण्ड पब्लिकेशन लि. मुबई, किमत ३।। रु.]

# द. बा. कालेलकर

## पंढरी

**पंढरीचे वाटे बाभळीचे कांटे ।**
**सखा माझा भेटे पांडुरंग ॥**

पढरपूरला जाऊन यावे आणि तेथे विठ्ठलाचे दर्शन घ्यावे असे ज्याला कधीच वाटले नाही, असा एक तरी महाराष्ट्रीय असेल का ? अगदी बाल्य-काळापासून पुडलिकाच्या आणि नामदेवाच्या, ज्ञानदेवाच्या आणि गोऱ्या कुभाराच्या गोष्टी ऐकत होतो चोखामेळा आणि जनाबाई याच्या अभगानी पवित्र झालेले पढरपूरचे वातावरण आपणाला केव्हा पाहावयाला मिळेल, असे लहानपणापासून आम्हाला वाटत असे पण पढरपूर म्हणताच जे पहिले चित्र डोळ्यापुढे येई, ते तुकाराममहाराजाचे पढरीसबधाचा ओढा जर कोणी मनामध्ये दृढ केला असेल तर तो तुकारामाच्या अभगानी

पुष्कळ वर्षांची ही उत्कठा जेव्हा तृप्त होण्याची सधि आली, तेव्हा मला तर आपण नव्याच जगात जातो आहोत असें वाटू लागले जतहून बैल-गाडीत बसून आम्ही पढरपूरला गेलो बैलगाडीत बसून किवा पायी प्रवास करण्यात जो आनद वाटतो, जो अनुभव मिळतो आणि जी स्वतत्रता असते, ती आगगाडीतून प्रवास करण्यात मिळत नाहीत

पढरपूरच्या वाटेवर कुठल्याशा गावी सध्याकाळी एका धर्मशाळेत आम्ही उतरलो होतो तेथेच एक वारकरी येऊन उतरला अधार होत आला होता हातपाय धुऊन येऊन त्याने धर्मशाळेत एका कोपऱ्यात आपले सामान लावलें आणि आपल्या बोचक्यातून दशम्याचे थोडे तुकडे काढून त्याने ते एका वाटीत घातले आणि त्यावर पाणी ओतून ती वाटी एका कोपऱ्यांत ठेवून दिली हे तुकडे पाण्याने चागले मऊ झाल्यानतर मगच ते त्याला खाणे शक्य होतें कारण तोडात फारच थोडे दांत उरले होते म्हाताऱ्याचें वागणे अत्यंत प्रेमळ, निस्पृह आणि सस्कारी होते. दशम्याचे वाळके तुकडे भिजत ठेवून

देऊन त्याने आपली पोथी उघडली आणि नित्यपाठाचे अभग वाचण्यास सुरवात केली. लहानपणापासून अभग ऐकण्याची मला गोडी असे. मराठी-मध्ये अभग आणि ओवी या वृत्तात जे साहित्य आहे, तेच धर्मपरायण महाराष्ट्राचे अमूल्य धन आहे ही दोन्ही वृत्ते अत्यत सोपी पण वक्तृत्वपूर्ण आहेत. वाटेल तो रस या वृत्तातून आळविता येतो.

त्या वारकऱ्याने तुकारामचरित्राचे अभग सुरू केले, आणि सद्गदित होऊन तो ते वाचू लागला. त्या अभगातील भाव, वासराने गायीचें दूध प्यावे त्याप्रमाणे, मी ग्रहण करीत होतो वारकऱ्याचा भक्तिभाव अगदी बावनकशी होता. जेव्हा तुकाराम सदेह स्वर्गाला गेला हा भाग आला, तेव्हा म्हाताऱ्याच्याने अभग बोलवेनात त्याचा गळा दाटून आला, डोळे आसवानी डबडब भरले आणि बराच काळ तो स्तब्ध बसला मध्येच एकदा हुदका आल्याचाहि भास होई

अशा रीतीने सध्याकाळचा नित्यपाठ सपल्यानतर त्याने शरिराला त्याचा कर दिला, आणि पढरीला जाण्याची शक्ति आपल्या पायात अजून आहे, त्याची धन्यता मानून तो झोपी गेला पण त्याच सध्याकाळी त्याने माझे हृदय खऱ्या भक्तीला जागे केले ( याच प्रसगाविषयी यापूर्वी कोठेतरी लिहिल्याचे स्मरते म्हणून येथे विस्तार करीत नाही ) या वारकऱ्यासारख्या लोकानीच महाराष्ट्रातील भूमि पावन केली आहे खुद्द पढरपूर म्हणजे पवित्रातील पवित्र भूमि तेथील प्रत्येक खडा आणि धोडा सताच्या चरणाने पुनीत झालेला. पढरीतील प्रत्येक वस्तु सुदर आहे, पवित्र आहे, हितकर आहे, असे मानण्याची प्रथमपासूनची मनाची तयारी होती मदिराकडे जाणाऱ्या रस्त्यावर दुतर्फा बसलेले आधळे—पागळे, कुष्टरोगी, आणि इतर दुर्दैवी लोक देखील जणू एका नव्याच दुनियेतील लोक आहेत, असे त्या वेळच्या माझ्या नजरेला भासत होते.

मुक्कामावर जाऊन सामान वगैरे ठाकठीक लावून आम्ही चद्रभागेवर आघोळीला गेलो. तेथे आम्ही प्रथम जे मदिर पाहिले ते पुडलिकाचे होते. एक म्हातारी त्या मदिरात मोठ्याने गात होती.

**कांरे पुंड्या मातलाशी ।**
**उभें केलें विठ्ठलासी ॥**

महाराष्ट्रातील लोकाना मातापित्याची अनन्यभावे सेवा करणाऱ्या पुड-

लिकाची कथा नव्याने सागण्याची जरुरी नाही मीदेखील सकाळी उठल्या-बरोबर वडिलाच्या आणि मातोश्रीच्या पाया पडत असे त्याची सेवा करण्याची एखादी सधि मिळाली म्हणजे मला आनद वाटत असे तेव्हा स्वाभाविकपणे पुडलिकाविषयी माझ्या मनात सविशेष आदर होता

पुडलिकाला कृतार्थ करण्यासाठी भगवान् विष्णु त्याचेजवळ गेले आणि तेथेच त्याने भगवतास एका विटेवर उभे राहावयास लाविले त्या वेळी रखु-माई भगवताच्या बरोबर आली नसेल, यामुळेच पढरपुरात विठोबाच्या मदिरात रखुमाईची मूर्ति नाही रुक्मिणीचे मदिर तेथे निराळेच आहे पढर-पुरात राधेला ' राई ' म्हणतात. राई–रखुमाई वारकऱ्याच्या माता होत. चद्रभागेच्या वाळवटावर जेथे पाहावे तेथे भजनच चालले होतें तेथे वर्णा-श्रमाला आणि कर्मकाडाला महत्त्व नाही पढरपूर म्हणजे भक्तीचे माहेरघर, सर्व सताचे धाम

आम्ही चद्रभागेत स्नान करून विठ्ठलाच्या दर्शनाला गेलो पुरोहित–बडवे बरोबर असल्यामुळे वाटेतील प्रत्येक स्थानाचे महात्म्य चटचट कळत असे रस्त्यामध्ये एक ताक–पीठ विठोबा होता, असें मला स्मरण आहे. या विठोबा-पुढे एक मोठे लाकडाचे भाडे असे. लोक त्यामध्ये लाह्या–पीठ आणि ताक घालीत असत

विठ्ठलाच्या मदिरात कोण मनस्वी गर्दी ! कोणी गात आहे, कोणी वाचत आहे, कोणी एक मोठ्याने ' विठ्ठलाऽऽ ' म्हणून आरोळी ठोकीत आहे मदिरा-तील एकेका भक्ताला पाहाताना त्याच्या निष्ठेविषयी आदर उत्पन्न होई पण या सर्वांचा एकत्र विचार करता फारसे बरे वाटले नाही हे सर्व मिळून अगात आल्याप्रमाणे असा काही कोलाहल करीत होते की, त्यापेक्षा भाजी-बाजार किती तरी चागला ! मी जरी लहान होतो तरी भक्तीच्या उमा-ळ्याचे प्रदर्शन करणाऱ्या लोकाचा दभ मला समजत असे

सरकारी अमलदाराचा वशिला सर्वत्र असतो येथेहि प्रतिष्ठेच्या वशिल्यानें आम्ही एका खाजगी दरवाजानें मदिरात शिरलो आणि कसलीहि चेंगरा-चेंगरी न होता सुखाने दर्शन करून परत आलो पहिले दर्शन घाईघाईनेंच करावयाचे असते या मदिराच्या प्रत्येक खाबाशी एखाद दुसरी आख्यायिका चिकटलेली आहे हा गरुड-स्तभ, या येथे तुकाराममहाराज उभे राहात असत,

गोरा कुभार येथें बसत असे; या ओटयावर नामदेव कपाळ फोडून घेणार होता, वगैरे वगैरे माहिती आम्हाला मिळाली मदिराचे बाहेर पितळेच्या पत्र्याची एक पायरी आहे, तिला 'नामदेवाची पायरी' म्हणतात 'नामदेवाची फरशी जशी काही जडावाची आरशी' ही ओळ मी लहानपणी ऐकिली होती नामदेव म्हणे, या पायरीखालीच समाधिस्थ झालेले आहेत.

रखुमाईचे दर्शन करून आम्ही गोपाळपूरला गेलो रस्त्यात जेथें श्रीकृष्णानी दही घुसळून लोणी काढले होते ते स्थान आले तेथील एका पुजाऱ्याने आम्हाला मोठ्याने हाक मारून म्हटले, "लवकर या लवकर या थोड्याच लाह्या उरल्या आहेत" एका पितळी ताटात लाह्याचे दहा पधरा दाणे पडलेले होते पुरोहित म्हणाला, "श्रीकृष्णाने बरोबरच्या बाळगोपाळांबरोबर येथे न्याहारी केली होती त्या वेळच्या या लाह्या आहेत. तुम्ही कसे अगदी वेळेवर आलात ! एवढ्याच लाह्या उरल्या आहेत" आम्ही दोन पैसे देऊन लाह्याचे चार दाणे घेतले आणि पुढे चाललो गोपाळपूरला एक शिळा आहे या शिळेवर गायीला उभी करून श्रीकृष्णाने तिचे दूध काढून ते प्राशन केले होते श्रीकृष्णाची पावले, त्या गायीची चार पावलें आणि त्याची वाटी, या सर्वांची चिन्हे त्या शिळेवर बरीच खोल उमटली आहेत या नदीतून कोणताहि धोंडा बाहेर काढा, त्याचेवर बाळगोपाळाची पावले उमटलेली दिसावयाचीच !

नदीच्या पात्रात अगदी मध्यावर एक लहानसे मदिर होते होडीत बसून आम्ही दर्शनासाठी तिकडे गेलो. अर्धा प्रवाह आम्ही ओलाडला असेल, इतक्यात मी होडीवाल्याला म्हणालो, "येथे पाण्यात बुडी मारून तळाचा एक धोंडा काढून दाखव पाहू." त्याने तसे करून एक धोंडा काढला आणि केवढे आश्चर्य ! त्याचेवर देखील लहान मुलाचे पाय उमटल्यासारखी चिन्हे स्पष्ट दिसून आली.

येथून आम्ही जनाबाईची जागा पाहावयास गेलो. जनाबाईही नामदेवाच्या घरची दासी बिचारीला नात्यागोत्याचे जवळचे कोणी नव्हते म्हणून विठोबा स्वत. तिचेबरोबर दळावयाला बसत. आठ आठ दिवसानी तिला न्हाऊ घालीत आणि तिची वेणीफणी करीत एका रात्री विठोबा जनाबाईचे घरीच निजले होते. जनाबाईचे वेळची एक वाकळ (गोधडी) आज देखील पाहावयास

मिळते लोकानी त्या वाकळीला तेलाचे हात लावून लावून तिला चामड्या-सारखी केली आहे.

परत येताना त्या लाह्यावाल्या भटजीजवळ आम्ही पुन्हा गेलो. या वेळी त्याच्या ताटात चागल्या दोन मुठी भरून लाह्या पडल्या होत्या मी त्याला विचारले, " आता इतक्या लाह्या कोठून आल्या ? " पण तो कसचा उत्तर देतो !

चद्रभागेच्या काठी एक लहानसे कुड आहे तेथे तुकारामाने आपल्या अभगाच्या वह्या धोडे बाधून पाण्यात बुडविल्या होत्या आणि देवावर सकट घालून ते तेथे उपवासी राहिले होते शेवटी विठोबाला आपल्या भक्ताचे समाधान करण्यासाठी वह्या धोड्यासहित कोऱ्याच्या कोऱ्या पाण्यावर तरत्या कराव्या लागल्या होत्या या गोष्टीची खात्री करून घ्यावयाची असेल तर आज देखील प्रचीति घेणे शक्य आहे दोन पैसे दिले म्हणजे एक मनुष्य धोड्याची बनविलेली एक लहानशी होडी ' पुडलीक वर दे हरि विठ्ठल ' असे म्हणून कुडाच्या पाण्यात सोडून देतो आणि ती नौका त्या पाण्यात मोठ्या डौलाने तरू लागते ती होडी अशा रीतीने तरत असलेली मी माझ्या स्वतःच्या डोळ्यानी पाहिली आहे मी त्या मनुष्याला म्हणालो, " हीच दगडाची होडी समोरच्या नदीच्या मुख्य पात्रात सोडून दाखव तेथे जर ती बुडाली तर आमची खात्री होईल की, या कुडाच्या महात्म्यानेच ही दगडी नौका येथे तरते " त्याने माझे ऐकिले नाही, कारण मी लहान होतो

सध्याकाळी लवकर जेवून आम्ही विठोबाची पूजा पाहावयास गेलो विठोबाच्या मूर्तीचे रसभरित वर्णन सतवाणीत इतके काही वाचले होते अथवा ऐकिले होते की साक्षात् विठोबाची मूर्ति पाहिल्यानतर देखील ती बेढब आहे, कुरूप आहे, असे स्वतःशी देखील कबूल करावयास मन तयार होईना. ' सुदर ते ध्यान उभे विटेवरी ' आणि ' पाउले साजिरी ' वर्णनाप्रमाणे नाहीत असे म्हणण्याची नास्तिकता मला तरी सोपी नव्हती.

हिवाळ्याचे दिवस होते म्हणून विठोबानी गरम पाण्याची आघोळ केली. घागरी भरून भरून त्याना दुग्ध-स्नान घातले, मग दधि-स्नान, लोण्याचा एक मोठासा गोळा पुजाऱ्याने मूर्तीच्या तोडावर थापून दिला. मग एक लोटाभर मध घेऊन मूर्तीला मधु-स्नान घातले मग आली पाळी घृत-

स्नानाची शेवटी एक पेलाभर कस्तुरीचे पाणी डोक्यावर ओतले गेले कस्तुरी हा उष्ण पदार्थ आहे कस्तुरी–स्नान घातले म्हणजे पचामृताची थडी बाधत नाही पडसे वगैरे होत नाही कस्तुरीची उष्णता बाधू नये म्हणून, तिचा उतार म्हणून, चदनाच्या पाण्याचा एक लोटा मूर्तीच्या डोक्यावर ओतण्यात आला शेवटी पुन्हा उष्णोदक आणि शुद्धोदक घेऊन स्नान आटपले सारे शरीर पुसून घेऊन विठोबा रेशिमकाठी धोतरजोडा नेसावयास तयार झाले. विठोबाच्या धोतराच्या निऱ्या अगदी व्यवस्थित असल्यापाहिजेत विठोबाचा तो नीटनेटकेपणा पाहून आमचेसारख्या भक्ताची दृष्टि निवून जात असे मग विठोबाने जरकसी जामा अगात घातला त्याचेवर आपल्या जुन्या थाटाचा अगरखा चढवला गेला त्यानतर विठोबाच्या डोक्यावर पगडी बाधण्याची क्रिया सुरू झाली विठोबा तैयार पगडी किवा पागोटे घालीत नसतात, पण डोक्यावरच बाधून घेतात त्यात तब्बल अर्धा तास गेला. आता विठोबा चागले रसिक दिसू लागले पण थडीचे दिवसात ओव्हरकोटावाचन कसे चालेल ? आणि ओव्हरकोट तर परदेशी प्रकार, आधुनिक तर खराच तेव्हा आत कापूस भरलेली अस्तरदार रेशमी गोधडी सर्वात वर पाघरण्यास दिली गेली यामुळे झाले असे की, विठोबाच्या उचीच्या मानाने पाहाता मूर्तीचा घेरावाच अधिक झाला. विठोबाच्या कपाळावर कस्तुरीचा टिळा केला होता त्यानतर नैवेद्य दाखविण्यात आला त्या वेळी दरवाजे बद केले होते भुकेलेल्या आशाळभूत लोकानी पाहिले तर विठोबाला नजर लागावयाची आणि खाल्लेले पचावयाचे नाही बडव्याची कृपा म्हणून ताबूल मात्र आमच्या देखतच देण्यात आला

आता विठोबाची शयनगहात जाण्याची वेळ झाली आमच्या उजव्या बाजूला शयनगृह सुदर प्रकारे सजविले होते पण विठोबानी आपल्या स्थलावरून शयनगृहात जावे कसे ? याचा उपाय म्हणून विठोबाच्या पायापासून शयनगृहातील पलगापर्यंत एक पायघडीवजा कापड ताणण्यात आले त्या कपड्यावर विठोबाची पावले ताबड्या रगाने छापली होती

आमचे पुरोहित म्हणाले, ' आता कळिकाळाचा महिमा वाढला, नाहीतर पूर्वी शयनगृहात तयार करून ठेविलेल्या पानपट्ट्या सकाळपर्यंत नाहीशा

होत आणि पलगाजवळील पिकदाणीमध्ये खाल्लेला पानाचा ताबडा लाल ताबूल पडलेला असे ' भक्तलोक तो ताबूल घेऊन खात

दुसऱ्या दिवशी पहाटे चार वाजता आम्ही काकडआरती पाहावयास गेलो त्या वेळी देखील लोकाची गर्दी कमी नव्हती कार्तिक महिन्यात आणि माघ महिन्यात अरुणोदयापूर्वी स्नान करण्याचे पुण्य विशेष आहे आणि काकड-आरतीच्या वेळेला दर्शन करणे ही तर पुण्याची पराकाष्ठा झाली. या दोहो-पैकी एकहि लाभ आम्ही सोडला नाही

चागली दक्षिणा देणाऱ्याना आणि अर्थात् मोठा वशिला असलेल्यानाहि पंचामृताचे उत्तम तीर्थ मिळत असे आमच्या मुक्कामावर एक खासा लोटा भरून जे तीर्थ येई, त्याचेबरोबर दशम्या आणि पुऱ्या खाणे हा आमचा आनदाचा व्यवसाय असे.

पंढरपुरात एकच वस्तु मला फार आवडली तेथे उच्चनीच भाव दिसून येत नाही सर्वच सत आणि सर्वच समान ज्ञानदेव, नामदेव, जनाबाई, गोरा कुभार, चोखामेळा, तुकाराम वगैरे सताच्या उपदेशाचे हे फळ आहे. पढरपुरविषयी मी जे लिहिले आहे, तें लहानपणी पाहिलेल्या गोष्टीचें आज जसे स्मरण आहे तसेच लिहिले आहे त्याला चाळीस–पचेचाळीस वर्षे झाली असतील त्यानतर पढरपूरला जाण्याचा योगच आला नाही. परवा गोकर्णाला जाऊन आलो तेव्हा पाहिले की, लहानपणचे सस्कार आणि आताचे सस्कार यांत बरेच अतर पडलेले होते. मात्र पाहिलेली स्थाने बहुतेक जशीच्या तशीच होती

विठोबाच्या मूर्तीचे वर्णन वाचून कोणीहि असे समजू नये की पूजेची चेष्टा करण्याचा माझा उद्देश आहे. माझ्या मनात त्या वेळी अत्यत उत्कट भक्ति होती घरच्या देवाची पूजा करण्यात मी अगदी तल्लीन होऊन जात असे. देवळात जाऊन देखील पूजा करावयास मला मिळाली तर धन्य धन्य वाटे पण त्या वेळीदेखील पूजेचा सर्व प्रकार मला काहीसा चेष्टेसारखाच भासला होता. आणि आज ज्या वेळी पाहिलेल्या गोष्टीचे चित्र डोळ्यापुढे आणतो तेव्हा कसेसेच वाटते. पूजेमध्ये खर्च आणि थाटमाट पुष्कळ असे;

पण पुजाऱ्याना सौंदर्याची कल्पना असेल अशी शका देखील ते येऊं देत नव्हते ख्रिस्ती देवळात जो गाभीर्याचा देखावा केला जातो तोहि आपल्या देवळात नसतो पण येथे मला स्वत च्या विचाराचा प्रचार करावयाचा नाही किवा समाजाला उपदेशहि द्यावयाचा नाही. फक्त लहानपणची सस्मरणेच द्यावयाची आहेत

# स. ज. भागवत

## व्यासांचा आक्रोश !

" ऊर्ध्वबाहुर्विरौम्येष न च कश्चिच्छृणोति माम् ।
धर्मादर्थश्च कामश्च स धर्मः किं न सेव्यते ।। "

— महाभारत

समाजाच्या प्रारभापासून आदर्शभूत समाजाची रचना कोणत्या प्रकारे करता येईल याची स्वप्ने समाजातील प्रतिभावत पुरुषाना सतत पडत आलेली आहेत कवीनी आदर्शाची चित्रे रेखाटली. सुधारकानी आदर्शाकडे नेणारे आचार दाखविले, वीरानी आदर्शाच्या मूर्ततेसाठी आपल्या प्राणाचेहि बलिदान केले, तथापि आदर्श अद्यापि प्रत्यक्षापासून अतिशय दूरच–कल्पनेच्या अतराळातच राहिले आहेत !

भारतीय सस्कृतीतील रामायण व महाभारत या प्रमुख आर्ष काव्यात जीवनाचे दोन आदर्श दाखविलेले आहेत व्यक्तिश आदर्श मानव चित्रित करण्यासाठी रामायणात वाल्मीकीची प्रतिभा खर्ची पडलेली आहे, आणि महाभारतात आपले बुद्धिसर्वस्व वेचून व्यासानी जीवनाचा सामाजिक आदर्श उभा केला आहे वस्तुत या दोनहि आदर्शांचा परस्पर दृढ सबध आहे. कारण आदर्शभूत समाजाच्या निर्मितीसाठी जरी असामान्य व्यक्तीची आवश्यकता असली तरी आदर्श समाजातच आदर्श मानवहि निर्माण होणे शक्य आहे. यामुळे समाजाचे सर्व व्यवहार आदर्श जीवन निर्माण करण्याच्या दृष्टीने कसे चालवावे याची, म्हणजे आदर्शाच्या व्यावहारिक साधनेचीच मुख्य गरज आहे.

व्यवहारातील नित्याचे व महत्त्वाचे प्रश्न म्हटले म्हणजे अर्थ व काम हेच होत मानवी जीवनाच्या पूर्णतेला भारतीय ऋषीनी 'मोक्ष' असा शब्द वापरलेला आहे. जीवनाचे प्रत्यक्ष स्वरूप अर्थकाममय असून त्याचें परोक्ष स्वरूप मोक्षमय–आनदमय आहे जीवनाच्या या प्रत्यक्ष व परोक्ष स्वरूपात जरी काही विरोध भासला तरी वैर नाही, अशी भारतीय द्रष्टयाची, व समाजसुधारकाची परपरागत समजूत आहे, आणि अर्थ – काम

व मोक्ष या द्विविध अंगाचे साधन म्हणून त्यांनी धर्म या एकाच साधनाचा पुरस्कार केला आहे 'धर्म' या शब्दाने जीवनाच्या सर्वांगीण साधनेचा बोध होतो. प्रस्तुत लेखाच्या प्रारंभी उद्धृत केलेल्या महाभारतातील प्रसिद्ध श्लोकातहि 'धर्म' शब्दाचा असाच अर्थ सूचित केलेला आहे धर्मसाधनेने मोक्ष-सिद्धि होते याविषयी कधीच कोणी संशय प्रगट केलेला नाही तथापि अर्थ–कामाची जी सिद्धि धर्माचरणाने होते तीविषयी पुष्कळ मतभेद दर्शविला जातो परंतु भारतीय विचारपद्धतीत धर्मापासूनच अर्थ–कामाची सिद्धता होते हा सिद्धान्त सर्वमान्य गणण्यात आलेला आहे 'धर्म' म्हणजे 'न्याय' असे लक्षात ठेविले तर भारतीयांचा वरील सिद्धान्त जवळजवळ जगन्मान्य आहे असे आढळून येईल समाजातील व्यवहार सर्वांच्या सुखाचे जर कधी काळी व्हावयाचे असतील, तर त्या सर्व व्यवहारांचा पाया न्यायबुद्धि हाच व्हावा लागेल सुख व न्याय यांच्यामध्ये तत्त्वत विरोध नाही परंतु सुखाचे स्वरूप जेव्हा संकुचित होते त्या वेळी त्या संकुचित सुखाचा, म्हणजेच स्वार्थाचा न्यायाशी विरोध येतो सर्वांचे सर्व काल टिकणारे सुख हे खरोखर न्यायाशीं अविरोधी आहे इतकेच नाही, तर न्यायाचा तो केवळ परिपाकच आहे पण सामाजिक इतिहास पाहिला असता समाजात ही न्यायनिष्ठा अद्यापि दृढपणे रुजलेली दिसून येत नाही त्यामुळे व्यासासारख्या ज्ञानी व 'सर्वभूतहिते रता' अशा थोर पुरुषाना दु खाचा आक्रोश करावा लागलेला आहे

साऱ्या महाभारताचे निरीक्षण केले असता व्यासाचा हा आक्रोश किती यथार्थ होता हें सहज दृष्टीस पडते धर्मसंस्थापनेकरिता प्रतिज्ञेने अवतीर्ण झालेल्या भगवान् श्रीकृष्णाच्या चारित्र्याचा प्रत्यक्ष परिणाम आपणास समाज-साफल्याच्या दृष्टीने काय झालेला दिसतो? ज्या यादवांच्या कुळांत श्रीकृष्णाचा जन्म झाला ते लोक त्याच्या डोळ्यादेखत मदिरामत्त होऊन नाश पावले. 'यादवी' हा शब्दच त्याचे स्मारक आहे ! पितामह भीष्मानी आपल्या वैयक्तिक सुखजीवनाचा आत्यंतिक होम करून जी कुलसेवा केली तिचे फल म्हणूनच की काय, त्याना आपल्या कुलाचा सर्वतोपरी विनाश झालेला पाहावा लागला, आणि विदुरासारख्या स्थितप्रज्ञ, ज्ञानी संताला आपला उपदेश निरर्थक होत आहे म्हणून जगत्कल्याणाची इच्छा असताहि जागच्या जागी हळहळत बसावे लागले ! स्वत 'महाभारत' कार व्यासाचे शेवटचे तळमळीचे उद्गार आरंभी दिलेच आहेत.

तथापि भारतीय विचारवंतानाच हा अनुभव आलेला आहे असे नाही युरोपीय संस्कृतीच्या अग्रभागी चमकणारे सॉक्रेटिस व प्लेटो यांचीहि कथा अशीच आहे. जीवनाचे सौख्य विचाराच्या शुद्धतेवर अवलंबून आहे असे आग्रहाने प्रतिपादन केल्याबद्दल सॉक्रेटिसला विषाचा पेला प्यावा लागला! प्लेटोची कहाणी तर याहूनहि करुणाजनक आहे प्लेटो हा पाश्चात्य संस्कृतीचा आद्य आचार्य होय. सामाजिक जीवनाचा संपूर्ण आदर्श आपल्या विशाल प्रतिभेने निर्माण करून आपल्या 'रिपब्लिक' या सर्वश्रेष्ठ ग्रंथाच्या द्वारे त्याने त्या काळच्या जगापुढे ठेविला. 'जीवनाचे परमसत्य जाणणाऱ्या ज्ञानी पुरुषाच्या हातीच समाजाचे शासनसूत्र असावे,' या त्याच्या सिद्धान्ताला आजहि जग मान डोलवीत आहे परंतु त्याचा स्वतःचा अनुभव किती शोचनीय! तत्त्वज्ञाने राजा होण्यापेक्षा राजाने तत्त्वज्ञ होणे सुलभ होईल, या कल्पनेने त्याने सिराक्यूजच्या राजाच्या निमंत्रणावरून त्याला प्रथम शिष्य म्हणून स्वीकारिले परंतु राजाला तत्त्वज्ञ होणे गैरसोयीचे आहे असे आढळून आल्यामुळे त्याने या प्रसिद्ध जीवनाचार्याला गुलाम म्हणून विकून टाकिले! तेथून कोणातरी मित्राच्या दयाळूपणामुळे बिचारा कसा तरी प्राण बचावून स्वदेशी परत आला.

प्राचीन चीन देशाचा प्रसिद्ध ज्ञानी पुरुष कान्‌-फू-त्से यानेहि समाजधारणेचे संपूर्ण दर्शन बनविले होते कोणातरी राजपुत्राने आपले शिष्यत्व पत्करावे म्हणजे आपण आपल्या दर्शनानुसार चीनचे जीवन घडवून दाखवू अशी त्याला मोठी उमेद होती पण त्याच्या वेळचे राजे आपसात प्राणघातक युद्धे करण्यात इतके गुंतलेले होते की, त्यांना कान-फू-त्सेकडे लक्ष देण्यासहि सवड मिळाली नाही. मरणकाली त्याच्या शिष्यांनी 'आपली अंतकाळची काय इच्छा राहिली आहे?' असे त्यास विचारिले असता 'माझ्या दर्शनाचा प्रयोग करण्यासाठी संधि देणारा राजपुत्र शेवटपर्यंत मला लाभला नाही, ही गोष्ट माझ्या हृदयाला फार लागून राहिली आहे!' असे त्याने उद्‌गार काढिले असे सांगतात

..

प्राचीन इराणी लोकांचा धर्मसंस्थापक जरदुष्ट्र याचीहि कथा अशीच मौजेची आहे. त्या महापुरुषाच्या ठायी समाजसौख्याची दिव्य दृष्टि होती; आणि प्लेटो, कान्‌-फू-त्सेप्रमाणे त्यालाहि एखाद्या राजाचे गुरुत्व करण्याची

पुष्कळ दिवस महत्त्वाकाक्षा होती एका राजाला निरुपायास्तव जरदुष्ट्राचा शिष्य व्हावे लागले, राजाचे घोडे आकस्मिकपणे आजारी पडले आणि जरदुष्ट्राला अश्वविद्या अवगत असल्यामुळे त्याने ही सधि साधून आपले गुरुत्व त्याच्यावर लादले या घटनेमधून काय निर्माण झाले असेल याची सहज कल्पना येईल.

आधुनिक युरोपातील 'युटोपिया' ('आदर्शसमाज') या ग्रथाचा कर्ता सर टॉमस् मूर याला राजाच्या हाती मरावे लागले आणि त्याच्या ग्रथनामावरून 'युटोपियन' असे एक अवहेलनादर्शक विशेषण इग्रजी भाषेत रूढ झाले!

आदर्शवाद्याची ही नामावली हवी तेवढी लाबविता येईल जगातील सर्व साधुसत मनुष्यानी धर्मशील बनावे म्हणून अत्यत कळकळीने सतत सागत आलेलेच आहेत ख्रिस्ताचा किवा बुद्धाचा उपदेश सन्यासवादाचा होता अशी पुष्कळ लोकाची समजूत आहे तथापि त्याच्या उपदेशाचे प्रत्यक्ष अवलोकन केले असता ही समजूत बरोबर नाही असे म्हणावे लागते ख्रिस्ताचे 'Kingdom of Heaven 'म्हणजे' Kingdom of Righteousness' होय, ही गोष्ट त्याने स्पष्ट शब्दात सागितली आहे. म्हणजे, त्याचे 'स्वर्गीय राज्य' हे 'धर्मराज्य' च होते. "तुम्ही धर्माने, न्यायाने वागा, म्हणजे तुम्हाला जीवनाची ऐहिक सुखेहि सहज मिळतील," हाच मुख्य त्याचा सदेश होता. हा सिद्धान्त प्रथमारभी सागितलेल्या भारतीय सिद्धान्ताशी ततोतत जुळणारा असाच आहे परतु या सिद्धान्ताकरिता येशू ख्रिस्ताला वधस्तभावर चढावे लागले! गौतमबुद्धाने उपदेशिलेला अष्टागमार्गहि केवळ सन्यासजीवनालाच उपयोगी आहे असे म्हणता येणार नाही सामाजिक जीवनाचाहि तोच आधार आहे हे उघड आहे वैशालीच्या वज्जी लोकाना त्याने जे सात प्रसिद्ध नियम सागितले होते ते समाजात धर्मराज्य प्रस्थापित करण्याचे साधन म्हणूनच त्याने उपदेशिले आहेत.

इस्लामी धर्मसंस्थापक महमद पैगबर व यहुदी धर्माचार्य मोझेस हे दोघेहि महापुरुष कर्मयोगीच होते. त्यानी अनुक्रमे अरब व इस्रायल जातीच्या लोकाची सामाजिक सघटनाच मुख्यत्वे घडवून आणिली. तथापि त्या दोघानीहि आपल्या सामाजिक आदर्शाच्या सिद्धीसाठी धर्मसाधनेचाच उपदेश केलेला आहे यामुळें

धर्म हेच अर्थकाम-सिद्धीचे एकमेव साधन होय या व्यासाच्या सिद्धान्ताला सार्वत्रिक मान्यता आहे असे दिसून येते परतु असे असताहि प्रत्यक्ष व्यवहारात धर्मबुद्धीने आचरण करणाऱ्याचा वर्ग अद्यापि अतिशय अल्पच दिसून येतो सामाजिक सुधारणेच्या दृष्टीनें ही एक गूढ घटना समजली पाहिजे

आधुनिक युगातील समाजसुधारकाचे प्रयत्न पाहिले असता आपणाला हे गूढ अद्यापि उकलले आहे असे दिसत नाही आधुनिक काळात न्यायप्रस्थापने-साठी राजकीय, आर्थिक, शैक्षणिक इत्यादि विविध क्षेत्रात अनेक क्रातिकारक प्रयोग झाले आहेत या नानाविध प्रयोगात इतर कितीहि भेद दिसले तरी सामाजिक व्यवहार न्यायबुद्धीवर आधारले तरच सर्व समाजाला सुख व समाधान याची प्राप्ति होऊ शकेल, हा सिद्धान्त सर्वत्र सारखाच गृहीत केलेला आढळून येतो तथापि या प्रयत्नानाहि कोठेच म्हणण्यासारखे यश आलेले दिसत नाही या प्रयोगकर्त्याचाहि व्यासासारखाच आक्रोश आढळतो!

मनुष्य हा बुद्धिवादी प्राणी आहे आणि त्याच्या बुद्धीला सत्य जाणण्याची शक्ति आहे, ही कल्पना फार प्राचीन काळापासून चालत आलेली आहे "ज्ञान हाच मनुष्याचा अलकार होय" असे आपल्याकडे मानीत असत, आणि "ज्ञान हाच सद्गुण होय," असा सॉक्रेटिसाचा सिद्धान्त होता आधुनिक काळात पाश्चात्य देशात बुद्धिपूजेचे पुनरुज्जीवन मोठ्या उत्साहाने करण्यात आले, परतु या बुद्धिपूजकाची श्रद्धा प्रत्यक्ष व्यवहारात बहुताशी विफल ठरलेली सध्या दिसत आहे! प्रख्यात इग्लिश लेखक जॉर्ज बर्नार्ड शॉ याचा अनुभव मोठा उद्बोधक आहे. बुद्धिवादी इग्लडमध्ये वाढलेल्या या प्रतिभाशाली पुरुषाला तरुणपणी असे वाटले की सामाजातील सर्व वर्गात पुरेसे ज्ञान पसरविले म्हणजे सर्व प्रकारचे अन्याय व विषमता आपोआप कोसळून पडतील म्हणून वाणी व लेखणी याच्या साह्याने शॉने इंग्लडातील अखिल जनतेवर ज्ञानाचा मुसळधार पाऊस पाडला. तथापि समाजाची क्रियाशून्यता कमी होत नाही असे त्याला दिसून आले! व्याख्याने-प्रवचने ऐकण्याकडे अथवा निबध-प्रबध वाचण्याकडे लोकाची प्रवृत्ति विशेष नसून रगभूमीकडे त्याची धाव असते, असे त्याला आढळून आल्याबरोबर त्याने आपल्या मताचा प्रचार करण्यासाठी रग-कलेचा आश्रय केला, आणि करमणुकीसाठी जमणाऱ्या सर्व स्त्रीशूद्राना 'ज्ञानी' करून सोडण्याचे त्याने ठरविले. परंतु या नव्या साधनाची उपासना

दोन तपाहून अधिक काळ केल्यानंतरहि आपली इष्टसिद्धि झालेली शॉला आढळली नाही ! शेवटी निराश होऊन त्याने " प्रचलित मानवप्राणी आदर्श-समाजनिर्मितीला स्वभावतःच अपात्र आहे आणि आदर्शसमाजासाठी ' नव-मानव ' ' अतिमानव ' निर्माण करण्याची योजना केली पाहिजे, " अशी मोठी नाटयमय घोषणा केली ! केवळ बुद्धिवादाच्या पराभवाची ही स्पष्ट कबुली आहे माणसामध्ये बुद्धीपेक्षा भावनांना व विकारांना अधिक प्राधान्य आहे, आणि तर्कबुद्धीला झालेले ज्ञान माणसाच्या संकल्पशक्तीला जागृत करू शकत नाही असा याचा निष्कर्ष आहे. अलीकडे पाश्चात्य विचारात बुद्धिवादाविरुद्ध प्रतिक्रिया चालू झालेली दिसते मनुष्याच्या जीवनावर विकाराचे प्रभुत्व असते, आणि त्याच्या बुद्धीवरहि विकाराचाच अमल चालत असल्यामुळे बुद्धिवादाच्या नावाखाली सत्याचे विकृत दर्शनच पसरते, ही गोष्ट पुष्कळ विचारवंताच्या ध्यानी येऊ लागली आहे. माणसाला स्वतःच्या सुखाची इच्छा असली तरी त्याच्या सामान्य प्रेरणा बहुधा बुद्धिविरोधी व बहुनाशी दुःखनिर्मितीलाच कारण होत असतात, असे विचार कित्येक लेखकांनी व्यक्त केले आहेत. उदाहरणार्थ, बर्ट्रँड रसेल यांनी आपल्या विविध ग्रंथांतून सुखी समाज निर्माण करण्याच्या अनेक कल्पनांचा ऊहापोह केलेला आहे, परंतु शेवटी शेवटी त्यांनी हताश होऊन ' मनुष्य हा स्वतःच आपल्या विनाशाची योजना करणारा प्राणी आहे, ' असे उद्गार काढले आहेत !

सामाजिक ध्येयवादाच्या वैफल्यपूर्ण इतिहासाची ही कहाणी कितीहि करुणाजनक असली, तरी मानवी अंतःकरणातील पूर्णतेची ओढ मनुष्याला कधीच संपूर्णतया निराश करू शकणार नाही. आणि आजपर्यंतच्या प्रयोग-वीरांना कितीहि अपयश आलेले असले तरी नवे प्रयोगवीर नव्या उत्साहाने पुढे आल्याशिवाय राहणार नाहीत. इतकेच काय, पण प्रत्येक अपयश हे मनुष्याच्या ध्येयवादाला अधिकाधिक शुद्ध करीत जाईल एकंदर सृष्टीच्या इतिहासात मानवसंस्कृतीचा प्रयोग चालू झाल्याला अगदीच थोडा काळ लोटला आहे सापेक्ष दृष्टीने पाहता मानवसमाज अद्यापि बाल्यावस्थेतच आहे आपल्या जीवनातील आंतरिक प्रेरणांचे अद्यापि त्याला यथार्थ आकलन झालेले नाही. यामुळे त्याला सुखाची इच्छा असूनहि सुखाचा मार्ग बरोबर दिसत नाही, आणि क्वचित् दिसला तरी त्याच्यावर स्थिरपणे पावले टाकीत

जाणे त्याला साधत नाही मानवाच्या हृदयात जी पूर्णतेची प्रेरणा आहे ती त्याच्या दैवी अंशाची द्योतक आहे परंतु अद्यापि त्या दैवी अंशाची त्याच्या अखिल जीवनात प्रभुता प्रस्थापित झालेली नाही खलिल जिब्रॉं याने आपल्या 'Prophet' ('जीवनद्रष्टा') नामक ग्रंथामध्ये म्हटल्याप्रमाणे,

"Much in you is still man,
and much in you is not yet man,
But a shapeleas pigmy, that
walks asleep in the mist
searching for its own awakening"

मानवामध्ये अद्यापि अमानव अंशाचा मोठ्या प्रमाणात वावरत आहे, आणि या अमानव अंशाला मानवतेचे स्वरूप घेण्यासाठी अद्यापि दीर्घ तपस्येतून जावे लागणार आहे 'विधात्याच्या हातो' रवींद्रनाथांनी म्हटल्याप्रमाणे, 'काल अनंत आहे त्याला त्वरा नाही.'

"प्रतीक्षा करिते जानो । शतवर्ष धरे
एकटि पुष्पेर कलि फुटाबार तरे
चले तव धीर आयोजन।'

विधात्याला विकासासाठी वाट पाहण्याची शक्ति असते, एक पुष्पकळी फुलविण्यासाठी त्याची शेकडो वर्षे धिम्मेपणाने तयारी चाललेली असते पण माणसाला धीर नसतो त्याला फळाचा आस्वाद घेण्याची आतुरता असते, आणि त्यामुळे तो अत्याचारी व अश्रद्ध बनू लागतो ध्येयवादाला जर कशाचे भय असेल तर ते त्याच्या स्वतःच्याच हृदयातील उतावळेपणाचें आहे मानवी पूर्णतेचे कार्य हे कोणा एकाच व्यक्तीचे नाही ते विधात्याचे विश्वकार्य आहे ते यथाकाली सफल झाल्याशिवाय राहणार नाही ध्येयवादी पुरुषाने आपल्या हृदयातील प्रेरणेशी सत्यनिष्ठ राहून आपल्या शक्त्यनुसार स्वकर्तव्य बजाविले म्हणजे त्याचे कार्य सपले. तात्कालिक फळाच्या मोहाने त्याने आपली श्रद्धा नासविणे बरे नाही प्रस्तुत अर्थानेच 'अनासक्तियोगा'चा उपदेश सर्व तत्त्वज्ञानी केलेला आहे.

न्याय व सुख याचा जर तत्त्वत अविरोध असेल, तर आज ना उद्यां

सामाजिक जीवनात या सिद्धान्ताची सर्वांना प्रतीति अवश्य झालीच पाहिजे. परतु ही प्रतीति होण्यासाठी समाजाला अनेक आघात सोसावे लागतील. त्याच्या हृदयातील उन्मादी विकाराना विवेकांकित होण्याला अनेक आपत्तीतून कदाचित् जावे लागेल समाजातील ज्ञानी व्यक्तींना समाजदुःखासबधी कितीहि कळवळा वाटला तरी त्याना अपेक्षित असलेली समाजव्यवस्था त्वरित मूर्त स्वरूपास येणार नाही केवळ शाब्दिक उपदेशाने विशेष कार्य होणार नाही , इतकेच काय, पण प्रत्यक्ष उदाहरणानेहि ताबडतोब काही मोठे बदल होण्याचा सभव नाही, तथापि ध्येयवादी लोकाच्या कृती–उक्तीमुळे समाजाच्या अतर्मनावर शुभ सस्कार सतत होत राहतात, आणि शेवटी त्यामुळेच समाजाचा हृदयपालट घडून येणार आहे समाजसुखासाठी समाजशुद्धीची आवश्यकता आहे, आणि सामाजिक शुद्धीसाठी समाजात मगल भावनाचे सतत आवाहन होण्याची आवश्यकता आहे यासाठी ‘ बुडती हे जन न देखवे डोळा, म्हणोनी कळवळा ’ येणे हा जरी आवश्यक गुण असला तरी समाजहितासाठीसुद्धा ‘ पिटून काढितो या लोका, ’ ही वत्ति कधीहि उपकारक होणार नाही कारण कोणत्याहि हिसात्मक साधनानी समाजाच्या अतर्मनाची शुद्धि घडून येत नाही, उलट, अहकार व अविवेक यानाच उसळी येते हिसा म्हणजे केवळ पाशवी शक्तीचा उपयोग, असा अर्थ समजण्याचे कारण नाही नैतिक मूल्याची श्रेष्ठता प्रतिपादिताना जर अवहेलना व असहिष्णुता याचा अगीकार केला गेला तर हिसेचाच आश्रय होतो यामुळे समाजशुद्धीच्या प्रयत्नात दडधारी राजे, कर्मठ शास्त्रज्ञ अथवा उतावळे शस्त्रवीर सदा विफल होत आलेले आहेत; आणि अक्रोधाने क्रोधाचा, साधुतेने असाधुतेचा अथवा अहिंसेने हिसेचा प्रतिकार करणाऱ्या प्रेमळ सतानाच समाजाच्या मानसिक जीवनात अढळ पद प्राप्त झाले आहे

सामाजिक ध्येयवादाच्या इतिहासात असा एक विरोधाभास नित्य आढळून आलेला आहे की, बुद्धिमान व साधनसपन्न असा वर्ग हळूहळू ध्येयजीवनापासून भ्रष्ट होत जातो त्याची न्यायबुद्धि मलिन अथवा विकृत होऊ लागते, आणि त्याची जीवनश्रद्धाहि लोपते परतु बुद्धिहीन व साधनहीन सामान्य जनतेला ध्येयवादाचा आचार सर्वस्वी साधला नाही तरी तिच्या हृदयात ध्येयवादी पुरुषाविषयी भक्ति वास करीत असते; आणि सामाजिक

सत्ययुगाच्या प्रतिष्ठापनेविषयीच्या श्रद्धेचा दीप कधीहि मालवत नाही सामाजिक न्यायप्रस्थापनेवरच व्यावहारिक सुखाची निर्मिति अवलबून असल्या-मुळे सामान्य जनतेला ही श्रद्धा अपरिहार्यच आहे, हे सहज दिसून येण्यासारखे आहे.

प्रत्यक्ष जीवनातील अर्थकामप्राप्ति व परोक्ष जीवनातील मोक्षसिद्धि या दोनहि अगाचे साधन धर्म हेच आहे कारण, प्रत्यक्ष व परोक्ष ही एकाच जीवनाची दोन अगे आहेत. ती दोनहि अगे तत्त्वतः अविरोधीच असली पाहिजेत. धर्माचे सशोधन व सस्थापन करणारे जीवनाचार्य मोक्षाच्या अत-रंगाकडे स्वभावतच वळलेले असल्यामुळे त्याच्या बाबतीत धर्मसाधना ही निष्काम व निरपेक्ष जीवनवत्ति झालेली असते त्यातच त्याना निरतिशय आनदहि लाभत असतो. हा आनद आपल्या बाधवानाहि उपलब्ध करून द्यावा अशी त्याना सहजच तळमळ वाटू लागते सामान्य लोक आपल्या व्यावहारिक जीवनातील अर्थकाम-विषयक प्रश्नानच धडपडत असले, तरी त्याना त्या प्रश्नाचा उलगडा करण्यासाठी धर्माचा-न्यायाचा आश्रयच करावा लागतो. यामुळे ते व्यावहारिक साधन म्हणून वरील जीवना-चार्यांच्या उपदेशाचा पुरस्कार करितात. तथापि अद्यापि सपूर्ण अहिंसेने जीवनातील सर्व व्यवहार सिद्ध करून दाखविणारा श्रेष्ठ जीवनाचार्य निर्माण व्हावयाचा आहे, आणि व्यवहाराचा मोक्षाशी मेळ दाखवून देणारा धर्महि अद्यापि सिद्ध व्हावयाचा आहे सत्याग्रहाचा मार्ग हा या दृष्टीने पाहाता सपूर्ण जीवन-धर्माचा एक महान् प्रयोग आहे, आणि म. गाधी हे या धर्माचे पहिले आचार्य आहेत, असे म्हणावयास प्रत्यवाय नाही लोकनायक अण्यानी महात्माजीना चालू सत्याग्रह-सघर्षाच्या प्रारभी व्यासाचा वरील श्लोक म्हणून दाखविला होता, आणि अहिंसाधर्माची विफलता सिद्ध करण्याचा प्रयत्न केला होता म गाधीनी त्यावर दिलेले उत्तर खऱ्या ध्येयवाद्यानी हृद-याशी जतन करून ठेवण्यासारखे आहे 'अर्थकाम मिळवून देणाऱ्या धर्माचे लोक का बरे सेवन करीत नाहीत ?' या व्यासाच्या उद्‌गारावरून धर्म-वादाची आवश्यकताच सिद्ध होत आहे, आणि समाज-कल्याणाची चिता वाहणाऱ्याने धर्मालाच चिकटून राहिले पाहिजे, असा म. गाधीनी व्यासाच्या आक्रोशाचा अर्थ केला आहे

## १. ज्ञान धर्माला व नीतिला पोषक नाहीं काय ?

पृ. २. **नासदीय सूक्त** : ऋग्वेदाच्या दहाव्या मंडळांतील १२९ वें सूक्त. सृष्टीच्या आरंभीं एकजिनसी द्रव्य होतें. सत् वा असत्, प्रकाश वा अंधार असें कोणतेंच नांव त्यास देतां येत नाहीं. तें एकलेंच अपरंपार शक्तीनें स्वयंप्रेरणेनें स्फुरत होतें असें या सूक्तांत सांगितलें आहे.

पृ. २. **मार्टिन ल्यूथर** : ( १४८३-१५४६ ) जर्मन धर्मसुधारक. पोपनें माजविलेल्या बुवाबाजीविरुद्ध बंड करून यानें प्रॉटेस्टंट पंथाचा पुरस्कार केला.

पृ. २. **कॅलव्हिन** : ( १५०९-१५६४ ) समाजसुधारक व प्रॉटेस्टंटपंथप्रवर्तक. ल्यूथरशीं तो काहीं काळ सहमत होता. परंतु पुढें मतभेद झाल्यावर त्याने निराळा पंथ काढला. धर्ममतासाठीं त्याला वारंवार देशांतर करावें लागलें.

पृ. २. **वेस्ले जॉन** : ( १७०३-१७९१ ) प्राध्यापकाचा दर्जा मिळाल्यावरहि आपलीं धर्ममतें प्रसृत करण्यासाठीं हा धर्मोपदेशक झाला. त्याच्या पंथास मेथॉडिस्ट पंथ म्हणतात.

पृ. ४. **मेचानिकॉफ** : ( १८८५-१९१६ ) रशियन प्राणिशास्त्रज्ञ. त्यानें श्वेतरक्तगोलकासंबंधीं संशोधन केलें.

पृ. ६. **कपिल** : सांख्यवाद: संसार दुःखमय आहे. ज्ञान हा परमपुरुषार्थ असून त्यामुळेंच मुक्ति प्राप्त होते. हा सांख्यवाद कपिल मुनीनें सांगितला.

पृ. ६. **हेगेलचें ॲबसोल्यूट** : ( १७७०-१८३१ ) जर्मन तत्त्ववेत्ता. जगांतील वस्तूंचा नुसता बुद्धीशीं संबंध आहे. जग हें त्या बुद्धीचेंच प्रकटीकरण आहे. भौतिक किंवा जड असें जग नाहीच. हा त्याच्या तत्त्वज्ञानाचा आशय आहे.

पृ. ७. कोंट : ऑगस्ट कोंट ( १७९८-१८५७ ) फ्रेंच तत्त्ववेत्ता. प्रत्यक्षज्ञानवादी तत्त्वज्ञानाचा हा पुरस्कर्ता होता. तो निरीश्वरवादी होता.

पृ. ७. मिल : जॉन स्टुअर्ट मिल्ल : (१८०६-१८७३) उपयुक्तता वादाचा प्रवर्तक. प्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ व स्त्रीस्वातंत्र्यवादी.

पृ. ७. ब्रॅडलॉ : चार्लस ब्रॅडलॉ : ( १८३३-१८९१ ) हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याचा पुरस्कर्ता : पार्लमेंटचा सभासद.

पृ. १०. डार्विन : विकासवाद : चार्लस रॉबर्ट डार्विन (१८०९–१८८२ ) या प्रसिद्ध आंग्ल सृष्टिशास्त्रज्ञाचें असें मत होते कीं, जीवनार्थ कलहांत योग्य तेच प्राणी टिकतात. अयोग्य नष्ट होतात. या तत्त्वाप्रमाणे जीवसृष्टींत उत्क्रांति होत होत मनुष्य निर्माण झाला.

पृ. १३. ह्यूम : ए. ओ. ह्यूम ( १८२९–११९१२ ) सरकारी अधिकारावरून निवृत्त झाल्यावर १८८२ मध्यें यानीं राष्ट्रीय सभा स्थापनेस सहाय्यक अशी चळवळ केली. १८८३ सालीं त्यानीं स्थापिलेली इंडियन नॅशनल् लीग या संस्थेतर्फेच २८–१२–१८८५ रोजीं राष्ट्रीय संस्थेचे पहिले अधिवेशन झाले.

पृ. १३. सी. एफ्. अँड्र्यूज : ( १८७१–१९४० ). महात्माजींचे परम आंग्ल मित्र. दक्षिण आफ्रिकेतील सत्याग्रहात यानीं गांधीजींबरोबर भाग घेतला होता. हिंदी जनतेने त्याना ‘ दीनबंधु ’ म्हणून गौरविलें.

पृ. १४. खाल्डियन : बाबिलोनियाच्या दक्षिणेकडील खाल्डीया प्रदेशांतील लोक. त्यानीं प्राचीनकाळीं मोठे वैभव मिळविलें. ते अनेक विद्यात पारगत होते.

पृ .१४. आसिरियन : टायग्रीस नदीवरील अॅशुर गांवाभोवतालच्या प्रदेशातील लाक, इ. स. पू. ५०० च्या सुमारास त्यांनीं मोठें साम्राज्य स्थापिलें होतें.

## २. ग्रहणें

पृ. १. आर्यभट्ट : इ. स. ४७६ च्या सुमारास होऊन गेलेला आद्य भारतीय ज्योतिष शास्त्रज्ञ हा केरळ प्रांतीं होऊन गेला. आर्यसिद्धांत हा त्याचा प्रसिद्ध ग्रंथ. त्याचें आरबी भाषेंतहि भाषांतर झालें होतें.

पृ. २१. ब्रम्हगुप्त (५९८–६६५) हा भारतीय ज्योतिषी गुजराथेंत भिनमाळ येथे होऊन गेला. तो स्वतः वेध घेऊन शोध करी. तो आद्य भारतीय बीजगणितकारहि आहे.

पृ. २७ आईन्स्टाइनचा सापेक्षतावाद : एकच भौतिक घटना दोन निरीक्षकांनीं पाहिली तर दोघांसहि ती घटना एकाच भौतिक नियमाप्रमाणे झालेली दिसेल, मग सापेक्षतः त्या घटनांची गति कशीहि असो हा सिद्धांत आईन्स्टाइन या शास्त्रज्ञानें १९१५ सालीं मांडला. त्याचप्रमाणें स्थल आणि काल हीं परस्परांपासून स्वतंत्र नाहीत. हाहि सापेक्षतावादाचाच एक सिद्धांत आहे.

## ३. बुद्धजयंति

पृ. ३०. महाभिनिष्क्रमण : गौतमबुद्धानें केलेला गृहत्याग

पृ. ३२. पांच शिष्य : वाराणशी येथील श्रीमंत व्यापाऱ्याचा मुलगा यश व त्याचे चार मित्र विमल, सुबाहु, पूर्णजित व गवांपति हे बुद्धाचे पहिले पांच शिष्य.

पृ. ३७. पलपैतृक : श्राद्धाच्या दिवशीं स्वयंपाकात मांसाचा उपयोग करणें ( पल–मांस ).

वषट्कार : आहुति देताना ' वौषट् ' हा शब्द असलेला मंत्र म्हणणे.

पृ. ३९. क्वेकर : सोसायटी ऑफ फ्रेंडस या नांवाच्या ख्रिस्ती धर्मपंथाचे अनुयायी. १६४७ सालीं जॉर्ज फॉक्स यानें हा पंथ काढला. या पंथाचे लोक बाप्तिस्मा, प्रभुभोजन इत्यादि बाह्यसंस्कार मानीत नाहींत प्रार्थना, अंतःस्फूर्ति यावर यांचा भर आहे.

पृ. ३९. चार सत्यें: १ कायानुदर्शन (शरीर अपवित्र असल्याची जाणीव). २ वेदनानुदर्शन ( विषय हे दुःखमय आहेत ही भावना ). ३ चित्तानुदर्शन ( चित्त चंचल आहे ही जाणीव ). ४ धर्मानुदर्शन ( संसार नाशवंत आहे ही जाणीव ).

पृ. ३९. आठ कर्मभाग : १ सम्यक् दृष्टि, २ सम्यक् संकल्प, ३ सम्यक् वाचा, ४ सम्यक् कर्म, ५ सम्यक् आजीव, ६ सम्यक् व्यायाम, ७ सम्यक् स्मृति, ८ सम्यक् समाधि हाअष्टांगिक कर्ममार्ग.

## ४. अर्जुनाचा वेडेपणा

पृ. ४३. न कांक्षे विजयं ०—गीता १—३२

पृ. ४४. क्लैब्यं : श्रीकृष्ण वचन : क्लैब्यंमा स्म गमः पार्थ. गीता. २—३

पृ. ४६. एतान्न हन्तुमिच्छामि०—गीता १—३५

पृ. ४६. भुंजीय भोगान् : गीता २-५

पृ. ४८. अहो बत महत्पापं : गीता १-४५

पृ. ४८. नरके नियतं वासो०—गीता १-४४

पृ. ५१. न चैतविद्म : कतरन्नो : गीता २-६. ( आम्ही जिंकूं कीं ते जिंकतील ) यापैकीं कोणती गोष्ट विशेष श्रेयस्कर ते आम्हांस कळत नाहीं.

## ६. अजान वृक्षाच्या सावलींत

पृ. ६७. पिपीलिका मार्ग : ( पिपीलिका-तांबड्या रंगाची लहान मुंगी. ) समाधि साधण्याची एक पायरी. विरक्तीनें इंद्रियांचें दमन करणें.

## ७ समाजशास्त्रांतील विवेकवाद

पृ. ७४. **बादरायण** : बादरायण व्यास यानें ब्रम्हसूत्रें व गीता हीं रचिलीं असावीत. तो खि. पू. ५००च्या सुमारास झाला असावा. त्याच्या ब्रह्मसूत्रात उपनिषदातील अध्यात्मसिद्धांताचे विवेचन आहे.

पृ. ७४. **जैमिनी** : व्यासांचा शिष्य. सामवेदाचा अभ्यासक. यानें पूर्वमीमांसा मत स्थापन केले. ती याची विशेष कामागिरी होय. वैदिक कर्म व यज्ञ याचें महत्त्व त्याच्या ग्रंथांत वर्णिलें आहे.

पृ. ८२. **कालेय किंवा कालिय** : हा नाग एका बेटात राहता असे. याला पांच तोंडें होतीं. गरुडाच्या भीतीने तो यमुनेच्या डोहांत दडला. कृष्णानें त्याचें ‘ मर्दन ’ केले.

पृ. ८५. **आपस्तंबसूत्र** : आपस्तंब ऋषीनें श्रौतसूत्र, गृह्यसूत्र, धर्मसूत्र इत्यादि १४ धर्मग्रंथ लिहिले आहेत.

पृ. ८६. **याज्ञवल्क्यस्मृति** : मनुस्मृतीप्रमाणेंच याज्ञवल्क्य ऋषींची स्मृति मान्यता पावली आहे. हिचे आचार, व्यवहार व प्रायश्चित्त असे भाग आहेत. ती खिस्ती शकाच्या ११ व्या शतकात रचिली गेली असावी.

पृ. ८८. **बौद्धायन** : श्रौत, गृह्य आणि धर्म या तीन सूत्राचा कर्ता. त्याच्या धर्मसूत्रावरून तत्कालीन समाजविचाराच्या संकुचितत्वाची कल्पना येते.

## ८. सत्य आणि अहिंसा

पृ. ८९. **रौलॅट ॲक्ट** : १९१८ सालीं महायुद्धाच्या वेळीं सरकारनें विशेषत: पंजाबकडे गांधींची चळवळ जाऊ नये म्हणून सभाबंदी कायदा केला. ‘काळा कायदा’ म्हणून जनतेनें त्या कायद्याविरूद्ध सत्याग्रह-युद्ध पुकारले.

पृ. ९०. **बारडोली सत्याग्रह** : १९२१ सालीं बारडोली तालुक्यांत करबंदीची चळवळ गांधींनीं सुरू केली. त्यावेळीं युवराजाच्या आगमनप्रसंगीं चौरीचुरा येथे दंगा झाला. म्हणून ही चळवळ गांधींनीं एकदम तहकूब केली.

## ९ आपल्या पूर्वजांचा परिचय करून देणारा चार्लस डार्विन

पृ. १००. **पास्कल** : ( १६२३–१६९२ ) फ्रेंच तत्त्ववेत्ता, गणितशास्त्रज्ञ आणि धर्मविज्ञानी. वातावरणाचें वजन हा त्याचा एक महत्त्वाचा शोध होय.

पृ. १०१. **होल्म्स** : ( १८०९–१८९४ ) अमेरिकन ग्रंथकार. तो शारीरशास्त्राचा प्राध्यापक होता. त्यानें विवेचनात्मक कांहीं ग्रंथ लिहिले आहेत. तो कवि व कादंबरीकारहि होता.

पृ. १०१. **एलिझाबेथ ब्राउनिंग** : ( १८०९–१८६१ ) आंग्ल कवयित्री. रॉबर्ट ब्राउनिंग याची पत्नि. लहानपणींच अपघातानें शारीरिक दुबळेपण आलें असताहि तिनें ग्रीक व लॅटिन वाङ्मयाचा अभ्यास करून १७ व्या वर्षींच काव्यप्रातांत स्थान मिळविलें.

## १० विज्ञान आणि जीवननिष्ठा

पृ. ११७. **रसेलचा वास्तववाद** : बाह्य वस्तूचें ज्ञान अंत:स्फूर्तीने ताबडतोब होतें हा मुख्य सिद्धांत असलेला वाद. बर्ट्रांड रसेल हा याचा प्रवर्तक होय.

पृ. १२०. **विल्यम जेम्स** : ( १८४२–१९१० ) अमेरिकेन मानसशास्त्रज्ञ आणि तत्त्ववेत्ता.

पृ. १२०. **महावीर** : ( खि. पू. ५९९ ) जैन धर्माचा प्रवर्तक. तो उच्च सरदार कुलांत जन्मला. वयाच्या ३० व्या वर्षीं सर्वसंगपरित्याग करून बारा वर्षे कडक तप करून त्यानें इंद्रियदमन केलें. वयाच्या ४२ व्या

वर्षी त्याला केवलज्ञान झालें. मम जिंकणारा म्हणून त्यास ' जिन ' व त्याच्या अनुयायास जैन हें नांव पडलें. वयाच्या ७२ व्या वर्षी तो मरण पावला.

## ११ प्रचंड शक्तीचा आवेश

पृ. १३०. भाण, प्रहसन : भाण हा संस्कृत नाटकाचा प्राचीन प्रकार होय. प्रहसन हाहि प्राचीन हास्यरसप्रधान नाट्यप्रकार आहे. त्यातील कथानकात खालच्या दर्जाचे व्यावहारिक जीवन असतें.

## १२ महाराष्ट्रांतील औद्योगिक क्रांति

पृ. १३७. विल्यम कॅकस्टनः ( १४२२-१४९१ ) छापण्याच्या कलेचा आग्ल संशोधक. १४७६ सालीं यानें छापलेलें पुस्तक ते इंग्लिश भाषेतील पहिलें छापील पुस्तक होय.

पृ. १४२. पैसाफंड : १८७३ सालापासून मुंबई येथें ' सार्वजनिक पै फंडाची पेटी ' ही कल्पना अताजी दामोदर काळे यानीं काढिली. त्यातूनच टिळकानीं १९०४ सालीं ' पैसाफंड ' कमिटीची स्थापना केली. पैसाफंड हा देशाचा औद्योगिक निधि मानला जाऊ लागला. तळेगांव येथे निघालेला काचकारखाना हें या चळवळीचे मोठें आद्य यश होय.

## १३ पंढरी

पृ. १५२. सुंदर तें ध्यान : ( १ ) सुंदर तें ध्यान उभें विटेवरी ।
कर कटावरी ठेवूनीया ॥
( २ ) सुकुमार साजिरीं ।
कैसीं पाउलें गोजिरीं वो ॥

तुकारामाने विठ्ठलमूर्तीचें वर्णन ज्या अभंगात केलें आहे त्यापैकीं दोन चरण निरनिराळ्या अभगातील आहेत.

पृ. १५८. कान्-फू-त्से : ( ख्रि. पू. ५५१-४७८ ) चीनमधील नीतिधर्म व राजधर्म यांचा संप्रदायप्रवर्तक.

पृ. १५८. झरतुष्ट्र: हा प्रसिद्ध धर्मसंस्थापक ख्रि. पू. ९ व्या शतकांत होऊन गेला. धर्मप्रसारासाठीं राजा कै. गुस्ताप यांच्याकडे गेला होता. आरंभीं सनातन्याच्या चिथावणीवरून राजानें त्यास कैदेंत टाकलें परंतु त्यानें आपल्या अलौकिक सामर्थ्यानें शेवटीं राजास आपला पंथ स्वीकारावयास लाविलें.

पृ. १५९. युटोपिया: काल्पनिक आदर्श राज्यपद्धती. टॉमस मूर यानें याच नावाच्या ग्रंथात एक काल्पनिक प्रदेशास युटोपिया म्हटलें आहे. आदर्श राज्यपद्धतीचें ते वर्णन जवळ जवळ अव्यवहार्य असल्यानें युटोपिया हा शब्द मनोराज्य अशा अर्थी योजण्याचा प्रघात पडला.

पृ. १६२. खलिल जिब्रॉं: (१८८३-१९३१) अरब ग्रंथकार. विश्वभर अमेरिकेंत सर्व जीवन गेल्यामुळें याची ख्याति पसरणे सुलभ झालें. सामाजिक आणि धार्मिक बाबतींत याचे विचार अतिशय क्रांतिकारक आहेत. त्याचें लेखन रूपकात्मक असून विचारप्रवर्तक आहे.